न साहित्यसाधना १

नु

मा

# चरित्र, आत्मचरित्र, टीका

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २०८

७०८९०

भिन्न भिन्न वाङ्मयप्रकारांची सोपपत्तिक व शास्त्रीय चर्चा करणारें लिखाण मराठींत बहुधा नाहीच. कादंबरी, लघुकथा व नाटक या विशेष लोकप्रिय वाङ्मयप्रकारांवरच काय तें थोडें बहुत लिखाण आजवर झाल्याचें दिसून येतें. पण चरित्र, इतिहास, टीका इ० वाङ्मयप्रकार लोकप्रियतेंत कमी असले म्हणून महत्त्वाने कमी आहेत, असें मुळीच नाही. अशा वाङ्मयप्रकारांचें मिक व सोपपत्तिक विवेचन करणारें ़तक वाचकांस स्वागतार्ह वाटेल.

थ

थ

मा

ला

१८

REFBK-0006272

किंमत दोन रुपये

लेखक,
प्रा. अ. म. जोशी
प्रा. प्र. ब. माचवे

# प्रा. अवधूत महादेव जोशी
एम्. ए.

मागे 'प्रतिभा' पाक्षिकांत चरित्रवाङ्मया-वर मार्मिक व वैशिष्ट्यपूर्ण लेख येत असल्याचें पुष्कळ वाचकांच्या स्मरणांत असेल. त्या लेखांचे लेखक प्रा. अ. म. जोशी यांनीच 'नवभारत ग्रंथमाले'करितां चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकारांवर प्रबंध लिहावे, ही गोष्ट सर्वांस अगदी योग्य अशीच वाटेल. प्रा. जोशी हे तरुण आहेत. त्यांचा जन्म १९०६ सालीं झाला व शिक्षण पुणें, जुनागड व मुंबई येथे झालें. मराठी हा प्रमुख विषय घेऊन ते १९३३ सालीं एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी आपल्या लेखनास यापूर्वीच तीन चार वर्षें सुरवात केली होती. यांची वाङ्मयसेवा विविध प्रकारची असली तरी मुख्यतया वाङ्मयविवेचक या नात्यानेच लोक त्यांस ओळखतील असें वाटतें. प्रख्यात हिंदी लेखक श्री. जैनेन्द्रकुमार यांच्या 'त्यागपत्र' या कादंबरीचा यांनी मराठींत केलेला अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. हे सध्या उज्जैनच्या माधव कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक आहेत.

नवभारत ग्रंथमाला

१८

साहित्यसाधना १

# चरित्र, आत्मचरित्र आणि टीका

# नवभारत ग्रंथमालेचा

## एक समयोचित आणि उद्बोधक उपक्रम

जगड्व्याळ महायुद्धाच्या कराल स्वरूपामुळे सर्व वातावरण धुंद व धूसर होऊन गेलें आहे. घरीं व दारीं, मनांत व जनांत लढाईखेरीज दुसरा विषय नाही व युद्धजन्य आपत्तीखेरीज दुसरी चिंता नाही. शांततेच्या काळीं जे अतोनात महत्त्वाचे वाटले असते, अशा विषयांकडे कोणाचेंही लक्ष जात नाही. 'नवभारत ग्रंथमाला' ही अर्थात् या परिस्थितीविषयीं उदासीन अथवा बेफिकीर राहूं शकत नाही. तसें राहणें तिचें ब्रीदच नाही.

युद्धाच्या नांवावर वाटेल तसलें उथळ लिखाण खपवावें, असें मात्र मालेच्या चालकांना वाटणें शक्यच नव्हतें. सध्याच्या परिस्थितीचें मार्मिक व मूलग्राही उद्घाटन करणारे ग्रंथ मिळविण्यासाठी मालेच्या चालकांचा किती तरी दिवस कसून प्रयत्न चालू आहे. सांगावयास आनंद वाटतो की या प्रयत्नांत मालेच्या चालकांस यश आलें आहे. सर्व जगभर हा भयंकर वणवा कां पसरला आहे, जगाच्या राजकारणांत दारूचीं कोठारें कोठेकोठे व कसकशीं भरलेलीं होतीं, निरनिराळ्या राष्ट्रांच्या हितसंबंधांच्या गुंतागुंती कशा झालेल्या होत्या, याचें अत्यंत मार्मिक व मूलग्राही विवरण करणारें

## जगाच्या राजकारणांत

हें अभिनव विचारसरणीचें पुस्तक यानंतर मालेमधून प्रसिद्ध होईल. मालेने आजपर्यंत मिळविलेली कीर्ति वाढविणारें हें पुस्तक आहे, अशी प्रत्येक वाचकाची खात्री पटल्याखेरीज राहणार नाही. पुस्तकाचीं पृष्ठें नित्यापेक्षा वाढणार असल्यामुळे व पुस्तकांत अनेक नकाशे असल्यामुळे सध्याच्या बिकट परिस्थितींत किंमत वाढवावी लागेल अशी भीति वाटते. कायम ग्राहकांस मात्र नेहमीच्याच किमतींत देण्यांत येईल.

**आपण मालेचे कायम ग्राहक नसल्यास तावडतोब व्हा.**

युद्धविषयक ग्रंथांस वाव देण्यासाठी प्रा. कनहट्टींचा 'भाषाशास्त्र' हा ग्रंथ तूर्त मागे ठेवण्यांत आला आहे.

# चरित्र, आत्मचरित्र

आणि

# टीका

लेखक

अवधूत महादेव जोशी, एम्. ए.

प्रभाकर बळवंत माचवे, एम्. ए.

REFBK-0006272

सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड,

नागपूर.

शके १८६४ ] किंमत दीड रुपया [ सन १९४२

मुद्रक व प्रकाशकः—पां. ना. बनहट्टी, बी. एस्सी.,
व्यवस्थापक, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर आणि
आणि
डायरेक्टर, सुविचार प्रकाशन मंडळ, लि० धनतोली, नागपूर.


# ए का व ळी

## प्रा. श्री. ना. बनहट्टी

यांनी लिहिलेल्या व्यक्तिचरित्रात्मक लेखांचा संग्रह.

वाङ्मयक्षेत्रांत थोर कार्य केलेल्या व्यक्तींच्या जीवनाचें व कार्याचें समालोचन करणारे आठ लेख या पुस्तकांत समाविष्ट केले आहेत. या व्यक्तींमध्ये अण्णासाहेब किर्लोस्कर, खाडिलकर, डॉ. केतकर या विख्यात महाराष्ट्रीयांप्रमाणेच बंकिमचंद्र चतर्जी व महावीरप्रसाद द्विवेदी या परप्रांतीय वाङ्मयप्रभूंचाही समावेश झाला आहे.

पुस्तकाचीं पृष्ठें २०० च्या वर झालेलीं असून एकखेरीज करून बाकीच्या सर्व व्यक्तींचीं चित्रें देण्यांत आलीं आहेत.

असा हा निरुपम सुंदर ग्रंथ सध्याच्या अतिशय बिकट परिस्थितींतही केवळ १॥ रु. किंमतीस देण्यांत येत आहे.

आपल्या संग्रहीं हा ग्रंथ असावयास पाहिजे.

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०
नागपूर.

# निवेदन

या छोटेखानी पुस्तकांत चरित्र, आत्मचरित्र आणि टीका अशा तीन वाङ्मयप्रकारांचें तात्त्विक दृष्ट्या विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. या तीन वाङ्मयप्रकारांचा परस्परसंबंध काय आणि ते एका पुस्तकांत गोवण्यांत औचित्य काय, असा प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. इंग्रजी भाषेंत Art and Craft Series या नावाच्या ग्रंथमालेंत असेंच वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांचें विवेचन केलेलें असतें. मालेच्या एका पुष्पांत कोणतेही दोन किंवा तीन वाङ्मयप्रकार सोई-प्रमाणें घातलेले असतात. त्या धर्तीवर हे तीन वाङ्मयप्रकार या पुस्तकांत घातले आहेत.

प्रा. फडके यांनी 'प्रतिभासाधन' या ग्रंथांत सामान्यतः ललित वाङ्मयासंबंधीं व कादंबरी, नाटक आणि लघुकथा या तीन वाङ्मय-प्रकारांसंबंधीं तात्त्विक विवेचन केलेलें आहे. आमच्या ग्रंथांत फडके यांनी वगळलेल्या प्रकारांपैकी तीन प्रकार आधी घेतले आहेत. पुढे जमल्यास काव्य, एकांकिका, प्रवासवर्णन इत्यादि कांही वाङ्मयप्रकारांचें असेंच तात्त्विक विवेचन करण्याचा मानस आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्या-सास मदत म्हणून या निबंधाचा उपयोग होईल अशी आशा आहे.

उज्जयिनी
ता. १ मे १९४२

विनीत
अ. म. जोशी
प्र. ब. माचवे

---

['साहित्यसाधना' हा सामान्य मथळा प्रस्तुत ग्रंथास ज्या योजनेनुसार दिला आहे तिचें स्पष्टीकरण पुढच्या पृष्ठावर प्रकाश-कांनी केलें आहे, तें जरूर पहावें.]

# साहित्यसाधना

प्रस्तुत ग्रंथास साहित्यसाधनेचा पहिला खंड म्हणून गणण्यांत आलें आहे. काव्य, कादंबरी, नाटक, लघुकथा, निबंध, इतिहास, चरित्र, इत्यादि वाङ्मयप्रकारांचें तंत्रदृष्टया सोपपत्तिक विवेचन करणारे ग्रंथ मराठींत बहुधा नाहीतच. ही उणीव भरून काढण्यासाठी भिन्न भिन्न वाङ्मयप्रकारांचें सर्वांगपूर्ण व पायाशुद्ध विवेचन करणारे ग्रंथ तज्ज्ञ लेखकांकडून लिहवून घेऊन ते प्रसिद्ध करण्याचें आम्ही योजिलें आहे. प्रस्तुत ग्रंथ या मालिकेंतील पहिला ग्रंथ म्हणून आज प्रसिद्ध होत आहे. कादंबरी, नाटक, इतिहास इत्यादि वाङ्मयप्रकारांवरील ग्रंथही अशाच रीतीने 'नवभारत ग्रंथमाले'मध्ये यथावकाश प्रसिद्ध केले जातील. साहित्याचें मार्मिकपणें रसग्रहण करूं इच्छिणारांना हे ग्रंथ बहुमोल वाटतील.

—प्रकाशक.

---

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| निवेदन | ५ |
| चरित्र | ७ ते १०१ |
| आत्मचरित्र | १०२ ते १४७ |
| चरित्र व आत्मचरित्र यांवरील संदर्भ ग्रंथ | १४८ |
| टीका | १४९ ते २०० |
| टीकाशास्त्रावरील संदर्भ ग्रंथ | २०१ |
| सूची | २०२ |

# चरित्र

*"Paint me as I am" said Oliver Cromwell while sitting to young Lely, "If you leave out the scars and wrinkles, I will not pay you a shilling."*

*—Macaulay*

कोणत्याही भाषेंत निरनिराळे वाङ्मयप्रकार ज्या वेळीं साधारण परिपक्व दशेस जाऊन पोचतात त्या वेळीं त्यांसंबंधीं तांत्रिक दृष्ट्या विचार करण्यास सुरवात होते आणि त्या त्या वाङ्मयप्रकाराचें स्वतंत्र तंत्र म्हणून निर्माण होतें. तंत्र म्हटलें की कित्येक लोकांच्या कपाळाला आठ्या पडतात आणि ते म्हणूं लागतात की 'हें तुमचें तंत्रबिंत्र आपल्याला बुवा कांही कळत नाही. लेखनकलेला—किंवा कोणत्याही कलेला—तंत्राच्या चौकटींत अडकवून टाकण्याचा हा काय तुमचा रिकामा कारभार? तिला जरा मोकळेपणाने हातपाय हलवूं द्या की!' तंत्र ही एक पोलादी चौकट आहे; तींत प्रत्येक ललितकृति ठोकून बसविण्यांत येते, आणि ती कृति चौकटींत व्यवस्थितपणें बसली नाही की ती टाकाऊ ठरविण्यांत येते, हा या लोकांचा मोठा गैरसमज आहे. तंत्र म्हणजे शास्त्र. कोणत्याही गोष्टीच्या सर्व अंगोपांगांचा विचार

करून तिच्या स्वरूपासंबंधीं सुव्यवस्थित नियम किंवा सिद्धान्त निर्माण केले म्हणजे त्या गोष्टीचें शास्त्र निर्माण होतें. या दृष्टीने लेखनकलाच काय, पण कोणतीही कला व विद्या, इतकेंच नव्हे तर सुतारकाम, शिवणकाम, बागकाम इत्यादि क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचेंही आपापल्या परीने शास्त्र किंवा तंत्र निर्माण होऊं शकतें. कलेची वा विद्येची जशी जशी वाढ होत जाईल तसा तसा या शास्त्रांत किंवा तंत्रांत बदलही होत जाईल. विशेषत: कलेच्या क्षेत्रांत एखादा असा प्रतिभावान् कलाकार निर्माण होतो की तो कलेला अगदी अभिनव स्वरूप देऊन त्या कलेचें तंत्र पार बदलून टाकतो. अशीं उदाहरणें लेखनकलेच्या क्षेत्रांत तर अनेक दाखवितां येतील. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात इब्सेनसारख्या नाटककाराने नाट्यवाङ्मयाला कसें नवीन स्वरूप प्राप्त करून दिलें हें इंग्रजी भाषेच्या अभ्यासकांस माहीत आहेच. वर्डस्वर्थ आणि कोलरिज् यांनी इंग्रजी कवितेला नवीन वळण लाविलें. आपल्या-कडे तशाच प्रकारची कामगिरी हरिभाऊ आपटे यांनी कादंबरीच्या क्षेत्रांत, आणि केशवसुतांनी काव्याच्या क्षेत्रांत केलेली आहे. कादंबरी, काव्य, नाटक, लघुकथा इत्यादि निरनिराळे वाङ्मयप्रकार आपल्याकडे गेल्या पन्नास वर्षांत इतके वाढले आहेत की प्रत्येकाचें स्वतंत्र शास्त्र किंवा तंत्र निर्माण झालें आहे. या तंत्राला पाहून बिचकण्याचें कांही कारण नाही. भाषेंतून ज्याप्रमाणें व्याकरण मिर्माण होतें त्याप्रमाणें कलेंतून शास्त्र किंवा तंत्र निर्माण होणें अपरिहार्य आहे व त्याचा अभ्यास करण्यापासून कलाकाराचा झाला तर फायदाच होणार आहे.

वाङ्मयकलेंतून निर्माण होणारें शास्त्र, अर्थात् साहित्यशास्त्र, आपल्या देशांत किती जुनें आहे हें संस्कृत वाङ्मयांत विद्यमान असलेल्या अनेक साहित्यशास्त्रविषयक ग्रंथांवरून दिसून येईल. जुन्या मराठी कवींपैकी रामदासांनी दासबोधांत कविता कशी असावी यासंबंधीं विचार केलेला आढळतो. इंग्रजीमध्ये Literary Criticism हें शास्त्र

पुष्कळ पक्वदशेस गेलेलें आहे व इंग्रजीच्या अभ्यासाने मराठी भाषेंतही या शास्त्रांत नवीं नवीं तत्त्वें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत आहे. काव्य, कादंबरी, नाट्य, लघुकथा इत्यादि वाङ्मयप्रकारांवर व सामान्यतः साहित्यशास्त्रावर नवेनवे ग्रंथ निर्माण होत आहेत व वाङ्मयाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाची प्रवृत्ति वाढत आहे. कलेच्या वाढीबरोबर शास्त्राचा अभ्यास वाढतो आणि शास्त्राभ्यासाने कलेला अधिक व्यवस्थित स्वरूप येत जातें, अशीं कला व शास्त्र हीं परस्परोपयोगी होतात.

इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने गेल्या पन्नास साठ वर्षांत जे निरनिराळे वाङ्मयप्रकार वाढीस लागले व ज्यांचें स्वतंत्र शास्त्र किंवा तंत्र निर्माण झालें, त्यांत सर्वांत आबाळ कोणत्या वाङ्मयप्रकाराची झाली असेल तर ती चरित्रवाङ्मयाची होय. काय असेल तें असो, या वाङ्मयप्रकाराला मराठी वाङ्मयांत कधीच महत्त्वाचें स्थान मिळालें नाही, किंवा त्याला विदग्धवाङ्मयाचा प्रकार मानावयाचीही कोणी तयारी दर्शविली नाही. अर्थात् त्याचें शास्त्र निर्माण करण्याचीही कोणी दगदग केली नाही हें ओघानेच येतें. इतिहास हाही असाच एक उपेक्षित वाङ्मयप्रकार झालेला आहे. इतिहास काय किंवा चरित्र काय, त्यांत रचनासौष्ठव, भाषासौष्ठव वगैरे कांही कलात्मक गुण म्हणून लागतात याची आपल्याला जाणीव नसते. इंग्रजी भाषेंत Literary Criticism किंवा 'वाङ्मयविवेचन' या प्रकारांतही योग्य ती कलात्मकता आणण्याचा प्रयत्न चालू आहे हें वाङ्मयविवेचनपर कोणतेंही चांगलें पुस्तक वाचलें असतां समजून येईल. शास्त्रीय ग्रंथ सुद्धा कसा कलात्मक करावा हें पाश्चात्त्य लेखकांपासून शिकावें. आपल्याकडे फक्त प्रा. ना. सी. फडके हे एकच लेखक असे आहेत की ते या दिशेने प्रयत्न करतांना दिसतात. इतर लेखकांच्या बाबतींत शास्त्रीय लिखाण म्हटलें म्हणजे तें इतकें बोजड होतें की वाचावेंसें वाटत नाही. त्यामुळे इतिहास, चरित्र किंवा वाङ्मयविवेचन या प्रकारांत समाविष्ट होणारें कोणतेंही लिखाण दिसलें की तें–

विशेष अभ्यास करणारीं थोडीं माणसें सोडून दिलीं तर—कोणी हातांत धरीत नाही ज्याला त्याला नाटकें, कादंबऱ्या, आणि गोष्टी पाहिजेत. इतिहास, चरित्र वगैरेंचीं पुस्तकें म्हटलीं म्हणजे तीं रुक्ष, जड आणि पांडित्यपूर्ण असावयाचीं हीच कल्पना होऊन बसली आहे. तीं आपली ग्रंथालयाची शोभा वाढविण्याकरितां कपाटांत लावून ठेवलेलीं असावयाचीं. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें राजवाडे व खरे यांनी भरपूर तयार करून दिलीं. त्यांचा जन्मच हा मालमसाला तयार करून देण्यांत गेला व त्यापासून सुंदर रुचकर पाकनिष्पत्ति करावयास त्यांना वेळही झाला नाही. परंतु त्यांच्यानंतर त्या सामग्रीचा उपयोग दुसऱ्यांनी तरी कुणी केला? युरोपांत ह्यूम, गिबन, मेकॉले, कार्लाइल, फ्रूड, ग्रीन वगैरे इतिहासकारांनी जसें इतिहासलेखनाचें तंत्र निर्माण केलें व त्यास कलात्मक स्वरूप दिलें, तसा प्रयत्न मराठी भाषेंत कुणी केला आहे? मेकॉलेने तर प्रतिज्ञापूर्वक असें म्हटलें होतें की, माझीं इतिहासाचीं पुस्तकें इंग्लंडमधील लोकांच्या मेजावरील कादंबऱ्यांचें उच्चाटण करतील! इतक्या निश्चयाने व आत्मविश्वासाने लिहिलेलें लिखाण लोकप्रिय झाल्याशिवाय राहणार नाही. ऐतिहासिक सत्याचें पालन करण्यासंबंधीं तो क्वचित निष्काळजी असे हें खरें, व हा मोटाच दोष आहे; परंतु आपलें लेखन आकर्षक व कलात्मक करण्याचा त्याला कसा हव्यास होता एवढेंच या ठिकाणीं दाखवावयाचें आहे. असो. सांगावयाचें तात्पर्य असें की लेखन ललित असो वा गंभीर असो, तें—सत्य न सोडतां—शक्य तितकें कलात्मक करण्याचा लेखकाने आग्रह धरला, तर वाचकवर्गाची आवड आज जी केवळ नाटककादंबऱ्यांपुरती मर्यादित आहे ती अधिक व्यापक होईल असें वाटतें.

या दृष्टीने मराठींत चरित्र या वाङ्मयप्रकाराची उपेक्षा झाली आहे हें मागे सांगितलेंच आहे. नाटक, कादंबऱ्या इत्यादि वाङ्मयप्रकारांच्या मानाने चरित्रवाङ्मयाची निर्मिति अगदी थोडी झाली आहे हें एक;

९०५१०

आणि त्याकडे विदग्धवाङ्मयाचा एक प्रकार या दृष्टीने पाहून त्याला शक्य तितकें सुंदर स्वरूप देण्याचाही कोणी खटाटोप केला नाही, हें दुसरें. पाश्चात्त्य चरित्रवाङ्मयाची सुद्धा परवापरवापर्यंत ही स्थिति होती, तर मराठीची गोष्टच कशाला? कारण पाश्चात्त्य वाङ्मयांत ज्या कांही सुधारणा होतील त्या पांचपन्नास वर्षांनी आपल्या भाषेंत यावयाच्या असा जवळजवळ नियमच ठरून गेला आहे. युरोपअमेरिकेंत चरित्र-वाङ्मय आताआता कुठे बाळसें धरूं लागलें आहे. त्यांत नवीननवीन प्रयोग होत आहेत आणि त्याला विदग्धवाङ्मयाच्या राखीव कुरणांत हळूहळू प्रवेश मिळूं लागला आहे. चरित्रवाङ्मयांत कोणत्या सुधारणा व्हावयास पाहिजेत, तें अधिक कलात्मक स्वरूप कसें धारण करूं शकेल, इत्यादींविषयीं पाश्चात्त्य देशांतील वाङ्मयांत जे प्रयोग चालू आहेत त्यांस अनुलक्षून चरित्रवाङ्मयाच्या तंत्रासंबंधीं येथे थोडेंसें विवेचन करण्याचा मानस आहे. त्यांत मराठी चरित्रवाङ्मयाच्या समग्र इतिहासाचें समीक्षण करण्याची आवश्यकता नाही. केवळ कांही प्रसिद्ध चरित्रग्रंथांतील उदाहरणें घेऊन तांत्रिक दृष्टया त्यांत काय गुण व दोष आहेत एवढेंच पाहावयाचें आहे. पाश्चात्त्य वाङ्मयांत चरित्र-वाङ्मयाचा आपल्या इकडच्या मानाने बराच विकास झाला असल्याने त्यांतील उदाहरणेंच विशेषेंकरून घेतलीं जावीं हें स्वाभाविक आहे.

सर्वांत पहिला आणि कदाचित सर्वांत महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो तो 'चरित्र म्हणजे काय?' हा होय. हॅवलॉक एलिस या प्रसिद्ध ग्रंथकाराने 'An open letter to Biographers म्हणून एक निबंधवजा पत्र। पाश्चात्त्य चरित्रकारांना उद्देशून लिहिलें आहे, त्यांत त्याने मुळावरच घाव घातल्याप्रमाणे प्रश्न विचारला आहे की 'चरित्र म्हणजे काय हें तरी तुम्हांला नीट समजलें आहे काय?'. तो म्हणतो की चरित्राची व्याप्ति काय आहे हेंच तुम्हांला अद्यापि समज-लेलें दिसत नाही. ज्या गोष्टी चरित्रांत देण्याची आवश्यकता नाही

त्या गोष्टींनी तुम्हीं पानेंच्या पानें भरून काढतां आणि ज्या गोष्टींवर वास्तविक भर द्यावयाचा त्यांचा पुसट उल्लेखही तुम्ही करीत नाही! एखाद्या शास्त्राचा एक सबंध तप अभ्यास केल्यानंतर गुरूने शिष्याला म्हणावें की 'तुला या शास्त्राचीं मूलतत्त्वें सुद्धा समजलीं नाहीत!' त्यांतलाच हा प्रकार झाला. आणि खरोखरच चरित्राची व्याप्ति निश्चित करणें ही चरित्रलेखनाची पहिली आणि सर्वांत कठीण पायरी आहे. चरित्रांत कोणत्या गोष्टींचा समावेश करावयास पाहिजे आणि कोणत्या गोष्टींचा नको, कोणत्या गोष्टींवर विशेष भर द्यावयास पाहिजे व कोणत्या गोष्टींचा केवळ ओझरता उल्लेख केला पाहिजे किंवा केला असतां चालेल, याचा निश्चय करणें आवश्यक आहे; म्हणजच इतिहास आणि चरित्र यांच्या मर्यादा स्पष्ट करणें आवश्यक आहे. चरित्र म्हणजे एका व्यक्तीचा इतिहास आणि कार्लाइलच्या म्हणण्याप्रमाणे इतिहास म्हणजे अनेक व्यक्तींचीं चरित्रें हें समीकरण सर्वस्वीं मान्य होण्यासारखें आहे काय? अनेक व्यक्ति इतिहास निर्माण करितात हें जरी खरें असलें तरी राष्ट्राच्या इतिहासाच्या घटनेला व्यक्तींच्या कृतीइतक्याच इतर अनेक शक्ति (Forces) कारणीभूत होतात हें विसरून चालावयाचें नाही. शिवाय इतिहासाचा अभ्यास करण्याची जी पद्धत आहे त्या पद्धतीने व्यक्तीचा अभ्यास करणें योग्य नव्हे. राष्ट्राचा इतिहास व एका व्यक्तीचें चरित्र यांजकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. इतिहासाकडे पाहतांना घटना व निरनिराळे प्रवाह यांना जास्त महत्त्व द्यावयास पाहिजे. तो घडवून आणण्यांत व्यक्तीचा भाग मोठा असला तरी त्यांत व्यक्तीला केव्हाही महत्त्व कमीच मिळणार. उलट चरित्रांत घटना व विचारप्रवाह यांना स्थान असलें तरी तें गौणच राहावयाचें. व्यक्तीला जणू सूक्ष्मदर्शक यंत्राखाली धरून तिची तपासणी करणें हें चरित्रांत जास्त महत्त्वाचें. तसें पाहिलें तर इतिहासाला रेखीव मर्यादा नाही; चरित्रकाराला चरित्रनायकाच्या जन्ममृत्यूच्या मर्यादेबाहेर जातां

येत नाही. अर्थात् चरित्र व इतिहास यांत दोन निरनिराळ्या गोष्टींना महत्त्व असल्यामुळे त्यांच्या लेखनतंत्रांत भेद राहणारच. लघुकथा म्हणजे ज्याप्रमाणे छोट्या प्रमाणांत कादंबरी नव्हे, किंवा कादंबरींतील एखादी घटना नव्हे, त्याप्रमाणे चरित्र म्हणजे छोट्या प्रमाणांत इतिहास नव्हे किंवा इतिहासाची एखादी घटनाही नव्हे. कादंबरी व लघुकथा यांचें जसें प्रत्येकीं स्वतंत्र शास्त्र आहे तसेंच इतिहास व चरित्र यांचें आहे. चरित्र लिहितांना चरित्रनायकाच्या व्यक्तित्वापेक्षा तत्कालीन घटना व विचारप्रवाह इत्यादिकांना महत्त्व जास्त मिळालें की तें चरित्र इतिहासांत जमा होतें. परंतु चरित्रनायकाच्या आयुर्मर्यादेइतका तो इतिहास मर्यादित असल्याने त्याला धड व्यवस्थित इतिहासाचेंही स्वरूप येत नाही. "Those weighty volumes called 'life and times'—which are both bad history and bad biography" (ज्याला धड इतिहास म्हणतां येणार नाही व धड चरित्र म्हणतां येणार नाही, अशा प्रकारचे 'चरित्र आणि काल' या नांवाने लिहिलेले लठ्ठ ग्रंथ) असें एका इंग्रजी टीकाकाराने या प्रकारच्या लेखनाचें वर्णन केलें आहे तें सार्थ वाटतें. 'चरित्र आणि काल' हा शब्दप्रयोगच चमत्कारिक आहे. तुम्ही एक तर व्यक्तीला महत्त्व देऊं शकतां किंवा कालाला महत्त्व देऊं शकतां; दोघांना सारखेंच महत्त्व देऊन चरित्र लिहितां येणार नाही. या प्रकाराचें मराठी वाङ्मयांतील उत्तम उदाहरण म्हणजे केळकरांचें 'टिळक चरित्र'. केळकरांसारख्या भाषाप्रभूने लिहिलेलें चरित्र कंटाळवाणें होणार नाही ही गोष्ट मान्य. टिळकांसारखा अखिलभारतीय नेता म्हटला म्हणजे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व अंगोपांगांशी त्याचा निकट संबंध असणार व त्याचें जीवन अनेक चळवळींशीं निगडित असणार हेंही खरें. परंतु टिळकांच्या हयातींत अशा अनेक घटना घडल्या की ज्यांच्याशीं टिळकांचा थोडा फार संबंध आला असला तरी त्यांत टिळकांचें व्यक्तित्त्व विशेष उठावदार रीतीने खुलून आलेलें दिसत नाही. अशा

अनेक गोष्टींचें टिळक चरित्रांत भरपूर वर्णन आलेलें आहे. संमतिवयाचा कायदा, पंडिता रमाबाईचें शारदासदन, क्रॉफर्डप्रकरण इत्यादि कांही प्रकरणें अशीं आहेत की, तीं वाचतांना 'यांत टिळकांचा संबंध काय' असें कांही वेळ तरी वाचकाला वाटावें. मग त्यावर टिळकांनी केसरींत एखादा लेख लिहिला असल्याचें किंवा एखादें व्याख्यान दिलें असल्याचें पुढें कळलें म्हणजे टिळकांचा त्या प्रकरणांशीं संबंध होता हें ध्यानांत येतें. केवळ एवढ्याकरितां त्या प्रकरणांचा तपशीलवार समग्र इतिहास देण्याचें कांही कारण नाही हें स्पष्ट दिसून येतें. पुढील दोन भागांत अशीच प्रत्येक लहानसहान घटनेची इतकी तपशीलवार माहिती दिली आहे की, ती सगळी वाचकांनी वाचावी अशी अपेक्षा करणें म्हणजे वाचकांच्या सहनशक्तीची परीक्षा पाहण्यासारखें आहे. कित्येक प्रकरणांच्या शेवटीं पुरवणी म्हणून जीं पुष्कळशीं पत्रें छापलीं आहेत त्यांपैकी कांहींचा टिळकांच्या जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध फार थोडा आहे. त्यासंबंधीं पुढे चर्चा येणारच आहे. सध्या एवढेंच सांगावयाचें की टिळक चरित्रांत असा पुष्कळसा भाग दाखवितां येईल की, ज्याचा टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास दर्शविण्यांत फारसा उपयोग होत नाही. श्री. केळकर प्रस्तावनेंत म्हणतात : "आम्हीं एकाच दृष्टीने हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. ती दृष्टि म्हणजे प्रकरणवार साधार भरपूर व जुळवून माहिती देण्याची. ही पद्धति सर्वांत अधिक नीरस ठरण्यासारखी असते. पण इतिहासकथनाच्या पायावरच पुढे गुणवर्णन, तात्त्विक विवेचन वगैरेंची इमारत बांधतां येते. यामुळे ज्याला सर्वांत कमी लेखनकौशल्य लागतें अशी व निवळ काबाडकष्टाची पद्धति तेवढीच आम्हीं स्वीकारून हा चरित्रखंड वाचकांना सादर केला आहे." परंतु ही पद्धति कलात्मक चरित्रनिर्मितीस बाधक आहे असें आम्हांस वाटतें. या पद्धतीने धड ना इतिहास, ना चरित्र, असें कांही तरी लिखाण निर्माण होतें. दुसऱ्या व तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत श्री.

केळकरांनी खरी कबुली दिली आहे. "या तीनही भागांच्या साहाय्याने आणखी एका वेगळ्या रीतीने टिळक-चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला तें साधन उपयोगी पडण्यासारखें आहे." यावरून एवढेंच म्हणतां येईल की, जवळजवळ दोन हजार पृष्ठांचा जो मजकूर केळकरांनी वाचकांच्या समोर ठेविला आहे तो टिळकचरित्राची सामग्री किंवा कच्चा माल म्हणून कोणालाही चांगला उपयोगी पडेल. मराठी भाषेंतील जीं थोडीं प्रसिद्ध चरित्रें आम्ही येथे उदाहरणादाखल घेणार आहों, त्यांपैकी श्री. न. र. फाटककृत 'रानडे चरित्रां'तही असे कांही दोष दाखवितां येतील. श्री. फाटक यांना माहिती भरपूर आणि त्यांची लिहिण्याची पद्धतही चटकदार असते. टिळकांप्रमाणेच रानडे ही महाराष्ट्रांतील तत्कालीन सर्व चळवळींत प्रामुख्याने भाग घेणारी व्यक्ति होती. साहजिकच रानड्यांचें चरित्र म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक चळवळींचा इतिहास, अशा कल्पनेने जणू कांही श्री. फाटक लिहावयास बसले आहेत. रानडे-चरित्राच्या निमित्ताने महाराष्ट्रांतील किती तरी निरनिराळ्या चळवळींचा साद्यंत तपशीलवार इतिहास आणि किती तरी इतर व्यक्तींचीं चरित्रें देण्यांत फाटकांनी पानेंच्या पानें खर्चीं घातलीं आहेत. बडोद्याचें मल्हारराव गायकवाड प्रकरण, दयानंद सरस्वतींचा दक्षिणचा दौरा, दादाजी–रखमाबाई खटला इत्यादि घटना, आणि वासुदेव फडके, सार्वजनिक काका. इत्यादिकांचीं चरित्रें यांना रानडे चरित्रांत किती जागा द्यावयाची यासंबंधीं मतभेद होण्याचा बराच संभव आहे त्यांत आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे वेळींअवेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांवर तोंडसुख घेण्याचीही फाटकांनी हौस पुरवून घेतली आहे. यांत कांही औचित्यभंग होत आहे अशी कल्पना त्या उत्साहाच्या भरांत त्यांना आली नाही. चरित्रनायकाच्या आयुष्यांत ज्या ज्या चळवळींशीं त्याचा संबंध आला असेल त्या त्या

चळवळींमुळे त्यांच्या व्यक्तित्त्वाला कितपत उठाव मिळतो हें पाहून त्याप्रमाणे त्या चळवळींना चरित्रांत स्थान मिळालें पाहिजे. तसें करतांना त्या चळवळींनाच जास्त महत्त्व मिळून चरित्रनायक त्या ढिगाऱ्याखाली दडपला जात नाही ना, अशी लेखकाने काळजी घेतली पाहिजे. त्या चळवळी पार्श्वभूमीसारख्या मागे राहिल्या पाहिजेत व चरित्रनायक वाचकांसमोर प्रामुख्याने वावरला पाहिजे. नाहीतर रंगभूमीवर एखादा भव्य देखावा दाखवावा आणि मुख्य नट कुठे तरी कोपऱ्यांत एखाद्या ठिपक्यासारखा दिसावा असा प्रकार होतो. टिळक-चरित्र काय किंवा रानडेचरित्र काय, वाचतांना वाचकाच्या मनावर आपण महाराष्ट्राचा एका विशिष्ट कालाचा इतिहास वाचीत आहों असाच ठसा राहतो. इतिहास व चरित्र यांच्या मर्यादा संभाळणें ही गोष्ट फार कठीण आहे.

चरित्रनायक जितका थोर तितकें त्याचें चरित्र विस्तृत असावयास पाहिजे या कल्पनेंतून 'व्यक्ति आणि काल' या प्रकारचें लिखाण निर्माण होतें. चरित्रनायकाचा ज्या ज्या गोष्टींशीं किंवा ज्या ज्या व्यक्तींशीं संबंध आला असेल त्यांचें तपशीलवार वर्णन दिलें पाहिजे ही कल्पना चुकीची आहे. त्यांत योग्य ती निवड करणें आवश्यक आहे. इंग्रजींत मोर्ले याचें ग्लॅडस्टन चरित्र पहा आणि प्रसिद्ध फ्रेंच चरित्रकार आंद्रे मॉर्वा (Andre Maurois) याचें डिझराएलीचरित्र पहा. वास्तविक ग्लॅडस्टन आणि डिझराएली हे दोघे प्रसिद्ध राजकारणी पुरुष सारख्याच योग्यतेचे, आणि इंग्लंडच्या इतिहासांत सारखीच कामगिरी केलेले होते. पण मोर्लेसाहेबांच्या गुरुभक्तींतून दोन अडीच हजार पानांचा ग्रंथराज जन्मला आणि आंद्रे मॉर्वा याने अडीचशें पानांत डिझराएलीचें इतकें उठावदार चित्र काढलें आहे की चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाच्या सर्व पैलूंचा स्वच्छ ठसा वाचकांच्या मनावर उमटावा.

मोर्ले याला आपल्या कार्यांतील खाचखळगे दिसत होते व त्यांसंबंधीं ग्लॅडस्टन-चरित्राच्या सुरवातीस त्याने उल्लेखही केला आहे. तो म्हणतो की माझ्या कार्यांतील सर्वांत मोठी अडचण म्हणजे चरित्र व इतिहास यांच्या मर्यादा संभाळणें ही होय. एखाद्या लेखकाचें चरित्र लिहावयाचें झालें तर ही अडचण उपस्थित होत नाही. परंतु जो मनुष्य चार वेळां इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला व सार्वजनिक जीवनांत जो अनेक वर्षें प्रामुख्याने झळकत राहिला, अशा मनुष्याचें जीवनचरित्र लिहितांना ही अडचण भासणें साहजिक आहे. त्याचें चरित्र लिहावयाचें म्हणजे इंग्लंडच्या तत्कालीन इतिहासांतील बहुतेक सर्व लहानमोठ्या प्रसंगांचा उल्लेख केल्याशिवाय गत्यंतर नाही! हें मोर्ले यांचें म्हणणें बरोबर नाही असें कोण म्हणेल? परंतु इंग्लंडच्या तत्कालीन इतिहासांतील प्रसंगांच्या वर्णनामध्ये चरित्रनायक कुठे तरी गडप झाला तर तेंही अयोग्यच! चरित्रनायक हा मध्यबिंदु असून घटना त्याच्या-भोवती फिरत असल्या म्हणजे तें चरित्र झालें. उलट घटनांना महत्त्व येऊन चरित्रनायक त्या घटनांच्या अनेक कारणांपैकी एक झाला की तो इतिहास होतो. शिवाय चरित्रांत व्यक्तिदर्शनाला महत्त्व जास्त आहे व तें कलात्मक करावयाचें तर त्यांत प्रमाणबद्धता पाहिजे, हें ओळखून मोर्ले साहेबांना ग्लॅडस्टनचें चित्र थोडक्यांत रंगवितां आलें नसतें काय? आंद्रे मॉर्वा हा अशीं प्रमाणबद्ध कलात्मक चित्रें काढण्यांत अत्यंत कुशल आहे. एखादा चित्रकार कुंचल्याच्या दोनचार फटकाऱ्यांसरशी सुंदर चित्र निर्माण करतो त्याप्रमाणे आंद्रे मॉर्वा यांच्या चरित्रलेखनाची पद्धत आहे. भाराभर गोष्टींची खोगीरभरती केली म्हणजे कलाकृतीच्या सौंदर्याला बाध येतो ही गोष्ट ओळखली पाहिजे. योग्य प्रसंगांची निवड व त्यांच्या मांडणींत योजिलेली सूचकता, ह्यांनी कलाकृति उठावदार दिसते. आणखी एक उदाहरण द्यावेंसें वाटतें. एखाद्या राज्यकर्त्याचें चरित्र लिहावयाचें म्हटलें म्हणजे त्याच्या राज्यांतील सर्व प्रकारच्या

घटनांशीं त्याचा निकट संबंध येत असल्यामुळे त्यांचें तपशीलवार वर्णन, राजाने केलेल्या निरनिराळ्या क्षेत्रांतील सुधारणा, राजाशीं निकट संबंध असलेल्या अधिकारी व्यक्तींचीं चरित्रें, इत्यादि अनेक प्रकार त्या चरित्रांत वास्तविक यावे. हे सर्व प्रकार तपशीलवार चरित्रांत यावयाचे म्हणजे चरित्रग्रंथ चांगलाच फुगणार हें उघड आहे. मराठी भाषेंतील अशा तऱ्हेच्या चरित्राचें उदाहरण द्यावयाचें म्हणजे बडोद्याचे श्री. दा. ना. आपटे यांनी लिहिलेलें श्रीमंत सयाजीराव महाराज यांचें चरित्र. हा विस्तृत ग्रंथ ज्यांच्या अवलोकनांत आला असेल त्यांना हें मान्य करावें लागेल की हें चरित्र आवडीने समग्र वाचण्याइतकी सहनशक्ति असलेले लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतके आणि तेही केवळ बडोदें राज्यांतच सापडले तर सापडावयाचे. सयाजीराव महाराजांची कारकीर्द जवळजवळ ६०–६५ वर्षांची व त्यांचें कार्यक्षेत्रही विस्तृत, या गोष्टी मान्य केल्या तरी त्यांतही कलादृष्ट्या कांही निवड, कांही सूचकता, इत्यादि गोष्टी साधतां आल्या असत्या–नव्हे साधणें आवश्यक होतें–हें कोणाच्याही ध्यानांत येईल. उलट सुप्रसिद्ध इंग्रजी चरित्रकार लिटन स्ट्रॅची याचें व्हिक्टोरिया राणीचें चरित्र पहा. व्हिक्टोरिया राणीची कारकीर्दही ६०–६५ वर्षांची आणि सयाजीरावांच्या कारकीर्दीपेक्षा कितीतरी जास्त धामधुमीची. परंतु केवळ अडीचशें पानांत रंगविलेलें व्हिक्टोरिया राणीचें चित्र इतकें सुंदर उतरलें आहे की त्याला जगाच्या चरित्रवाङ्मयांत क्वचित् जोड सापडेल. मोर्लेसाहेबांच्या ग्लॅडस्टनने चार वेळां मुख्य प्रधानगिरी गाजविली असली तरी व्हिक्टोरिया राणीने तसले कैक मुख्य प्रधान पाहिले होते. तेव्हा तिचें चरित्र वास्तविक केवढें मोठें व्हावयास पाहिजे होतें? परंतु स्ट्रॅचीचा संयम व सूचकता कांही विलक्षण आहे. राणीच्या सार्वजनिक जीवनाला त्याने जितकें महत्त्व दिलें आहे तितकेंच तिच्या खाजगी जीवनाला, तिच्या स्वभावरेखनाला दिलें आहे. राणीच्या कारकीर्दींत झालेले मेलबोर्न, पामर्स्टन, पील,

डिझराएली, ग्लॅडस्टन वगैरे मुख्य प्रधान, फार काय राणीचा नवरा प्रिन्स आल्बर्ट हाही, आपापलें स्थान सोडून भलत्या महत्त्वाला चढलेले नाहीत. सर्व कांही योग्य प्रमाणांत व जेथल्या तेथे. इंग्लंडच्या राजकीय परिस्थितीची पार्श्वभूमि ही पार्श्वभूमीच राहते. ती राणीच्या चित्राला क्षणभरही झाकोळूं शकत नाही. राणीच्या स्वभावविकासाला मुख्य महत्त्व दिलें असून निरनिराळ्या घटनांचें वर्णन अशा बेताने केलेलें आहे की त्यांतून तिचें व्यक्तित्व खुलून दिसावें. इतक्या थोड्या अवकाशांत इतकें अप्रतिम चित्र काढलेलें जगांतील कोणत्याही भाषेंतील चरित्रग्रंथांत क्वचित पाहावयास सापडेल.

या दृष्टीने पाहतां आपणांस असें दिसून येईल की मनुष्याच्या आयुष्यांतील निरनिराळ्या घटनांच्या प्रत्यक्ष वर्णनापेक्षा त्यांत प्रतीत होणाऱ्या मनुष्याच्या स्वभावविकासाला चरित्राच्या दृष्टीने अधिक महत्त्व आहे. थोर मनुष्याच्या आयुष्यांतील घटना जगाच्या समोर असतातच. त्या सांगावयास चरित्रकारच कशाला पाहिजे? टिळकांच्या आयुष्यांत ज्या प्रमुख घटना घडल्या त्यांचा इतिहास कळावा म्हणून केळकरांकडे जाण्याचें काय कारण? पंडिता रमाबाईच्या शारदासदनाचें प्रकरण काय होतें व त्यावर टिळकांनी ‘केसरीं’तून आपलें मत कसें प्रकट केलें, हें सांगावयास चरित्रकार कशाला पाहिजेत? तें आम्ही ‘केसरी’चे जुने अंक पाहून जाणूं शकतों. यावर कोणी म्हणेल, अहो पुढच्या पिढीला तरी ही हकीकत कशी कळावयाची? चरित्रें हीं पुढच्या पिढीकरितां लिहिलेलीं असतात! याला उत्तर असें की इथेच तुम्ही चरित्राचा प्रांत सोडून इतिहासाच्या प्रांतांत घुसूं पाहतां. एका विशिष्ट कालीं महाराष्ट्रांत कोणत्या घटना घडल्या आणि त्यांत टिळकांचा भाग किती होता हें महाराष्ट्राचा इतिहास लिहिणाराने सांगावयाचें असतें. टिळकांच्या चरित्रकाराने मुख्यतः टिळकांविषयीं लिहावयाचें आणि टिळकांच्या आयुष्यांत घडलेल्या घटनांचें सविस्तर वर्णन न करतां त्या

घटनांचा टिळकांचा व्यक्तिविकास होण्यांत कितपत भाग होता हें सांगावयाचें. जो फरक आहे तो प्रश्नाची पकड (approach) घेण्यांत आहे. इतिहासकार घटनांकडे प्रामुख्याने लक्ष देऊन टिळकांना गौण स्थान देईल, चरित्रकार टिळकांकडे आधी पाहून घटनांकडे केवळ त्यांच्या व्यक्तिविकासाच्या दृष्टीपुरतें पाहील. आंद्रे मॉर्वा याने शेले कवीचें जें चरित्र लिहिलें आहे तें या दृष्टीने आदर्श म्हणून घेण्यासारखें आहे. चरित्रकाराने शेलेच्या घरगुती जीवनावरच मुख्य भर दिला असून त्याच्या कवितेसंबंधीं वाङ्मयीन चर्चा सबंध चरित्रांत कुठेही मिळावयाची नाही. शेलेच्या कवितेची चर्चा त्याच्या चरित्र-काराने कशाला करावयाची? तें काम वाङ्मयटीकाकार करीतच आहेत. उलट शेलेने जें काव्य निर्माण केलें तें कोणत्या परिस्थितींत केलें हें सांगण्याचें काम चरित्रकाराचें होय. लहानपणापासून त्याचें आयुष्य कोणत्या परिस्थितींत गेलें, त्याच्या आवडीनिवडी काय होत्या, विशिष्ट घटनांमुळे किंवा परिस्थितीमुळे त्याची काव्यप्रतिभा कशी जागृत झाली, इत्यादि गोष्टींची अपेक्षा वाचक चरित्रकाराकडून करीत असतात. चरित्रनायकाच्या आईबापांचीही थोडीशी हकीकत देणें आव-श्यक असतें, कारण त्यावरून त्याच्या अंगच्या गुणांत आनुवंशिक भाग कितपत होता तें कळतें. डिझराएली हा जसा मोठा राजकारणी पुरुष होता तसा तो कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध होता. ही वाङ्मयाची आवड त्याच्या वडिलांकडून त्याला मिळाली होती, हें चरित्रांत सांगावयास पाहिजे. लहान असतांनाच 'तूं कोण होणार पुढे?' म्हणून प्रश्न विचा-ण्यांत आला असतांना 'मी इंग्लंडचा मुख्य प्रधान होणार!' असें जें त्याने उत्तर दिलें, त्याला चरित्रांत महत्त्वाचें स्थान आहे. लहानपणच्या प्रवृत्ति, आवडीनिवडी, खेळ यांची शक्य तितकी माहिती देणें चरित्र-काराचें कर्तव्य आहे, कारण यांचाच विकास पुढे मोठेपणांत झालेला असतो. किंवा कित्येक वेळां अगदी उलटही प्रकार दिसतो. एलिझाबेथ

फ्राय् या परोपकारी स्त्रीबद्दल असें सांगतात की ती लहानपणीं अतिशय लाजरी व भित्री असून आईचा पदर सोडून कधी बाहेर जावयाची नाही. तीच पुढे गरिबांची कैवारी आणि तुरुंगव्यवस्थेंत सुधारणा घडवून आणणारी मोठी कार्यकर्त्री स्त्री म्हणून प्रसिद्धीस आली. अशा रीतीने मनुष्याच्या स्वभावांत क्वचित बदल कसा होतो हें जाणणेंही मनोरंजक होतें. जॉर्ज स्टीफनसनला लहानपणापासून छोटीं छोटीं यंत्रें तयार करण्याचा नाद होता. त्यानेच पुढे वाफेच्या इंजिनाचा शोध लावला. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. तात्पर्य, लहानपणांतील या क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टी चरित्रांत महत्त्वाच्या असतात. या हकीकती सर्वांना माहीत नसतात म्हणून लोक चरित्रकाराच्या तोंडाकडे पाहतात. टिळकांच्या संगतींत ज्या मनुष्याने पंचवीस वर्षें काढलीं त्याच्याकडून आम्ही असल्या गोष्टींची अपेक्षा करीत असतों. बॉस्वेलने लिहिलेलें जॉनसनचें चरित्र जगांतल्या सर्वोत्तम चरित्रांपैकी एक समजलें जातें त्याचें कारण हेंच. त्याने जॉनसनच्या आयुष्यांतील असे निवडक प्रसंग शोधून लोकांपुढे ठेविले आहेत की, त्यांची माहिती बॉस्वेलशिवाय दुसऱ्या कोणाला मिळणें शक्य नव्हतें. बॉस्वेल हा जॉनसनच्या इतक्या निकट सहवासांत राहिला होता की, जॉनसनच्या आयुष्यांत घडलेल्या बहुतेक सर्व लहानमोठया गोष्टी त्याच्या डोळ्यासमोर घडलेल्या होत्या. एका टीकाकाराने गमतीने असें म्हटलें आहे की, बॉस्वेल हा महामूर्ख होता म्हणूनच तो इतकें सुंदर चरित्र लिहूं शकला! बरोबरच आहे, जॉन्सनचीं वाटेल तशीं बोलणीं मुकाटयाने ऐकून घेऊन त्याच्या संगतींत इतकीं वर्षें एकनिष्ठपणें त्याने काढिलीं नसतीं, तर आज आपल्याला जॉन्सनचें इतकें सुंदर चरित्र कसें मिळतें?

चरित्रवाङ्मयाची मानववंशशास्त्राशीं तुलना करण्यांत येते. मानववंशशास्त्रांत एका सबंध जातीच्या विकासाचा इतिहास येतो, तसा चरित्रांत एका व्यक्तीच्या विकासाचा इतिहास येतो. वंशशास्त्राला

जीवशास्त्र व मानवशास्त्र यांचा अभ्यास आवश्यक असतो. एका विशिष्ट जातीचा अगदी बाल्यावस्थेपासून परिणतावस्थेपर्यंत शरीरदृष्ट्या व मनोदृष्ट्या कसा विकास होत गेला हें मानववंशशास्त्रज्ञ दाखवितो. याच दृष्टीने व्यक्तीचा बालपणापासून कसा विकास होत गेला हें चरित्रकार दाखवितो. हॅवलॉक एलिस म्हणतो की ज्याप्रमाणें मनुष्य आपल्या निर्वाहाकरितां गारगोटीने आग पेटविणें, हत्यारें बनविणें, शेतीचीं आयुधें तयार करणें, अन्न शिजवून खाणें, इत्यादि गोष्टी कसा शिकला हें सांगणें त्याचा आजपर्यंतचा विकास दर्शविण्याकरितां आवश्यक असतें, त्याप्रमाणें एखादा प्रसिद्ध कवि कवित्व करण्यास कसा उद्युक्त झाला, त्याच्यांतील कवित्वाच्या बीजाला केव्हा आणि कसा अंकुर फुटला व त्याचा विकास कसा झाला हें चरित्रकाराने सांगितलें पाहिजे. या दृष्टीने तो म्हणतो की चरित्रनायकाच्या आयुष्यांतील पहिल्या वीस वर्षांचें वर्णन करणें ही चरित्रकाराच्या दृष्टीने अतिशय अवघड गोष्ट आहे. पुढील आयुष्यांत बहुतेक सर्व बीजांना अंकुर फुटून तीं परिणत झालेलीं असतात आणि तो इतिहास जगाच्या समोर असतोच. पुढील घटनांचा त्या बीजांशीं मेळ बसविणें एवढेंच काम त्याला उरतें.

## २

मागील विभागाच्या सुरवातीस 'चरित्र म्हणजे काय?' असा पहिला प्रश्न उत्पन्न होतो म्हणून सांगितलें. त्या प्रश्नाची चर्चा करतांना 'चरित्र म्हणजे काय नव्हे' हेंच आतापर्यंत दाखविलें. या अकरणात्मक चर्चेत चरित्र आणि इतिहास यांतील फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला व चरित्र म्हणजे इतिहास नव्हे एवढें स्पष्ट केलें. त्यांतून चरित्र काय हें जरी अप्रत्यक्षपणें समजलें असलें तरी चरित्राचें स्वरूप काय, त्याचा हेतु कोणता, इत्यादि प्रश्नांचा स्वतंत्रपणें विचार करणें आवश्यक आहे. 'इतिहास' या नांवाने जो वाङ्मयप्रकार ओळखला जातो तो जरी

चरित्रवाङ्मयापेक्षा भिन्न असला, तरी चरित्र हा एकप्रकारें इतिहास आहे हें तितकेंच खरें आहे. ऑक्सफर्डच्या कोशांत चरित्राची व्याख्या ('the history of the life of an individual as a form of literature') अशी केली आहे. म्हणजे 'चरित्र हा एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहासच होय'. इतिहास या वाङ्मयप्रकारांत जसें एखाद्या राष्ट्राच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, वैचारिक इत्यादि सर्व प्रकारच्या प्रगतीचें वर्णन येतें, तसें चरित्रांत एका व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचें वर्णन येतें. चरित्रें लिहिण्यांत मनुष्याचा कोणता उद्देश असतो? या प्रश्नाचा विचार करतांना मनुष्यमात्रांत स्वसंरक्षणा-(Self-Preservation) ची जी सहजप्रवृत्ति असते ती विचारांत घेतली पाहिजे. कोणत्याही प्रकारें आपलें स्वत्व नष्ट होऊं द्यावयाचें नाही, तें शक्य तितकें टिकवून ठेवावयाचें या स्वतःबद्दलच्या प्रवृत्तींतून आपल्याला ज्या व्यक्तीबद्दल प्रेम वाटतें त्या व्यक्तीचें व्यक्तित्त्वही टिकून राहावें अशी प्रवृत्ति निर्माण होणें शक्य आहे. आपल्याला प्रिय असलेल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिची आठवण कायम राहावी म्हणून कांही लोक तिचें तैलचित्र तयार करवून घेतातच की नाही? त्याचप्रमाणे चरित्र लिहिण्यांत मृताची स्मृति कायम ठेवणें व शक्य तों त्याचा गौरव करणें असा कांहीतरी हेतु पूर्वीपासून चालत आला आहे. आपल्याकडील जुन्यांत जुनें महानुभावीय कालचें 'लीळाचरित्र' चरित्र घ्या, किंवा पुढे महीपतीने लिहिलेलीं संतचरित्रें घ्या, त्यांत पूर्वी होऊन गेलेल्या आदरणीय व्यक्तींचें गुणवर्णन करून त्यांची स्मृति कायम ठेवावी आणि शक्य असल्यास त्यांच्या चरित्रापासून पुढच्या पिढीने योग्य तो बोध घ्यावा, असा हेतु स्पष्ट दिसतो. 'वाटे चरित्र त्यांचें आपण कांही तरावया गावें' या वचनाचा अर्थ स्पष्ट आहे. युरोपमधील सर्वांत जुना चरित्रकार प्लूटार्क याने जीं चरित्रें लिहून ठेवलीं आहेत त्यांतही मृतांचा गौरव करून कांही विशिष्ट गुणांचा आदर्श लोकांपुढे ठेवावा

यापलीकडे दुसरा कांही हेतु असेल असें म्हणावयास जागा नाही. इतकेंच नव्हे, तर युरोपमध्ये अगदी परवापरवापर्यंत चरित्रलेखनाबद्दल हीच कल्पना होती. चरित्रलेखन ही एक कला आहे आणि तिचा हेतु मनुष्याच्या व्यक्तित्त्वाचें हुबेहूब चित्र निर्माण करण्याचा आहे ही कल्पना अगदी अलीकडची आहे. मध्यंतरींच्या काळांत बॉस्वेलच्या जॉनसन चरित्रासारखी एखादी अप्रतिम कृति निर्माण झाली खरी, पण ती अपवादरूपच होय. विशेषतः व्हिक्टोरिया राणीच्या वेळीं चरित्राच्या नांवाखाली लिहिल्या गेलेल्या गौरवग्रंथांची मोठीच गर्दी झाली होती. व्हिक्टोरिया राणीचें युग हें इंग्लंडच्या इतिहासांत विशिष्ट गोष्टींकरितां प्रसिद्ध आहे. श्रीमंतीची ऐट, मोठेपणाच्या भलत्या कल्पना, भोंदूगिरींत मोडणारा फाजील सोवळेपणा व शिष्टपणा इत्यादि गोष्टी तत्कालीन समाजांत रूढ होत्या. त्यांची आजचे लोक चेष्टा उडवतात. व्हिक्टोरियन नीतिमत्ता ही आज थट्टेची बाब होऊन बसली आहे. यावरून त्या काळीं चरित्रासंबंधीं कल्पना काय असतील याची कल्पना येऊं शकेल. कोणीही एखादा लॉर्ड, ड्यूक वगैरेसारखा मोठा मनुष्य मेला की त्याच्या कुटुंबीयांनी त्याचें चरित्र लिहवून घ्यावयाचें अशी साधारण पद्धत असे; मग त्याची योग्यता कांहीही असो. चरित्रलेखकाला त्याबद्दल भरपूर मोबदला देऊं केला की तो मिंधा व्हावयाचाच आणि मग चरित्र म्हणून जो जाडजूड ग्रंथ बाहेर पडावयाचा तो म्हणजे मृताच्या निर्भेळ स्तुतीने खच्चून भरलेला असावयाचा हें सांगावयास नकोच. "Those two fat volumes, with which it is our custom to commemorate the dead—who does not know them, with their ill-digested masses of material, their slipshod style, their tone of tedious panegyric their lamentable lack of selection, of detachment, of design?" (अव्यवस्थित रीतीनें लिहिलेले, पोकळ स्तुतीने भरलेले, व कलाशून्य असे केवळ मृत व्यक्तीचें स्मारक म्हणून लिहिलेले आपल्याकडील जाडजूड चरित्रग्रंथ

कोणाच्या परिचयाचे नाहीत ?) असें लिटन स्ट्रची याने त्या चरित्रांचें वर्णन केलें आहे. मनुष्य मेला म्हणजे त्याच्यावर जे मृत्युलेख लिहिले जातात, त्यांत जशी त्याची भरमसाट स्तुति केलेली असते आणि मृताचे दोष दाखविण्याचें तर बाजूलाच राहिलें परंतु गुणपरमाणूंचा पर्वत करण्याची प्रथा असते, त्यापैकीच या चरित्रांची गोष्ट आहे. अशा रीतीने लिहिलेल्या चरित्रांतून त्या मनुष्याचें जें चित्र बाहेर पडेल त्याच्यांत आणि त्या मनुष्यांत काय साम्य दृष्टीस पडणार ? काळ्याकुट्ट आणि कुरूप माणसाचें चित्र काढतांना त्यांत तो गोरापान आणि सुंदर आला पाहिजे असला वेडा हट्ट धरण्यापैकीच हा प्रकार. ऑलिव्हर क्रॉमवेलने आपलें चित्र काढणाऱ्या चितान्याला "Paint me as I am. If you leave out the scars and wrinkles, I will not pay you a shilling." असें बजावून सांगितलें होतें, याचें कारण तरी हेंच की मनुष्याचें चित्र काढावयाचें तर तें हुबेहूब तर आलें पाहिजे ? आपल्या तोंडावर देवीचे वण आणि सुरकुत्या असल्या तर त्या चित्रांत आल्याने बिघडतें काय ? पण जिथे मनुष्य स्तुतिस्तोत्रें गायलाच बसतो तिथे वास्तविकतेची अपेक्षा कशी करावयाची ?

अशा प्रकारचीं चरित्रें लिहिलीं गेलीं याचें एक कारण असें की चरित्र हा वाङ्मयाचा एक भाग आहे, आणि त्यांत कलात्मकतेला कांही स्थान आहे ही कल्पनाच त्या काळीं नव्हती. रचनेची कलात्मकता तर बाजूलाच राहिली, परंतु आपण जें चित्र काढतों तें निदान मूळच्या मनुष्याशीं जुळलें पाहिजे हीही कल्पना नव्हती. मनुष्याची स्मृति कायम राहावी आणि पुढल्या पिढीने चरित्रापासून कांही तरी शिकावें हा हेतु मनांत असला तरी त्या व्यक्तीचें ओळखूं न येण्याइतकें अतिरंजित चित्र काढण्यांत फायदा काय ? गुणांचें अतिरंजन व दोषांचा अपलाप करून देवासारखी निर्दोष व्यक्ति निर्माण केल्याने पुढील पिढीवर त्याचा चांगला परिणाम होईल अशी कल्पना करणें चुकीचें आहे.

त्यापासून झाला तर उलटच परिणाम होईल. चरित्रविषयीभूत व्यक्तीचें असें दोषरहित असामान्य स्वरूप पाहून ती व्यक्ति आपल्यापेक्षा कांही तरी निराळी आहे, अलौकिक आहे, तेव्हा तिची बरोबरी करणें किंवा तिचें अनुकरण करणें आपल्या आवाक्याबाहेरचें आहे असाच सामान्य वाचकाचा ग्रह होईल. मागे 'शिवाजी उत्सवा'निमित्त भाषण करतांना श्री. अ. बा. लट्ठे यांनी ह्या मुद्द्यावर विशेष भर दिला होता. ते म्हणाले: "या आमच्या पूजाप्रवृत्तीचा सर्वांत मोठा दुष्परिणाम असा की ज्या थोर व्यक्तींच्या चरित्रांचा प्रकाश वास्तविक आजच्या आमच्या हातांतील कार्यावर पडून आम्हांस आमचा मार्ग स्वच्छ दिसावयास मदत व्हावयाची, त्या व्यक्तींची स्थापना उंच स्वर्गांत झाल्यामुळे त्यांचा आमचा कसलाच संबंध उरत नाही. उंच आकाशांतील तेजोगोल ज्याप्रमाणे आम्हांला परके वाटतात, त्याप्रमाणे आमच्या राष्ट्रांत होऊन गेलेल्या थोर पुरुषांचा आमच्या आयुष्याशीं कसलाच जिव्हाळ्याचा संबंध नाही अशी भलती भावना आम्ही उराशीं धरून बसतों...... आमच्या थोर व्यक्तींच्या चरित्रांभोवतीं गूढतेचें आवरण घालण्याची, आकाशांतील धुक्यांत त्यांची स्थापना करण्याची....सवय आमच्या देशबांधवांनी सोडली पाहिजे. शिवाजी हा शिवाचा अवतार होता असें समजण्यापेक्षा मानवी सामर्थ्याच्या जोरावर संकटांशीं झगडणारा, मानवी शरीराचीं व बुद्धीचीं व्यंगें अंगीं असूनही महत्कार्य करून दाखविणारा असा एक जबरदस्त कर्तृत्वाचा पण तुमच्या आमच्यासारखाच एक मनुष्य, या दृष्टीने त्याच्या चरित्राचा अभ्यास करण्यांतच त्याचा खरा गुणगौरव होईल." यावरून स्पष्ट दिसेल की जर शिवाजीच्या चरित्रापासून आपणास बोध घ्यावयाचा असेल, त्याचें अनुकरण करावयाचें असेल तर तो आपल्यापैकी सामान्यांतल्या सामान्य वाचकालाही जवळचा वाटला पाहिजे, त्याच्या अंगीं कांही असामान्य गुण असले तरी मनुष्यमात्रांत सामान्यतः दिसणारे

दोषही त्याच्या अंगीं होते व तो आपल्यांतलाच एक होता असें मनुष्याला पटलें पाहिजे. अशा मनुष्याच्या चरित्रापासूनच सामान्य मनुष्याला उत्तेजन मिळूं शकेल. एरव्ही सर्वांगपरिपूर्ण अशा संगमरवरी पुतळ्याचें कोण अनुकरण करावयास जाणार? तात्पर्य, चरित्र हा वाङ्मयकलेचा भाग आहे ही दृष्टि येईपर्यंत चरित्रनायकाचा केवळ गौरव करणें आणि त्याच्या जीवनापासून कांही तरी बोध मिळणें हे हेतु व त्याचें देवासारखें दोषरहित अवास्तव चित्र काढण्याची पद्धत, थांत बदल होणें शक्य नाही.

कथावाङ्मयाच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणे कलावादी आणि बोधवादी असे पक्ष निर्माण झाले आहेत त्याचप्रमाणे चरित्रवाङ्मयांत आहेत. अगदी सामान्य परंतु श्रीमंत अशा मनुष्यांचीं केवळ गौरव करण्याकरितां लिहवून घेतलेलीं चरित्रें सोडून दिलीं, तरी पूर्वीच्या काळीं पुढच्या पिढीसमोर आदर्श ठेवण्याच्या हेतूने जीं चरित्रें लिहिलीं गेलीं त्यांचे पुरस्कर्ते हे निर्भेळ बोधवादी होते. ते जरी चरित्रांतील वास्तवतेच्या सर्वस्वीं विरुद्ध नसले, तरी चरित्रांत सत्याचा अपलाप करणें अगर त्यास जराशी मुरड घालणें, हें महान् पातक आहे असें मानण्याइतके ते सत्याचे अनन्य उपासक नव्हते. त्यांचें म्हणणें असें की, चरित्रापासून पुढच्या पिढीने जर बोध घ्यावयाचा असेल तर तें चरित्र सर्व दृष्टीने आदर्शासारखें लोकांसमोर मांडलें पाहिजे. आदर्श म्हणून ज्याचें चित्र लोकांपुढे ठेवावयाचें तो मनुष्य जर चारचौघांसारखाच असला तर त्याबद्दल लोकांना आदर वाटावयाचा कसा? याकरितां ज्याचें चरित्र लिहावयाचें तो मनुष्यही अलौकिक कर्तृत्वाचा असाच निवडला पाहिजे; इतकेंच नव्हे तर त्याच्या त्या अलौकिकत्वाला बाध येईल अशा गोष्टी चरित्रांतून गाळून टाकणें हेंही आवश्यक आहे. डॉ. केतकरांचें चरित्र लिहितांना, ते खिशांत भजीं ठेवून रस्त्याने जातां जातां खात असत ही गोष्ट सांगितली तर पुढच्या पिढीला त्यांच्याबद्दल

आदर काय राहणार? डॉ. जॉनसन रस्त्याने जातां जातां तारेचे खांब मोजीत जात असे हें चरित्रकाराने सांगितलें म्हणजे झालेंच!—डॉ. जॉनसन पुढच्या पिढीच्या मनांतून खाडकन उतरणार नाही का?

चरित्रनायकाचा गौरव करून त्याला देवकोटीला नेऊन वसविणें व त्याच्या चरित्रापासून लोकांस बोध प्राप्त करून देणें हे हेतु व त्याबरोबर येणाऱ्या कलाविघातक गोष्टी, यांविरुद्ध बंड उभारणारा पहिला इंग्रजी लेखक लिटन स्ट्रॅची हा होय. अर्वाचीन चरित्रवाङ्मयाचा जनक असें याचें वर्णन करतां येईल. गेल्या वीसपंचवीस वर्षांत युरोपीय वाङ्मयांत जे चरित्रकार होऊन गेले ते स्ट्रॅचीची परंपरा चालविणारे त्याचे शिष्य होत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईल असें वाटत नाही. व्हिक्टोरियन युगांतील चरित्रासंबंधींच्या कल्पना स्ट्रॅचीने पार बदलून टाकल्या. मृताचा गौरव करून त्याच्या चरित्रापासून बोध घेण्यासाठी चरित्राचा उपयोग करण्याची कल्पना त्याला मान्य नव्हती. बोधाचा हेतु ज्या ठिकाणीं आला त्या ठिकाणीं सत्याचा बळी देण्याची बुद्धि झाल्याशिवाय राहावयाची नाही याची त्याला खात्री होती. तो खराखुरा कलावादी होता. चरित्रवाङ्मय ही कला आहे ही कल्पना प्रथम त्याने रूढ केली; आणि कला म्हणजे त्यापासून नीतिबोध झालाच पाहिजे हें त्याला मुळीच मान्य नव्हतें. चरित्र लिहिण्याचा खरा उद्देश नीतिबोधाचा किंवा गौरव करण्याचा नसून व्यक्तीचें हुबेहूब चित्र रंगविण्याचा आहे असें त्याचें मत होतें. सिड्नें ली या प्रसिद्ध ग्रंथकाराने चरित्राचा हेतु a truthful transmission of personality—व्यक्तित्वाचें सत्यपूर्ण चित्रण—असा सांगितला आहे. या त्याच्या व्याख्येशीं स्ट्रॅचीची चरित्रासंबंधींची कल्पना बरोबर जुळते. या व्याख्येंतील 'truthful'—सत्यपूर्ण—व 'Personality'—व्यक्तित्व—या दोन शब्दांमध्ये आधुनिक चरित्रवाङ्मयाचीं मुख्य तत्त्वें साठविलीं आहेत. 'Transmission of personality'—व्यक्तिदर्शन—या शब्दप्रयोगावरून चरित्राचा हेतु गौरवाचा किंवा नीति-

बोधाचा नसून व्यक्तित्त्वाचें यथार्थ दर्शन हा होय हें स्पष्ट होतें, व truthful–सत्यपूर्ण–या शब्दानें चरित्रलेखनांत सत्याचें किंवा वास्तविकतेचें महत्त्व किती आहे हें सिद्ध होतें. या व्याख्येमध्यें कलात्मकतेच्या तत्त्वाची काय ती उणीव भासते. ऑक्सफर्ड कोशाच्या ( 'the history of an individual as a branch of literature) या व्याख्येंतील as a branch of literature–वाङ्मयाचा एक प्रकार–असे शब्द आहेत ते या तत्त्वाचे सूचक आहेत. हीं तीन तत्त्वें एका ठिकाणीं ठेविलीं म्हणजे चरित्राची थोडक्यांत व्याख्या 'सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन' अशी होते व तीच व्याख्या स्ट्रॅची व त्याचे अनुयायी यांस अभिप्रेत होती.

या व्याख्येला अनुसरून चरित्र लिहावयाचें म्हणजे अगदी मुळापासूनच मतभेद होणार हें उघड आहे. चरित्र कुणाचें लिहावें हा पहिला प्रश्न. केवळ गौरव करण्यासाठी जीं अमीरउमरावांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं त्यांत हा प्रश्न उद्भवण्याचें कारण नव्हतें. कारण त्यांत चरित्रनायकाच्या योग्यतेचा प्रश्न नसून केवळ त्याची स्मृति कायम ठेवावयाची एवढाच उद्देश असे. अशा चरित्रांत चरित्रवाङ्मयाच्या मुख्य तत्त्वांपैकी एकही धड पाळलें जावयाचें नाही हें उघड आहे. केवळ स्तुतिच जेथें करावयाची तेथें सत्यपूर्णता कशाची, व्यक्तिदर्शन कुठचें आणि कलात्मकता तरी कुठली येणार? नीतिबोधाच्या दृष्टीनें जीं चरित्रें लिहावयाचीं त्यांत हा प्रश्न उद्भवावयाचा. चरित्रनायकाच्या चरित्रापासून लोकांपुढे कांही आदर्श मांडावयाचा म्हटला म्हणजे तो सामान्य मनुष्य असतां कामा नये हें ठरलेंच. जुन्या काळीं शोकपर्यवसायी नाटकांच्या विषयासंबंधीं ग्रीक लोकांची जी कल्पना होती त्या कल्पनेप्रमाणे चरित्राचा विषय असला पाहिजे. म्हणजे त्यांत एकप्रकारची भव्यता आणि गांभीर्य पाहिजे. सिड्नेली यासारख्या अर्वाचीन लेखकानेही चरित्रविषय भव्य (of a certain magnitude) असावा असें आपलें मत दिलें आहे.

आंद्रे मॉर्वासारखा अद्ययावत् चरित्रकारही थोडासा या मताकडे झुकणारा आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याचें म्हणणें असें की नीतिबोधाच्या दृष्टीनेच थोर मनुष्य निवडूं नये हें जरी खरें असलें, तरी सामान्य मनुष्याच्या बाबतींत अशी अडचण उपस्थित होते की त्याचें चरित्र लिहिण्यासारखी सामग्री फार थोडी मिळते. थोर मनुष्यासंबंधीं वर्तमानपत्रांत, त्याच्या पत्रव्यवहारांत, दैनंदिनींत, किंवा इतर लोकांकडून तोंडी, पुष्कळशी माहिती मिळूं शकते. सामान्य मनुष्य कधी दैनंदिनी लिहावयाचा नाही, कधी पत्रें जपून ठेवावयाचा नाही आणि वर्तमानपत्रांत त्याच्यासंबंधीं काय माहिती मिळणार? म्हणजे त्याची अडचण असलीच तर ती केवळ व्यावहारिक आहे. याच्या उलट कांही टीकाकारांचें म्हणणें असें आहे की ज्याप्रमाणे चित्रकार आपल्या चित्राचा विषय निवडतांना केवळ भव्य देखावे किंवा थोर व्यक्ति निवडतो असें नाही, तर सामान्य देखाव्यांतही त्याला कित्येक वेळां आकर्षकपणा दिसून तो तसाच विषय निवडतो, त्याप्रमाणे चरित्रकाराचें आहे. कलेच्या क्षेत्रांत लहानथोर हा भेद येऊं शकत नाही. चित्रकार एखाद्या सुंदर स्त्रीचें चित्र रंगविण्यांत जितका आनंद मानील तितकाच एखाद्या कुरूप, तोंडावर सुरकुत्यांचें जाळें झालेल्या म्हाताऱ्या भिकारणीचें चित्र काढतांना त्याला आनंद होईल. तसेंच चरित्रकाराचें. बॉस्वेल जसा जॉनसनच्या संगतींत राहून त्याच्या प्रत्येक कृतीची, विचारांची नोंद करूं शकला, त्याप्रमाणे एखाद्या सामान्य मनुष्याच्या कृति, विचार व भावना यांची व्यवस्थित नोंद करून त्याचें चरित्र–त्याच्या मनोविकासाचें यथार्थ चित्र–रंगवितां येईल की नाही? प्रत्येक मनुष्याच्या मनोविकासाचा इतिहास मनोरंजक होऊं शकेल. मग सामान्य मनुष्याचें चरित्र लिहावयास कोणती हरकत आहे?

या दोन्ही पक्षांत एक सामान्य गोष्ट आहे. ती म्हणजे चरित्र केवळ गौरवाकरितां किंवा नीतिबोधाकरितां लिहूं नये, तर कलाकृति

निर्माण करण्याचा त्याचा मुख्य हेतु आहे, हें दोघांनाही मान्य आहे. हाच नवीन युगाचा दृष्टिकोण आहे व आपल्याला याच दृष्टीने विचार करावयाचा आहे. या दोन्ही पक्षांत थोडें थोडें सत्य आहे असें दिसून येईल. कलाकृति निर्माण करावयाची म्हणजे विषयाची निवड ही आलीच. वाटेल तो विषय घेऊन कांही चालणार नाही. विषयाची निवड करतांना लौकिक दृष्ट्या भव्य आणि सुंदर दिसणाऱ्या वस्तूची निवड केली पाहिजे अशी मर्यादा कलाकाराला घालतां येणार नाही. चित्रकार आपली चौकट, कुंचले, रंग वगैरे सामग्री घेऊन योग्य विषयाची निवड करण्यासाठी फिरत असतो. देखावा भव्य आणि सुंदर असला तर त्याला तो आवडेलच असा नियम नाही. त्याच्या कलादृष्टीला एखादा सामान्य देखावाही आकर्षक दिसूं शकेल. त्याची दृष्टिच वेगळी असते. त्याच्या दृष्टीने नुसत्या भव्यतेपेक्षा किंवा सौंदर्यापेक्षा यथार्थदर्शन (Perspective) रचनासंगति (Composition) इत्यादिकांना जास्त महत्त्व असतें. चरित्रकारही अशाच निराळ्या दृष्टीने चरित्रविषयांकडे पाहत असतो. आंद्रे मॉर्वा याने वर्डस्वर्थ, कोलरिज इत्यादि मोठेमोठे कवि सोडून शेलेचें चरित्र लिहावयास घेतलें, यांत हेंच रहस्य आहे. शेलेच्या जीवनांत त्याला जी एकप्रकाची विलक्षण रचनासंगति (Composition) व एकसूत्रता दिसली ती वर्डस्वर्थ आणि कोलरिज—ते कितीही मोठे कवि असले तरी—यांच्या जीवनांत दिसली नाही. हे सूक्ष्म गुण एखाद्याच्या जीवनचरित्रांत शोधून काढावयास चित्रकाराची सूक्ष्म व मार्मिक दृष्टि पाहिजे. ही दृष्टि प्रत्येक चरित्रकाराजवळ असेलच असें नाही. परंतु सामान्यतः असें दिसून येईल की एखाद्याचें चरित्र लिहावयाचें म्हटलें म्हणजे त्याच्या एकंदर जीवनपटांत सामान्यापेक्षा कांही तरी निराळेपणा असावा लागतो आणि हा निराळेपणा शोधून काढण्याइतकी मार्मिक दृष्टि तरी चरित्रकारांत असावयास पाहिजे. ज्याचें आयुष्य केवळ चारचौघांप्रमाणे गेलेलें आहे त्याच्या आयुष्यांत वर्णन करण्यासारखें तें

काय असणार? कवीला काव्य करण्याकरितां साधा विषय चालत असला तरी त्या साध्या विषयांतही कांही तरी आशय असेल, कांही तरी लक्ष वेधून घेण्यासारखें असेल, तरच कवि तो विषय निवडतो. त्याचप्रमाणे चरित्रकाराला चरित्रविषय मोठासा भव्य किंवा लौकिक दृष्टया थोर नसला तरी चालतो, परंतु त्यांत कांही तरी आकर्षक गुण असावा लागतो. केवळ श्रीमंतीमुळे किंवा उच्च पदवीमुळे किंबहुना केवळ विद्वत्तेमुळेही मनुष्य योग्य चरित्रविषय होऊं शकेल असें नाही. मोठ्या मोठ्या सरदारांचीं व अधिकाऱ्यांचीं चरित्रें कित्येक वेळां केवळ कर्तव्य म्हणून व पुष्कळ वेळां भविष्यकालीन फायद्याकरितां लिहिलेलीं असतात. चरित्र लिहिण्यासारखे आकर्षक गुण त्यांच्या आयुष्यांत मुळीच सापडावयाचे नाहीत. तेव्हा त्यांचें चरित्र नीरस व्हावें यांत आश्चर्य नाही. परंतु एखाद्या अत्यंत विद्वान माणसाने आपल्या आयुष्यभर ग्रंथ लिहिण्यापलीकडे कांही केलें नसेल तर त्याचेंही चरित्र कलादृष्टया तितकेंच नीरस होईल! उलट ज्याच्या जीवनचरित्रांत किंवा स्वभावविकासांत चार चौघांपेक्षा कांही तरी वेगळेपणा आहे, कांही तरी अद्भुतरम्य भाग (Romantic element) आहे, अशा मनुष्याचें चरित्र जास्त आकर्षक होऊं शकतें. डॉ. भांडारकर व इतिहासाचार्य राजवाडे किंवा डॉ. केतकर हे सारखेच विद्वान संशोधक. परंतु भांडारकरांचें आयुष्य एकंदरींत चारचौघांसारखेंच. ठराविक वेळीं सरकारी नोकरींत शिरले व विशेष कमीजास्त न घडतां इमानेंइतबारें आपली नोकरी पूर्ण करून सेवानिवृत्त झाले; दरम्यानच्या कालांत व नंतरही कांही थोडेंफार संशोधन केलें व पुस्तकें लिहिलीं; सरकारकडून व लोकांकडून मानमान्यता भरपूर मिळविली. परंतु चरित्रकाराला या जीवनचरित्रांत आकर्षकपणा दिसावयाचा नाही. त्यापेक्षा भांडारकरांच्या मानाने पुष्कळच कमी मानमान्यता मिळविलेले परंतु तितकेच किंबहुना जास्त कर्तृत्ववान राजवाडे किंवा केतकर हे मार्मिक चरित्रकाराला जास्त जवळचे वाटतील. केवळ स्वभावांतील

९०४१०

व वागणुकींतील विक्षिप्तपणानें नव्हे, तर एकंदर आयुष्यांत अनेक अडचणींना तोंड देऊन, स्वदेश व स्वभाषा यांच्या अभिमानानें प्रेरित होऊन अपूर्व स्वार्थत्यागानें संशोधन व लेखनकार्य करण्यांत त्यांनी दाखविलेल्या युयुत्सु वृत्तीनें, त्यांच्या जीवनचरित्राला एकप्रकारची विविधता व आकर्षकपणा आला आहे. याच दृष्टीनें पोप, ॲडिसन, स्विफ्ट् यांच्यापेक्षा डॉ. जॉनसन हा जास्त चांगला चरित्रविषय ठरतो; आयुष्यांत फारशा अडचणी न येतां पायरीपायरीनें मुख्यप्रधानाच्या पदापर्यंत चढत जाणाऱ्या ग्लॅडस्टनपेक्षा, जातीनें ज्यू असल्यामुळे लहानपणापासून पदोपदीं ठोकरा खातखात वर चढलेला डिझराएली आंद्रे मॉर्वासारख्या कलावन्ताला जास्त रुचतो. रानडे हे अत्यंत विद्वान, कर्तबगार, देशाभिमानी पुरुष खरे, परंतु टिळकांच्या आयुष्यांतील धकाधकी, चढउतार व धडाडीची वृत्ति, त्यांच्या आयुष्यांत नाही. रानडयांच्या समतोल, नेमस्त वृत्तीपेक्षा टिळकांचा स्वदेशाभिमानांतील आत्यंतिकपणा चरित्रकाराला कदाचित् जास्त रम्य वाटेल. फार काय, जन्मभर आरामखुर्चीवर पडल्यापडल्या राजकारणांत कागदी घोडे नाचविणाऱ्या एखाद्या मवाळ पुढाऱ्यापेक्षा उमाजी नाईक किंवा वासुदेव बळवंत फडकेच एखाद्या चरित्रकाराला चरित्रविषय म्हणून जास्त आवडेल.

यावरून साहजिक कोणी असें अनुमान काढील की विचारप्रवण वृत्तीच्या माणसापेक्षा कार्यप्रवण वृत्तीचा मनुष्य चरित्रविषय म्हणून अधिक योग्यतेचा ठरतो. परंतु तें सर्वस्वीं खरें नाही. कार्यप्रवण वृत्तीच्या किंवा बहिर्मुख वृत्तीच्या मनुष्याच्या आयुष्यांतील घडामोडी लोकांच्या डोळ्यांसमोर घडतात त्यामुळे त्यांतील चढउतार, एखाददुसरा रोमांचकारक प्रसंग हे लोकांच्या डोळ्यांत प्रामुख्यानें भरतात. उलट विचारप्रवण किंवा अंतर्मुख वृत्तीच्या मनुष्याच्या अंतःकरणांतही घडामोडी होत नाहीत असें नाही; परंतु त्या लोकांच्या दृष्टीस पडत नसल्यामुळे याचें जीवन सामान्य स्वरूपाचें दिसतें. खरोखर पाहतां ज्या चरित्र-

काराला मनोविकासाचें चित्र रंगवावयाचें आहे त्याला पहिल्यापेक्षा दुसऱ्या प्रकारचाच मनुष्य चरित्रविषय म्हणून अधिक सोयीचा वाटेल. प्रसिद्ध मनोविश्लेषणशास्त्रज्ञ युंग (Jung) हा म्हणतो : "The extrovert is so much less accurately describable—less interestingly describable—than the introvert...... An analysis of his mind will always give a negative result, since the chief value of the extrovert lies not in himself but in reciprocal relation to the object. The relation to the object belongs to those imponderabilia which the intellectual formation can never seize." बहिर्मुख वृत्तीच्या मनुष्याचें मनोविश्लेषण करण्यास वाव राहत नाही. आणि म्हणून त्याचें चरित्र विशेष मनोरंजक होणार नाही असा त्याच्या म्हणण्याचा आशय आहे. यासंबंधीं दुसऱ्या एका टीकाकाराने अलीकडच्या अमेरिकन लोकांचें उदाहरण घेऊन असें दाखविलें आहे की आजचे बहुतेक सर्व अमेरिकन पुढारी चरित्राचे विषय या दृष्टीने निरुपयोगी आहेत. तो म्हणतो की, अमेरिकेंतील सर्व मोठे लोक जडवाद, व्यवहारवाद व ऐहिकता यांत इतके गुरफटून गेले आहेत की, त्यांना आंतरिक जीवन असें कांही उरलेंच नाही. व्यवहारवादादिकांच्या लाटांत गटंगळ्या खाऊन खाऊन पाण्यांतील गोट्याप्रमाणे त्यांच्या मनाचे सर्व पैलू पार घासले गेले आहेत. त्यामुळे त्यांच्या मनाची नीट परीक्षा करणें अशक्य होऊन बसलें आहे. अशा रीतीने चरित्रलेखनाकडे मानसशास्त्रदृष्ट्या बघणाऱ्या लेखकांचा जो वर्ग आहे त्याला केवळ बहिर्मुख प्रवृत्तीच्या माणसापेक्षा अंतर्मुख प्रवृत्तीचा मनुष्य चरित्रनायक या दृष्टीने श्रेष्ठ वाटतो. ॲब्राहाम लिंकन किंवा प्रेसिडेन्ट रूझवेल्ट यांच्यापेक्षा ते इमर्सनला जास्त गुण देतील. असो. प्रत्येक चरित्रकाराचा स्वतंत्र दृष्टिकोन असतो, आणि त्याप्रमाणे तो आपला चरित्रनायक निवडतो. एवढेंच की चरित्रविषय होण्यासाठी मनुष्याच्या आंतरिक किंवा बाह्य जीवनांत चारचौघांपेक्षा कांही तरी विशेष असलें पाहिजे. कार्लाइलने आपला

स्नेही स्टर्लिंग यांचें चरित्र लिहिलें आहे, त्याच्या अखेरीस तो म्हणतो : All that remains, in palpable shape, of John Sterling's activities in this world, are those two poor volumes...an inconsiderable memorial, not pretending to have achieved greatness; only disclosing mournfully...that a promise of greatness was there...High hopes, noble efforts; under thickening difficulties and impediments, ever new nobleness of valiant effort,—and the result death, with conquests by no means corresponding. A life which cannot challenge the world's attention; yet which does modestly solicit it, and perhaps on clear study will be found to award it." स्टर्लिंग यास त्याच्या आयुष्यांत कधी यश मिळालें नाही, तो कधीही जगापुढे आला नाही. परंतु त्याच्या उच्च आशाआकांक्षा व त्या प्राप्त करून घेण्यासाठी त्यानें जन्मभर केलेली–अयशस्वी का होईना–धडपड, त्याची अखेरीस झालेली निराशा, इत्यादिकांचा इतिहास लिहिला असतां तो अत्यंत मनोरंजक होईल–अनेक यशस्वी थोरामोठ्यांच्या चरित्रापेक्षा मनोरंजक होईल–असा कार्लाइल यास भरवसा होता, म्हणून त्याने या लौकिकदृष्ट्या सामान्य मनुष्याचें चरित्र लिहिण्याचें धाडस केलें. याहीपुढे जाऊन असें मानणारे लोक आहेत की, मनुष्य कितीही सामान्य असला किंबहुना लौकिकदृष्ट्या अत्यंत हीन दर्जाचा गुन्हेगार किंवा नीच कारस्थानी पुरुष असला. तरी बॉस्वेलच्या पद्धतीने जर कोणी त्याचें चरित्र लिहिलें तर तें चांगलेंच उतरेल. बायरन कवीचें आचरण नैतिकदृष्ट्या गर्हणीय असलें तरी त्याचें चरित्र लिहिणें गर्हणीय कसें ठरतें? हिंदुस्थानाच्या सुपीक भूमींत पिकणारे जे अनेक 'बुवा' आपल्या मोहिनीनें लाखों लोकांना आपले दास करून घेऊन यशस्वी म्हणून जगापुढे मिरवीत आहेत, त्यांपैकी एखाद्याचें चरित्र--भक्तिभावानें नव्हे, तर त्यांच्या मनोविकासाच्या व 'कार्या'च्या दृष्टीने–एखाद्या निकटवर्ती शिष्यानें लिहिलें तर तेंही कमी मनोरंजक होईल असें नाही! असो.

या दृष्टीने लिटन स्ट्राची याने लिहिलेल्या व्हिक्टोरिया राणीच्या चरित्राचा निर्देश करणें आवश्यक आहे. चरित्रनायकाच्या जीवनांत कांही तरी विशेष पाहिजे हें जरी त्याला मान्य असलें तरी चरित्रकाराला चरित्रविषयाबद्दल आदर, प्रेम किंवा सहानुभूति पाहिजेच हें त्याला मान्य नव्हतें. चरित्रकाराने चरित्र लिहितांना कांही तरी एक दृष्टिकोन ठेवला पाहिजे; परंतु तो दृष्टिकोन आदराचा, प्रेमाचा किंवा सहानुभूतीचाच असला पाहिजे असा नियम नाही, असें त्याचें मत होतें. त्याने व्हिक्टोरिया राणीचें चरित्र लिहावयास घेतलें याचें कारण तिच्याबद्दल त्याला आदर किंवा प्रेम होतें असें नाही; उलट व्हिक्टोरियन युगांतील नीतिमत्तेच्या, मोठेपणाच्या विलक्षण कल्पना, फाजील शिष्टपणा, इत्यादिकांबद्दल त्याला अत्यंत तिरस्कार होता, आणि या सर्व अवगुणांचें प्रतीक म्हणून त्याने चरित्राकरतां व्हिक्टोरिया राणीची निवड केली असें म्हणतां येईल. परंतु एवढेंच म्हणून भागणार नाही. व्हिक्टोरिया राणीची केवळ टर उडविण्याकरितां त्याने चरित्र लिहिलें असें म्हणणें म्हणजे स्ट्रॅचीला अन्याय केल्यासारखें होईल. व्हिक्टोरिया राणी ही मनुष्य या दृष्टीने अगदी सामान्य, परंतु सम्राज्ञीपदामुळे उच्च पदवी धारण करणारी, सर्वशक्तिमान् अशी स्त्री; स्वभावाने गर्विष्ठ, हट्टी, एककल्ली, परंतु तितकीच प्रेमळ व थोडीशी मूर्ख; या विरोधांत स्ट्रॅचीला कांही तरी अद्भुतरम्यता दिसली, आणि आधी किंचित कुचेष्टेच्या स्वरांत सुरुवात केलेल्या चरित्राचा शेवट राणीबद्दलच्या पूर्ण प्रेमादरांत होतो. 'Those who came to scoff, remained to pray' अशी त्याची स्थिति झाली. आणि यांतच स्ट्रॅचीच्या कलेची परमावधि झाली आहे. दृष्टिकोन सहानुभूतीचा असो वा नसो, चरित्र लिहितांना उपलब्ध सामग्रींतून जें चित्र बाहेर पडेल तें खरें—तेंच उत्तम चरित्र, अशी त्याची चरित्रकलेची कल्पना होती.

आंद्रे मोर्वा हा स्ट्रॅचीच्याच परंपरेंतील फ्रेंच चरित्रकार. त्याने

जीं चरित्रें लिहिलीं आहेत त्यांत शेले व डिझराएली यांचीं चरित्रें प्रसिद्ध आहेत. यांसंबंधी मागे उल्लेख आलाच आहे. चरित्रकार हा फ्रेंच मनुष्य आणि तो या इंग्रज कवीचीं व राजकारणी पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याच्या भानगडींत कसा पडला याचें कोणासही आश्चर्य वाटेल. याची मीमांसा त्याने स्वतःच केली आहे. ती सर्व त्याच्याच शब्दांत देणें योग्य झालें असतें, परतु त्याने फार जागा अडेल. याकरितां मुख्य मुद्द्यांचा येथे निर्देश करतों. तो म्हणतो : "शेले कवीचें एक चरित्र मी वाचलें तेव्हा माझ्या हृदयांत कांहीतरी विलक्षण संवेदना उत्पन्न झाल्या. मी त्या वेळीं नुकताच कॉलेजांतून बाहेर पडलों होतों आणि माझ्या डोक्यांत कांही विशिष्ट राजकारणविषयक व तत्त्वज्ञानविषयक कल्पना घोळत होत्या व शेले व त्याचा मित्र हॉग यांच्या डोक्यांत याच वयांत तशाच कल्पना घोळत होत्या व त्या उघडपणें बोलून दाखविल्याबद्दल त्या दोघांनाही कॉलेज सोडून जावें लागलें होतें. शेलेचें चरित्र वाचतां वाचतां मला असें आढळून आलें की त्याच्या तीस वर्षांच्या आयुष्यांत त्याच्या अंतःकरणांत जो लढा चालू होता तोच लढा माझ्या आयुष्यांत मला अनुभवावा लागला होता. तारुण्यांत आपल्या डोक्यांत ज्या कल्पना खेळत असतात त्यांचा प्रत्यक्ष परिस्थितीशीं मेळ बसत नाही आणि मनुष्य थोडासा चिडखोर व निराश होतो ही गोष्ट मला स्वतःच्या आणि शेलेच्या आयुष्यावरून चांगली समजली. इतकें दोघांच्या आयुष्यांत साम्य असल्यामुळे मला शेलेच्या जीवनाबद्दल जास्त आकर्षण वाटूं लागलें आणि याचें जीवनचरित्र लिहिलें असतां आपल्याला आपलें अंतःकरण मोकळें केल्याचा आनंद मिळेल असें वाटूं लागलें. आधी शेलेच्या जीवनचरित्राच्या आधारे एक कादंबरी लिहावी अशी कल्पना माझ्या डोक्यांत आली, आणि त्याप्रमाणें कादंबरी लिहूनही काढली; परंतु त्याने समाधान झालें नाही. अंतःकरणांतील खुटखुट पूर्णपणें नाहीशी झाली नाही. शेवटीं शेलेचें

चरित्रच लिहिण्याचें ठरविलें व त्यासंबंधींची सर्व सामग्री गोळा करून चरित्र लिहून काढलें, तेव्हा बरें वाटलें."

शेलेकडून डिझराएलीकडे तो कसा वळला याचाही इतिहास मनोरंजक आहे. तो पुढे म्हणतो : "शेलेच्या व माझ्या कल्पना जुळल्यामुळे मी त्याचें चरित्र लिहिलें. परंतु शेलेचें आयुष्य तिसाव्या वर्षी संपलें. तेव्हा त्याच्यासारख्या ध्येयवादी तरुणाला पुढील आयुष्यांत जो लढा अनुभवावा लागला असता त्याचें प्रतीक शोधून काढणें आतां मला आवश्यक वाटूं लागलें. आता तशा तऱ्हेचा दुसरा कोणी चरित्रनायक शोधणें प्राप्त आलें. इतक्यांत सहज डिझराएलीचें चरित्र वाचनांत आलें आणि मला पाहिजे तसा मनुष्य मिळाल्यासारखें वाटलें. त्याचा ध्येयवादीपणा व तत्त्वनिष्ठा, लोकांकडून त्याला सोसावा लागलेला विरोध व क्वचित्प्रसंगीं छळ, त्या विरोधाला न जुमानतां त्यानें दाखविलेली कर्तव्यनिष्ठा, जन्मभर झगडतां झगडतां देह जर्जर झालेला असतांनाही कायम राहिलेला त्याचा करारीपणा, इत्यादि गुणांनी माझें मन आकर्षून घेतलें. विशेषतः डिझराएली हा ज्या विशिष्ट राजकीय विचारप्रणालीचा प्रतिनिधि मानला गेला होता ती मला तंतोतंत मान्य होती. आणि मी कांही प्रत्यक्ष राजकारणांत पडलेला नव्हतों; तेव्हा त्या विचारप्रणालीचा पुरस्कार करण्याची आपणास अशा रीतीनें संधि मिळेल अशीही मनांत एक कल्पना आली. अशा रीतीनें डिझराएलीचें चरित्र जन्मास आलें." याच्यापुढे जाऊन तो म्हणतो की, "तरुणपणांतील उच्छृंखल ध्येयवादित्वाची पुढील आयुष्यांत एखाद्या तत्त्वज्ञान्याच्या स्थितप्रज्ञतेंत परिणति झाली आहे, अशा स्वरूपाचें चित्र रंगविण्याची माझी इच्छा आहे. सध्या तशा प्रकारचीं दोन माणसें माझ्या डोळ्यांसमोर आहेत, एक जर्मन कवि गटे आणि दुसरा इंग्रजी कादंबरीकार जॉर्ज मेरिडिथ."

यावरून चरित्राचा विषय निवडतांना आंद्रे मोर्वा हा सामान्यतः कोणती दृष्टि ठेवीत असे हें लक्षांत येईल.

आंद्रे मोर्वा याने कोणत्या दृष्टीने आपले चरित्रविषय निवडले हें वरील हकीकतीवरून लक्षांत येईल. या हकीकतींतील तात्पर्य काढं गेल्यास तें असें निघेल कीं चरित्रकाराचें मन ज्या व्यक्तीच्या चरित्राशीं कोणत्या ना कोणत्या कारणाने समरस होऊन जात असेल अशी व्यक्ति त्याने चरित्रलेखनासाठी निवडावी. ज्या व्यक्तीची मनोवृत्ति, जिचीं ध्येयें अथवा जिचे आयुष्यांतील झगडे चरित्रलेखकाचें मन सहानुभवित्वाने आकृष्ट करून घेत असतील अशी व्यक्ति चरित्रासाठी निवडली असतां तिचें चरित्र त्या लेखकाच्या हातून हृदयंगम उतरेल. लिटन स्ट्राची हा सहानुभवाच्या भावनेने प्रेरित न होतां उपरोधाच्या भावनेने चरित्रलेखनास प्रेरित झालेला दिसतो. तथापि निवडलेल्या व्यक्तीच्या जीवनविकासाविषयीं त्याला एकप्रकारचें असाधारण कुतूहल वाटत होतें, ही गोष्ट शिल्लक राहतेच. निवडलेल्या विषयाशीं कलाकाराची होत असलेली समरसता सहानुभवित्वाची किंवा विरोधित्वाची अशी दोन प्रकारची असूं शकते. लिटन स्ट्राचीसारख्या लेखकांचा प्रकार यांपैकी दुसरा मानतां येईल. नाही तरी विरोधभक्ति हा भक्तीचा एक प्रकार आपल्या भागवतधर्मांत मानला आहेच !

तात्पर्य, कोणत्या ना कोणत्या कारणाने कलादृष्ट्या आपणास ज्या व्यक्तीचें जीवनचरित्र आकर्षक वाटतें त्या व्यक्तीची चरित्रकाराने निवड केली पाहिजे. त्यांत कलेच्या दृष्टीलाच प्राधान्य दिलें पाहिजे; इतर हेतु जर कलेला बाधक होत असतील तर ते बाजूला सारले पाहिजेत. विषयाच्या योग्यायोग्यतेसंबंधीं लौकिक कल्पना वेगळ्या व कलावन्ताच्या वेगळ्या असतात. केवळ पैशाकरितां एखाद्या श्रीमंत माणसाचें—चित्रविषय कुरूप असून शक्य तितका सुस्वरूप दाखविणारें—चित्र काढून देणारा चित्रकार, आणि एखाद्या सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या जख्खड म्हाताऱ्याचें हुबेहुब चित्र रंगविणारा चित्रकार यांत जो भेद आहे, तोच भेद व्हिक्टोरियन युगांतील स्तुतिस्तोत्रांनी भरलेलीं भारुडें लिहिणारा चरित्रकार आणि स्ट्रॅचीच्या परंपरेंतील चरित्रकार यांमध्ये आहे.

# ३

चरित्रनायकाची निवड कशी करावी हें आतापर्यंत पाहिलें. यापुढे प्रत्यक्ष चरित्र लिहितांना चरित्रकाराने कोणती दृष्टि ठेवावी हें पाहावयाचें. या ठिकाणीं पुन्हा एकदा सांगावेंसें वाटतें की चरित्र-लेखनाच्या पद्धतीसंबंधीं कोणत्या नवीन कल्पना आज प्रचलित आहेत हें सांगतांना पाश्चात्त्य वाङ्मयांतील उदाहरणें घेणें अवश्य आहे. कारण या नवीन कल्पना अद्यापि मराठी वाङ्मयांत आल्या नाहीत. इंग्रजी वाङ्मयांत त्या गेल्या २५–३० वर्षांतच आल्या आहेत हें मागे सांगितलेंच. याचें एक कारण असें सांगतां येईल की विसाव्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंडच्या सामाजिक जीवनामध्ये व्हिक्टोरियन युगाविरुद्ध एक प्रकारची प्रतिक्रिया झालेली दिसून येते. गेल्या पंचवीस तीस वर्षांत संबंध युरोपांत सर्व सामाजिक व नैतिक मूल्यें बदललीं. तीं इतकीं की व्हिक्टोरियन युगांतील एखादा उच्चवर्गीय मनुष्य आज पुन्हा जिवंत झाला तर ही सामाजिक व नैतिक मूल्यांची उलथापालथ पाहून त्याला घेरीच येईल. आजचें युग समतेचें आहे. शिष्टपणाच्या फाजील कल्पनांना आजच्या समाजांत स्थान नाही. जरी रशियाप्रमाणे इंग्लंडमध्ये आमूलाग्र समाजरचना बदलली नसली तरी पूर्वीच्या मानाने सामाजिक ठोकशाही पुष्कळ कमी झाली आहे व एकंदर समाजांत लोकशाहीच्या तत्त्वांचा अधिक प्रसार झाला आहे. शिवाय भौतिक शास्त्रांच्या वाढीमुळे माणसांमधील चिकित्सकपणाही वाढला आहे. आजच्या काळांत कोणत्याही गोष्टीची शास्त्रीय दृष्ट्या पूर्ण छाननी केल्याशिवाय कोणी अंधपणें ती मान्य करील हें शक्य नाही. ही शास्त्रीय चिकित्सेची दृष्टि जशी जशी वाढत जाते तसातसा सत्याबद्दलचा आग्रह वाढत जातो हें उघड आहे. या सत्याग्रहाची व चिकित्साबुद्धीची छाप आजच्या युरोपीय वाङ्मयावर सर्वत्र पडलेली दिसून येते. विशेषतः चरित्रवाङ्मयांत यांचें महत्त्व जास्त आहे. आजच्या चरित्रकाराचा एक विशेष गुण

दाखवावयाचा झाला तर सत्याचा आग्रह हा दाखवितां येईल. अमुक एक थोर व्यक्तीचें चरित्र आपणास लिहावयाचें आहे; त्या व्यक्तीची अशी अशी प्रसिद्धि आहे; तिच्यासंबंधीं अशा अशा आख्यायिका प्रचलित आहेत; या गोष्टी जमेस धरून, त्या व्यक्तीचें महत्त्व जेणेंकरून कमी होणार नाही अशा बेताने आपण तिचें चरित्र लिहावें, असा विचार आजचा चरित्रकार करणार नाही. उलट तो म्हणेल : "माझ्यासमोर जी व्यक्ति आहे तिच्यासंबंधीं लोकांचा समज काय आहे, लोकांत तिची प्रतिष्ठा किती आहे, याच्याशीं मला काय करावयाचें आहे? माझ्या-समोर त्या व्यक्तीसंबंधाने पुष्कळशी लेखी पुराव्याची सामग्री आहे—पत्रें आहेत, दैनंदिनी आहे, त्या व्यक्तीचें लेखन आहे. ही सामग्री मी निर्विकार मनाने तपासून पाहणार आणि तिच्या आधारें त्या व्यक्तीचें चित्र निर्माण करणार. ती जशी असेल तसें चित्र तयार होईल. तिची फाजील स्तुति किंवा निंदा करणें हा माझा उद्देशही नव्हे आणि तसें करणें मला शक्यही नाही."

सत्याबद्दल इतका आग्रह धरणाऱ्या आजच्या चरित्रकाराविरुद्ध आक्षेप घेणारे सनातनी वृत्तीचे लोक अजूनही थोडेथोडके नाहीत. त्यांचें म्हणणें असें : एखाद्या मनुष्याबद्दल बऱ्यावाईट सर्व गोष्टी सांगून तुम्हांला काय मिळतें? त्याच्याबद्दल लोकांच्या मनांत ज्या उच्च कल्पना असतील त्यांना अशाने धक्का मात्र बसेल. ज्याच्या जीवनचरित्रापासून अनेकांना स्फूर्ति मिळाली त्याच्याबद्दल अनादर उत्पन्न करण्यापलीकडे तुम्ही काय करतां? असे आक्षेप घेणाऱ्या लोकांना चरित्रवाङ्मयाचा हेतु व परिणाम मुळीच समजले नाहीत असेंच म्हणावें लागेल. मागे यासंबंधीं थोडीशी चर्चा झालीच आहे. चरित्रांत मनुष्याचें व्यक्तित्व हुबेहूब रंगवावयाचें असतें; हाडामासाचा मनुष्य असून एखाद्याला देव बनवावयाचें हा चरित्राचा हेतु नसतो. मनुष्य म्हणून जर त्याचें चित्र रंगवावयाचें तर त्याचे दोष लपवून ठेवून कसें चालेल? कोणता मनुष्य सर्वस्वीं दोषरहित

असतो? 'He is all fault who has no fault at all' असें इंग्रजींत वचन आहे. खरा थोर मनुष्य असतो त्याची योग्यता एखाद्दुसऱ्या दोषानें कमी होणार नाही. डॉ. केतकर व राजवाडे वागण्यांत विक्षिप्त होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेला बाध आला आहे काय? टिळकांना संगीताची मुळीच आवड नव्हती हा एखाद्या कलाप्रेमी मनुष्याला दोष वाटेल. परंतु टिळकांबद्दलचा त्याचा आदर एवढ्यानें कमी होणार आहे काय? बायरनचें चारित्र्य एखाद्या नीतिमार्तंडाच्या दृष्टीने गर्हणीय असलें तरी त्याची कविता त्याच्या वाचनांत आली असेल तर त्याला बायरनबद्दल प्रेम वाटेलच. कोणताही मनुष्य सर्व बाजूंनी परिपूर्ण असेल अशी अपेक्षा कां करावी? प्रत्येकांत कांहीना कांही दोष असतोच. आणि दोष असल्यामुळेच तो मनुष्य असतो आणि आपल्याला अधिक जवळचा वाटतो. चरित्रापासून कांही तरी बोध व्हावा असा ज्यांचा उद्देश असेल त्यांच्या दृष्टीनेही व्यक्तीचें यथातथ्य निदर्शन करणें हेंच अधिक इष्ट ठरेल. कारण केव्हाही सत्य हेंच अंतीं परिणामकारक ठरत असतें. आपल्या चुका प्रांजळपणें कबूल करणारा महात्मा लोकांचा पूजा विषय ठरतो; अर्थात् कोणाही व्यक्तीचे प्रांजळ दोषनिदर्शन हें त्याच्या गुणांचा जनमनावरील प्रभाव वाढविण्यास कारणीभत होतें. बोधवाद्यांच्या दृष्टीने हें प्रतिपादन झालें. आधुनिक चरित्रकार बोधाची दृष्टीच ठेवीत नाही, तेव्हा त्याच्या दृष्टीनें हा प्रश्नच उद्भवत नाही. तो एवढेंच म्हणतो की मनुष्य जसा असेल तसा मी त्याला रंगविणार; लोकांच्या आदरबुद्धीला धक्का बसेल म्हणून मी सत्याचा अपलाप करून माझी कलाकृति बिघडूं देणार नाही. वॉल्ट व्हिटमन यानें आपल्या एका स्नेह्याला बजावून ठेवलें होतें की जर तूं माझें चरित्र पुढे मागे लिहिलेंस तर प्रामाणिकपणें माझे सर्व गुणदोष दाखवून हुबेहूब चित्र काढ; उगाच माझ्या चरित्रांत भडक रंग भरूं नकोस! इंग्रजी चरित्रवाङ्मयांतील दैवीकरणाच्या प्रवृत्तीस उद्देशून

त्यानें म्हटलें आहे की आपले सारे चरित्रकार महा लबाड व खोटाडे आहेत; त्यांना वाटतें की परमेश्वरानें निर्माण केलेल्या मनुष्यकृतींत आपण सुधारणा करूं शकूं; आणि या कल्पनेनें त्यांनी आपल्या राष्ट्रीय पुरुषांच्या जीवनाचा विचका करून टाकला आहे; यामुळे आपलें चरित्रवाङ्मय मला हातांत सुद्धा धरावेंसें वाटत नाही!

आपल्याला ज्या व्यक्तीबद्दल आदर वाटतो तिचे दोष दाखविलेले कोणासही आवडत नाहीत. तिच्यांत दोष असले तरी त्यांना गुणांचें स्वरूप देण्याची लोकांची प्रवृत्ति असते; परंतु एखाददुसरा दोष हा माणसांत असावयाचाच व त्यामुळे त्या व्यक्तीच्या थोरपणाला मोठासा बाध येत नाही, असा विचार करण्याइतकी त्यांची दृष्टि व्यापक झालेली नसते. नुसती कलात्मक दृष्टि सोडून दिली तरी बोधाच्या दृष्टीनेही दोषदर्शन व्यक्तीच्या मोठेपणाला बाधक होत नाही ही गोष्ट फार थोडयांना मान्य होते. पुष्कळ वेळां असें होतें की एखादी थोर व्यक्ति मृत झाली की तिच्या आप्तांच्या आग्रहास्तव त्या व्यक्तीचें चरित्र लिहिलें जातें. अशा वेळीं चरित्रकाराची खरोखर कठीण परिस्थिति होते. चरित्रनायकाचे दोष दाखवावे तरी पंचाईत, न दाखवावे तरी पंचाईत. फाटकांच्या 'रानडे चरित्रा'ची प्रस्तावना वाचल्यास या गोष्टीचें उदाहरण दिसेल. श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्या आग्रहास्तव फाटकांनी चरित्र लिहिलें असें जरी म्हणतां येत नाही तरी 'संकल्पिलेलें कार्य माझ्या डोळ्यांदेखत प्रसिद्ध होईल ना?' अशा त्यांच्या निर्वाणीच्या प्रश्नानें फाटकांची स्थिति चमत्कारिक झाली नसेल असें म्हणतां येणार नाही. रानडे हे अत्यंत थोर पुरुष यांत शंका नाही; परंतु त्यांनी केलेली प्रत्येक गोष्ट बरोबरच होती, त्यांच्या बोलण्याचालण्यांत त्यांनी जन्मांत कधी चूक केली नाही, असें थोडेंच आहे? पण त्यांची एखादी चूक दाखविली किंवा त्यांच्या एखाद्या कृतीचें समर्थन केलें नाही तर त्यांच्या पत्नीला काय वाटेल, हा विचार चरित्रकाराच्या

मनांतही आला नसेल असें ते स्वतःही छातीठोकपणें सांगू शकतील असें वाटत नाही. परिणाम काय झाला आहे तें 'रानडे चरित्रा'च्या वाचकांनी ठरवावें. हें सांगण्यांत फाटकांच्या ग्रंथाच्या गुणांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप कोणी करणार नाही अशी आशा आहे. 'टिळकचरित्र' लिहितांना केळकरांच्या ध्यानांत ही गोष्ट आली होती असें दिसतें. प्रस्तावनेंत ते म्हणतात: "लो. टिळकांचें चरित्र लिहिणें ही गोष्ट आजच्या घटकेला बरीच अवघड व नाजूक आहे. एक तर टिळकांच्या हयातींत उठलेले वादाच्या धुळीचे लोट जमिनीवर बसण्याला व आरपार स्वच्छ दिसूं लागण्याला अडीच वर्षे सतत स्रवलेलें विस्मृतीचें दहिवर पुरें झालेलें दिसत नाही. दुसरें असें की टिळकांच्या चरित्रांत सरकारी नोकर आणि राष्ट्रीय पक्षांतील निरनिराळ्या ध्येयांचे व स्वभावाचे लोक यांचा इतका निकट व गुंतागुंतीचा संबंध आला की त्यांतील कांही बाबींची खाजगी माहिती कोणा लिहिणारास असली, तरी ती प्रकट करण्याची वेळ अद्यापि आलेली नाही. कांही हकीकती चार दोन पिढ्या गेल्यानंतर ऐतिहासिक म्हणून उघड रीतीने सांगतां येतील, व त्या ऐकून हर्ष, अमर्ष, विषाद वाटणाऱ्या व्यक्ति नाहीशा झाल्यामुळे त्यांविषयीं शुद्ध कौतुकच शिल्लक उरेल. पण टिळकांना दिवंगत होऊन पुरतीं तीन वर्षेंही न झाल्याकारणाने अशा हकीकती प्रसिद्ध करणें हें काम आज सहजच अवघड होऊन बसतें." या कबुलीजबाबांत केळकरांचा प्रामाणिकपणा दिसून येतो, परंतु त्यांनी खरोखरीच कांही महत्त्वाच्या गोष्टी लपवून ठेविल्या असतील तर तें समर्थनीय खास ठरणार नाही. केळकरांनी दर्शविलेली अडचण कोणासही मान्य होईल. चरित्रनायकाला मरून पुष्कळ काळ निघून गेला तर त्याच्याबद्दल फारसें कुतूहल कोणास उरावयाचें नाही, कदाचित् त्याची लोकांना विस्मृतिही पडेल, या भीतीने त्याच्या मृत्यूनंतर शक्य तितक्या लवकर चरित्र लिहावें असें चरित्रकाराला वाटणें साहजिक आहे. परंतु तसें केलें तर त्याचे आप्त, त्याचे भक्त व

त्याच्याशीं संबंध आलेले व चरित्रांत ज्यांचा बरावाईट उल्लेख केला गेला आहे असे इतर लोक हे बहुतेक सर्व जिवंत असल्यामुळे त्यांच्या भावना दुखविल्या जातील ही भीति असते. इतकेंच नव्हे तर विशिष्ट प्रकारें चरित्र लिहिणार असलां तर चरित्रासंबंधींची सामग्री तुम्हांस देतों अशी अट घालणारेही आप्त भेटतात! तेव्हा एका दृष्टीनें चरित्र-नायकाच्या मृत्यूनंतर बरेच दिवसांनी–ती व्यक्ति व तिचें कार्य हीं इतिहासांत जमा होऊन त्यांकडे लोक तटस्थ वृत्तीनें पाहूं शकतील इतका काल लोटल्यानंतर–चरित्र लिहावें असें म्हणतां येईल. "Death is the greatest of the artists; by his passing, all passions are set at rest" (मृत्यु हा खरा थोर कलावंत आहे. तो रागद्वेषादि सर्व भावना नष्ट करून टाकतो.) हें वचन या ठिकाणीं सार्थ वाटूं लागतें. परंतु शेवटीं असा प्रश्न येतो की सत्य व अप्रिय यांपैकी कोणाचा बळी द्यावयाचा?

या अडचणी जरी भासल्या तरी खरा कलोपासक चरित्रकार त्यांना जुमानीत नाही. साधनसामग्री हातीं आल्यानंतर केवळ दुसऱ्या-च्या भावना दुखविल्या जातील या भीतीनें चरित्रनायकाच्या मृत्यूनंतर अमुक काल जाऊं द्यावा असा तो विचार करीत बसणार नाही; तथापि सर्व साधनें पूर्ण हातीं येईपर्यंत पांचपंचवीसच काय, पन्नास वर्षे तो थांबावयास तयार होईल, आणि शेवटीं त्या साधनांतून सुंदर मूर्ति तयार करून वाचकांच्या हातीं देईल. तेव्हा कालावधीची मर्यादा तो कधीच पाळावयाचा नाही. सुंदर चित्र निर्माण करणें हाच त्याचा हेतु; मग तें कोणाला प्रिय वाटो की अप्रिय वाटो. बॉस्वेलनें जॉनसनचें चरित्र लिहिलें त्या वेळीं असें सांगतात की जॉनसनच्या कांही चाहत्यांनी त्याला अशी सूचना केली की एवढ्या आदरणीय पुरुषाच्या स्वभावां-तील विक्षिप्तपणा, राकटपणा इत्यादि दोष जरासे फिक्क्या रंगांत रंगविले तर बरें होईल. परंतु बॉस्वेल हा जॉनसनचाच शिष्य. त्यानें

जें उत्तर दिलें तें त्याच्याच शब्दांत देतों : ( I would not ) cut off the Doctor's claws nor make his tiger a cat to please anybody." (कोणालाही खूष करण्यासाठी त्या वाघाचीं नखें छाटून त्याला मांजर बनवून टाकण्याची माझी इच्छा नाही.) स्वतः डॉ. जॉनसन सत्याला अतिशय महत्त्व देणारा होता. "The truth of a story depends upon its being true. A story is a picture either of an individual or of human nature in general; if it be false, it is a picture of nothing." कोणत्याही व्यक्तीचें चित्र काढावयाचें म्हटलें म्हणजे तें सत्यपूर्ण पाहिजे; तसें नसेल तर तें कवडी किमतीचें नाही, असें त्याचें ठाम मत असे. त्याने स्वत: जीं कविचरित्रें लिहिलीं आहेत त्यांत त्याने हेंच कठोर तत्त्व पाळिलें आहे, आणि तीं चरित्रें अद्यापि इंग्रजी भाषेंत अत्युत्कृष्ट समजलीं जातात. अशा मनुष्याचा पट्टशिष्य लोकांची मर्जी संभाळण्यासाठीं सत्याचा बळी देईल हें संभवत नाही.

लोकांच्या आवडीनिवडी पाहून त्याप्रमाणे आपलें चित्र रंगविणें हें प्रामाणिक चरित्रकाराचें लक्षण नव्हे. जरी तात्पुरतें कांही लोकांना संतुष्ट करण्याचा आनंद त्याला मिळाला, तरी सत्यापलाप करून विकृत चित्र रंगविणें हें चरित्रकलेला बाधक आहे इतकेंच नव्हे तर पुढील पिढयांना अन्याय करण्यासारखें आहे. त्यांच्यापासून सत्य लपवून ठेवून तो त्यांना फसवीत आहे असा त्याच्यावर आरोप केला तर चुकलें कुठे ? प्रसिद्ध इतिहासकार जेम्स फ्रूड याने कार्लाइलचें चरित्र लिहिलं त्या वेळीं कित्येक लोक जरासे रागावले. फ्रूडने कार्लाइलचे सर्व गुणदोष दाखवून त्याचें हुबेहूब चित्र काढलें, तें न आवडल्यामुळे कित्येकांनी तर फ्रूडने कार्लाइलवर सूड उगवला असा आरोप करावयास कमी केलें नाही. पण फ्रूड अशा लोकांना भीक घालणारा नव्हता त्याला कार्लाइलबद्दल आदर होता आणि त्याचें सर्वगुणपरिपूर्ण असें विकृत चित्र रंगवून पुढच्या पिढीसमोर ठेवल्याने त्याचा सन्मान

होण्यापेक्षा अपमानच जास्त होईल हें तो ओळखून होता. त्या वेळच्या कांही लोकांना फ्रूडचें कार्य मूर्तिभंजनासारखें वाटलें असेल, परंतु आज एक उत्कृष्ट कलाकृति निर्माण केल्याबद्दल आपण त्याची स्तुतीच करूं.

एखाद्यानें सुडाच्या भावनेनें चरित्रनायकाचे दोषच मुद्दाम हुडकून त्याची नाचक्की करण्याचा प्रयत्न केला तर तोही अर्थात् गर्हणीय होय. पण मनुष्याचें यथातथ्य चित्र रंगवावयाचें तर दोष तेवढे वगळून चालावयाचें नाही, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. दोष दर्शविल्यानें मनुष्याच्या कीर्तीला बाध येतो ही समजूत काढून टाकली पाहिजे. चिपळूणकरांनी डॉ. जानसन यांचें जें चरित्र लिहिलें आहे त्यांत त्याचे कित्येक दोष प्रांजलपणें दाखविले आहेत. तो लहानपणीं उनाड होता, त्यामुळे शाळेंत नेहेमी शिक्षकांच्या हातचा मार खाण्याचा त्यावर प्रसंग येत असे; इतकेंच नव्हे पण पुढे आपल्या मित्रांबरोबर रात्रीं बेरात्रीं बाहेर भटकण्याचीही त्याला सवय लागली होती व 'एक-दोनदां त्याचें जरा वाकडें पाऊल पडलें' असें चिपळूणकरांनी स्पष्ट लिहिलें आहे. यामुळे जॉनसनच्या थोरपणाला लौकिक दृष्टया बाध येत असेल, परंतु कलेच्या दृष्टीनें त्यांत कांही चूक नाही इतकेंच नव्हे तर तें आवश्यक आहे. ही कलादृष्टि ज्यांना नाही त्यांना तें कधीच योग्य वाटावयाचें नाही. खुद्द विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें जें चरित्र त्यांच्या बंधूंनी लिहिलें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत चरित्रकार म्हणतात : "आमच्या भाषेंत जीं थोडीं चरित्रें लिहिलेलीं आढळतात, त्यांत चरित्रनायकाच्या कांही ठोकळ सद्गुणांशिवाय बहुधा दुसरें कांही सापडावयाचें नाही. त्याच्या आंगचे कमी योग्यतेचे गुण व प्रायः सर्वच दुर्गुण यांचा पूर्ण अभाव असावयाचा; यामुळे मूळ चरित्रनायकाचें खरें स्वरूप वाचकांचे ध्यानांत येत नाही. ज्याप्रमाणे थोरले बाजीराव-साहेब पेशवे वगैरे ऐतिहासिक पुरुषांच्या जुन्या तऱ्हेच्या नुसत्या रूपरेषेने (औटलाइनीनें) एकचप्मी काढलेल्या तजबिरींवरून मूळ

पुरुषांचें स्वरूप चांगलें ध्यानांत येत नाही, त्याचप्रमाणे हल्ली बापू गोखले, परशुरामभाऊ पटवर्धन, वगैरे पुरुषांच्या चरित्रांवरून त्यांचें खरें स्वरूप ध्यानांत येत नाही.....शिवाय फोटोग्राफमध्ये जसें निरनिराळ्या ठिकाणीं प्रकाश व छाया हीं कमी जास्त प्रमाणाने वटलीं असल्यामुळे फोटोग्राफांतील चेहऱ्याचा उठाव व खोलपणा स्पष्ट दिसून येऊन मूळ पुरुषाची ओळख सहज पटते व तो आपणापुढे जणू काय प्रत्यक्ष उभा आहे असा भास होतो, त्याचप्रमाण उत्कृष्ट चरित्रकाराच्या वर्णनाने चरित्रनायकाची मूर्ति वाचकांच्या डोळ्यांसमोर उभी राहून तीच प्रत्यक्ष बोलते चालते आहे की काय असें त्यांस वाटूं लागतें! ही मूर्ति अर्थातच सुस्वरूप असावी अशी मर्मज्ञ वाचकांची अपेक्षा नसते; मात्र ती फोटोग्राफच्या तसबिरीप्रमाणें खरी असली पाहिजे; आणि ही मूर्ति चरित्रनायकाच्या खऱ्या स्वरूपाशीं जितक्या मानाने कमी जास्त जुळेल तितक्या मानाने चरित्राची योग्यता कमी जास्त लागते." या दृष्टीने जॉनसन–बॉस्वेल या जोडींत व विष्णुशास्त्री–लक्ष्मणशास्त्री या चिपळूणकर बंधूंच्या जोडींत साम्य दिसतें. चरित्रलेखनाच्या बाबतींत स्वत: जॉनसनने जीं तत्त्वें कसोशीने पाळलीं तीं त्याचा चरित्रकार बॉस्वेल याने तितक्याच कसोशीने पाळलीं; आणि जॉनसनचें चरित्र लिहितांना स्वत: विष्णशास्त्री यांनी ज्या तत्त्वांचा अवलंब केला तीं तत्त्वें लक्ष्मणशास्त्री यांनी त्यांचें चरित्र लिहिताना सोडलीं नाहीत!

तात्पर्य, दोषदर्शनाने मनुष्याच्या चित्राला बाध न येतां उलट स्वाभाविकता व परिपूर्णता येते हें आतापर्यंत पाहिलें. परंतु त्यांतही औचित्य पाळणें अवश्य आहे. ज्याप्रमाणे गुणवर्णन करतांना अतिशयोक्ति होऊं देतां कामा नये, त्याप्रमाणे दोषदर्शन करतांना तारतम्य सोडतां कामा नये. केवळ दोष दाखवावयाचे म्हणून दाखवावयाचे असें धोरण ठेवणें योग्य नव्हे. तसें करणें म्हणजे खरोखर सूड उगविण्यासारखें होतें. ज्या गुणदोषांनी मनुष्याचें व्यक्तित्व स्पष्टपणें उमटत

असेल त्यांचाच निर्देश केला पाहिजे. इतर सटरफटर गुणदोष टाळल्याने सत्यापलापाचा दोष घडत नाही.)

थोर व्यक्तीच्या दोषांकडे डोळेझाक करणारे सनातनी चरित्रकार एक चूक करतात. मनुष्यस्वभाव हा अनेक निरनिराळ्या गुणावगुणांच्या अणुपरमाणूंनी भरलेला म्हणजे समिश्र आहे व तो सर्वकाल एकसारखा राहत नसून बदलत असतो हें शास्त्रीय तत्त्व ते विचारांत घेत नाहीत. शेक्सपियरपूर्वीच्या नाटकांपैकी Morality Plays हा जो नाटकांचा प्रकार इंग्लंडमध्ये रूढ होता त्यामध्ये Honesty (प्रामाणिकपणा), Goodness (चांगुलपणा), Malice (द्वेष) इत्यादि विशिष्ट गुण-निदर्शक पात्रें घालीत असत. त्यांत कल्पना अशी असे की एकएक मनुष्य एकएका गुणाचा पुतळा किंवा प्रतीक असतो. नाटक हें संसाराचें चित्र असून त्यांत मनुष्यस्वभावाचें वास्तविक चित्र वठलें पाहिजे ही कल्पना तत्कालीन नाटककारांना नव्हती. या कल्पनेप्रमाणे नाटकें लिहिण्यास शेक्सपियरनेच सुरवात केली. मनुष्यस्वभाव संमिश्र आहे ही गोष्ट शेक्सपियरने चांगली ओळखली होती, त्यामुळे त्याने रंगविलेलीं अनेक लहानमोठीं पात्रें अत्यंत स्वाभाविक वाटतात. त्याचा हॅम्लेट अत्यंत स्वाभिमानी आहे, सत्यनिष्ठ आहे, परंतु अतिविचाराने कर्तृत्व-हीन झालेला दाखविला आहे. ऑथेल्लो एवढा शूर, उमद्या स्वभावाचा, परंतु क्षुल्लक गोष्टीवरून पत्नीचा संशय घेऊन तिचा खून करण्यास प्रवृत्त होतो. मनुष्यस्वभावाचें व मनुष्यजीवनाचें असें संमिश्र स्वरूपाचें यथातथ्य चित्र काढल्यामुळेच शेक्सपियरच्या नाट्यकृति अमर झाल्या आहेत. चरित्रकारानेही ही गोष्ट कधीही दृष्टीआड करतां कामा नये. एकएका मनुष्याला एकएक गुण चिकटवून त्याचें चित्र रंगविणें म्हणजे ईश्वराच्या कलाकृतीचें विकृतीकरण होय.

आज भौतिकशास्त्रांची इतकी वाढ झाली आहे की कोणत्याही क्षेत्रांत अमुक एक गोष्ट गृहीत धरून चालण्याची सोय राहिली नाही.

पदार्थविज्ञानशास्त्र, जीवशास्त्र इत्यादि शास्त्रांनी जडसृष्टि व जीवसृष्टि यांचेंच विश्लेषण केलें असेल तर मनुष्याच्या मनाचा ठाव घेण्याचें कार्य मानसशास्त्र व मनोविश्लेषणशास्त्र हीं करीत आहेत. मनुष्याचें शरीर असंख्य अणुपरमाणु व पेशी यांनी भरलेलें आहे असें जीवशास्त्रज्ञ सांगेल, तर मानसशास्त्रज्ञ म्हणेल की मनुष्याचें मनही असंख्य गुणांनी भरलेलें आहे. मनुष्यामध्ये एक चांगली आणि एक वाईट अशा दोन व्यक्ति ( Personalities ) असतात असें स्टीव्हनसन याने Dr. Jekyll and Mr. Hyde या आपल्या कादंबरींत दाखविलेंच आहे. परंतु दोनच काय, अशा असंख्य बाजू मनुष्याच्या मनाला असतात असें शास्त्रज्ञ सांगेल. मनुष्य स्वभावाचें ज्याने सामान्य निरीक्षण केलें आहे त्याला असें आढळून येईल की एकच मनुष्य पुष्कळ वेळां निरनिराळ्या माणसांशीं निरनिराळ्या तऱ्हेने वागतो, आणि कृष्णाप्रमाणे निरनिराळ्या लोकांना निरनिराळा भासतो. याचा अर्थच असा आहे की त्याच्या व्यक्तित्वाच्या निरनिराळ्या बाजू प्रत्येक वेळीं तो दाखवीत असतो. मित्रमंडळींत असताना अत्यंत मोकळेपणाने वागणारा मनुष्य घरच्या मंडळींशीं अगदी घुमेपणाने वागतांना दिसेल, तर घराबाहेर अत्यंत गंभीर व कठोर दिसणारा मनुष्य घरांतील मुलांबाळांशीं इतक्या प्रेमळपणाने वागतांना दिसेल की एखादा बाहेरचा मनुष्य आश्चर्याने थक्क व्हावा. रग्बी शाळेचा प्रसिद्ध मुख्याध्यापक डॉ. आर्नोल्ड याचें छोटेंसें चरित्र लिटन स्ट्रॅची याने लिहिलें आहे. त्यांत त्याने असें दाखविलें आहे की डॉ. आर्नोल्ड याची शाळेंतील शिस्त अत्यंत कडक असे व सर्व विद्यार्थी व दुय्यम शिक्षकवर्ग त्याला अतिशय भिऊन असत. परंतु घरीं आल्यावर म्हातारा लहान मुलांशीं खेळण्यांत इतका दंग होई की कुणी आल्यागेल्याचें त्याला भानही राहत नसे. मग मुलांबरोबर घोडाघोडा काय खेळे, खाली जाजमावर बसून कोलांटया उडया काय मारी, अशा नाना तऱ्हा करी! नेपोलियन

हा अत्यंत धाडसी, कटोर व भयप्रद मनुष्य होता असें आपणास इतिहास सांगतो. त्याच्या स्वभावाचे इतर पैलू पाहावयाचे असतील तर ॲब्रट किंवा एमिल लुडविग याने लिहिलेलें त्याचें चरित्र वाचावें. लुडविग याचें नेपोलियन चरित्र हा जगांतील सर्वोत्कृष्ट चरित्रग्रंथांपैकी एक आहे. नाटयात्मक पद्धतीने प्रत्येक चित्र वाचकांच्या डोळ्यांसमोर उभें करण्यांत त्याने विलक्षण कौशल्य दाखविलें आहे. नेपोलियनच्या खाजगी पत्रव्यवहाराचा त्याने भरपूर उपयोग केला असून त्या योगाने त्याच्या खाजगी जीवनावर व स्वभावावर चांगला प्रकाश टाकला आहे. रणांगणावर शत्रूशीं झगडण्यांत जन्म घालविलेल्या या योद्धयाला स्त्रीविषयक मोहाने किती पछाडलें होतें हें त्याने आपली पत्नी जोसेफाइन हिला लिहिलेल्या अनेक पत्रांवरून दिसतें. तिच्यावर त्याचें पराकाष्ठेचें प्रेम होतें, परंतु तिला त्याच्याबद्दल विशेष आकर्षण वाटत नसावें असें दिसतें. युद्धाच्या आघाडीवरून हा तिला जवळजवळ रोज एक पत्र पाठवी, परंतु तिच्याकडून मात्र क्वचितच पत्र येई. असें झालें म्हणजे त्याला अतिशय वाईट वाटे; इतकेंच नव्हे तर तिच्या पातिव्रत्याबद्दल तो संशय घ्यावयास कमी करीत नसे. "मला आता तुझा विरह सहन होत नाही. तूं शक्य तितक्या लवकर इकडे निघून ये...तूं मला पत्र कां पाठवीत नाहीस? तुझें माझ्यावर प्रेमच नाही असें मला वाटूं लागलें आहे. तुझा पति तुझ्या आठवणीने वेडा होत आहे आणि तुला मात्र त्याची मुळीच आठवण येऊं नये!......तुला आकर्षून घेण्याइतकें शरीरसौंदर्य ईश्वराने मला दिलें नाही हा माझा दोष आहे. मी तुझ्याकडून प्रेमाची अपेक्षा कां करावी?" वगैरे. एकदा त्याने ऐकलें की ती दुसऱ्या एका माणसाबरोबर राहत आहे. त्याबरोबर त्याला कांही सुचेना. वेड लागावयाची पाळी आली. "कोण तो मनुष्य आहे? त्याचे राईराई एवढे तुकडे करून टाकतों! जोसेफाईन! तूं हें काय केलेंस?" असें म्हणून तो कपाळावर हात मारून घेऊं लागला. त्याचा एक

अधिकारी त्याला म्हणाला "महाराज, आपणास हें शोभत नाही. आपल्यासारख्याने या गोष्टींना किती महत्त्व द्यावयाचें? यांपेक्षा युद्धांतील यश व कीर्ति यांना जास्त महत्त्व नाही का?" ताबडतोब उत्तर आलें, "कीर्ति? अरे काय करायचं आहे त्या कीर्तीला? जोसेफाइनच्या प्रेमापुढे मला सगळं जग तुच्छ वाटतं!" एकदा एका अधिकाऱ्याबरोबर घोडदौड करीत असतांना त्याच्या खिशांतील आपल्या पत्नीच्या लहानशा फोटोची कांच फुटली. "अरे, हा कांहीतरी अपशकुन आहे खास! जोसेफाइन आजारी असेल...किंवा तिने पातिव्रत्यभंग केला असेल!" एवढा मोठा जगज्जेता, परंतु शकुनावर विश्वास ठेवण्याइतका भोळा! एका बरोबरीच्या अधिकाऱ्याने त्याचें वर्णन केलें आहे. "रणांगणावर जितका कठोर तितकाच घरीं कोमल मनाचा व प्रेमळ; बोलण्यांत मोठा कोटिबाज; वागणूक अत्यंत गोड." त्याची मातृभक्ति विलक्षण होती. एकदा अघाडीवरून परत आल्यावर आई त्याला जवळ घेऊन म्हणाली, "बाळा, फार वाळलास रे! इतके श्रम नको करीत जाऊं?" बाळाने उत्तर दिलें, "छे: ग, मला काय झालं आहे? आई तूं बरीक आपल्या प्रकृतीची काळजी घे हो! तुझं कांही बरंवाईट झालं, तर मला अधिकाराने चार गोष्टी सांगणारं कोणी राहणार नाही!" कला व सौंदर्य यांचा तो भोक्ता असे. या जन्मजात योद्धयाला संगीताची विलक्षण आवड होती हें कोणाला सांगून खरें वाटणार नाही. स्त्रीसौंदर्याने तो वेडा होत असे. जोसेफाइनच्या पातिव्रत्याबद्दलचा त्याचा संशय पुढेपुढे दृढ होत गेला व तो परस्त्रियांशीं उघडपणें संबंध ठेवूं लागला. पोलंडमधील कौंटेस वालेव्स्का हिची हकीकत तर प्रसिद्धच आहे. नीति-अनीतीच्या लौकिक कल्पना त्याने तेव्हाच धाब्यावर बसविल्या होत्या. सारांश, खाजगी जीवनासंबंधींच्या या गोष्टींनी नेपोलियनच्या स्वभावचित्राला जी पूर्णता येते ती त्याने जिंकलेल्या सर्व लढायांचें तपशीलवार वर्णन केल्याने येणार नाही.

आणखी एक उदाहरण घेतों. लिटन स्ट्रॅची याने लिहिलेल्या 'Eminent Victorians' या चरित्रग्रंथांत फ्लॉरेन्स नाइटिंगेल या प्रसिद्ध स्त्रीचें चरित्र आहे. क्रिमियाच्या युद्धांत रोग्यांच्या शुश्रूषेकरितां हिने केलेले परिश्रम व स्वार्थत्याग यांना इतिहासांत जोड नाही. एकंदर रुग्णपरिचर्या या शास्त्राच्या वाढीसाठी तिने केलेलें कार्य अपूर्व होय. जखमी सैनिकांबद्दलची कळकळ, तिचा प्रेमळपणा, इत्यादि गुणांनी त्या काळींच नव्हे, अद्यापिही ती केवळ देवता मानली जाते. परंतु स्ट्रॅचीने तिच्या स्वभावाचें जें चित्र काढलें आहे त्यावरून असें दिसतें की रोग्यांशीं वागतांना जो तिचा प्रेमळपणा व मनाचा कोमलपणा दिसत असे तो इतरांशीं वागतांना दिसत नसे. आपल्या कार्याबद्दलचें तिचें वेड इतकें जबरदस्त होतें की त्यांत जरासुद्धा ढिलाई किंवा विरोध तिला खपत नसे. जर तसें कांही झालें तर ती कोणासही फाडफाड बोलावयास कमी करीत नसे. प्रत्यक्ष व्हिक्टोरिया राणीपाशीं तिचा वशिला असल्यामुळे मोठमोठे अधिकारीसुद्धा तिला वचकून असत. पुढेपुढे तिचा स्वभाव चिडखोर व तिरसट झाला होता हें तिच्या पत्रांवरून स्पष्ट दिसतें. आणि तें साहजिक आहे. अत्यंत कार्यव्यापृत माणसें चिडखोर झालीं नाहीत तरच आश्चर्य. आपल्या मतांच्या बाबतींत ती विलक्षण आग्रही–नव्हे हट्टी–होती. लुई पाश्चर व लिस्टर या शास्त्रज्ञांच्या जंतुविषयक उपपत्तीवर तिचा विश्वास नव्हता! खुल्या हवेचें तिला फार वेड. रुग्णालयांतील सर्व खिडक्या सताड उघड्या ठेवल्या पाहिजेत—बस्स, मग ती इंग्लंडची हवा असो, तुर्कस्तानची असो की हिंदुस्तानची असो! या बाबतींत ती कुणाचेंही ऐकावयाची नाही! फ्लॉरेन्स नाइटिंगेलचें हें चित्र किती मानवी आहे! रोग्यांना देवतेसारखी वाटणारी ही स्त्री अखेर मनुष्यच होती ना? चरित्रकाराला देवतेचें चित्र काढावयाचें नसून मनुष्याचें चित्र काढावयाचें आहे. आणि मनुष्यस्वभावाच्या निरनिराळ्या बाजू दाखविल्या नाहीत तर तें चित्र अपूर्णच राहणार.

या चरित्रांत स्ट्रॅची यांने आणखी एक गोष्ट दाखविली आहे ती चरित्रकाराला महत्त्वाची वाटेल. फ्लॉरेन्स नाइटिंगेल ही नव्वद वर्षांची होऊन वारली. आयुष्याचीं जवळजवळ पन्नास वर्षे सार्वजनिक कार्य करण्यांत घालविल्यावर म्हातारपणाचीं शेवटलीं वीस पंचवीस वर्षे तिने जवळजवळ अज्ञातवासांत काढलीं. शेवटीं शेवटीं तिचा स्वभाव फार बदलला होता. प्रत्यक्ष कार्य करीत असतांना दिसून येणारी तिची तडफ तर म्हातारपणीं राहणें शक्यच नव्हतें; परंतु तिच्या स्वभावांतील चिडखोरपणा हट्टीपणा व ताठरपणा हेही गुण पार नाहीसे झाले होते. पूर्वी क्वचितच कोणाशीं बोलणारी ही बाई आता तरुण मुलींशीं तासन्तास गप्पा मारीत बसलेली दिसत असे आणि या तरुण पोरींनी तिची स्तुति केली की तिच्या सुरकुतलेल्या तोंडावर स्मिताची लकेर उमटत असे. ही गोष्ट विलक्षण होती. पूर्वी कोणी आपल्या कामाबद्दल तोंडावर स्तुति केलेली तिला आवडत नसे; आता तिला त्यांत आनंद वाटूं लागला होता. असो. यावरून हें स्पष्ट होतें की ज्याप्रमाणे मनुष्यस्वभावाला विविध बाजू असतात, त्याप्रमाणे तो जन्मभर एकसारखाच राहील असा नियम सांगतां येत नाही. उलट वयोमाना-प्रमाणे विविध प्रकारचे अनुभव येऊन त्यांत बदल होण्याचाच संभव जास्त. ही गोष्ट ध्यानांत घेतली नाही तर चरित्राला एकांगीपणा येतो, इतकेंच नव्हे तर चरित्रविषयाचें स्वरूपही स्पष्ट होत नाही. पूर्वीच्या काळीं ग्रीक लोकांमध्ये जी मृताच्या गुणवर्णनपर भाषणें (funeral orations) होत असत, त्यांतील एकांगीपणा चरित्रांत येतो. मनुष्य हा एका विशिष्ट गुणाचा किंवा अवगुणाचा नमुना (type) आहे असें गृहीत धरून त्याचें चरित्र लिहिण्याची पद्धत अलीकडच्या काळापर्यंत इंग्लंडांत रूढ होती. चरित्रनायकाच्या स्वभा-वांतील एक विशिष्ट गुण आधी गृहीत धरावयाचा व नंतर त्या गुणास अनुलक्षून त्याच्या आयुष्यांतील निरनिराळे प्रसंग निवडावयाचे अशी

पद्धत होती. वास्तविक पद्धत अगदी उलट असावयास पाहिजे. आधी त्याच्या आयुष्यांतील निरनिराळे प्रसंग घेऊन छाननी करावयाची व त्यांतून त्याच्या स्वभावाच्या ज्या बाजू दिसतील त्या रंगवावयाच्या. तसें करतांना त्याच्या स्वभावांत किंवा वागणुकींत क्वचित् विसंगतीही दिसेल, परंतु त्याला इलाज नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत मनुष्यस्वभाव अगदी सुसंगत राहील असें कुठे आहे? व्हॉल्टेअरच्या चरित्रांत आंद्रे मोर्वा याने त्याच्या स्वभावांतील विसंगति दाखविली आहे. तो म्हणतो: 'व्हॉल्टेअरच्या स्वभावांत परस्परविरुद्ध गुणांचें मिश्रण होतें.' तो जितका उदार मनाचा होता तितकाच चिक्कू होता; जितका मोकळ्या मनाचा तितकाच खोटें बोलणारा; जितका शूर तितकाच भित्रा." (" Was his character great? He was complex......He was generous and miserly; frank and untruthful; cowardly and brave.") चरित्रनायकाकडे मनुष्य या दृष्टीने पाहिल्यास अशा विसंगतीचें कांही वाटणार नाही.

सारांश, चरित्रकाराने चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचें यथार्थ चित्र काढणें हाच उद्देश मनांत बाळगला पाहिजे. तसें करतांना त्याचे गुणदोष स्पष्टपणें दाखविलें असतां त्याच्या थोरपणाला बाध न येतां उलट त्याच्या व्यक्तित्वाची रूपरेषा अधिक स्पष्ट दिसते हें ओळखलें पाहिजे; व लहानपणापासून त्याच्या मनावर जे संस्कार होत जातात व त्याला जे निरनिराळे अनुभव येत जातात, त्या योगाने त्याच्या स्वभावांत हळूहळू बदल होणें हेंही अस्वाभाविक नाही, हें ओळखून त्याच्या स्वभावविकासाचें यथायोग्य चित्र काढलें पाहिजे, हें चरित्र-काराच्या कार्याचें एक महत्त्वाचें लक्षण म्हणून सांगतां येईल.

## ४

चरित्रकाराने सत्यकथनाबद्दल आग्रह धरला पाहिजे म्हणून सांगितलें. परंतु हें सत्य मिळवावयाचें कसें? जिवंत मनुष्याला कांही गोष्टी

प्रत्यक्ष विचारतां येतील, परंतु शंभर किंवा दोनशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या मनुष्याबद्दल चरित्रकाराला खरी माहिती कशी मिळणार? म्हणजे चरित्र लिहिण्यापूर्वी चरित्रनायकासंबंधीं जेवढी मिळेल तेवढी सामग्री गोळा करणें हें पहिलें महत्त्वाचें कार्य; व त्यानंतर त्या सामग्रीची व्यवस्थित जुळणी करून ती कलात्मक पद्धतीनें मांडणें हें त्यापेक्षाही महत्त्वाचें कार्य होय. हीं दोन कार्यें म्हणजे चरित्रलेखनाच्या शास्त्रीय व कलात्मक बाजू होत.

प्रथम शास्त्रीय बाजूचा विचार करूं. इतिहासकाराप्रमाणे चरित्रकार हा प्रथम संशोधक असावयास पाहिजे. इतिहासकाराला एका विशिष्ट कालाचा इतिहास लिहावयाचा असतो व त्या कालांतील निरनिराळ्या व्यक्ति व प्रसंग यांना अनुलक्षून जे जे (कागदपत्र–पत्रें, करिणे, बखरी)–उपलब्ध असतील ते ते सर्व गोळा करून त्यांची त्याला छाननी करावी लागते. तेंच चरित्रकाराला एका व्यक्तीच्या बाबतींत करावें लागतें. व्यक्तीसंबंधानें त्याला कोणतीं साधनें उपलब्ध होऊं शकतील तें पाहूं. पहिली गोष्ट म्हणजे त्या व्यक्तीनें इतरांना लिहिलेलीं व (इतरांनी त्या व्यक्तीला लिहिलेलीं पत्रें.) अशीं बरींचशीं पत्रें उपलब्ध झालीं तर त्यांचा चरित्रलेखनाला चांगला उपयोग होईल यांत शंका नाही. परंतु त्यांत अडचणी कोणत्या येऊं शकतात तें पाहूं. लहानपणापासून आपण लिहिलेलीं किंवा दुसऱ्यानें आपणास लिहिलेलीं सर्व किंवा बहुतेक सर्व पत्रें जपून ठेवण्याइतकी काळजी घेणारीं किती माणसें निघतील? मला वाटतें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं तरी अशीं माणसें सापडतील किंवा नाही याची शंका आहे. साधारण प्रवृत्ति अशी की कोणाचें पत्र आलें की तें वाचावयाचें आणि केराच्या टोपलींत टाकून द्यावयाचें. आपण दुसऱ्याला लिहिलेल्या पत्रांची नक्कल करून ठेवणारा तर बहुधा 'मनुष्याणां सहस्रेषु कश्चित्' सुद्धा सापडणार नाही. त्यानें ज्यांना पत्रें पाठविलीं असतील

त्यांनी तीं जपून ठेविलीं असलीं तर तीं उपलब्ध होण्याचा संभव. पण एवढी काळजी घेतो कोण? अमुक एक मनुष्य पुढे मोठा प्रसिद्ध पुरुष होणार आहे आणि त्याचें चरित्र लिहिलें जाण्याचा संभव आहे, तेव्हा त्याचीं पत्रें जपून ठेवावीं असें स्वप्न कोणाला आधीपासून पडलें तरच तें शक्य. दुसरें साधन म्हणजे दैनंदिनी. या बाबतींत निदान आपल्याकडे तरी जी कांही अनास्था दिसते, तिच्यामुळे हें साधन आपल्या चरित्रकाराला जवळजवळ निरुपयोगीच होऊन बसलें आहे. लहानपणापासून, म्हणजे समजूं लागल्यापासून, अर्थात् वयाच्या १८–२० वर्षांपासून, नियमाने दैनंदिनी लिहिणारा—व ती जपून ठेवणारा —मनुष्य आपल्याकडे मला एकच माहीत आहे. श्री. पांगारकर आपल्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेंत म्हणतात : "रोजनिशी ठेवण्याचा छंद मला १८९४ सालीं लागला. गेल्या ४४ वर्षांपैकी सुमारें ४० वर्षांच्या रोजनिशा आज मजजवळ आहेत. चांगला विचार कोठें आढळला, सुचला किंवा ऐकला, तर तो रोजनिशींत टिपून घ्यायचा, कांही महत्त्वाचे प्रवास, कोणाच्या गांठीभेटी, संवाद यांचीं टांचणें ठेवायचीं अशी सवय लागली." यांचा श्री. पांगारकरांनी कसा उपयोग करून घेतला आहे हें ज्यांनी त्यांचा 'चरित्रचंद्र' वाचला असेल त्यांच्या लक्षांत येईल. रेव्ह. टिळकांना दैनंदिनी लिहिण्याची थोडीशी सवय होती असें दिसतें. बाकी रानडे, टिळक, गोखले इत्यादि प्रसिद्ध पुरुषांचीं जीं चरित्रें लिहिलीं गेलीं आहेत, त्यात दैनंदिनीचा उपयोग केल्याचें फारसें कुठे दिसत नाही. लो. टिळकांचें चरित्र लिहिताना श्री. केळकर यांना दैनंदिनीचा अभाव कसा जाणवला तें त्यांनी 'गतगोष्टी' या आत्मचरित्रात्मक ग्रंथांत सांगितलें आहे. ते म्हणतात : "लो. टिळक यांचें चरित्र तीन खंडांत मी लिहिलें त्या वेळीं पत्रव्यवहार व रोजनिशा यांच्या अभावामुळे होणाऱ्या हानीची जाणीव मला चांगलीच कळून आली.... ('केसरी–मराठा' पत्रांत) उल्लेख झाला तो मुख्यतः राजकीय

स्वरूपाच्या विषयांवरील त्यांच्या मतांचा आणि फार तर त्यांनी केलेल्या उघड चळवळींतील सभा संमेलनें यांचा. पण या सर्वांच्या मागे वर्तमानपत्रांत अलिखित परंतु एखाद्या चरित्रग्रंथांत लिहिण्याला योग्य असे कितीतरी प्रसंग घडले असतील याची कल्पना कोणालाही करतां येईल. या गोष्टी म्हणजे खाजगी उद्योग, व्यक्तीव्यक्तींच्या गाठीभेटी, संभाषणें, सुखदुःखाचे प्रसंग, हास्यविनोदाचे प्रसंग—म्हणजे एकंदरीनें उघड सार्वजनिक जीवनाच्या पोषाख-पेहरावाला आंतून अस्तरासारख्या चिकटलेल्या पण बाहेर दिसून न येणाऱ्या गोष्टी. आणि व्यक्तिजीवनाचें स्वारस्य अशाच गोष्टींत असतें हें कोणत्याही चरित्रग्रंथावरून किंवा आत्मचरित्रग्रंथावरून दिसून येतें." यावरून लो. टिळक प्रभृतींनी आपली दैनंदिनी लिहून ठेविली नाही हें स्पष्ट होतें. त्याबद्दल त्यांना दोष तरी कसा द्यावयाचा? आपल्या कार्यांत ते इतके गढून गेलेले असत की रोज थोडा वेळ बसून आपण काय काय केलें याची नोंद करून ठेवण्याइतका वेळ व स्वास्थ्य त्यांना मिळत नसे. दैनंदिनी लिहून ठेवणें किंवा न ठेवणें हें त्या त्या मनुष्याच्या जीवनविशेषावर अवलंबून राहतें. पांगारकरांसारख्या भक्तिमार्गी व अंतर्मुख लेखकाला दैनंदिनी लिहिणें जितकें सोइस्कर होईल, तितकें टिळक किंवा गोखले यांच्यासारख्या सार्वजनिक कार्यक्षेत्रांत उतरलेल्या मनुष्याला होणार नाही हें उघड आहे. दुसरी जी एक अडचण पत्रांच्या बाबतींत उपस्थित होते तीच दैनंदिनीच्या बाबतींत. आपण पुढे कोणीतरी थोर पुरुष होणार आहों आणि आपलें चरित्र लिहिण्यासाठी आपल्या दैनंदिनीचा उपयोग होईल, तेव्हा आतापासूनच व्यवस्थित दैनंदिनी लिहून ठेवावी, असा लहानपणींच विचार करणाऱ्या मनुष्याचें धाष्टर्य मोठेंच म्हणावयाचें! या बाबतींत एवढेंच म्हणतां येईल, की प्रत्येक मनुष्यानें पुढच्या पिढीच्या उपयोगाकरितां आपल्या आयुष्या-संबंधाचीं टाचणें करून ठेविलीं पाहिजेत. तें एक सामाजिक कर्तव्य

आहे, ही गोष्ट प्रत्येकाने ओळखली पाहिजे. पाश्चात्य देशांतही या गोष्टीचें महत्त्व सर्वांशीं लोकांना पटलें आहे असें नाही. कांही थोड्या थोरामोठ्यांच्या घराण्यांत कागदपत्रें जपून ठेवण्याची पद्धत आहे. दैनंदिनी सर्वच लिहितात असें नाही. तरी या बाबतींत आपल्याइतकी अनास्था तिकडे दिसत नाही. ज्या थोर पुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध आहेत त्यांत दैनंदिनीचा भरपूर उपयोग केल्याचें आढळून येतें व अत्यंत खाजगी स्वरूपाचा पत्रव्यवहार चरित्रकाराला उपलब्ध झालेला दिसून येतो. शेलेच्या चरित्रांत आंद्रे मॉर्वा याने शेलेच्या प्रेमपत्रांचा उपयोग केला आहे. लुडविग याने तर नेपोलियनने जोसेफाइनला लिहिलेलीं बरींचशीं अत्यंत खाजगी पत्रें नेपोलियनच्या चरित्रांत दिलीं आहेत. त्यांमुळे नेपोलियनचें स्वभावचित्र किती खुलून दिसतें ! अर्थात् हीं सर्व पत्रें कोणीतरी जपून ठेवलीं, आणि त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा चरित्रकारांना उपयोग करूं दिला, म्हणून त्यांचीं चरित्रें लिहिणें सुलभ झालें. नाहीतर शेलेच्या कवितेची चर्चा करण्यापलीकडे आणि नेपोलियनच्या लढायांची हकीकत देण्यापलीकडे चरित्रकार कांही करूं शकले नसते.

पत्रें व दैनंदिनी यांशिवाय चरित्रनायकासंबंधीं इतर लोकांनी लिहून ठेवलेल्या आठवणी उपलब्ध असल्या तर त्यांचा चरित्रकाराला चांगला उपयोग होतो. आठवणींमध्ये पत्रें व दैनदिनी यांच्याइतका चरित्रनायकाच्या खाजगी जीवनाचा भाग पाहावयास मिळणार नाही हें खरें; परंतु त्याचा स्वभाव, त्याची लोकांशीं वागणूक, त्याच्या सवयी, त्याच्या आवडीनिवडी, इत्यादिकांवर अवश्य प्रकाश पडूं शकेल. अनेक लोकांनी निरनिराळ्या प्रसंगांच्या आठवणी सांगितल्या असल्या तर मनुष्याच्या स्वभावाच्या निरनिराळ्या बाजू समजून येतात. या दृष्टीने पत्रें व दैनंदिनी यांपेक्षाही आठवणींचें महत्त्व जास्त आहे. पत्रांमध्ये व दैनंदिनीमध्ये मनुष्याच्या जीवनांतील कांही घटना, इतरांशीं त्याचे

असलेले संबंध, व क्वचित् त्याची विशिष्ट वेळची मनःस्थिति, यांचा बोध होतो. मनुष्याचा स्वभाव, त्याच्या लकबी, इत्यादि गोष्टी त्याच्या स्वतःच्या लेखनांत कागदावर तितक्या स्पष्टपणें उमटूं शकत नाहीत. त्या प्रत्यक्ष भेटींतच जास्त स्पष्टपणें लक्षांत येतात. बहुतेक सर्व आठवणी प्रत्यक्ष भेटींतूनच निर्माण होत असल्यामुळे चरित्रनायकाचा खराखुरा स्वभाव त्यांतच उमटलेला दिसतो. शिवाय पत्रें व दैनंदिनी हीं नीट विचार करून लिहिलेलीं असल्यामुळे त्यांत थोडीशी तरी कृत्रिमता येण्याचा संभव असतो. मित्रमंडळींत बसलें असतांना मनुष्याची वागणूक अत्यंत मोकळेपणाची व अकृत्रिम असते. त्या वेळीं त्याचा खराखुरा स्वभाव लक्षांत येतो. लोकमान्य टिळकांचें चरित्र आणखी पन्नास किंवा शंभर वर्षांनी कोणास लिहावयाचें झालें तर केसरीचे जुने अंक व केळकरांनी 'टिळकचरित्रां'त छापलेलीं पत्रें, यांपेक्षाही टिळकांच्या आठवणींचे ग्रंथ चरित्रकाराला जास्त उपयोगी पडतील. आपल्याकडें लो. टिळक व हरिभाऊ आपटे यांच्याच आठवणी प्रसिद्ध आहेत. शिवाय श्रीमती रमाबाई रानडे व श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांचीं आत्मचरित्रात्मक पुस्तकें आहेत त्यांत अनुक्रमें न्या. रानडे व रेव्ह. टिळक यांच्यासंबंधीं भरपूर आठवणी सापडतात. परंतु अद्यापि अनेक थोर लोकांच्या आठवणींची वाण भासते. पुढील चरित्रकारांच्या उपयोगाकरितां त्यांच्या आठवणी प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. अस्तु.

चरित्रनायक लेखक—विशेषतः ललितलेखक - असला, तर त्याच्या लेखनांत पुष्कळदा त्याच्या स्वतःच्या जीवनाचें व स्वभावाचें प्रतिबिंब पाहावयास मिळतें. त्याने निर्माण केलेल्या निरनिराळ्या पात्रांपैकी एखाद्या पात्राचें चित्र थोडया फार प्रमाणात त्याच्या स्वतःचें चित्र असूं शकतें. 'डेव्हिड कॉपरफील्ड' या कादंबरींत डिकन्सने स्वतःच्या जीवनाचें चित्र रंगविलें आहे असें म्हणतात, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. प्रि भाटे यांची 'प्रेम की लौकिक' ही कादंबरी तर जवळजवळ

आत्मचरित्रात्मक आहे. श्री. वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांपैकी 'सुशीलेचा देव' व 'इंदु काळे-सरला भोळे' या कादंबऱ्यांतील अनुक्रमें सुनंद व विनायकराव भोळे हीं पात्रें म्हणजे वामनरावांचीं स्वतःचीं चित्रें आहेत असें म्हणणारे टीकाकार बरेच निघतील. परंतु हे सर्व तर्कच. प्रश्न असा की चरित्रकाराने अशा अनिश्चित स्वरूपाच्या साधनावर कितपत अवलंबून राहावें? मला वाटतें, तसें करणें बरेंच धोक्याचें आहे. आज वामनराव जोशी यांचें चरित्र ज्यांना माहीत आहे ते विनायकराव भोळ्यांच्या पात्रांत वामनरावांचें चित्र पाहूं शकतात. परंतु समजा, आणखी शंभर वर्षांनी एखाद्याच्या वाचनांत ही कादंबरी आली, आणि त्याला लेखकाच्या जीवनासंबंधाने कांही एक माहिती नसली, तर तो असे कांही तर्क करूं शकेल काय? आणि केले तरी त्यांत कितपत तथ्य मानावयाचें? असेच तर्क तो करूं लागला, तर विनायकराव भोळेच काय, 'रागिणीं'तील भय्यासाहेबांचाही तो वामनरावांवर आरोप करूं शकेल! परंतु याला आधार काय? मनुष्याच्या चरित्राकडून त्याच्या पात्रांकडे जातां येईल; पात्रांवरून चरित्राचा तर्क करणें अत्यंत धोक्याचें आहे.

आतापर्यंत पत्रें, दैनंदिनी, आठवणी इत्यादि ज्या साधनांचा निर्देश केला त्यांतही विश्वसनीयता कितपत असूं शकते याचा विचार केला पाहिजे. मनुष्य जेव्हा पत्रें किंवा दैनंदिनी लिहितो तेव्हा तो आपलें अंतःकरण उघडें करीत असतो असें सामान्यतः आपण समजतों. आणि त्या दृष्टीनेच त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांचा चरित्र लिहितांना उपयोग करावयास हरकत नाही असें मानतों. परंतु एकाच मनुष्याच्या पत्रांत तरी किती तऱ्हा असतात! आपल्या जिवलग मित्राला किंवा प्रियकरिणीला पत्र लिहितांना एखाद्या कॉलेज तरुणाचें व्यक्तित्व एक प्रकारचें दिसेल, तर बापाला पत्र लिहितांना वेगळेंच दिसेल. प्रियकरिणीला लिहितांना तो म्हणेल की तुझ्या आठवणीने कांही अभ्यास सुचत नाही,

खाणंपिणं सुचत नाही आणि प्रकृति बिघडली आहे; इकडे बापाला लिहील, की अभ्यास सपाटून करीत आहें, रात्रीच्या रात्री जागून काढतों, म्हणून प्रकृति बिघडली आहे. आंद्रे मॉर्वा याने बायरन कवीचें उदाहरण दिलें आहे, तें अशाच प्रकारचें आहे. आपल्या एका प्रियकरणीला लिहितांना बायरन म्हणतो : 'तुझ्यावर माझें किती प्रेम आहे म्हणून सांगूं? मी जगतों तो केवळ तुझ्यासाठी. माझें जीवित, माझें भवितव्य सर्व तुला वाहिलेलें आहे.' त्याच वेळीं तो आपल्या एका मित्राला लिहितो. 'काय हें माझें जीवित? एखाद्या नटव्या बाईची खुशामत करीत बसण्याची पाळी यावी ना? यापेक्षा दुसरी अधोगति कोणती असू शकणार?' आता हीं दोन्ही पत्रें चरित्रकाराच्या हातीं पडलीं तर त्यांवरून बायरन हा भोंदू होता, बायकांना फसविणारा होता, असा तर्क चरित्रकाराला करतां येईल. परंतु दोहोंपैकी एकच पत्र हातीं आलें तर त्यावरून चरित्रकाराचा गैरसमज होण्याचा संभव नाही का? म्हणजे स्टीव्हनसनच्या Dr. Jekyll आणि Mr. Hyde प्रमाणेंच मनुष्य आपल्या पत्रांतही वेगवेगळा दिसतो. तसेंच दैनंदिनीचें. पुष्कळ लोक जसे स्वत:च्या समाधानाकरितां दैनंदिनी लिहितात तसे कांही लोक पुढच्या पिढीने ती वाचावी या उद्देशाने लिहिणारेही असतात. पहिल्या प्रकारच्या लोकांची दैनंदिनी जितकी विश्वसनीय मानतां येईल तितकी दुसऱ्या प्रकारच्या लोकांची मानतां येणार नाही. दुसऱ्या प्रकारांत मनुष्याला आपलें खरें व्यक्तित्व लपवून ठेवण्याचा मोह होणार नाही असें निश्चित सांगतां यावयाचें नाही.

असें जरी असलें तरी त्यांतल्यात्यांत चरित्रसाधनांमध्ये दैनंदिनीला विशेष महत्त्व आहे. आपल्या आत्मचरित्रांत श्री. न. चिं. केळकर म्हणतात : "रोजनिशीला मी रोजमेळाच्या कीर्दीइतकी किंमत सहज देईन. अशा कीर्दींत चुका किंवा खोटें लिहिणें कोठे होतच नसेल असें म्हणतां येणार नाही हें खरें. परंतु ती गोष्ट क्वचित घडते. निदान

व्यक्तीच्या विशेष गुणदोषांच्या हकीकती वगळल्या तरी निरपेक्ष, नि:स्वार्थी अशा हकीकती पुष्कळच असणार. तारीखवार लिहिलेल्या नोंदी व टिपणें यांचें इतिहासदृष्ट्या महत्त्व मुळीच नाकबूल करतां येणार नाही. जो मनुष्य रोजनिशी दुसऱ्याला फसविण्याच्या दृष्टीने लिहील तो आत्मचरित्रग्रंथांत तसें काय कमी लिहील? आणि ज्या संकलित इतिहासाला आपण डोळे मिटून विश्वसनीयतेचें प्रदान करतों तो तर तिसऱ्याने चवथ्याकडून हकीकती मिळवून जुळवून लिहिलेला; म्हणून आत्मचरित्रापेक्षा कमी महत्त्वाचा ठरतो. तात्पर्य, संकलित इतिहासापेक्षा आत्मचरित्रांचे ग्रंथ आणि त्यांहीपेक्षा नियमित वेळीं लिहिलेल्या रोजनिशा यांना सर्वोत्तम पहिल्या प्रतीचें इतिहाससाधन हें पद सहजच प्राप्त होतें असें मला वाटतें."

तसेंच आठवणींचें. आठवणी लिहिणाऱ्या पुष्कळशा लोकांत आपल्याकडेच मोठेपणा घेण्याची प्रवृत्ति बरीच सापडते ही गोष्ट पुष्कळांना अप्रिय वाटली तरी ती खरी आहे. आठवणी काळजीपूर्वक वाचून पाहणाराच्या ही गोष्ट ध्यानांत येईल. याचा परिणाम असा होतो की आपल्याला थोडासा मोठेपणा मिळावा या बुद्धीने आठवण लिहितांना प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींत थोडासा बदल करण्याची किंवा तिला तिखटमीठ लावण्याची प्रवृत्ति होते. क्वचित् प्रसंगीं वर्णनविषयाचा गौरव करण्याच्या हेतूनेही तशी प्रवृत्ति होण्याचा संभव आहे. शिवाय एकाच मनुष्याकडे बघण्याची दोन निरनिराळ्या माणसांची दृष्टि निराळी असू शकते. त्या दृष्टीप्रमाणे मनुष्याच्या निरनिराळ्या कृतींकडे पाहून त्यांपासून वेगवेगळा अर्थ तीं दोन माणसें काढूं शकतील. इतिहासाचार्य राजवाडे यांचे भक्त त्यांच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल त्यांचें कौतुक करतांना दिसले, तर त्याच स्पष्टवक्तेपणाला अमर्यादपणा, उद्धटपणा इत्यादि नांवें देऊन त्यांचा निषेध करणारेही पुष्कळ निघतील. कार्लाइलचा चरित्रकार फ्रूड याने कार्लाइलच्या गृहजीवनाचें जें चित्र काढलें आहे

त्यांत त्याने असें दाखविलें आहे की 'हा एवढा मोठा तत्त्वज्ञानी घरीं बायकोला अगदी वाईट वागवीत असे. तिचें अंतःकरण समजून घेण्याचा त्याने कधी प्रयत्न केला नाही. त्यामुळे घरांत नेहमी गैरसमज, भांडणें व धुसफुस चालू असे. याच्या स्वार्थीपणामुळे आणि अरेरावीमुळे तिला अतिशय कष्ट सोसावे लागत व घरांत तिला सामान्य नोकरापेक्षा जास्त किंमत नव्हती.' तीही थोडीशी चिडखोर व हट्टी असल्याचें फ्रूड अमान्य करीत नसला, तरी त्याने कार्लाइललाच अधिक दोष दिला आहे. याउलट कार्लाइलची एक मैत्रीण त्याच्या बायकोचें वर्णन करतांना म्हणते की, 'ती अत्यंत भांडकुदळ व तोंडाळ असून नवऱ्याला सळो की पळो करून सोडीत असे! आणि हा बिचारा कधी तिला उलटून बोलला नाही; उलट नेहमी नमतें घेऊन तिची समजूत घालायचा प्रयत्न करीत असे!' आता या दोन परस्परविरुद्ध वर्णनांचा मेळ कसा घालावयाचा? दोघांचाही कार्लाइलच्या जीवनाशीं दाट संबंध आलेला; तरी दोघांच्या मतांत जमीनअस्मानाचा फरक! येथे एकेकाच्या दृष्टीचा फरक स्पष्ट दिसतो. हीं दोन्ही चित्रें ज्याच्या डोळ्यासमोर आहेत तो असा विचार करील की सत्य दोहोंच्या मध्ये कुठे तरी असलें पाहिजे. परंतु ज्याच्या हातांत या दोन चित्रांपैकी एकच पडेल, त्याला वस्तु-स्थितीचें ज्ञान होणें शक्य नाही. त्याचा कार्लाइलसंबंधीं किंवा त्याच्या बायकोसंबंधीं गैरसमजच होईल. तात्पर्य, मनुष्याचा स्वभाव पाहणाराच्या दृष्टीप्रमाणे वेगवेगळा दिसणार हें उघड आहे. प्रश्न असा की पुढच्या पिढीने यांपैकी खरें कोणतें मानावयाचें?

आणि हीं सर्व साधनें उपलब्ध असलीं व तीं विश्वसनीय आहेत असें मानलें तरी शेवटीं मनुष्याच्या जीवनांत अशा कित्येक गोष्टी घड-लेल्या असतात की त्यांचा छडा लावणें अशक्य होऊन बसतें. मनुष्याने केलेल्या प्रत्येक कृतीच्या पाठीमागे काय हेतु असेल हें कळणें अशक्यप्राय आहे. पत्रांवरून, दैनंदिनीवरून किंवा ऐकीव माहितीवरून कांही थोड्या

कृत्यांचा छडा लागेल. पण इतरांच्या बाबतींत काय करावयाचें? आंद्रे मॉर्वा याने यासंबंधीं एक उदाहरण दिलें आहे, तें येथे देतों. डिझराएली याने त्या वेळचा मुख्य प्रधान सर रॉबर्ट पील यास एक कडक पत्र लिहिलें. पुढे पील याने पार्लमेंटमध्ये त्याचा जाब विचारल्यावर डिझराएली याने पत्र लिहिलें असल्याचें नाकबूल केलें. आता येथे डिझराएलीबद्दल आपलें मत कसें बनवावयाचें? आपण पत्र लिहिल्याचें तो खरोखरच विसरला असेल तर ती गोष्ट नाकबूल केल्याबद्दल त्याला दोष देतां येत नाही. बरें विसरला नसून लपवूं पाहत असेल तर तो लुच्चा, किंबहुना मूर्ख असला पाहिजे--कारण पीलसारखा धूर्त मनुष्य तें पत्र जपून ठेवणार हें निश्चित! तेव्हा या ठिकाणीं परकायाप्रवेश करण्याची विद्या माहीत असल्याशिवाय सत्य काय आहे तें कळावयास मार्ग नाही.

सारांश या सर्व चर्चेवरून एवढें अनुमान काढतां येईल की मनुष्याच्या जीवनाबद्दलची माहिती उपलब्ध सामग्रीवरून जेवढी मिळेल तेवढ्यावर चरित्रकाराला संतुष्ट राहावें लागणार. शंभर टक्के सत्य मिळण्याची कोणीही आशा बाळगूं नये. शास्त्रीय शोधाच्या बाबतींत ज्याप्रमाणे एकसारखे प्रयोग करून सत्य शोधून काढणें शक्य आहे, त्याप्रमाणे चरित्राच्या साधनांतून सत्य शोधून काढणें शक्य नाही. एखाद्या द्रव्याचें शास्त्रीय रीत्या पृथक्करण करतां येईल; चरित्राच्या साधनांचें पृथक्करण कुठवर करणार? अनेक प्रकारचीं उदाहरणें घेऊन त्यावरून एक सर्वसाधारण सिद्धांत बसविणें हें शास्त्राच्या बाबतींत शक्य आहे; मनुष्यजीवनाच्या निरनिराळ्या भागांवरून साधारण सिद्धांत काढणें वेडेपणाचें होईल. मनुष्य दहा वेळां अमुक एका तऱ्हेने वागला यावरून त्याच्या वागणुकीसंबधीं सर्वसाधारण सिद्धांत काढणें म्हणजे मनुष्याला यंत्र बनविण्यासारखें होईल. मनुष्याचें मन म्हणजे एक अजबखाना आहे! त्याचें पृथक्करण होऊं शकत नाही, त्याच्यापुढे तर्कशास्त्र लंगडें पडतें व त्यासंबंधीं कांही एक नियम घालतां येणार

नाही. त्या बाबतींत सत्याच्या शक्य तितक्या जवळ जाण्याचा प्रयत्न करण्यांतच मनुष्यानें समाधान मानलें पाहिजे. या दृष्टीनें पत्रें, दैनंदिन्या इत्यादि साधनांचा उपयोग करावयाचा व अनेक साधनांचा मेळ घालून त्यांची योग्य जुळणी केल्यावर त्यांतून मनुष्याचें जें चित्र बाहेर पडेल तें खरें असें समजावयाचें. त्यांत चिकित्सकपणा व कौशल्य या दोहोंचा शक्य तितका उपयोग करणें हेंच चरित्रकाराचें कर्तव्य आहे.

या ठिकाणीं कलेचा प्रांत सुरू होतो. चित्रकार ज्या वेळीं देखावा रंगवावयास बसतो त्या वेळीं प्रत्येक बारीकसारीक गोष्ट तो रंगवीत नाही. तसें करणें शक्य नसतें. झाडाचें चित्र काढावयाचें झाल्यास झाडाचें पानन् पान तो रंगवीत बसणार नाही; किंवा डोंगराचें चित्र काढावयाचें झाल्यास त्या डोंगरावरील प्रत्येक झाड, झुडूप व दगड रंगविणें त्याला अशक्य होऊन बसेल. आणि समजा मोठ्या खटपटीनें त्यानें सर्व बारीकसारीक गोष्टी रंगविल्या तरी त्यांमुळे चित्राला मोठी शोभा येईल असेंही नाही. उलट कुंचल्याच्या चारदोन फटकाऱ्यांसरशीं तो झाडाचें किंवा डोंगराचें चित्र जास्त सुंदर रंगवूं शकेल. हे चारदोन फटकारे तो कसे मारतो हें पाहण्यासारखें आहे. डोंगराचें किंवा झाडाचें वैशिष्टय कशांत आहे तें आधी तो पाहतो. डोंगरावर असलेल्या सर्व गोष्टी रंगवीत बसण्यापेक्षा कोणत्या विशिष्ट गोष्टींमुळे डोंगर ओळखतां येतो तें नीट ध्यानांत घेऊन तेवढ्याच गोष्टी तो रंगवील. आणि त्या थोड्याशा गोष्टींनी जें चित्र निर्माण होईल तें पाहून एखादा लहान मुलगासुद्धा म्हणेल की 'हा पहा डोंगर!' तसेंच झाड रंगवितांना तो प्रत्येक पान आणि फांदी रंगवीत बसणार नाही, तर झाडाची साधारण रूपरेषा व छायाप्रकाश हीं पाहून तेवढेच कुंचल्याचे फटकारे मारून हुबेहूब झाडाचा आभास उत्पन्न करील. यांतच खरी कला आहे. चरित्रलेखनाची कला अशाच प्रकारची आहे. पत्रें, दैनंदिन्या, आठवणी यांचा ढीग त्याच्यासमोर पडलेला

असतो. त्यांत कित्येक परस्परविरुद्ध व विसंगत गोष्टी त्याच्या नजरेस येतात. परंतु त्यांतून तारतम्याने योग्य ती निवड करून व्यक्तीचें चित्र उभें करण्यांत त्याची कला साठविलेली आहे. तारतम्याने निवड करावी, याचा अर्थ असा मात्र नव्हे की आपल्याला जसें चित्र रंगवावयाचें असेल तशा चित्राला अनुकूल गोष्टी फक्त घ्यावयाच्या आणि इतरांचा बुद्ध्या अपलाप करावयाचा. तसें करण्यांत सत्यापलापाचा दोष घडतो. त्याचा अर्थ एवढाच की मनुष्याचें व्यक्तित्व पूर्णपणें—त्याच्या मानवीय गुणदोषांसहित—व सुसंगतपणें व्यक्त होईल अशा गोष्टी निवडावयाच्या व इतर निरुपयोगी गोष्टी सोडून द्यावयाच्या. त्या निवडलेल्या गोष्टींतून तर्कशुद्ध व मानवी मूर्ति निर्माण करावयाची हें चरित्रकाराचें कार्य होय. साधनांची योग्य निवड व जुळणी करण्यांत चरित्रकाराच्या योजकतेची खरी परीक्षा होते. या ठिकाणीं चरित्रकाराला कल्पनाशक्तीची आवश्यकता भासते.

या बाबतींत चरित्रकार आणि कथालेखक यांच्या तुलनेचा प्रश्न साहजिकच डोळ्यांसमोर येतो. दोघांच्याही कार्यांत कल्पनाशक्तीची आवश्यकता असते. परंतु कथालेखकाला आपली कल्पनाशक्ति मोकळी सोडण्यास जितका वाव असतो तितका चरित्रकाराला नसतो हें उघड आहे. कादंबरीकार आपल्या मनास येईल तसें पात्र निर्माण करूं शकतो, मनास येईल तसा त्याचा स्वभावविकास दाखवूं शकतो. त्याला मर्यादा कसली असेल तर ती वास्तवतेची. चरित्रकाराचे हातपाय त्याच्या समोर असलेल्या पत्रें, आठवणी इत्यादि साधनांनी जखडलेले असतात. या साधनांमध्ये त्याला मनुष्याच्या बाह्य कृति, बाह्य संबंध, त्याचें बोलणें, चालणें, इत्यादि गोष्टी पाहावयास मिळतात. त्यांतून त्याला सुसंगत चित्र निर्माण करावयाचें असतें. त्यांतही अनेक परस्परविरुद्ध व विसंगत गोष्टी त्याला आढळतात आणि त्यांचा मेळ घालण्याचें अत्यंत कठीण कार्य त्याला करावयाचें असतें. मनुष्याच्या हातून

विसंगत वर्तन होत नाही असें नाही; परंतु हॅम्लेटच्या वेडाप्रमाणे त्या विसंगतीच्या पाठीमागेसुद्धा कांहीतरी 'पद्धत' असते. ती 'पद्धत' शोधून काढावयाची असेल तर मनुष्याच्या अंतःकरणाचा ठाव घ्यावा लागेल. बाह्यतः विसंगत दिसणारी गोष्ट मनुष्याच्या हातून ज्या वेळीं घडते त्या वेळीं त्याच्या अंतःकरणांत कांहीतरी लढा चाललेला असतो. त्या लढ्याचें स्वरूप आपल्याला कळलें तर कदाचित् त्या विसंगतीचें समर्पक कारण आपल्याला मिळूं शकेल. परंतु तें कळावयाचें कसें ? मनुष्याच्या अंतःकरणांत चालू असलेले खेळ कोण पाहूं शकणार ? ही गोष्ट कादंबरीकार करूं शकतो. त्याचें सर्व जग काल्पनिक असल्यामुळे तो तेवढ्यापुरता तरी परमेश्वरच असतो. आपल्या पात्रांचा विचार, त्यांच्या भावना इत्यादि गोष्टी त्याला तळहातावरच्या आवळ्यासारख्या स्पष्ट दिसतात. कारण त्यांचा निर्माता तोच ना! त्यामुळे कथालेखक त्यांचें अंतःकरण वाचकांच्यासमोर उघडें करून दाखवूं शकतो. परंतु चरित्रकार हा कांही आपल्या पात्रांचा निर्माता नव्हे. त्याचीं पात्रें ईश्वरनिर्मित असतात. त्यांच्या अंतःकरणाचा ठाव चरित्रकाराला कसा लागणार ? आणि मनुष्याचें अंतःकरण जोंपर्यंत पाहावयास मिळत नाही, त्याचे विचार, त्याच्या भावना इत्यादिकांचें विश्लेषण जोंपर्यंत करतां येत नाही, तोंपर्यंत त्याच्या नुसत्या बाह्य कृतींवरून त्याचें स्वभावचित्र रंगविणें हें अत्यंत कठीण आहे, इतकेंच नव्हे तर कांही अंशीं मनुष्याला अन्याय करण्यासारखें आहे. कथालेखकाप्रमाणे चरित्रकाराला परकायाप्रवेश करतां येत नसल्यामुळे त्याचें कार्य अतिशय अवघड होतें. 'भाऊबंदकी' नाटकांत राघोबादादा किंवा आनंदीबाई यांच्या तोंडीं स्वगत भाषणें घालून खाडिलकर त्यांचें अंतःकरण वाचकांच्या समोर उघडें करून दाखवूं शकतात. इतिहासावर आधारलेलें असलें तरी तें नाटक आहे. तेथे कल्पनेला पूर्ण नाही तरी बराचसा वाव आहे. परंतु राघोबादादाचा इतिहासकार किंवा चरित्रकार तसें करूं शकत नाही. त्याला कल्पनेचें

साहाय्य घेतां येत नाही. रेव्हरंड टिळकांचें वर्तन कित्येक वेळां अत्यंत चमत्कारिक असे. इतकें की प्रत्यक्ष लक्ष्मीबाई टिळकांना त्याची उपपत्ति लावतां येत नसे व त्यामुळे त्यांना गप्प बसण्याची पाळी येत असे. टिळकांनी एखादी गोष्ट करावी आणि बायकोला ती न पटल्यामुळे ती रागावली, म्हणजे आपल्या वर्तनाबद्दल योग्य स्पष्टीकरण देऊन तिची समजूत घालण्याऐवजी त्यांनी म्हणावें, 'तुला मानसशास्त्र समजत नाही.' आणि बापड्या लक्ष्मीबाईनी गप्प बसावें! अहर्निश पतीबरोबर राहणाऱ्या पत्नीची जर ही स्थिति तर बिचारा चरित्रकार तेथे काय करणार? अशा प्रत्येक प्रसंगाची मनुष्याने दैनंदिनींत स्पष्टीकरणासह नोंद करून ठेविली असली, किंवा एखाद्या पत्रांत त्याचा उल्लेख केला असला, तरच त्याच्या वर्तनाचा लागला तर छडा लागणार. या साधनांपलीकडे चरित्रकाराला जातां येत नाही ही त्याच्या बाबतींत एक मोठी अडचण आहे.

न्या. रानडे यांनी अकरा वर्षांच्या कुमारिकेशीं दुसरें लग्न केलें, याबद्दल त्यांच्या चरित्रकाराला वाद घालून त्यांचें समर्थन करण्याची पाळी येते याचा अर्थ तरी हाच आहे. वास्तविक समर्थन करण्याचें कारण काय? एखादा कादंबरीकार त्या ठिकाणीं असता तर त्याने तें लग्न करतांना रानड्यांच्या मनांत जो लढा चालू होता त्याचें चित्र काढून वाचकांच्या समोर ठेविलें असतें, आणि आपण स्वतःचें कांही मत न देतां तो स्वस्थ बसला असता. मनुष्याच्या मनाचें चित्र तुमच्या-समोर ठेविलें आहे; त्यावरून तुम्हांला काय समजायचें असेल तें समजा. मी कशाला त्यावर मल्लिनाथी करूं? असें त्याने वाचकांना सांगितलें असतें. रानड्यांच्या चरित्रकाराला त्यांच्या मनांत प्रवेश मिळूं शकत नाही. तेव्हा त्यांनी केलेल्या विशिष्ट गोष्टीबद्दल लोक काय म्हणतात हें पाहून तो आपलें मत बनविणार. आणि मग चरित्रनायकाच्या कृतीचें समर्थन करण्याची साहजिकच प्रवृत्ति होणार. 'वडिलांच्या इच्छेकरितां

मला ती गोष्ट करावी लागली' असें स्वतः रानड्यांनी आपल्या वर्तनाचें स्पष्टीकरण दिलें, (आणि तें दिलें असावें असें श्रीमती रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या 'आठवणी' वरून दिसून येतें, ) तरी खरोखर त्यांच्या अंतःकरणांत त्या वेळीं काय चाललें असेल, हें कळावयास काय मार्ग ? आणि प्रत्येक कृतीपाठीमागे चालत असलेला मनाचा व्यापार जोंपर्यंत कळत नाही तोंपर्यंत त्या कृतीचीच काय, एकंदर मनुष्यस्वभावाची संगति नीट लागत नाही, आणि वाचकाच्या मनाचें पूर्ण समाधान होत नाही. ही संगति लावण्याकरितां नाटककार किंवा कादंबरीकार स्वगत भाषणांच्या साहाय्याने आपल्या पात्रांच्या अंतःकरणाचे व्यापार वाचकांसमोर उघडे करून दाखवितात. परंतु चरित्रकाराला तें कसें साधणार ? मग आपल्या परीने त्या कृतीचें समर्थन करण्याची त्याच्यावर पाळी येते. परंतु तसें करणें धोक्याचें आहे. कसें तें पहा. समजा, पुढे रानड्यांच्या एखाद्या जिवलग मित्राजवळ त्यांच्या दैनंदिनीचीं कांही पानें किंवा त्यांनी त्याला लिहिलेलीं पत्रें सापडलीं आणि त्यांनी कांही वेगळाच कबुलीजबाब दिला असला; किंवा असें समजा की प्लँचेटच्या साहाय्याने परलोकविद्याविशारद ऋषींनी रानड्यांना याबद्दल स्पष्टीकरण देण्यास विनंती केली आणि त्यांनी असें स्पष्ट कबूल केलें की माझ्या मनांत विधवेशीं विवाह करावा असें फार होतें, अशी एक विधवा खरोखर लग्नाला तयारही होती, परंतु लोकमताविरुद्ध जाण्याचा आपणास धीर झाला नाही, आणि वडिलांच्या इच्छेचें केवळ निमित्त आपण पुढे केलें होतें; तर चरित्रकाराचें सगळें समर्थन पत्त्याच्या बंगल्यासारखें कोसळलें की नाही ? कादंबरीकार आपणच निर्माण केलेल्या पात्राच्या अंतःकरणांत बुडी मारून त्याच्या वर्तनाची संगति लावण्याकरितां आपणास अनुकूल अशीं प्रमाणें काढू शकेल. परंतु ईश्वरनिर्मित मनुष्य हा असा अजब प्राणी आहे, त्याचें मन समुद्राप्रमाणे इतकें खोल आहे, की त्याचा टाव घेण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य बुडून मात्र मरावयाचा !

[तेव्हा चरित्रकाराला आपल्या समोर जीं साधनें असतील तेवढ्यां-वरूनच मनुष्याचें चित्र रंगविणें भाग पडतें हें स्पष्ट झालें.] चरित्र-नायकानें अमकी गोष्ट केली एवढें सांगून त्याला स्वस्थ बसावें लागतें. त्या वेळीं त्याच्या मनांत काय विचार चालले असतील आणि ती गोष्ट करण्याचें त्यानें कां व कसें ठरविलें असेल तें कळावयास त्याला मार्ग नाही. अशा रीतीनें चरित्रकाराचे हातपाय बांधले गेले असल्यामुळेच चरित्र कादंबरीइतकें चित्तवेधक होऊं शकत नाही. चरित्र म्हणजे केवळ चरित्रनायकाच्या हयातींत घडलेल्या गोष्टींचें रुक्ष वर्णन होऊन बसतें. कादंबरींतील पात्रें वास्तविक काल्पनिक, परंतु कुशल कादंबरीकार त्यांचें जिवंत चित्र आपल्यासमोर उभें करून दाखवितो; चरित्र-काराचीं पात्रें जिवंत सृष्टींतील असून त्यांचा नुसता सांगाडा आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी किंवा नाटक यांतील फरक पहा. शेक्सपियरच्या 'आठवा हेनरी' या नाटकां-तील वूल्झीचें जिवंत चित्र कुणीकडे आणि इतिहासांतील नुसता हाडा-मासाचा पुतळा वूल्झी कुणीकडे ! गडकऱ्यांच्या 'राजसंन्यासा'तील संभाजी वाचकांचें किंवा प्रेक्षकांचें चित्त वेधून घेतो तसें इतिहासांतील संभाजी घेऊं शकत नाही. याचें कारण उघड आहे. नाटककार किंवा कादंबरीकार इतिहासांतील हाडामासाच्या पुतळ्यामध्ये आपल्या कल्पना-शक्तीनें प्राण ओतून जिवंतपणा आणूं शकतो. इतिहासकार किंवा चरित्रकार तसें करूं शकत नाही. त्याला तितकें स्वातंत्र्य नाही. मग प्रश्न असा की चरित्रलेखनाची 'कला' म्हणतात ती कुठे येते? सगळीं बंधनें पाळून चरित्र कादंबरीसारखें कलात्मक व चित्तवेधक करतां येईल काय?

या प्रश्नाची चर्चा करावयाची म्हणजे कलेच्या विविध अंगांचा विचार केला पाहिजे व तीं चरित्रामध्ये आणतां येतील की नाही हें पाहावयास पाहिजे. कलानंदाचा आस्वाद घेण्याकरितां अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे तटस्थता किंवा सविकल्पता. नाटककादंबरींतील पात्रें व

घटना काल्पनिक असल्यामुळे आपण आवश्यक तेवढें ताटस्थ्य कायम ठेवूं शकतों व सविकल्प समाधीचा आनंद उपभोगतों. परंतु हें ताटस्थ्य जिवंत व्यक्ति व प्रत्यक्ष घडलेल्या घटना यांच्या बाबतींत ठेवणें कठीण आहे. या प्रश्नाचा थोडासा विचार मागे केलेला आहे. जिवंत व्यक्ती-संबंधाने सत्यकथन करावयाचें म्हणजे कित्येक लोकांचीं मनें दुखविण्याचा प्रसंग यावयाचा. ते लोक या व्यक्तीच्या बाबतींत तटस्थता ठेवूं शकतील अशी अपेक्षा करणें चुकीचें होईल. मागे एका ठिकाणीं सांगितल्याप्रमाणे समजा रानड्यांनी प्लँचेटवर येऊन चरित्रकाराला आपल्या द्वितीय विवाहाबद्दल विशिष्ट कबुलीजबाब दिला आणि चरित्रकाराने स्वतः तटस्थवृत्ति ठेवून तो जसाच्या तसा चरित्रांत दिला, तर स्वतः रमाबाई रानडे, रानड्यांचे इतर नातलग व भक्त हे तितक्याच तटस्थ वृत्तीने त्या घटनेकडे पाहूं शकले असते की काय हा प्रश्न आहे. आणि ते जर तटस्थ वृत्ति ठेवूं शकले नाहीत तर त्यांना कलानंदाला मुकावें लागणार हें उघड आहे. या दृष्टीनेच केळकरांनी टिळकचरित्राच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे की, "कांही हकीगती चार-दोन पिढया गेल्यानंतर ऐतिहासिक म्हणून उघड रीतीने सांगतां येतील व त्या ऐकून हर्ष, अमर्ष, विषाद वाटणाऱ्या व्यक्ति नाहीशा झाल्यामुळे त्यांविषयीं शुद्ध कौतुकच शिल्लक राहील." यांतील 'शुद्ध कौतुकच शिल्लक राहणें' याचा अर्थच कलानंदाला आवश्यक असें ताटस्थ्य प्राप्त होणें हा होय. तसें ताटस्थ्य प्राप्त होण्यासाठी त्या व्यक्ति 'ऐतिहासिक' झाल्या पाहिजेत हें यावरून स्पष्ट होईल. पण मग मागचाच प्रश्न पुन्हा उपस्थित होतो. त्या व्यक्ति 'ऐतिहासिक' होईपर्यंत चरित्रकाराने वाट पाहावयाची की काय ? या प्रश्नाचें उत्तर मागे दिलेंच आहे. केवळ कांही लोकांचीं मनें दुखविलीं जातील म्हणून चरित्रकाराने वाट पाहण्याचें कांही कारण नाही आणि त्याकरिता सत्याचा बळी तर मुळीच देता कामा नये. चरित्रकाराने आपल्या परीने तटस्थ

वृत्तीने सर्व गोष्टी जशा घडल्या असतील तशा सांगाव्या. त्याची कृति जर उत्कृष्ट उतरेल तर लोकांतही तटस्थ वृत्तीने त्या कलाकृतीचा आस्वाद घेण्याची प्रवृत्ति आपोआप उत्पन्न होईल. चारदोन लोकांना त्यापासून आनंद न झाला तर तेवढ्याकरितां इतरांनी एका सुंदर कलाकृतीस कां मुकावें ?

कलाकृतीस सौंदर्य येण्यासाठी कलाकार तिच्याशीं समरस झाला पाहिजे हेंही आवश्यक आहे. येथे कांहीशी विसंगति दिसेल. कलाकाराने कलाकृतीबद्दल तटस्थ वृत्ति ठेवावी आणि तिच्याशीं समरसही व्हावें, यां दोन्ही गोष्टींचा मेळ कसा घालावयाचा ? परंतु ज्याला काव्यानंदाची उपपत्ति कळली असेल त्याला यांत विसंगति दिसणार नाही. काव्यानंदाच्या उपपत्तीची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. केळकरांची उपपत्ति जर मान्य केली, तर त्यांनी योजलेल्या 'सविकल्प समाधि' या शब्दप्रयोगामध्ये काव्यानंदाच्या उपपत्तीचें सार येतें. काव्यानंदाचा आस्वाद घेण्यासाठी सविकल्पता पाहिजे व समाधि किंवा समरसताही पाहिजे. चरित्रकाराला निःपक्षपातबुद्धीने सत्यकथन करण्यापुरती व वाचकांस तें वाचून वाईट न वाटण्यापुरती तटस्थ वृत्ति किंवा सविकल्पता आवश्यक असते; आणि उभयतांना चरित्रनायक व इतर व्यक्ति यांच्या अंतःकरणाची पूर्ण ओळख पटण्यासाठी समाधि किंवा समरसता पाहिजे. चरित्रकार ज्या मानाने आपल्या विषयाशीं समरस होऊं शकेल त्या मानाने त्याची कलाकृति सुंदर उतरेल व तितक्या प्रमाणांत वाचकही त्याच्या कृतीशीं समरस होऊन रसास्वाद भोगूं शकतील. मागे चरित्रविषयाची निवड करण्यासंबंधीं जी चर्चा केली आहे तींतील एक धागा येथे पुन्हा उचलावा लागेल. कोणत्या ना कोणत्या कारणाने आपणास ज्या व्यक्तीचें जीवन कलादृष्टया आकर्षक वाटतें त्या व्यक्तीची चरित्रकाराने निवड करावी असें मागे सांगितलें आहे. आंद्रे मॉर्वा याने डिझराएली व शेले हे चरित्रनायक कां

निवडले हेंही आपण पाहिलें. स्ट्रॅची याने व्हिक्टोरिया राणीचें चरित्र लिहिण्याचें ठरविलें याचें कारण आपणास माहीतच आहे. आंद्रे मॉर्वा यास शेले व डिझराएली यांच्या जीवनांत स्वतःच्या इच्छाआकांक्षांचें प्रतिबिंब दिसलें व त्यामुळे तो त्यांकडे आकर्षिला गेला. स्ट्रॅची यास व्हिक्टोरिया राणीबद्दल सुरवातीसच सहानुभूति नसून तिच्या जीवनांत त्याला असा कांही अद्भुतरम्य भाग दिसला की त्यामुळे त्याचें लक्ष तिच्या चरित्राकडे वेधलें गेलें. सहानुभूतीचा अभाव असून तिच्या चरित्राबद्दल त्याला आकर्षण वाटलें हें विशेष. परंतु या आकर्षणामुळेच दोघेही आपापल्या चरित्रविषयाशीं समरस होऊं शकले. तसें पाहिलें तर समरसता आणि सहानुभूति यांत काय फरक आहे? चरित्रकाराची विषयाशीं समरसता झाली म्हणजे त्याचे अनुभव ते आपले अनुभव, असा भाव उत्पन्न होऊन त्याच्या अंतःकरणाची त्यास पूर्ण ओळख पटते. यालाच सहानुभूति म्हणावयाचें. या अर्थाने सहानुभूतीची चरित्रकारास आवश्यकता असते असें म्हणतां येईल.

ज्या मानाने सहानुभूति वाढत जाईल त्या मानाने चरित्रविषयाच्या दोषांवर पांघरूण घालण्याकडे अधिकाधिक प्रवृत्ति होईल अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. परंतु ती शंका व्यर्थ आहे. सहानुभूतीबरोबरच आवश्यक तेवढें ताटस्थ्यही चरित्रकार ठेवीत असतो हें विसरून चालणार नाही. चरित्रविषयाशीं समरस होणें किंवा त्याबद्दल सहानुभूति बाळगणें याचा अर्थ त्याची वकिली करणें नव्हे. सहानुभूतीच्या योगाने चरित्रकार त्याच्या प्रत्येक कृतीचें समर्थन करण्यास प्रवृत्त झाला तर त्याला आपलें कर्तव्य समजलें नाही असेंच म्हणावें लागेल. चरित्रनायक हा बोलून चालून मनुष्य आहे, मनुष्यामध्ये जसे कांही गुण असतात तसे दोषही असूं शकतात, एवढें चरित्रकाराने ओळखलें म्हणजे झालें. येथेच सहानुभूतीची सुरवात झाली असें समजावें. पुढे त्याच्या प्रत्येक कृतीकडे निःपक्षपातबुद्धीने पाहण्याची व ती समजून घेण्याची

साहजिक प्रवृत्ति होते. त्या त्या कृतीचें वर्णन करतांना जणू कांही आपणच चरित्रनायकाच्या जागीं आहोंत अशी भावना चरित्रकाराच्या मनांत उत्पन्न झाली म्हणजे चरित्रनायकाचें हृदय त्याला पूर्ण कळलें असें होतें. याने चरित्रनायकाच्या आयुष्यांतील कित्येक विसंगत दिसणाऱ्या गोष्टींची संगति लावतां येते. पत्रें, दैनंदिन्या वगैरे चरित्राचीं साधनें म्हणजे केवळ चरित्राचा सांगाडा झाला. हाडें, मांस, मज्जा इत्यादिकांचा मनुष्य बनत नाही; त्यांत प्राण असावा लागतो. चरित्रकार चरित्रांत आपलें हृदय ओतून हा प्राण निर्माण करतो व चरित्राला जिवंतपणा आणतो. तसें करतांना त्याच्या हृदयाचें प्रतिबिंब चरित्रांत उमटून चरित्रनायकाचा रंग किंचित् बदलेल व तें चित्र अस्वाभाविक होईल ही भीति व्यर्थ आहे. समरसता आणि तटस्थता यांचा योग्य प्रमाणांत तोल सांभाळण्यांत खरी कला आहे.

आता चरित्राची कलात्मक मांडणी कशी करतां येईल तें पाहूं. सामान्यत: कथावाङ्मयाच्या बाबतींत असा दण्डक मानण्यांत येतो की, कथा सांगत असतांना तिच्याबद्दल शेवटपर्यंत वाचकांची उत्कंठा कायम राहावी अशा पद्धतीने ती सांगितली पाहिजे. प्रो. फडके यांनी 'प्रतिभासाधनां'त याबद्दल चर्चा केली आहे. तिची पुनरुक्ति येथे करण्याची आवश्यकता नाही. मुख्य मुद्दा सांगितला म्हणजे पुरे. वाचकांची उत्कंठा कायम ठेवणें हें जसें कथालेखकाला आवश्यक आहे तसेंच चरित्रकाराला आवश्यक आहे हें प्रथम सांगितलें पाहिजे. वाचकांची उत्कंठा कायम ठेवावयाची, म्हणजे कथेचें रहस्य अखेरपर्यंत त्यांना कळूं द्यावयाचें नाही, याबद्दल काळजी घेतली पाहिजे. तें आधीच सांगून टाकलें तर कथा शेवटपर्यंत कोणी वाचणारच नाही. यावर असा आक्षेप येईल की चरित्र म्हणजे कांही कथा नव्हे. त्यांत रहस्य तें कसलें असावयाचें? चरित्र हें जिवंत ( म्हणजे प्रत्यक्ष होऊन गेलेल्या ) व्यक्तीचें चरित्र असल्यामुळे त्याचा आदि, मध्य व अंत सर्वांना

माहीतच असतो. हा आक्षेप बरोबर आहे. परंतु जिवंत व्यक्तीचें चरित्र सर्वांना माहीत असलें तरी प्रथमच तिच्या जीवनाचें रहस्य सांगून टाकण्यापेक्षा बालपणापासून तिच्या जीवनाचा हळूहळू विकास कसा होत गेला, तिच्या स्वभावावर निरनिराळे संस्कार कसे होत गेले, व अखेरीस तिच्या जीवनाला कांही तरी वैशिष्टय कसें प्राप्त झालें, याचा क्रमवार इतिहास सांगणें हें जास्त चित्तवेधक होणार नाही काय? यासंबंधीं एक दोन उदाहरणें सांगतों. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें त्यांच्या बंधूंनी जें चरित्र लिहिलें आहे त्याची सुरवात पहा :

"आमच्या या महाराष्ट्र देशांत इंग्रजी विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून जे पुष्कळ विद्वान पुरुष होऊन गेले त्यांमध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापेक्षा चरित्र लिहिण्यास अधिक योग्य असा पुरुष क्वचितच निपजला असेल. जेथे जेथे म्हणून मराठी भाषा बोलतात, तेथे तेथे या थोर पुरुषाचें नांव माहीत नाही असा मनुष्य सापडणें कठीण. त्यांच्या हातून अल्पवयांतच जीं महत्त्वाचीं कृत्यें घडून आलीं, तशीं गेल्या पन्नाससाठ वर्षांत कोणाच्याही हातून घडून आलीं नसतील. सुमारें दहा बारा वर्षांतच यांनी आपल्या अलौकिक ग्रंथरचनेने महाराष्ट्रभाषेस अगदी वेगळें स्वरूप दिलें; लोकमताचा प्रवाह जो आपल्या देशाच्या खऱ्या हिताविरुद्ध जबरदस्त असा वहात चालला होता त्यास अगदी उलटी दिशा दिली; आपल्या देशबांधवांमध्ये स्वदेशाविषयीं, स्वभाषांविषयीं, स्वजातीविषयीं अभिमान जागृत केला; व नवीन छापखाने, नवीन किताबखाने हातीं घेऊन सरकारच्या नोकरीवरच भिस्त न ठेवतां खाजगी उद्योगाने आपल्या विद्वान लोकांस स्वतंत्रपणाने व अब्रूने कसें राहतां येईल, हें प्रत्यक्ष स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिलें."

विष्णुशास्त्री यांच्या आयुष्यांतील थोरपणाचें सगळें रहस्य, त्यांनी केलेलें कार्य, हें सर्व पहिल्या पानावर पहिल्याच परिच्छेदांत सांगून

टाकल्याने चरित्राचें निम्में सौन्दर्य कमी झालें! विष्णुशास्त्र्यांचें कार्य सर्वांना माहीत आहे हें कबूल; परंतु तें सुरवातीला सांगून टाकण्यापेक्षा वर्णनाच्या ओघांत आलें तर जास्त बरें नाही का? तसेंच श्री. फाटक यांनी रानड्यांच्या चरित्रांत पहिलेंच वाक्य पुढीलप्रमाणे घातलें आहे.

"हिंदुस्थानच्या अर्वाचीन राजकीय इतिहासाला आपल्या अद्वितीय ज्ञानाने, धोरणाने व कर्तबगारीने नवें वळण लावणारे कै. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, यांचा जन्म नाशिक जिल्ह्यांतील निफाड गावीं सन १८४२ सालीं जानेवारीच्या अठराव्या तारखेस सूर्यास्तसमयीं झाला."

येथेही पहिल्याच वाक्यांत रानडे यांचा थोरपणा कशांत होता हें सांगून टाकल्याने रसहानि होते. शिवाय आंद्रे मॉर्वा याने फॉस्टर याने लिहिलेल्या डिकन्सच्या चरित्राच्या सुरवातीसंबंधीं म्हटलें आहे त्याप्रमाणे विनोदाने म्हणावयाचें म्हणजे नाशिक जिल्ह्यांत निफाड गावीं १८४२ सालच्या जानेवारी महिन्याच्या अठराव्या तारखेस गोविंदराव रानड्यांच्या घरीं एक मूल जन्माला आलें इतकेंच; त्या वेळीं तें हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासाला नवें वळण लावणारें नव्हतें, न्यायमूर्तीही नव्हतें आणि कैलासवासी तर मुळीच नव्हतें! याच्या उलट लिटन स्ट्रॅची याने व्हिक्टोरिया राणीच्या चरित्रांत काय केलें आहे तें पहा. सुरवातीला कांही पानें राणीच्या कुलाचा थोडासा पूर्वेतिहास देण्यांत खर्च केलीं आहेत व पहिल्या प्रकरणाच्या शेवटीं म्हटलें आहे,

......and there, on May 24, 1819, a female infant was born.

आणि पुढे तिच्या बालपणाचें वर्णन आहे. आधीपासून तिचें गुणवर्णन केल्याने रसभंग होईल हें स्ट्रॅची ओळखून होता. त्याचप्रमाणे तिच्या लहानपणच्या वर्णनांत राणीचा उल्लेख Queen Victoria असा कुठेही केलेला दिसणार नाही; तर the child किंवा the little girl असा केलेला आढळेल. लहानशी गोष्ट आहे, परंतु कलेच्या दृष्टीने महत्त्वाची

आहे. वयाच्या नवव्या वर्षीं मराठी शिक्षण संपवून इंग्रजी शिक्षण घेऊं लागलेला मुलगा 'माधवराव' नव्हता, तर नुसता 'माधव' होता. नऊ वर्षांच्या माधवाला 'माधवराव' म्हटलें नाही तर श्रीमती रमाबाई यांना राग येईल अशी तर फाटकांची कल्पना नव्हती? मोठमोठ्या सरदारांच्या घराण्यांत लहान मुलांना 'भाऊसाहेब' 'बाळासाहेब' म्हणण्याची पद्धत आहे; मध्यमवर्गीयांत ती नाही. तेव्हा तसा कोणाला राग येण्याचें कारण नाही हें उघड आहे. असो. याचा अर्थ एवढाच की चरित्रकाराच्या अंगीं आवश्यक तेवढी तटस्थ वृत्ति बाणली नाही. आपण रानड्यांसारख्या थोर मनुष्याचें चरित्र लिहीत आहों तेव्हा त्याचा योग्य तो मान राखला पाहिजे, कोणाला दुखवितां कामा नये, अशी जाणीव चरित्रकाराच्या मनांत आहे हें स्पष्ट दिसतें.

चरित्राची मांडणी करतांना चरित्रनायकाचा जीवनवृत्तान्त कालक्रमानुसार कथारूपाने सांगितला असतां कादंबरीप्रमाणे चरित्राची गोडी कायम राहते. आंद्रे मॉर्वा, लिटन स्ट्रॅची व एमिल लडविग हे तीन आधुनिक चरित्रकार या कलेमध्ये प्रवीण आहेत. चरित्रलेखनाची कला या तिघांनी परमावधीस नेऊन पोचविली आहे. मॉर्वा यांचीं शेले, डिझराएली, बायरन व डिकन्स यांचीं चरित्रें, स्ट्रॅची याचीं 'व्हिक्टोरिया', 'एलिझाबेथ आणि इसेक्स' व 'एमिनंट व्हिक्टोरियन्स' हीं चरित्रें, लडविग यांचीं 'नेपोलियन,' 'बिस्मार्क', 'कैसर विल्यम दुसरा' हीं चरित्रें, चरित्रलेखनकलेचे नमुने म्हणून पुढे ठेवावीं इतक्या योग्यतेचीं आहेत. त्यांतील कथेचा ओघ कादंबरीप्रमाणे अखंड वाहत असतो. कादंबरी वाचतांना एखादे वेळेस कंटाळा येईल, परंतु हीं चरित्रें एकदा हातांत घेतल्यानंतर खाली ठेववत नाहीत. एमिल लडविग याने नेपोलियन चरित्रांत नेपोलियनच्या जन्मापासून अखेरपर्यंत नाट्यात्मक पद्धतीने एकेका प्रसंगाचीं इतकीं मनोहर चित्रें काढलीं आहेत की नेपोलियनच्या

आयुष्याचा चित्रपट आपण पाहत आहों असा भास होतो. आंद्रे मॉर्वा याचीं 'शेले' व 'डिझराएली' हीं चरित्रें म्हणजे सुंदर कादंबऱ्याच होत. शेलेच्या चरित्राची सुरवात त्याने शेलेच्या ईटन शाळेंतील एका प्रसंगापासून केली आहे. शेले त्या वेळीं सुमारें पंधरा वर्षांचा होता. पुढे पूर्वेतिहास थोडक्यांत सांगितला आहे. प्रो. फडके यांनी 'प्रतिभा-साधनां'त वर्णिलेल्या 'विलोमपद्धती'सारखी ही पद्धत होय. शेलेचें चित्र रंगवितांना त्याचा जन्म कुठे व केव्हा झाला हें सांगण्याची सुद्धा त्याला आवश्यकता वाटत नाही. लिटन् स्ट्रॅची याचें 'व्हिक्टोरिया' चरित्र म्हणजे सर्व चरित्रवाङ्मयाचा मुकुटमणिच होय. त्याबद्दल आतापर्यंत अनेकवेळां उल्लेख आलाच आहे. त्याचें गुणवर्णन करण्या-पेक्षा तें प्रत्यक्ष वाचण्याची शिफारस करणें हाच उत्तम मार्ग. या दोनतीन चरित्रलेखकांचा येथे मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण इतकेंच की चरित्रलेखनाची कला काय असते याचा विचार करतांना आम्ही त्यांचींच चरित्रें डोळ्यासमोर ठेविलीं असून बरींचशीं उदाहरणें त्यांतूनच घेतलीं आहेत. आणि चरित्रवाङ्मयाच्या अभ्यासकांनी तीं अवश्य वाचावीं, म्हणजे केवळ औपपत्तिक चर्चेपेक्षा चरित्रलेखनाच्या कलेचें स्वरूप अधिक चांगलें समजेल. असो.

कालक्रमासंबंधींच्या मुद्द्याचें सूत्र पुन्हा उचलूं. कालक्रम पाळण्याचा मुख्य उद्देश चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचा विकास कसा होत गेला हें दाखविणें हा होय. चरित्रनायकाच्या आयुष्यांतील निर-निराळे प्रसंग यथाक्रम सांगितले म्हणजे त्यांचा त्याच्या स्वभावावर कसा परिणाम होत गेला व तो कसा आकार धारण करूं लागला हें आपोआप प्रतीत होतें. पुष्कळशा चरित्रांत शेवटीं 'स्वभाव' या नांवाचें स्वतंत्र प्रकरण दिलेलें आढळतें. ही प्रथा अत्यंत कलाविघातक आहे. कादंबरींत ज्याप्रमाणे निरनिराळे प्रसंग, नायकाचे व इतरांचे संवाद, इत्यादिकांनून नायकाचा स्वभावविकास आपोआप प्रतीत होतो,

त्याप्रमाणे चरित्रांत झाला पाहिजे. जुन्या कादंबऱ्यांतील स्वभावाचें वर्णन करण्याची पद्धत आपण आज गौण समजतों. तसाच चरित्राचा प्रकार होय. चरित्रनायकाच्या आयुष्यांतील सर्व प्रसंगांचें वर्णन करून झाल्यानंतर शेवटीं पुन्हा त्याचें स्वभाववर्णन करण्याची पाळी यावी हें चरित्रकाराच्या कलेला भूषणास्पद खास नव्हे. चरित्रकाराने निरनिराळ्या प्रसंगांचें वर्णन केल्यावर त्यांत चरित्रनायकाचा स्वभाव कसा प्रतीत होतो हें आपल्या शब्दांत सांगूं नये. कलेमध्ये सूचकतेला फार महत्त्व आहे. एखादी गोष्ट नुसती सूचित केल्याने जशी सुंदर दिसते तशी प्रत्यक्ष सांगितल्याने दिसत नाही. एखादी आठवण सांगून पुढे "यावरून....यांचा सत्यवक्तेपणा दिसून येतो." अशी मल्लिनाथी केल्याने रसभंग होतो. 'A biographer must never impose, but only expose'—'चरित्रकाराने मूल विषयाचें उद्घाटन, आविष्करण करावें, आपले निष्कर्ष वाचकावर लादूं नयेत,' हा स्ट्रॅचीने घालून दिलेला दण्डक प्रत्येक चरित्रकाराने लक्षांत ठेवला पाहिजे. वर्णनाच्या ओघांत मनुष्याच्या स्वभावावर आपोआप प्रकाश पडला पाहिजे. चरित्रकार प्रत्येक वेळीं आपलें भाष्य करूं लागला, की चरित्राचें नाटयात्मकस्वरूप नष्ट होतें आणि चरित्रनायकाशीं समरस होत असलेल्या वाचकाच्या डोळ्यासमोरचा चरित्रनायक मध्येच चित्रपटाची फिल्म तुटल्याप्रमाणे नाहीसा होऊन त्याच्याकडे बोट दाखवीत असलेल्या चरित्रकाराकडे त्याची दृष्टि वळते; आणि वाचक जणूं कांही त्रासाने म्हणतो 'अरे हो रे! तूं मध्येमध्ये बोलून रसभंग करूं नको—मला समजतं आहे सगळं!'

चरित्रांत अनावश्यक गोष्टींचा भरणा न करण्याची चरित्रकाराने काळजी घ्यावयास पाहिजे. चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचें यथायोग्य चित्र वठण्यासाठी कोणत्या गोष्टी चरित्रांत याव्या व कोणत्या येऊं नयेत याचें तारतम्य ठेवणें सोपें नाही. हॅवलॉक एलिस याने चरित्र-

कारांविरुद्ध हीच तक्रार केली आहे. तो म्हणतो की, "तुम्ही आम्हाला चरित्रनायकासंबंधीं आवश्यक अशा गोष्टी न सांगतां उगाच अनावश्यक गोष्टी भाराभर सांगत सुटतां. चरित्रनायकाच्या ज्या नातलगांचा किंवा मित्रांचा त्याच्या आयुष्यावर काडीइतका परिणाम झाला नाही, त्यांचीं लांबलचक वर्णनें तुम्ही देत बसतां; आणि ज्यांचा त्याच्या आयुष्यावर वास्तविक परिणाम झालेला असतो त्या त्याच्या आईबापांबद्दल तुम्ही फार थोडें सांगतां. त्याने आपल्या आयुष्यांत केलेल्या कार्यांचें तपशीलवार वर्णन देत बसतां, परंतु त्या कार्यांचें बीज कसें पेरलें गेलें व त्याचा विकास कसा झाला हें सांगण्याची तुम्हांला आवश्यकता वाटत नाही." याचीं कांही उदाहरणें मराठी चरित्रांतून देतों. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्रांत जीं त्यांच्या अनेक नातलगांचीं व मित्रांचीं लांबलचक वर्णनें आलीं आहेत तीं सर्वस्वीं अनावश्यक आहेत असें कोणी म्हणणार नाही. चरित्रकाराने स्वतः चरित्राच्या सुरवातीस त्याचें समर्थन दिलेंच आहे. "चरित्रनायकाच्या अंगच्या गुणावगुणांचा प्रादुर्भाव व विकास होण्यास ज्या कित्येक अनुकूल किंवा प्रतिकूल व्यक्ति व गोष्टी कारणीभूत झाल्या असतील त्यांचें यथास्थित विवेचन करणें हें चरित्रकारास अत्यंत जरूर आहे." असें ते म्हणतात. यावर आक्षेप घेण्याचें कांही कारण नाही. प्रश्न येतो तो 'यथास्थित'तेचें प्रमाण ठरविण्याच्या बाबतींत येतो. उदाहरणार्थ, त्या वेळच्या डेक्कन कॉलेजांतील अध्यापक वर्गाबद्दल जी भरपूर माहिती चरित्रकाराने दिली आहे, तिचा विष्णुशास्त्र्यांशीं कितपत संबंध येतो हा प्रश्न आहे. दुसरें, विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत 'निबंधमालें'तील उतारे किती द्यावे याला मर्यादा आहे की नाही? निबंधमालेमध्ये चिपळूणकरांनी आपलें सगळें हृदय ओतलें आहे व निबंधमालेचा आधार घेतल्याशिवाय चिपळूणकरांच्या जीवनाचें चित्र रंगविणें शक्य नाही हें खरें आहे. परंतु निबंधमालेचा आधार घेण्यांतही कलात्मकता

दाखविणें शक्य आहे. पानेंच्यापानें उतारे देण्यापेक्षा वर्णनाच्या ओघांत मधूनमधून निबंधमालेंतील कांही महत्त्वाचीं वाक्यें उद्धृत करून चिपळूणकरांचा दृष्टिकोन दाखविला असता तर तें जास्त कलात्मक दिसलें नसतें काय? तसेंच श्री. फाटक यांनी 'रानडेचरित्रां'त विष्णुशास्त्र्यांवर वेळीं अवेळीं जें तोंडसुख घेतलें आहे त्याचें समर्थन करणें कठीण आहे. दोन विद्वान माणसांत वाद होऊं शकतात आणि वादविषयाच्या महत्त्वानुसार त्याला चरित्रांत स्थान मिळावें याबद्दल वाद नाही. परंतु चरित्रनायकाचें समर्थन करून प्रतिपक्षावर तोंडसुख घेणें अथवा त्याची टवाळी करणें हें चरित्रकाराच्या कार्यकक्षेच्या बाहेर आहे. येथे पुन्हा सांगावेंसें वाटतें की चरित्रकार समर्थन करण्याच्या भानगडींत पडला की त्याच्या अंगीं तटस्थवृत्ति बाणली नाही असें निश्चित समजावें. The biographer must never impose, but only expose हें तत्त्व त्याला समजलें नाही! चरित्रकाराची भूमिका कांही अंशीं न्यायाधीशासारखी आहे. कांही अंशीं म्हणण्याचें कारण असें की न्यायाधीशाप्रमाणे अखेरीस निकाल देणें हें त्याचें कार्य नव्हे. ज्याप्रमाणे फौजदारी खटल्यांत दोन्ही बाजूंच्या वकिलांचें म्हणणें ऐकून घेतल्यावर न्यायाधीश खटल्याची गोळाबेरीज करून पंचापुढे मांडतो, त्याप्रमाणे चरित्रकाराने दोन्ही बाजूंचें थोडक्यांत निदर्शन करावें आणि निकाल देण्याचें काम वाचकांवर सोपवावें. जरी स्वतः निकाल देणें आवश्यक वाटलें, तरी तसें करतांना प्रतिपक्षाची टर उडविण्याचें कांही कारण नाही. अशा अनावश्यक गोष्टी चरित्रकाराने शक्य तों टाळल्या पाहिजेत. हीं चरित्रावरचीं बांडगुळें होत; आणि बांडगुळांनी कधी कशाचें सौंदर्य वाढलें आहे?

पत्रें, आठवणी व दैनंदिन्या यांचा कलात्मक पद्धतीने उपयोग करणें हें चरित्रलेखनाच्या कलेचें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. 'स्वभाव'-वर्णनासंबंधीं मागे जें सांगितलें आहे तें या बाबतींतही लक्षांत ठेवण्या-

सारखें आहे. स्वभाववर्णनाप्रमाणे आठवणी शेवटीं एका प्रकरणांत दिलेल्या पुष्कळ चरित्रांत आढळतात. श्री. केळकर यांनी 'टिळक चरित्रां'त कांही प्रकरणांच्या शेवटीं परिशिष्ट म्हणून टिळकांच्या जीवन-चरित्रासंबंधीं बरींचशीं पत्रें छापलीं आहेत. चरित्राचें साधन म्हणून दुसऱ्याला तीं उपयोगी पडण्यासारखीं असलीं तरी टिळकांचें चरित्र लिहीत असतांना त्यांना देण्यांत आलेलें स्थान अयोग्य होय. शिवाय त्यांतील कांही पत्रांचा टिळकांच्या जीवनाशीं फार थोडा संबंध आहे. त्याचप्रमाणे कांही प्रकरणांच्या शेवटीं परिशिष्टांत जी माहिती दिली आहे तिचा उपयोग प्रत्यक्ष चरित्रांत करावयास पाहिजे होता. उदा-हरणार्थ, टिळकांच्या वेळच्या डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे संवाद, आगरकरांच्या 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस' या लेखांतील खटल्याचें वर्णन, इत्यादिकांचा उपयोग वर्णनाच्या ओघामध्ये केला असता तर तें जास्त कलात्मक दिसलें असतें. या सर्व गोष्टी—पत्रें, आठवणी, दैनंदिनींतील उतारे—कथेच्या ओघांत एकजीव झाल्या पाहिजेत. (साधनें हातीं आल्यावर त्यांची कुशलतेने योजना करण्यांत खरी कला आहे.) स्ट्रॅचीच्या शब्दांचा अनुवाद करावयाचा म्हणजे, मीठ, मिरची, मसाला व आंब्याच्या फोडी—एवढ्या वस्तु एका ठिकाणीं ठेवल्याने लोणचें तयार होणार नाही, तर त्या एकजीव व्हाव्या लागतात, त्याप्रमाणे नुसतीं निरनिराळ्या प्रकारचीं साधनें एका ठिकाणीं ठेवल्याने इतिहास ( किंवा चरित्र ) होत नाही, तर तीं कथेंत एकजीव व्हावीं लागतात. स्वत: स्ट्रॅची याने या साधनांचा कुशलतेने उपयोग कसा केला आहे हें पाहावयाचें असल्यास 'व्हिक्टोरिया' चरित्रांतील कोणतेंही पान उघडून वाचूं लागावें. एखाद्या प्रसंगाचें वर्णन करतांना पत्रांतील, आठवणींतील किंवा दैनंदिनींतील एखादा वाक्यखंड मध्येच अवतरणचिन्हांत ठेवून दिलेला आढळेल; कधी मध्येच पत्रांतील एखादें वाक्य घेऊन आपल्या वाक्याला जोडून दिलेलें सापडेल; तर

कधी तो वर्णनाच्या ओघांत मध्येच एक सुंदर आठवण सोडून देऊन असा विनोद निर्माण करील की गंभीर वर्णनाने मनावर बसलेला ताण झटकन सैल पडून वाचकाच्या तोंडून 'वाहवा!' असे उद्गार आपोआप बाहेर पडावे! कांही उदाहरणें दिल्याशिवाय राहवत नाही. अर्थात् तीं जशींच्या तशीं मूळ इंग्रजींतच दिल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यांचें भाषांतर होणें अशक्य आहे हें रसिकांच्या ध्यानांत येईल.

व्हिक्टोरिया राणी लहान असतांना तिचा भावी पति प्रिन्स आल्बर्ट हा आपले वडील व इतर भावंडें यांच्यासह तिच्या घरीं पाहुणा म्हणून आला होता. ती त्यांची पहिली भेट. सगळींच लहान मुलें, एका ठिकाणीं खेळायचीं, हिंडायचीं, फिरायचीं, असें चाले. कांही दिवसांनंतर पाहुणे परत जावयास निघाले तेव्हाचें वर्णन पहा:—

When, after a stay of three weeks, the time came for the young men and their father to return to Germany, the moment of parting was a melancholy one. 'It was our last happy break-fast with this dear Uncle and these dearest cousins whom I do love so very very dearly ......They are very clever, naturally clever, particularly Albert, who is the most reflecting......Dearly as I love Ferdinand and also good Augustus, I love Earnest and Albert more than them, oh yes, much more......'

या ठिकाणीं पहिल्याच भेटींत तिला आल्बर्टविषयीं कसें आकर्षण वाटूं लागलें होतें, हें आपण न सांगतां तिच्याच शब्दांत सांगितलें आहे. पुढे आल्बर्टशीं लग्न झाल्यावर व स्वतः इंग्लंडची राणी झाल्यावर लहान सहान बाबतींत नवराबायकोंचे कधीकधी खटके उडत. आल्बर्टची परिस्थिति चमत्कारिक होती. तो जन्माने जर्मन होता, राणीचा पति असून राजा नव्हता, त्यामुळे इंग्लंडच्या राजकारणांत त्याला भाग घेतां येत नसे व त्याने भाग घेतलेला इंग्रज रक्ताच्या मुख्य प्रधानाला—इतकेंच नव्हे प्रत्यक्ष राणीला—आवडत नसे. याचें आल्बर्टला नेहमी वैषम्य वाटे.

स्ट्रॅचीने एका प्रसिद्ध आठवणीचा उपयोग कसा करून घेतला आहे, तें पहा.

"It was only natural that in so peculiar a situation, in which the elements of power, passion, and pride were so strangely apportioned, there should have been occasionally something more than more irritation—a struggle of angry wills......Her arbitrary temper flashed out. Her vitality, her obstinacy, her overwhelming sense of her own position, might well have beaten down before them his superiorities and his rights. (But) she was madly in love (with him)......when, in wrath, the Prince one day had locked himself into his room, Victoria, no less furious, knocked on the door to be admitted. 'Who is there?' he asked. 'The Queen of England', was the answer. He did not move, and again there was a hail of knocks. The question and the answer were repeated many times; but at last there was a pause, and then a gentler knocking. 'Who is there?' came once more the relentless question. But this time the reply was different. 'Your wife, Albert.' And the door was immediately opened.

यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही. एवढ्या एका आठवणीने व्हिक्टोरिया व आल्बर्ट यांचे स्वभाव, व त्यांचे परस्परसंबंध यांवर जेवढा प्रकाश पडतो तेवढा पानेंच्या पानें वर्णन केल्याने पडणार नाही. स्ट्रॅची स्वतःही अशा आठवणींवर भाष्य करीत बसत नाही. सूचकता हा त्याच्या लेखनाचा महत्त्वाचा गुण होय. व्हिक्टोरिया राणीच्या लहरी, हट्टी स्वभावाचें वर्णन करीत बसण्यापेक्षा तो एकदोन सुंदर आठवणी मध्येच ठेवून देतो. एकदोन उदाहरणें देतो. सगळा संदर्भ देण्याची आवश्यकता नाही. पुढील एक दोन वाक्यांतच त्याची कल्पना येऊं शकेल.

It was in vain that Her Majesty's constitutional advisors reminded her of the principle of English law

which lays down that no man can be found guilty of a crime unless he be proved to have had a criminal intention. Victoria was quite unconvinced. 'If that is the law,' she said, 'the law must be altered'; and altered it was. In 1883 an Act was passed changing the form of the verdict......and the confusing anomaly remains upon the Statute Book to this day.

आल्बर्टवर तिचें निस्सीम प्रेम होतें. अल्पवयांत तो मृत्यु पावल्यामुळे तिला वेडयासारखें झालें होतें. त्याची स्मृति कायम राहावी म्हणून तिने अनेक गोष्टी केल्या. त्यांत कांही गोष्टी तर अगदी विक्षिप्तपणाच्या असत. आल्बर्ट ज्या खोलींत बसत उठत असे त्या खोलींतील सामान त्याच्या जिवंतपणीं जसें असे तसें ठेवलें पाहिजे अशी तिची आज्ञा होती. स्ट्रॅची म्हणतो:

Within those precincts everything remained as it had been at the prince's death; but the mysterious preoccupation of Victoria had commanded that her husband's clothing should be laid afresh, every evening upon the bed, and that, each evening, the water should be set ready in the basin, as if he were still alive; and this incredible rite was performed with scrupulous regularity for nearly forty years.

नर्मविनोदाचा एक मासला देतों. व्हिक्टोरिया राणीच्या आईला मुख्य प्रधान लॉर्ड मेलबोर्न, त्याचप्रमाणे व्हिक्टोरियाची शिक्षिका लेह्झेन, यांच्याबद्दल अत्यंत तिटकारा वाटत असे. त्यांचें तोंड पाहण्याची तिची इच्छा नसे; परंतु एकदा तसा प्रसंग आला. तिला तो टाळावयाचा होता. ड्यूक ऑफ वेलिंग्टन तिची समजूत घालूं लागला. त्या वेळचा त्यांचा संवाद मजेदार आहे.

'What am I to do if Lord Melbourne comes up to me?' 'Do, madam? Why, receive him with civility.' Well she would make an effort......'But what am I to do if

Victoria asks me to shake hands with Lehzen ?' 'Do madam ? Why, take her in your arms and kiss her.' '*What* ! ' The Duchess cristled in every feather and then, she burst into a hearty laugh. 'No, madam,' said the Duke, laughing too. 'I don't mean your are to take *Lehzen* in your arms and kiss *her*, but the Queen.'

अशा विनोदपूर्ण आठवणींचा उपयोग आंद्रे मॉर्वा यानेही फार कुशलतेने केला आहे. डिझराएलीच्या चरित्रांत असे एकदोन सुंदर मासले आहेत. डिझराएली हा मुख्य प्रधान असतांना रशियाशीं युद्ध पुकारण्याचा प्रश्न आला. इंग्लंडने रशियाला युद्धाची नुसती धमकी द्यावी, परंतु प्रत्यक्ष युद्ध करूं नये असा डिझराएलीचा डाव होता. इंग्लंडच्या लोकांना काय होणार हें जाणण्याची उत्कंठा लागून राहिली होती. युद्ध सुरू करण्यास मुख्यप्रधान कसली वाट पाहत आहे हेंच लोकांना कळेना. स्वत: व्हिक्टोरिया राणीची शक्य तितक्या लवकर युद्ध करण्याची इच्छा होती. एकदा डिझराएली तिच्याकडे जेवायला गेला असतांना जेवतां जेवतां राजपुत्रींपैकी एक त्याला म्हणाली "I cannot imagine what you are waiting for !" डिझराएलीने शांतपणे उत्तर दिलें "Potatoes at this moment, Madam" तसेंच डिझराएली व ग्लॅडस्टन ह्या दोघां प्रतिस्पर्ध्यांबद्दल नेहमी लोकांमध्ये तुलना चाले, व लोक बहुतकरून डिझराएलीच्या बाजूने बोलत, त्यासंबंधीं आंद्रे मॉर्वा म्हणतो :

In almost all classes of society, women were for him. At a supper party of 'Gaiety Girls' the question was asked, "*Which* would you like to marry, Gladstone or Disraeli ? " All these pretty girls chose Disraeli; only one said "Gladstone," and the others booed her. "*Wait* a minute," she said, " I would like to marry Gladstone and get Disraeli to run away with me, just to see Gladstone's face ! "

On the next day she said proudly to one of her friends, "Dizzy came staight home; I had got a pie ready and a bottle of champagne. He ate half of the pie and drank all the champagne, and he said to me, 'My dear, you are more of a mistress to me than a wife.'" She was then sevnty seven.

यांतील She was then seventy-seven या एका वाक्यांत किती अर्थ भरला आहे! ही पत्नी वारली त्या वेळीं त्याला अत्यंत दुःख झालें. तिच्या वडिलार्जित घरांत तो इतके दिवस राहत असे. तिच्या मृत्यूनंतर तें घर सोडून त्याला लंडनमधील एका होटेलमध्ये राहण्यास जावें लागलें. पहिल्याच दिवशीं पार्लमेंटमधून घरीं यावयास निघाला त्यावेळची आठवण देतांना मॉर्वा म्हणतो.—

Never again would he know the kindliness of a true shelter. The lonliness of the hotel, . ...alive only with stupid furniture, dreary meals and unknown neighbours —such would be his London life henceforth. When he called to his coachman "Home" he remembered that he no longer had a home and his eyes filled with tears.

अशीं उदाहरणें जितकीं द्यावीं तितकीं थोडींच होतील. परंतु त्यांनी जास्त जागा अडविणें योग्य नाही. आठवणींचा कसा व कुठे उपयोग करावा हें दाखविण्याकरितां इतकीं उदाहरणें देण्याचीही आवश्यकता नव्हती, परंतु कांही उदाहरणें देण्याचा मोह अनावर झाला. तीं कंटाळवाणीं होणार नाहींत या आशेनेच तो मोह आवरण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. असो.

आठवणी, पत्रें, वगैरेमध्ये ज्या कांही बारीकसारीक गोष्टी—चरित्रकाराच्या सवयी, लकबी, इत्यादि—आढळतात त्यांचा चरित्रांत फार उपयोग होतो. त्याने मनुष्याच्या चित्राला निश्चित आकार येतो. त्यांचा शक्य तितका उपयोग करून घेतला पाहिजे. सर्वांनी लाडावून ठेवलेली व्हिक्टोरिया लहानपणीं सुद्धा अशी हट्टी आणि एककल्ली असे की

शिकावयास बसावयाचें नाही म्हटलें की नाहीच बसायचें. याचें वर्णन करतांना स्ट्रॅचीने असें म्हटलें आहे की ती अशा वेळीं रागावली म्हणजे जोराने जमिनीवर पाय आपटून सर्वांना गप्प बसवावयाची, आणि कोणाचें ऐकावयाची नाही! (She would fly into a violent passion, stamp her little foot, and set every one at defiance.) या वर्णनाने चित्र किती स्पष्ट होतें!

पृष्ठ ८८ च्या सुरवातीस पुढील मजकूर जास्त वाचावा.

डिझ्राएलची पत्नी त्याच्यापेक्षा तेरा वर्षांनी मोठी होती. दोघांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम होतें, व तें अगदी म्हातारपणींही तसेंच कायम होतें. हें आंद्रे मॉर्वा याने कसें मजेदार रीतीने सूचित केलें आहे तें पहा. पार्लमेंटमध्ये एका प्रश्नावर विलक्षण परिणामकारक भाषण करून डिझ्राएली घरीं यावयास निघाला असतां कांही मित्रांनी त्याला जेवायला क्लबमध्ये थांबावयाचा आग्रह केला. परंतु घरीं पत्नी वाट पहात असेल असा विचार करून त्याने तें आमंत्रण नाकारलें व तो ताबडतोब घरीं निघून आला.

रस्त्यावर दोन इसम उभे असून त्यांपैकी एक दिव्याच्या खांबाला हाताने कवटाळून मोठमोठ्याने 'हा: हा: हा: हा:' करून हसत आहे असें त्यांच्या नजरेस पडे. तो इसम म्हणजेच डॉ. जॉनसन! जॉनसनचा आडदांडपणा, बेफिकिरी, या गुणांचें निराळें वर्णन देण्याची आवश्यकता नाही. कैदेंत विषाचा पेला पिण्यापूर्वी सॉक्रेटिस सहज आपला पाय खाजवीत होता, हें वर्णन किती अर्थपूर्ण आहे! 'मी पूर्ण निरपराधी आहें, मला मरणाची शिक्षा देणारे अज्ञानी आहेत, मला मरणाची भीति वाटत नाही',—असें जणूं कांही तो म्हणत आहे, असें त्या क्षुल्लक

दिसणाऱ्या क्रियेने ध्वनित होतें. आपल्या पत्नीच्या बेइमानीपणाची बातमी ऐकल्याबरोबर नेपोलियन अतिशय क्षुब्ध होऊन इकडून तिकडे जोराने येरझारा घालूं लागला व मधूनमधून हाताची मूठ कपाळावर आपटून घेऊं लागला, या लहानशा वर्णनाने नेपोलियनच्या त्या वेळच्या चित्रामध्ये किती रंग भरला आहे! या क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टी कित्येक वेळां मोठयामोठया भाषणांपेक्षा मनुष्याच्या स्वभावावर जास्त प्रकाश टाकूं शकतात. आणि हाच चरित्राचा खरा हेतु आहे. Biography should be illuminating rather than informative. 'चरित्राचा हेतु नुसती माहिती पुरविण्याचा नसून मनुष्याच्या व्यक्तित्वावर प्रकाश पाडण्याचा आहे' असें स्ट्रॅचीचें म्हणणें असे. कित्येक वेळां भरपूर माहितीने भरलेल्या चरित्रापेक्षा चरित्रनायकाच्या आयुष्यांतील एका विशिष्ट भागाचेंच कलात्मक वर्णन केलें असतां त्याचें व्यक्तित्व जास्त स्पष्टपणें उमटूं शकेल. हॅरोल्ड निकोल्सन् याने बायरन कवीच्या आयुष्यांतील शेवटच्या कांही दिवसांचें चित्र 'Byron, the last journey' या नांवाच्या पुस्तकांत काढलें आहे. तें या दृष्टीने पाहण्यासारखें आहे.

भाषाशैली, वर्णनशैली इत्यादिकांना इतर ललित प्रकारांमध्ये जितकें महत्त्व आहे तितकेंच चरित्रलेखनांत आहे. मागे सांगितल्याप्रमाणे केवळ माहिती पुरविणें हा चरित्रलेखनाचा हेतु नसून मनुष्याच्या व्यक्तित्वाचें कलात्मक चित्र रंगविणें हा आहे हें एकदा मान्य केल्यावर भाषाशैली व कलात्मक वर्णनें यांचें महत्त्व निराळें सांगावयास नको. स्ट्रॅची, मॉर्वा किंवा लुडविग् यांनी लिहिलेल्या चरित्रांत कोणता महत्त्वाचा विशेष असेल तर तो हाच आहे. विशेषतः स्ट्रॅची आणि मॉर्वा यांची सहज, खेळकर, अशी भाषापद्धति अनुकरणीय आहे. ते जणू कांही आपल्यासमोर आपल्याशीं गप्पा मारतां मारतां मनुष्याचें वर्णन करीत असावे असा भास होतो, इतकी सहजता त्यांच्या कथनपद्धतींत असते,

स्ट्रॅचीच्या 'व्हिक्टोरिया चरित्रां'तील एकच लहानसा उतारा पहा.

Warm-hearted, responsive, she loved her dear Lehzen, and she loved her dear Feodora, and her dear Victoria, and her dear Madam de Späth. And her dear mamma......of course she loved her too; it was her duty; and yet—she could not tell why it was—she was always happier when she was staying with her Uncle Leopold at Claremont.

व्हिक्टोरियाच्या लहानपणचें हें वर्णन आहे. तिची आई तिला अत्यंत कडक शिस्तीने वागवीत असे—इतकी की त्या लहानशा मुलीला आई नकोशी वाटावी! तिला तिची शिक्षिका, तिच्या मैत्रिणी, सगळ्या हव्याशा वाटत, पण आई डोळ्यांसमोर नको. त्यापेक्षा चुलत्याकडे राहणेंच तिला जास्त आवडे. परंतु आईवर प्रेम करणें हें मुलीचें कर्तव्य आहे अशी तिला शिकवण देण्यांत आली होती, तेव्हा तिच्यावर प्रेम नाही असें म्हणून कसें चालेल? या भावनांचें चित्र एका वाक्यांत किती सुंदर काढलें आहे! वाक्यांत मधूनमधून घातलेले विराम किती अर्थपूर्ण आहेत! त्याचप्रमाणे शेलेच्या चरित्रांतील जें शेवटचें दृश्य आंद्रे मॉर्वा याने रंगविलें आहे तें अत्यंत काव्यमय आहे, स्पेझियाच्या उपसागरांत बुडालेल्या शेलेचें छिन्नविच्छिन्न झालेलें प्रेत; त्याच्या एका खिशांतील कीट्सच्या कवितांचें पुस्तक—बोट बुडूं लागण्याचें चिन्ह दिसूं लागल्याबरोबर त्याने तें उलटें दुमडून तसेंच घाईघाईने खिशांत कोंबलें होतें—व दुसऱ्या खिशांतील सोफोक्लिसच्या नाटकांचें पुस्तक; बायरन, ट्रॅलॉनी इत्यादि शेलेच्या मित्रांनी केलेला प्रेताचा अग्निसंस्कार; त्या वेळीं पडलेल्या कडक उन्हामुळे वातावरणांत उत्पन्न झालेला कंप; इत्यादिकांचें वर्णन मॉर्वा याने इतकें रसपूर्ण केलें आहे की जणूं कांही आपण स्वतः शेलेच्या प्रेताजवळ उभे आहों व त्या चितेची झळ आपणास लागत आहे असा भास व्हावा. प्रत्यक्ष

चित्र डोळ्यांसमोर उभें करण्यासारखें हुबेहूब वर्णन करण्यांत मॉर्वा किंवा लुडविग यांच्यापेक्षा स्ट्रॅची कांकणभर श्रेष्ठ ठरेल. बारीकसारीक माहिती मिळविण्याच्या त्याच्या परिश्रमाचें कौतुक वाटतें. 'एमिनंट व्हिक्टोरियन्स' मधील फ्लॉरेन्स नाइटिंगेल हिच्या चरित्रांत त्या वेळचा युद्धमंत्री सिडने हरबर्ट याच्या मरणाच्या वेळचें चित्र काढतांना त्याचे शेवटचे शब्दही त्याने नमूद केले आहेत. तसेंच व्हिक्टोरियाच्या चरित्रांत आल्बर्टच्या मृत्यूच्या वेळचा प्रसंग असाच कौशल्याने रंगविला आहे. त्या त्या प्रसंगाचें वातावरण उभें करण्यांत त्याचा हातखंडा आहे. बारीकसारीक तपशिलाच्या साहाय्याने चित्रांत जिवंतपणा आणण्याचें कौशल्य त्याच्या अंगीं आहे. एक उदाहरण दिल्याशिवाय राहवत नाही. इंग्लंडचा राजा चवथा वुइल्यम हा १८३७ सालीं वारला व त्याची पुतणी व्हिक्टोरिया —ही त्या वेळीं अठरा वर्षांची होती—इंग्लंडची राणी झाली. या संबंधीं त्याच दिवशीं औपचारिक घोषणा करण्यासाठी भरविण्यांत आलेल्या दरबाराचें जें वर्णन स्ट्रॅचीने केलें आहे त्यांतील व्हिक्टोरियाचें चित्र पहा:

The great assembly of lords and notables, bishops, generals, and Ministers of State saw the doors thrown open and a very short, very slim girl in deep plain mourning come into the room alone and move forward to her seat with extraordinary dignity and grace; they saw a countenance, not beautiful but prepossessing—fair hair, blue prominent eyes, a small curved nose, an open mouth revealing the upper teeth, a tiny chin, a clear complexion and over all, the strangely mingled signs of innocence, of gaiety, of youth, and of composure; they heard a high unwavering voice reading aloud with perfect clarity; and then the ceremony over, they saw the small figure rise and with the same consummate grace, the same amazing

dignity, pass out from among them, as she had come in, alone.

हें वर्णन वाचल्यानंतर जणूं कांही चित्रपटाच्या पडद्यावर हा देखावा आपण पाहत आहों असा भास होतो. मनुष्याची चेहरेपट्टी व शरीरावयव यांचा बारीक अभ्यास करून त्यांच्या वर्णनाने चित्रांत जिवंतपणा आणण्याचें त्याचें कौशल्य या ठिकाणीं दृष्टीस पडतें.`बुइल्यम पिट् (थोरला) याची नात लेडी हेस्टर स्टॅन्होप हिचें चित्र काढतांना स्ट्रॅचीं तिच्या नाकावर घसरला आहे. तिच्या नाकाचें वर्णन करतांकरतां अर्धवट थट्टेने त्या नाकाची पूर्वपरंपरा व विकास यांची त्याने मीमांसा केली आहे. तिचा आजोबा थोरला पिट्, चुलता धाकटा पिट् यांच्या नाकाच्या आकारांतील भेद दाखवून पुढच्या पिढींत नाकाला कसा आकार आला याचें वर्णन केलें आहे व त्यांतून प्रत्येकाचा स्वभाव कसा प्रकट होत होता हें दाखविलें आहे. थोरल्या पिट्चें नाक गरुडा-सारखें चोचदार, तर नातीच्या नाकाचा शेंडा उलट वरती आलेला! एवढी मीमांसा करून तो त्या नाकाचा पिच्छा सोडीत नाही. शेवटीं लेडी स्टॅनहोप हिच्या मरणाच्या वेळचें वर्णन करतांना तो म्हणतो: She was lying back in her bed--inexplicable, grand, preposterous, with her nose in the air. त्या नाकाचें त्याने जणूं कांही प्रतीकच करून टाकिलें आहे!

शेले आणि डिझ्राएली यांच्या आयुष्यांत अशीच प्रतीकें (motifs) आहेत. शेलेच्या आयुष्यांत पाण्याचें प्रतीक आहे.याचा अर्थ असा की त्याचें आयुष्य पाण्याशीं इतकें संबद्ध झालेलें आहे की त्याला पाण्यांत बुडून आलेला मृत्यु हा ईश्वरी योजनेचा जणूं कांही भाग असावा असा भास व्हावा. लहानपणीं कागदाच्या होडया करून खेळला तो शेजारच्या ओढयांत; ईटनच्या शाळेंत असतांना आवडतें विश्रांतिस्थान म्हणजे शेजा-रची नदी; पहिली पत्नी हेरियट हिला मृत्यु झाला तो पाण्यांत बुडून; पुढे

दुसऱ्या पत्नीबरोबर युरोपचा प्रवास केला तो बराचसा पाण्यांत; आणि शेवटीं स्वतःला मृत्यु आला तो पाण्यांत;—अशा रीतीने अनुप्रासांत पुनः पुन: येणाऱ्या अक्षराप्रमाणे आयुष्यांत ठिकठिकाणीं पाणी प्रामुख्याने डोकावतें. डिझराएलीच्या जीवनांत असेंच फुलांचें प्रतीक आहे. त्याला फुलांची–विशेषत: प्रिमरोझ फुलांची–मनस्वी आवड होती. आधी आधी बहिणीकडून आलेलीं फुलें; पुढे पत्नीने बागेंत लावलेलीं व रोज सकाळीं पुष्पपात्रांत भरून ठेवलेलीं फुलें; मुख्य प्रधान झाल्यावर व्हिक्टोरिया राणीकडून येणारीं फुलें; शेवटीं मृत्यूनंतर त्याची फुलांची आवड लक्षांत घेऊन राणीने समाधीवर वाहिलेलीं प्रिमरोझ फुलें; आणि पुढे त्याच्या अनुयायांनी त्याच्या स्मृत्यर्थ काढलेल्या संस्थेला दिलेल्या 'प्रिमरोझ सोसायटी' ह्या नांवांतही फुलें;—डिझराएली आणि फुलें यांचें जणू कांही लग्नच लागलें होतें असें वाटतें. पाणी व फुलें हीं अनुक्रमें शेले व डिझराएली यांच्या आयुष्याचीं अशा रीतीने प्रतीकें होऊन बसलीं आहेत!

चरित्र कलात्मक करण्याच्या या अशा पद्धति आहेत. याविरुद्ध आक्षेप घेणारेही पुष्कळ आहेत. त्यांचें म्हणणें असें की स्ट्रॅचीप्रभृति चरित्रकारांनी चरित्राची कादंबरी करण्याच्या भरांत सत्याची चाड जितकी बाळगावयास पाहिजे होती तितकी बाळगली नाही. परंतु या आक्षेपांत तथ्य नाही. प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींच्या बाबतींत या चरित्रकारांनी भलतें स्वातंत्र्य कधीच घेतलें नाही. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचें वर्णन करतांना स्ट्रॅची याने विश्वसनीय कागदपत्रांचा आधार घेतला आहे हें 'व्हिक्टोरिया' चरित्राच्या प्रत्येक पानावर दिलेल्या टीपांवरून ध्यानांत येईल. स्ट्रॅचीच्या 'व्हिक्टोरिया' चरित्रांत एकच स्थान असें आहे की ज्या ठिकाणीं त्याला आधारभूत कागदपत्रांचा आधार मिळणेंच शक्य नव्हतें आणि त्याने आपल्या कल्पनेचा उपयोग केला आहे. व्हिक्टोरिया राणीच्या मृत्यूच्या वेळच्या प्रसंगाचें वर्णन करीत असतांना, अर्धवट बेशुद्धावस्थेंतही तिच्या मनांत कोणते विचार

चालले असावेत याचें कल्पनेने वर्णन त्याने केलें आहे. मरतां मरतां आपल्या सबंध आयुष्याचा चित्रपट तिच्या डोळयांसमोरून कसा सरकत गेला असेल, म्हातारपणापासून मागे मागे जात जात बालपणापर्यंत तिने आपल्या आयुष्याचें कसें सिंहावलोकन केलें असेल, याचें इतकें सुंदर वर्णन त्या ठिकाणीं केलें आहे की तेवढा भाग म्हणजे एक उत्कृष्ट गद्यकाव्य आहे! याला जरी कागदपत्रांचा आधार मिळणें शक्य नसलें तरी तें सबंध चित्राशीं विसंगत नसल्यामुळे क्षम्य समजावयास कांहीच हरकत नाही. तेवढें स्वातंत्र्य चरित्रकाराला दिलें पाहिजे. अर्थात ज्या ठिकाणीं सत्याचा निर्णय करण्यास वाव आहे त्या ठिकाणीं कल्पनेचा उपयोग करणें योग्य ठरणार नाही हें उघड आहे. चरित्रांत कल्पनेला स्थान नसलें तरी क्वचित् प्रसंगीं, सत्याला बाध न येतां, कलेच्या दृष्टीने आवश्यक वाटत असल्यास कल्पनेला थोडा फार वाव देण्यास प्रत्यवाय नसावा असें आमचें मत आहे. अर्थात कल्पनेचा उपयोग करावयाचाच झाला तर अत्यंत जपून केला पाहिजे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

## ५

एथवर चरित्रलेखनाच्या निरनिराळया बाजूंचा विचार केला. आत्मचरित्र हा चरित्रवाङ्मयाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. त्याचा विचार स्वतंत्र प्रकरणांत करूं. चरित्रवाङ्मयाचा दुसरा एक प्रकार म्हणजे स्वभावचित्रें. त्याचा येथे थोडासा विचार करूं. स्वभावचित्रें म्हणजे चरित्राची छोटी आवृत्ति असें म्हणावयास हरकत नाही. सामान्यतः चरित्रलेखनाच्या बाबतींत जे दण्डक मागे दर्शविले आहेत तेच या प्रकाराला लागू पडतात. तेव्हा त्यांची पुनरावृत्ति करण्याची आवश्यकता नाही. दोहोंमध्ये महत्त्वाचा फरक आहे तो आकाराचा. आणि आकाराचा फरक असला म्हणजे थोडासा तंत्रदृष्टयाही फरक आलाच. रंगपट मोठा असला म्हणजे चित्रकाराला बारीकसारीक

तपशील दाखविण्यास जितका वाव मिळतो तितका तो लहान असल्यास मिळत नाही. तेथें त्यास सूचकतेचा उपयोग जास्त करावा लागतो. या दृष्टीने लहान चित्र रंगविण्यांत जास्त कला आहे असें म्हणतां येईल. चरित्रांत व्यक्तीचें चित्र रंगवावयाचें असतें; स्वभावचित्रांतही चित्रच रंगवावयाचें असतें. परंतु पहिल्याचा रंगपट फार मोठा, दुसऱ्याचा जवळजवळ त्याचा शंभरावा भाग. तीनचारशें पानांत व्यक्तीचें जें चित्र चरित्रकार रंगवितो, तेंच चित्र स्वभावचित्रकार तीनचार पानांत रंगवितो. या ठिकाणीं कादंबरी व लघुकथा यांच्या तंत्राची तुलना डोळ्यासमोर आल्यास आश्चर्य नाही. परंतु कादंबरी व लघुकथा यांच्यांत जितका फरक आहे तितका चरित्र आणि स्वभावचित्र यांच्यांत नाही. कादंबरींत एक किंवा अनेक व्यक्तींच्या जीवनाचा संबंध किंवा बराच मोठा इतिहास येतो; लघुकथेंत त्यांच्या जीवनांतील एखादा प्रसंग रंगविलेला असतो, एखाद्या लहानशा बाजूवर प्रकाश पाडलेला असतो. उलट चरित्रांत ज्याप्रमाणे मनुष्याचें सबंध व्यक्तित्व रंगविलेलें असतें त्याप्रमाणे स्वभावचित्रांतही त्याच्या व्यक्तित्वाच्या सर्व बाजूंवर किंवा क्वचित् प्रसंगीं एखाद्या प्रमुख स्वभावविशेषावर किंवा त्याच्या प्रमुख कार्यावर प्रकाश पाडलेला असतो. एवढेंच की चरित्रांत हीच गोष्ट जितकी तपशीलवार करितां येते तितकी स्वभावचित्रांत करतां येत नाही. शिवाय स्वभावचित्र या नांवावरूनच असा बोध होतो की त्यांत स्वभावरेखनाला प्राधान्य असतें. स्वभावाच्या निरनिराळ्या पैलूंवर प्रकाश टाकणें हें स्वभावचित्रकाराचें प्रमुख कार्य होय. प्रत्यक्ष जीवनासंबंधीं तपशीलवार माहिती देणें एवढ्या थोड्या अवकाशांत त्याला शक्य नसतें.

चरित्रलेखनाच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणे स्ट्रॅची, मोर्वा व लुडविग यांचीं नांवें जगप्रसिद्धच आहेत, त्याप्रमाणे निदान इंग्रजी वाङ्मयांत तरी स्वभावचित्रें रंगविण्यांत ए. जी. गार्डिनर याचा हात धरणारा लेखक

क्वचित सापडेल. '*Pillars of Society*', '*Prophets, Priests and Kings*' आणि '*Certain people of importance*' हे त्याचे स्वभावचित्रांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या तीन ग्रंथांत मिळून शंभरावर प्रमुख व्यक्तींचीं स्वभावचित्रें त्याने रंगविलीं आहेत. चरित्र लिहिण्याच्या कामीं ज्या साधनांची आवश्यकता असते तीं सर्व साधनें स्वभावचित्र रंगविण्याकरतां अगदी अवश्य नसलीं, तरी बरींच उपयोगी पडतात; किंबहुना जितकीं साधनें अधिक तितकें स्वभावचित्र सुंदर रंगवितां येईल. चरित्र लिहिण्याकरितां जशी परिश्रमाची आवश्यकता असते तशीच स्वभावचित्र रंगवितांना असते, यावरून शंभरावर स्वभावचित्रें रंगविण्याऱ्या गार्डिनरला किती परिश्रम करावे लागले असतील याची कल्पना येऊं शकते. शिवाय त्याने रंगविलेल्या स्वभावचित्रांच्या विषयांची विविधता पाहिली म्हणजे त्याच्या माहितीच्या चौरसपणाचें कौतुक वाटतें. त्यांत सातवा एडवर्ड, कैसर यांसारखे राजे आहेत; बर्नार्ड शॉ, चेस्टर्टन् , आर्नोल्ड बेनेट, यांसारखे लेखक आहेत; रॅम्से मॅक्डोनल्ड, स्टॅन्ले बाल्डविन, विन्स्टन चर्चिल, काल्व्हिन कूलिज, बॉल्फोर, कर्झन, यांसारखे राजकारणी पुरुष आहेत; चार्ली चॅपलीन, फोर्ब्स-रॉबर्टसन, सिबिल थॉर्नडाइक यांसारख्या नटनटी आहेत; फार काय जॅक हॉब्स, रणजितसिंह यांसारखे क्रिकेटपटुही आहेत. यांतील प्रत्येक मनुष्याचें चारपांच पानांत जें चित्र रंगविलें आहे, त्यांत त्याच्या त्याच्या स्वभावाचें व प्रमुख कार्याचें इतकें मार्मिक चित्रण केलें आहे की या लेखकाला माहिती तरी किती किती विषयांची आहे असें वाटून वाचक आश्चर्यानें थक्क होतो! चित्र रंगविण्याची पद्धतही अत्यंत मार्मिक आणि कलात्मक आहे. चित्राची सुरवात अशा एखाद्या मजेदार आठवणीने करील की तेवढ्याने मनुष्याच्या स्वभावाचा प्रमुख विशेष प्रकट व्हावा. बर्नार्ड शॉच्या स्वभावचित्राची सुरवात पहा : I once had the duty of

presiding at a gathering assembled to hear an address by Mr. Bernard Shaw. "What is the title of your lecture!" I asked. "It hasn't got one", he replied. "Tell them it will be announced at the close." एका फटकाऱ्यासरशीं शॉच्या विक्षिप्तपणावर प्रकाश पडला! पुढे लागलीच दाखविलें आहे की चाळीस पंचेचाळीस मिनिटें आपल्या पद्धतीप्रमाणे विनोद, उपहास यांचा पाऊस पाडल्यानंतर आधी सांगितल्याप्रमाणे व्याख्यानाच्या विषयाबद्दल एक अक्षर न बोलतां लागलीच छत्री खाकोटीस मारून व्याख्याते जे बाहेर निसटले ते ट्यूब रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर जाऊन थांबले! कांही वेळां सुरुवात करतांना मोठ्या खुबीने चित्राच्या विषयासंबंधीं वाचकाच्या मनांत कुतूहल उत्पन्न करील; एखाद्या समोर असलेल्या मनुष्याचें मार्मिक वर्णन करून शेवटीं हळूच सांगेल की हाच तो अमका अमका! चित्राचा विषय कोणीही असो, त्याचें चित्र रंगवितांना पौराणिक वा वाङ्मयीन उल्लेख येतील, उपमादृष्टांत येतील, विरोधात्मक मार्मिक विधानें येतील. शॉचें वर्णन एका वाक्यांत He is a hurricane on two legs असें करून पुढे He whips us with the scorpion of his bitter pen and we are grateful. He flings his withering gibes in our faces and we laugh... we love him as Bill Sikes' dog loved that hero—because he beats us. अशीं मजेदार विरोधात्मक वाक्यें घातलीं आहेत. प्रसिद्ध क्रिकेटपटु रणजितसिंह यांच्या खेळांतील सहजते (ease) चें वर्णन करतांना 'Schiller had to burn a whole city in order to thrill us; Shakespeare drops a handkerchief and chills our blood.' असा वाङ्मयांतील दृष्टांत तो देईल. विशेषतः यांपैकी कांही जणांशीं लेखकाचा प्रत्यक्ष परिचय असल्यामुळे चित्रांना विशेषच रंग भरला आहे. लेख संपल्यानंतर मनुष्याच्या व्यक्तित्वाचें चित्र वाचकाच्या डोळ्यांसमोर उभें राहील. स्वभावचित्र रंगविण्याची ही मार्मिक व कलात्मक पद्धत गार्डिनरसारखी कोणालाच साधली नाही.

आंद्रे मॉर्वा याने '*Poets and Prophets*' या आपल्या पुस्तकांत किपलिंग, वेल्स, चेस्टर्टन, डी. एच्. लॉरेन्स, आल्डस हक्स्ले, इत्यादि लेखकांचीं स्वभावचित्रें रंगविलीं आहेत. परंतु त्यांत व्यक्तित्वदर्शनापेक्षा त्यांच्या वाङ्मयाच्या चर्चेला प्राधान्य दिलें असल्यामुळे स्वभावचित्रें या दृष्टीनें गार्डिनरच्या चित्रांपेक्षा तीं कमी प्रतीचीं ठरतात. स्ट्रॅचीच्या '*Eminent Victorians*' या पुस्तकांत जीं चार चरित्रें आहेत तीं प्रत्येकीं सुमारें ८०–९० पानांचीं असल्यामुळे त्यांस स्वभावचित्रें म्हणण्यापेक्षा छोटीं चरित्रेंच म्हणावयाला पाहिजे. मराठीमध्ये श्री. दिवेकर यांनी रंगविलेलीं 'स्वभावचित्रें' गार्डिनरच्या धर्तीवरच रंगविलेलीं दिसतात आणि तीं सर्वच चांगलीं साधलीं आहेत. तसेंच श्री. क्षीरसागर यांचें 'व्यक्ति आणि वाङ्मय' आणि श्री. माडखोलकर यांचें 'माझे आवडते लेखक' हीं दोन पुस्तकें या प्रकारांत मोडण्यासारखीं आहेत. परंतु या दोन्ही पुस्तकांत दिवेकरांची सफाई दिसत नाही. या वाङ्मयप्रकाराकडे आपल्या लेखकांचें जावें तसें लक्ष अद्यापि गेलें नाही. मोठमोठे लेखक व राजकारणी पुरुष सोडून दिले तरी गणपतराव जोशी, बालगंधर्व इत्यादि नट, अब्दुल करीमखां, सवाई गंधर्व यांसारखे गायक, देवधर, नायडू, विठ्ठल यांसारखे क्रिकेटपटु, यांचीं स्वभावचित्रें चांगलीं रंगवितां येतील. याकरितां त्या त्या कलेंतील बारकायांचें ज्ञान मात्र पाहिजे. 'रत्नाकरां'त श्री. गोविंदराव टेंबे यांनी लिहिलेला गोहरजानवरील अप्रतिम लेख कोण विसरेल ?

मराठी वाङ्मयांत चरित्रवाङ्मयाची आबाळ झाली आहे हें सुरुवातीस सांगितलें आहे. परंतु ही स्थिति फार दिवस टिकणार नाही अशी आशा बाळगावयास जागा आहे. लोकशाहीच्या तत्त्वांचा झपाट्याने प्रसार होत आहे. गेल्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्त्वांनी लहानथोर हा भेद नाहीसा केला आहे. विभूतिपूजेला आजच्या युगांत स्थान नाही. कांही हुकूमशहांचा उदय झाला असला तरी

त्याच्या मुळाशीं एका व्यक्तीबद्दल भक्ति किंवा आदर यापेक्षा भीतिच जास्त आहे. पन्नास वर्षांपूर्वीच्या मोठेपणाच्या कल्पना आज राहिल्या नाहीत. या परिस्थितीचा परिणाम पाश्चात्त्य चरित्रवाङ्मयांत दिसूं लागलाच आहे व आपल्याकडे लवकरच दिसेल. यापुढे अंधभक्तीनें किंवा केवळ कर्तव्यबुद्धीनें स्तुतिस्तोत्रांनी भरलेलीं भारुडें लिहिलीं जाण्याचा संभव फार कमी. कलादृष्टया ज्याच्या जीवनचरित्रांत वर्णनीय असें कांही असेल त्याचेंच—मग तो श्रीमंत असो, गरीब असो, विद्वान असो, अविद्वान असो—चरित्र लिहिलें जाईल; व तें चरित्र केवळ गौरवग्रंथ म्हणून नव्हे तर कलाकृति म्हणून लोकांच्या पुढे ठेवण्यांत येईल. आतापर्यंतच्या चर्चेमध्ये इंग्रजी व मराठी वाङ्मयांतील कांही प्रसिद्ध चरित्रांतील जीं उदाहरणें घेतलीं त्यांत मराठी चरित्रांतील उदाहरणांचा बहुशः चरित्रवाङ्मयाचे दोष दाखविण्याकडे उपयोग केला आहे व इंग्रजी चरित्रांतील उदाहरणांचा गुण दाखविण्याकरितां उपयोग केला आहे याची मला जाणीव आहे, परंतु त्याला इलाज नव्हता. चरित्रलेखनास आवश्यक असलेला दृष्टिकोन मराठी चरित्रकारांत अद्यापि आला नाही हें मान्य करणें भाग आहे. चरित्र लिहिणें ही कला आहे—अत्यंत कष्टसाध्य कला आहे—ही गोष्ट आपल्यापैकी फार थोडयांना पटली आहे. वाटेल त्याने उठावें व एखाद्याचें स्तुतिस्तोत्र गावें, इतकें चरित्रलेखन सोपें असतें तर राजाच्या दरबारचा प्रत्येक भाट चरित्रकार ठरला असता. चरित्र लिहिण्यास कलादृष्टि तर आवश्यक आहेच, परंतु तितक्याच प्रमाणांत परिश्रम करण्याची शक्ति व निर्भीडपणें सत्य लोकांपुढे मांडण्याचें धैर्य हे गुण आवश्यक आहेत. चरित्रलेखनाकरितां जितकी अधिक सामग्री मिळेल तितकें चरित्र अधिक चित्तवेधक करतां येईल. स्ट्रॅची याने व्हिक्टोरिया राणीचें चरित्र लिहितांना बारीकसारीक कागदपत्रांव्यतिरिक्त पाऊणशें पुस्तकें वाचलीं होतीं असें म्हणतात. शिवाय इंग्रज लोक अद्याप पुराणप्रिय आहेत; आपल्या राणीबद्दल कमजास्त

लिहिलेलें त्यांना खपावयाचें नाही; अशा परिस्थितींत राणीचें इतकें वास्तवपूर्ण चित्र निर्माण करण्याचें धैर्य दाखविणें ही लहानसहान गोष्ट नव्हे. हॅवलॉक एलिस म्हणतो : The writing of a biography is no facile task; it is the strenuous achievement of a lifetime, only to be accomplished in the face of endless obstacles and unspeakable prejudice. 'चरित्र लिहिणें हें जन्माचें कार्य आहे; त्यांत अनेक अडचणी येतात व अनेक लोकांचे शिव्याशाप खाण्याची पाळी येते.' सुंदर जीवनचरित्र लिहिणें हें प्रत्यक्ष सुंदर जीवन जगण्याइतकें कठीण आहे असें कार्लाइल म्हणत असे. समतावादाच्या या युगांत सुंदर जीवन जगावयाची संधि मिळण्याचा काल जसा निकट आला आहे, तसा सुंदर चरित्रें निर्माण होण्याचाही काल जवळ आला आहे असें कां म्हणूं नये?

६२७२

# आत्मचरित्र

आत्मचरित्र एक प्रकारसे आत्मदान का ही रूप है।

—जैनेंद्रकुमार

वाङ्मयांतील निरनिराळ्या प्रकारांपैकी सर्वांत सोपा व सर्वांत अवघड प्रकार म्हणजे आत्मचरित्र, असें म्हटलें तर ती केवळ चाटूक्ति (Epigram) दिसेल; पण तें मनोरंजक सत्य आहे. सर्वांत सोपें अशा अर्थानें की त्याकरितां नाटककादंबरीप्रमाणे फारशी कल्पनाशक्तीची आवश्यकता नसते; शास्त्रीय ग्रंथाला आवश्यक असलेली तीव्र बुद्धिमत्ता व दीर्घ व्यासंग हीं लागत नाहीत; चरित्रइतिहास यांना लागणारे परिश्रम लागत नाहीत. शिवाय उत्तम कलाकृति निर्माण करण्याकरतां लागणारी समरसता आत्मचरित्राच्या बाबतींत जितकी शक्य आहे तितकी दुसऱ्या कोणत्या प्रकारांत आढळूं शकेल? आरशांत स्वतःचें प्रतिबिंब पाहण्यांत मनुष्य जितका रंगतो तितका दुसऱ्याचें चित्र पाहण्यांत रंगत नाही हा प्रत्येकाचा अनुभव असेल. माहितीसंबंधीं म्हणाल तर मला माझ्या स्वतःबद्दल जितकी माहिती असेल तितकी दुसऱ्या कोणाला असणें शक्य नाही, हें कोणीही मान्य करील. माझ्या बाह्य जीवनाबद्दल माझ्याबरोबर जन्म काढलेल्या--आईबाप व पत्नी या दोघांना मिळून--कदाचित माझ्याइतकीच माहिती असण्याचा संभव आहे; परंतु माझ्या अंतर्जीवनाबद्दल मलाच प्रमाणभूत मानावें लागेल. याच्या उलट आत्मचरित्र हा सर्वांत कठीण वाङ्मयप्रकार कोणत्या अर्थानें? तें चर्चेच्या ओघांत पुढे सांगूं. आधी आत्मचरित्राचें स्वरूप निश्चित करण्याचा प्रयत्न करूं.

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे हें सांगावयास नको. चरित्रांत लेखक आणि चरित्रविषय हीं भिन्न मनुष्यें असतात, यामुळे एक भेद असा उत्पन्न होतो की चरित्राप्रमाणे आत्मचरित्र संपूर्ण कधीच असूं शकत नाही–अर्थात मनुष्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतची हकीकत त्यांत येणें शक्य नाही. म्हणून डब्ल्यू. एच. डन या ग्रंथकाराने आत्मचरित्राचें 'मस्तक व अवयव विरहित मूर्ति' (The true autobiography is but a torso.) असें वर्णन केलें आहे. अर्थात अपूर्णता हा कांही दोष मानण्याचें कारण नाही. चरित्रलेखनांतही मनुष्यजीवनाच्या विशिष्ट भागाचें चित्र रंगवून त्याच्या व्यक्तित्वावर योग्य प्रकाश टाकतां येतो. जन्ममृत्यूच्या दोन्ही मर्यादांना स्पर्श केल्याशिवाय मनुष्यजीवनाचें चित्र यथातथ्य रंगवितां येणार नाही असें थोडेंच आहे? दुसरें, चरित्रकार चरित्रविषयाच्या बाह्य जीवनाकडून आंतरजीवनाकडे जाण्याचा प्रयत्न करतो म्हणजे त्याच्या जीवनांतील विविध प्रसंगांवरून त्याच्या स्वभावावर किंवा मनःप्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो; तर आत्मचरित्रकार आपल्या मनःप्रवृत्तीच लोकांपुढे उघड्या करून दाखवितो व त्यावरून निरनिराळ्या प्रसंगांची संगति दाखविण्याचा प्रयत्न करतो. अंगांतून काढलेल्या सदऱ्याप्रमाणे आपलें अंतःकरण उलटें करून त्याची आंतली बाजू आत्मचरित्रकार वाचकांना दाखवीत असतो. चरित्रकाराला फार तर त्याची सुलटी बाजू दाखवितां येईल. त्यापलीकडे जाणें शक्य नाही. म्हणूनच मनुष्याचें खरेंखुरें व्यक्तित्व आपणास पाहावयाचें असेल तर त्याचें आत्मचरित्र वाचलें पाहिजे, असें म्हणण्यास हरकत नाही.

पण हरकत नाही असें म्हणतांना सुद्धा मनांत शंका अशी येते की अगदी शास्त्रीय दृष्टीने पाहतां मनुष्याला स्वतःला तरी आपलें खरेंखुरें स्वरूप समजतें का? असें म्हणतात की ज्या वेळीं 'अ' आणि 'ब' हीं दोन माणसें एकमेकांशीं बोलत असतात त्या वेळीं खरोखर एकंदर

सहा माणसें बोलणारीं असतात. 'अ'बद्दलच्या 'ब'च्या कल्पनेचें एक व्यक्तित्व, 'अ'च्या स्वतःबद्दलच्या कल्पनेचें दुसरें व्यक्तित्व आणि 'अ'चें खरें व्यक्तित्त्व (हें केवळ परमेश्वरच जाणतो.); अशा 'अ'च्या तीन व्यक्ति व 'ब'च्या तीन मिळून सहा. याचा तात्पर्यार्थ एवढाच की मनुष्य स्वतःसही नीटपणें ओळखूं शकत नाही. स्वतःबद्दल त्याची जी कल्पना असते ती त्याचें खरें व्यक्तित्व दर्शवीत असेल असें निश्चित सांगतां येत नाही. स्वतःबद्दल आपल्या कित्येक वेळां कांही अतिशयोक्त कल्पना असतात. आपलें खरें व्यक्तित्त्व कित्येक वेळां स्वतःपेक्षा इतरांना जास्त चांगलें समजतें. या दृष्टीने एखाद्या मार्मिक चरित्रकाराने लिहिलेलें 'अ'चें चरित्र 'अ'च्या आत्मचरित्रापेक्षा जास्त विश्वसनीय मानतां येईल. परंतु साधारणपणें आपल्या आयुष्यांतील निरनिराळे प्रसंग, निरनिराळे अंतःकरणांतील लढे, विचारअविचारांचीं आंदोलनें, इत्यादि प्रामाणिकपणें वाचकांपुढे मांडून, आपल्या व्यक्तित्वासंबंधीं अनुमान काढण्याचें त्यांच्यावर सोपवावयाचें, एवढें धोरण ठेवून जर आत्मचरित्र लिहिलें असेल, तर तें स्वतःच्या व्यक्तित्वाचें चित्र सत्यापासून फारसें वेगळें होणार नाही असें मानावयास हरकत नाही.

आत्मचरित्र लिहिण्यांत मनुष्याचा हेतु काय असतो याची थोडी मीमांसा करूं. एका टीकाकाराने असें म्हटलेलें आठवतें की चरित्र हें नाट्यासारखें असतें, व आत्मचरित्र हें भावगीतासारखें असतें. जसें भावगीत हें मनुष्याचे विचार, भावना इत्यादिकांना वाट देण्याचें साधन वा माध्यम असतें तसें आत्मचरित्रही. मनुष्याला जीवनयात्रेंत जे बरेवाईट अनुभव येतात ते लोकांना सांगून टाकले म्हणजे त्याला हृदय हलकें केल्यासारखें वाटतें. 'स्निग्धजनसंविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति' या न्यायाने आपलीं दुःखें दुसऱ्यास सांगितलीं असतां त्यांचा हृदयावरील भार निम्मा होतो; व आपल्या आयुष्यांतील सुखद प्रसंगांत दुसरा वाटेकरी झाला म्हणजे आपला आनंद दुणावतो. शिवाय

केळकरांनीं म्हटल्याप्रमाणे आपण केलेल्या कार्याचा किंवा प्रवासाचा साद्यंत वृत्तांत कोणाला तरी सांगावासा वाटतो व त्याप्रमाणे तो आपण लिहून काढतों; त्याप्रमाणे आपल्या जीवनप्रवासाचाही वृत्तांत लिहून काढून जगाला सादर करण्याची इच्छा होणें स्वाभाविक आहे. एवढेंच की कामाचा वृत्तांत वरिष्ठासमोर सादर करावयाचा झाला म्हणजे त्यांत ऐच्छिकता राहत नाहीं, तें काम जुलमाने करावें लागतें; तर जीवनप्रवासाचा वृत्तांत सादर करतांना मनुष्य स्वेच्छेने तसें करीत असतो, भारावलेलें मन हलकें करण्यासाठी करीत असतो, त्यामुळे त्यांत एक प्रकारची स्वयंस्फूर्तता असते. हा आत्मचरित्राचा एक प्रमुख गुण होय. कर्तव्यभावनेने लिहिलेल्या आत्मचरित्रांत हा गुण आढळण्याचा संभव कमी. ज्याप्रमाणे प्रत्येक (अर्थात् श्रीमंत) मनुष्य मरणापूर्वी आपलें मृत्युपत्र करून ठेवतो–नव्हे तें आपलें कर्तव्य समजतो–त्याप्रमाणे प्रत्येक मनुष्याने मृत्यूपूर्वी आत्मचरित्र लिहून ठेवणें हें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे असें एका टीकाकाराने म्हटलें आहे. त्यांत विनोदाचा भाग आहे असें आपण धरून चालूं. एरव्ही प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत सांगण्यासारखें असें काय असणार? ज्याच्या सबंध आयुष्यांत जन्म आणि मृत्यु हे दोनच महत्त्वाचे प्रसंग घडलेले असतात, ज्याला उभ्या आयुष्यांत कधी वैचारिक अगर भावनाविषयक लढा कसा तो माहीत नाही, त्याचें चरित्र लिहिणें जितकें कठीण तितकेंच आत्मचरित्र लिहिणें कठीण. परंतु सदर टीकाकाराचें म्हणणें असें की मनुष्य कितीही क्षुल्लक असो, कितीही मठ्ठ असो, त्याने आत्मचरित्रांत या क्षुल्लकपणाचीच वा मठ्ठपणाचीच जर मीमांसा प्रामाणिकपणें केली, तर तें मनोरंजक कां होऊं नये? परंतु हें म्हणणें योग्य नव्हे. आत्मचरित्र लिहिणें हें इतकें सोपें नाही. केवळ आपल्या जीवनांतील निरनिराळ्या गोष्टी कशा तरी लोकांपुढे मांडणें म्हणजे कांही आत्मचरित्र लिहिणें नव्हे, आत्मचरित्र

लिहिण्याकरितां कलादृष्टि लागते. आणखी कित्येक धोरणें संभाळावीं लागतात. हें प्रत्येक मनुष्याला साधलें म्हणजे बघावयासच नको. भावगीतांत आपल्या भावना व्यक्त करतां येतात म्हणून प्रत्येक मनुष्य कवि थोडाच होऊं शकतो? तेव्हा ज्या मनुष्याच्या आयुष्यांत सांगण्यासारखें कांही घडलें असेल व तें सांगण्याची ज्याला तळमळ लागून राहिली असेल त्यानेच आत्मचरित्र लिहावें असें म्हटलें असतां आत्मचरित्राचें क्षेत्र संकुचित केल्याचा आरोप कोणी करूं नये.

स्वतःचे अनुभव दुसऱ्यास सांगून आपलें अंतःकरण हलकें करणें याशिवाय आपल्या अनुभवांपासून दुसऱ्यास कांहीं बोध व्हावा हाही आत्मचरित्राचा हेतु असूं शकेल. मागे चरित्रवाङ्मयांत जसा बोधवाद्यांचा पक्ष आहे म्हणून सांगितलें तसा आत्मचरित्राच्या क्षेत्रांतही असूं शकतो. आपलें मन हलकें करणें हा तर त्यांचा हेतु असतोच, परंतु त्याबरोबर बोधाचा हेतुही असतो व कित्येक वेळां तोच प्रमुख असतो. आपल्या 'चरित्रचंद्रा'च्या प्रस्तावनेंत श्री. पांगारकर म्हणतात: "माझ्या चरित्रांत कोणास कांही घेण्यासारखें नाही असें मला वाटतें तर हें चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचा हा उद्योग मी केला नसता. दारिद्र्यांत वाढलेल्या पण डोकें वर काढूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस, कांही भरीव वाङ्मयकार्य किंवा धर्मकार्य करूं पाहणाऱ्या लेखकांस व वक्त्यांस, परमार्थाची तळमळ वाहणाऱ्या मुमुक्षूंस, संसार सुखमय करावा अशी वासना असणाऱ्या संसारिकांस, या चरित्रापासून कांही तरी बोध, आनंद व उत्साह मिळेल असा मला भरवसा वाटतो." यावरून श्री. पांगारकर यांचा हेतु स्पष्ट होतो. श्री. कर्वे यांनी 'एका जीवाचें उत्क्रमण कसकसें होत गेलें, याची कल्पना यावी' या हेतूने आत्मवृत्त लिहिलें असलें तरी 'आमचीं चरित्रें सामान्य विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडतील असें मला वाटलें' हें त्यांनी मान्य केलें आहे. विलक्षण कठीण परिस्थितींत विद्याभ्यास करून आक्सफर्ड विद्यापीठांत संस्कृतच्या

अध्यापकाची बहुमानाची जागा पटकावणारा जर्मन प्रोफेसर मॅक्सूमुल्लर याने तरुण विद्यार्थ्यांना धीर व उत्तेजन देण्याच्या उद्देशाने आत्मचरित्र लिहिलें, यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांही नाही. बोधाची दृष्टि ठेवून लिहिलेल्या चरित्रांप्रमाणेंच आत्मचरित्रांतही स्वतःच्या दोषांवर पांघरूण घालण्याची प्रवृत्ति होण्याचा संभव असतो हें सांगावयास नकोच.

ही बोधदृष्टि सोडून दिली तर केवळ जुन्या आठवणींची उजळणी करण्याकरितां आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा होणेंही स्वाभाविक आहे. गिबन या प्रसिद्ध इतिहासकाराने आपल्या आत्मचरित्राच्या सुरवातीस म्हटलें आहे की "वयाच्या बावन्नाव्या वर्षी माझें इतिहासलेखनाचें कार्य संपूर्ण झाल्यामुळे आता रिकाम्या वेळांत गतायुष्यावर एकदा दृष्टि टाकण्याची मला इच्छा होत आहे; तसें करण्यांत स्वतःच्या मनाचें समाधान हा एकच हेतु आहे व तेंच माझें फल होय." आपल्याकडील नटवर्य बोडस यांनी नुकतेंच जें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें आहे त्यांत 'थोडा काळ कां होईना, पण गतगोष्टींत स्मृतिरूपाने राहायला मिळावें म्हणून मी आत्मचरित्र लिहिलें. रंगभूमीपासून तोडल्या गेलेल्या एका वेड्या नटाचा आत्मसमाधानाचा तो प्रयत्न आहे' असा त्यांनी आपला हेतु स्पष्ट केला आहे. साधारणतः आयुष्यांत अनेक टक्केटोणपे खाऊन जर्जर झालेल्या मनुष्याला मागील आयुष्याकडे दृष्टि टाकून जुन्या आठवणी सांगण्यांत विशेष प्रकारचा आनंद होतो. या, आठवणी सुखदच असल्या पाहिजेत असें नाही. दुःखद गोष्टींच्या आठवणींतही सविकल्प समाधीचा आनंद लुटतां येतो. स्वतःवर किंवा आपल्याला प्रिय असलेल्या व्यक्तींवर आलेल्या मोठ्या आजारांत जरी प्रत्यक्ष कष्ट झाले असले, तरी पुढे चारसहा महिन्यांनंतर त्या आजारांत सोसलेल्या हालअपेष्टांच्या आठवणी कष्टदायक न होतां उलट सुखद होतात हा सामान्य अनुभव आहे. त्याचप्रमाणे गत आयुष्यांतील बऱ्यावाईट आठवणींची उजळणी करण्यांत आनंद वाटतो. शिवाय केळकर म्हणतात

त्याप्रमाणे आपल्या हातून घडलेल्या चुका, दुष्ट कृत्यें, आपल्यावर आलेले मानहानीचे प्रसंग इत्यादि गोष्टींच्या आठवणी सुखद नसल्या तरी 'मनुष्याला तत्त्वज्ञानाच्या शिक्षणाचें वळण यत्किंचित्‌ही असेल तर, त्यापासून गंभीरपणाचा बोध मनाला होतो.' यावरून दुसऱ्या एका हेतूचें दिग्दर्शन करतां येईल. वर दिलेल्या आठवणी दुःखद असल्या तरी त्या प्रामाणिकपणें लोकांसमोर मांडल्याने आपल्या कृतापराधांचा कबुलीजबाब देऊन मोकळें होण्याचें समाधान मनुष्याला मिळूं शकतें. ख्रिस्ती लोकांत निकालाच्या दिवशीं (Judgment day) आपल्या सर्व पातकांचा पाढा ईश्वरासमोर वाचावा लागतो अशी कल्पना आहे. आत्मचरित्राच्या रूपाने जनताजनार्दनासमोर आपण आपल्या कृत्यांचा कबुलीजबाब दिला असें समाधान चरित्रकाराला कां मिळूं नये? प्रसिद्ध फ्रेंच लेखक रूसो याने आपल्या आत्मचरित्राला 'कबुलीजबाब' (Confession) असेंच नांव दिलें आहे. इतकेंच नव्हे तर सुरवातीलाच त्याने असें स्पष्ट म्हटलें आहे की "जेव्हा मला देवाघरचें बोलावणें येईल तेव्हा मी हें माझें आत्मचरित्र ईश्वरासमोर ठेवीन आणि म्हणेन की 'देवा, मी अशा अशा तऱ्हेने जगांत वागलों आहें, माझीं पुण्यकृत्यें व पापें मी प्रामाणिकपणें तुझ्यासमोर ठेवीत आहें.'" याप्रमाणें मोकळेपणाने आपल्या सर्व कृत्यांचा कबुलीजबाब दिल्यावर मनुष्याने एकप्रकारें प्रायश्चित्त घेतल्यासारखें होतें व त्याला आपलें हृदय हलकें केल्यासारखें वाटतें.

याशिवाय आपल्या कार्याचा आत्मचरित्राच्या द्वारें प्रचार करणें, आपल्याविषयीं जगांत गैरसमज पसरले असल्यास आत्मसमर्थन करणें, हेही आत्मचरित्र लिहिण्याचे हेतु असूं शकतात. अर्थात् या हेतूंनी लिहिलेलीं आत्मचरित्रें किंचित् गौण मानलीं गेल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. श्री. कर्वे यांच्या आत्मवृत्ताचा हेतु स्वतःचें उत्क्रमण कसें झालें हें दाखवावें व सामान्य लोकांना त्यापासून बोध

मिळावा हा आहे, हें मागे पाहिलेंच. परंतु त्यांच्या आत्मवृत्ताचें मूळ पाहिलें असतां असें आढळून येईल की त्यांनी प्रथम आपल्या कार्याचा प्रचार करण्यासाठी 'हिंदी स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ माझीं वीस वर्षे' या नांवाचा एक निबंध इंग्रजींत लिहून प्रसिद्ध केला होता. तोच निबंध पुढे मराठींत थोडा अधिक विस्तारपूर्वक 'मनोरंजन' मासिकासाठी लिहिला, व त्यानंतर बुकर टी. वॉशिंग्टन यांच्या 'आत्मोद्धार' या पुस्तकाच्या धर्तीवर आपणही आपले अनुभव आत्मवृत्तांत ग्रथित करावे असा विचार मनांत येऊन त्यांनी 'आत्मवृत्त' लिहिलें. या ग्रंथाच्या विशेषतः उत्तरार्धांत आपल्या संस्थांविषयी जी माहिती कर्वे यांनी दिली आहे त्यावरून आपल्या कार्याचा प्रचार करण्याचा त्यांचा हेतु नाही असें म्हणवत नाही. अर्थात् हा हेतु जरी असला तरी 'आत्मवृत्तां'त इतर गुण पुष्कळच असल्यामुळे कर्वे यांच्या आत्मचरित्राला चरित्रवाङ्मयांत पहिल्या प्रतीचें स्थान मिळेल यांत शंका नाही. अडॉल्फ हिटलर याने 'माझा झगडा' (Mein Kampf) या नांवाने जें आत्मचरित्र लिहिलें आहे त्यांत आपल्या आयुष्यांतील झगड्याचें वर्णन केलें आहे हें पुस्तकाच्या नांवावरूनच स्पष्ट दिसतें. रंगाऱ्याच्या गरीब घरांत जन्म घेतलेल्या या जबरदस्त महत्त्वाकांक्षेच्या मनुष्याने आपल्या संघटनाचातुर्याने जर्मनीमध्ये सर्वाधिकारित्व कसें मिळविलें याचा हा इतिहास मनोरंजक तर खराच; परंतु हिटलर संबंधीं जगांत जो गैरसमज, नव्हे तिटकारा, उत्पन्न झालेला दिसतो, त्याचें अंशत: निरसन होण्यास मदत करील असा आहे. हिटलरच्या आत्मचरित्रांत आपल्या पक्षाच्या तत्त्वांचा प्रचार करण्याचा हेतु जसा दिसून येतो तसा आत्मसमर्थनाचाही हेतु स्पष्ट दिसतो. मुसोलिनीचें आत्मचरित्र कांहींसें अशाच भावनेने लिहिल्यासारखें दिसतें. हिटलर व मुसोलिनी हे दोघे हुकूमशहा आपल्या अनुयायांमध्ये जितके लोकप्रिय झाले तितकेच इतर लोकांच्या टीकेचे व निंदेचे विषय झाले आहेत.

अशा या दोघा नेत्यांना स्वसमर्थनार्थ आत्मचरित्रें लिहिण्याची बुद्धि झाली तर नवल नाही. मराठीमध्ये श्री. केळकर यांच्या 'गतगोष्टी'ला अशाच आत्मसमर्थनाचा वास येतो. पहिल्या कांही वर्षांचा वृत्तांत केळकर यांनी जसा तटस्थवृत्तीने लिहिला आहे तसा पुढचा भाग ते लिहूं शकले नाहीत. आत्मसमर्थनाचा हेतु किंचित् गौण समजला जातो असें जें मागे म्हटलें आहे त्याचें कारण असें की आपल्या कार्याबद्दल किंवा योग्यतेबद्दल आपण स्वतः निकाल देण्यापेक्षा दुसऱ्यांनी तो द्यावा हें अधिक योग्य मानलें जातें. आपण आपले हेतु, आपलें कार्य, आपलीं ध्येयें, जशीं असतील तशीं लोकांपुढे मांडलीं तर त्या आत्मसमर्थनाला गौणत्व येण्याचें कारण नाही. परंतु आपल्या योग्यतेसंबंधीं, आपल्या कार्याच्या महत्त्वासंबंधीं, आपणच निकाल देऊं लागलों तर तें कांहीसें गौण आहे. हिटलरच्या आत्मसमर्थनाचें समर्थन करतांना केळकर म्हणतात : 'पराक्रमी मनुष्यालाही शत्रु कांही थोडेथोडके नसतात. त्याचा पराभव त्यांना हाताने करतां न आला तरी निंदेचें चाटण माखलेल्या आपल्या जिभेने आणि द्वेषाच्या शाईत बुडविलेल्या आपल्या लेखणीने ते तो करूं पाहतात. अशांना उत्तर द्यावेंच लागतें.' ही गोष्ट खरी आहे. परंतु अशांना उत्तर देण्याचा मार्ग म्हणजे आपलें कार्य, आपले हेतु इत्यादि केवळ जनतेपुढे मांडणें व निकाल देण्याचें लोकांवर सोपविणें हा होय. मी शहाणा आहे हें सिद्ध करण्याकरितां दुसरे मूर्ख आहेत असें म्हणण्याचें कांही कारण नाही, इतकेंच नव्हे तर मी शहाणा आहें हेंही आपल्या तोंडाने सांगण्याचें कारण नाही. केळकरांच्या 'गतगोष्टीं'चा शेवटला 'आत्मनिरीक्षणा'चा भाग ज्यांनी वाचला असेल त्यांना असें खरोखर वाटेल की केळकरांनी तेवढा भाग लिहिला नसता तर बरें झालें असतें. आत्मचरित्र एका दृष्टीने नाटककादंबऱ्यादि ललित वाङ्मयासारखें असतें. त्यांतील 'बोध' हा जसा लेखकाने सांगावयाचा नसतो किंवा

त्यांतील पात्रांच्या स्वभावांचें लेखकानें स्वत: वर्णन करावयाचें नसतें, तर तें वाचकांवर सोपवावयाचें असतें, तद्वतच आत्मचरित्रांत होतां होईल तों स्वतःच्या स्वभावाबद्दल किंवा कार्याबद्दल स्वतः निकाल न देतां तें वाचकांवर सोपविणें बरें. रूसोच्या आत्मचरित्रांतही स्वसमर्थनाचा भाग बराच आहे. परंतु तो इतका उत्तान नाही. आपल्या चरित्रांतील घडलेल्या बऱ्यावाईट सर्व गोष्टी वाचकांपुढे मांडण्यांत आपल्या कृत्यांचा 'कबुलीजबाब' देण्याचा जसा त्याचा हेतु त्यानें बोलून दाखविला आहे तसा स्वसमर्थनाचा हेतु स्पष्ट बोलून दाखविला नाही. किंबहुना आत्मचरित्र वाचीत असतांना तो स्पष्टपणें दिसूनही येत नाही. परंतु रूसोबद्दलही त्या काळीं व पुढेही गैरसमज थोडाथोडका नव्हता. त्याचें निरसन व्हावें हा हेतु त्याच्या आत्मचरित्राच्या शेवटीं कांहीसा दिसतो. शेवटीं तो म्हणतो की 'मी जें आतापर्यंत सांगितलें तें निर्भेळ सत्य आहे; याच्या उलट जर कुणी कांही माझ्याबद्दल ऐकलें असेल तर तें असत्य आहे, ती केवळ निंदा आहे, असें समजावें. मी निर्भयपणें असें सांगू शकतों की माझे ग्रंथ वाचून माझा स्वभाव, माझे मार्ग, माझ्या प्रवृत्ति, इत्यादिकांबद्दल पूर्ण विचार करून जर कुणी मला अप्रामाणिक ठरविलें तर तो स्वतःच अप्रामाणिक आहे असें मी म्हणेन.' यावरून 'कबुलीजबाबा'बरोबरच स्वतःचा 'बचाव' करण्याचा हेतु स्पष्ट दिसतो. रूसोच्या बाबतींतही असेंच म्हणतां येईल की त्यानें हा शेवटला भाग (व असे इतरत्र कांही ठिकाणीं आलेले भाग) घालण्याचें टाळलें असतें तर बरें झालें असतें.

आत्मचरित्राविरुद्ध पुष्कळ वेळां आक्षेप घेण्यांत येतात त्याचें कारण कांहीसें असेंच असावें. आत्मचरित्र लिहिणें हा प्रकारच गौण आहे असें म्हणणारे पुष्कळ आहेत. त्यांचें म्हणणें असें की 'मनुष्य स्वतःबद्दल लिहावयास बसला म्हणजे त्याला आपल्या व्यक्तित्वाची चांगली बाजू तेवढी दाखविण्याचा मोह होणें साहजिक आहे. त्यानें

कितीही प्रयत्न केला तरी त्यांत स्वतःकडे चांगुलपणा घेण्याची प्रवृत्ति त्याला टाळतां येणें शक्य नाही. आपली स्वतःचीच स्तुति करणाराबद्दल समर्थ रामदास काय म्हणतात तें प्रसिद्धच आहे.' स्वतःचे दोष कितीही स्पष्टपणें दाखविले तरी लोक लेखकावर प्रामाणिकपणाचें सोंग केल्याचा आरोप केल्याशिवाय राहणार नाहीत. 'मला दुसऱ्याचें मन मोडवत नाही, मी अत्यंत भिडस्त, संकोची वृत्तीचा आहें. हा माझा दोष आहे.' असें कर्वे यांच्या आत्मचरित्रांत वाचल्याबरोबर एका गृहस्थानें असें म्हटल्याचें आठवतें की, हा निव्वळ भोंदूपणा आहे; 'मी अत्यंत नम्र आहे' हें कर्व्यांना सांगावयाचें आहे; स्वस्तुतीचा दोष येऊं नये व आपला प्रामाणिकपणा दिसावा म्हणून तीच गोष्ट दोषाच्या रूपानें सांगितली आहे झालें! कांही लोकांनी फाजील विनयाचा कर्व्यांवर आरोप करावयास कमी केलें नाही. म्हणजे खरोखर आत्म-चरित्रलेखकाला कात्रींत पकडल्यासारखें होतें. स्वतःच्या गुणांचें दिग्दर्शन करावें तर आत्मश्लाघेचा दोष घडतो; स्वतःचे दोष प्रामाणिकपणें दाखवावे तर फाजील विनयाचा व कित्येक वेळां भोंदूपणाचा आरोप करण्यांत येतो. याच्या उलट प्रो. जॉवेट यांनी म्हटल्याप्रमाणें आत्मचरित्रांत खरी भीति असेल तर ती आत्मस्तुतीची नव्हे तर फाजील विनयाचीच असते, असेंच वाटूं लागतें. महात्मा गांधी किंवा कर्वे हे वास्तविक त्यांच्या नम्रपणाबद्दल व सौजन्याबद्दल प्रसिद्ध आहेत; परंतु त्यांनी आपले दोष दाखविले असतां जर त्यांच्यावर भोंदूपणाचा आरोप करणारे महात्मे भेटतात तर सामान्य मनुष्याची गोष्टच बोलावयास नको!

आत्मसमर्थनार्थ लिहिलेल्या आत्मचरित्रांत मात्र आत्मश्लाघेचा दोष घडण्याचा खरोखरच संभव असतो. स्वतःचे गुण सांगण्याचें टाळणें हा दोषच; परंतु फाजील आत्मश्लाघा त्यापेक्षाही वाईट. आत्मसमर्थन करण्यास सिद्ध झालेला मनुष्य आत्मश्लाघेचा दोष क्वचितच टाळूं शकतो. केळकरांच्या 'गतगोष्टीं'त शेवटीं त्यांनी

खाडिलकर, चिं. वि. वैद्य इत्यादिकांच्या वाङ्मयसेवेशीं स्वतःच्या साहित्यविषयक कामगिरीची जी तुलना केली आहे, व पुढे 'हटवादानें बोलावयाचेंच झालें तर मी असें म्हणेन की साहित्याचार्य किंवा साहित्य-सम्राट ही पदवी लोकांनी मलाच दिली.' या वाक्यानें जो कळस केला आहे, त्यायोगानें इतक्या सुंदर आत्मचरित्राला फार मोठें गालबोट लागलें आहे असेंच कोणी झालें तरी म्हणेल! शिवाय आत्मसमर्थन करण्यांत दुसरा एक मोठा दोष असा घडतो की सकारण किंवा अकारण दुसऱ्यांवर तोंडसुख घेण्याचा प्रसंग येतो व तसें करतांना मनुष्याला मर्यादेचें भान राहत नाही. ज्या लोकांचा आपल्याशीं संबंध आला असेल त्यांच्यांतील दोष दाखविणें अपरिहार्य असेल तर तसें करणें गैर होईल असें नाही. परंतु जर तें टाळतां येत असेल तर उगाच एखाद्यावर तोंडसुख घेण्याची हौस मात्र आत्मचरित्रकारानें पुरवून घेऊं नये. रूसो यानें आपल्या कांही मित्रांवर—त्यांत दिदेरोसारखे प्रसिद्ध ग्रंथकारही होते—असेच ठिकठिकाणीं दोषारोप केले आहेत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या आत्मचरित्रांत तर याचा इतका अतिरेक झाला आहे की त्यांनी आत्मचरित्र अजीबात लिहिलें नसतें तर फार बरें झालें असतें असें वाटूं लागतें. क्षुल्लक बाबतींत कोल्हटकरांसारख्या थोर साहित्यिकानें दुसऱ्यावर तोंडसुख घेतलेलें पाहून कोणाचाही असाच ग्रह होईल की साहित्यिकांचा थोरपणा सगळा त्यांच्या पुस्तकांतच असतो की काय! प्रत्यक्ष वर्तन पाहावें तों हें असें!

अगदी अपरिहार्य झाल्याशिवाय दुसऱ्यांचे दोष, त्यांचीं रहस्यें, इत्यादि चवाठ्यावर मांडणें कितपत योग्य होईल हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. 'माझें चरित्र जसें घडलें असेल तसें लिहा, माझे दोष लपवून ठेवूं नका' असें आपल्या चरित्रकाराला सांगणारे वॉल्ट व्हिटमन, रेव्ह. टिळक यांसारखे जे लोक असतात त्यांच्या चरित्रकारांना चरित्रनायकाचे दोष दाखविण्याची

पूर्ण मुभा मिळालेली असते. चरित्रनायकाव्यतिरिक्त त्याच्याशीं संबंध आलेल्या इतर व्यक्तींबद्दल बोलण्याचा प्रसंगच आला (आणि तो येणारच) तर अपरिहार्य झाल्यास तो त्यांचे दोष दाखवितोच. पण मागें चरित्रावरील निबंधांत दर्शविल्याप्रमाणे 'रानडेचरित्रां'त श्री. फाटक यांनी विष्णुशास्त्र्यांवर जें तोंडसुख घेतलें आहे तें समर्थनीय आहे असें कोण म्हणेल ? त्यांतही चरित्रकार हा बोलूनचालून त्रयस्थ असतो. आत्म-चरित्रकाराची परिस्थिति त्याहून नाजूक असते. दुसऱ्या कोणाबद्दल तो वाईट बोलूं लागला की वाचकांच्या कपाळाला आठ्या पडतात. माझा मित्र 'अ' यानें माझा दुसरा मित्र 'ब' याची निंदा करून माझी स्तुति केली तर तें लोकांस फारसें गैर वाटणार नाही. परंतु मी स्वतः 'ब'बद्दल वाईट बोललों व आपली स्तुति–नव्हे नुसतें समर्थन–करण्याचा आभास उत्पन्न केला तर माझ्यावर गहजब होईल !

एथेल मॅनिन या ग्रंथकर्त्रीनें *Confessions and Impressions* या नांवानें आत्मचरित्र लिहिलें आहे. त्यांत तिनें आपल्या आयुष्यांतील कांही विलक्षण रहस्यें उघड केलीं आहेत. तसें करतांना तिनें इतर लोकांविषयीं कांही आक्षेपार्ह लिहिण्याचें बुद्धयाच टाळलें आहे. एके ठिकाणीं ती म्हणते की, "मी आणखीही कित्येक मनोरंजक गोष्टी सांगितल्या असत्या; परंतु त्यांत इतर कांही लोकांचा संबंध येतो. मनुष्य स्वतःसंबंधीं सर्व रहस्यें खुलीं करण्यास मुखत्यार असला तरी दुसऱ्याच्या बाबतींत तसें करण्याचा त्याला काय अधिकार आहे ? अगदी आवश्यक वाटल्याशिवाय, केवळ मनोरंजनाच्या हेतूनें दुसऱ्या बद्दलचीं रहस्यें सांगणें योग्य नाही. कित्येक वेळां मित्रमंडळींत बसलों असतां आपण सहजच थट्टेनें कांही तरी बोलून जातों. अशा गोष्टी एखाद्यानें आत्मचरित्रांत घातल्या तर आपल्याला काय वाटेल ? अर्थात् आत्मचरित्र लिहितांना प्रत्येक मनुष्याला 'मी तुझ्याबद्दल अमुकअमुक लिहिलें आहे, तुला चालेल का ?' असें विचारीत बसण्याची आवश्य-

कता नाही. परंतु कोणत्या गोष्टी आत्मचरित्रांत घालणें आवश्यक आहे, कोणत्या गोष्टींनी निष्कारण एखाद्याचा उपमर्द अथवा निंदा होण्याचा संभव आहे, इत्यादि गोष्टींचें तारतम्य अवश्य पाहावयास पाहिजे." बाईचें हें मत कोणासही मान्य होण्यासारखें आहे. ही गोष्ट तारतम्यानें ठरवावयास पाहिजे. एखादी गोष्ट सांगणें अवश्य असेल तर सत्याचा अपलाप करण्याचें कारण नाही. परंतु एरव्ही उगाच दुसऱ्याबद्दलच्या अप्रिय गोष्टी चवाठ्यावर आणणें योग्य नव्हे. एथेल मॅनिनने स्पष्ट म्हटलें आहे की, आपण स्वतः नग्न व्हावयास तयार असलों तरी इतरांनीही तयार असावें अशी अपेक्षा आपण कां करावी ?

आत्मसमर्थनांतून प्रतीत होणारी आत्मश्लाघा व दुसऱ्यावर तोंडसुख घेण्याची प्रवृत्ति हे दोष टाळून प्रामाणिकपणें आत्मचरित्र लिहिणें अशक्य नाही. प्रामाणिकपणें स्वतःचे गुण सांगितले तर त्याला आत्मश्लाघा म्हणणाऱ्यांचें तोंड कोणी धरू शकत नाही. स्वतःचें गुणवर्णन हें आंब्रसांत टाकलेल्या मिरपुडीसारखें आहे. तें योग्य प्रमाणांत असलें तर आत्मचरित्र चवदार होतें; जरा जास्त झालें की त्यास उग्र वास येऊन तें असह्य होतें. हें योग्य प्रमाण साधणेंच अत्यंत कठीण आहे. तें साधलें तर आत्मचरित्रावर आत्मश्लाघेचा आरोप करण्याचें कांही कारण नाही. स्वतःचे अनुभव दुसऱ्याला सांगण्याची तीव्र इच्छा असणें हें गैर नव्हे. त्यांत विविधता आणि वैशिष्ट्य असेल तर तें मनोरंजक तर होईलच, परंतु बोधप्रदही होऊं शकेल. आणि मनोरंजक असून बोधप्रद असेल तर अस्सल कलावादीही त्याविरुद्ध आक्षेप घेणार नाही. महात्मा गांधींनी आपले 'सत्याचे प्रयोग' लोकांपुढे ठेवतांना 'असली (सत्याच्या प्रयोगांची) कथा जर मला तटस्थपणें, निरभिमान वृत्तीने लिहितां आली, तर त्यापासून तसलेच प्रयोग करणाऱ्या इतर लोकांना थोडीबहुत सामग्री मिळूं शकेल' अशी आशा व्यक्त केली आहे. हे उद्गार किती शालीनतेचे आहेत ! यांत 'पहा मी कसे प्रयोग करून दाखविले !' अशी प्रौढी मिरविण्याची

मुळीच इच्छा दिसत नाही, तर 'मी असे असे प्रयोग केले आहेत, त्यांत मी कांही प्रमाणांत यशस्वी झालों आहें अशी माझी कल्पना आहे; ज्याला इच्छा असेल त्याने असे प्रयोग करून पाहावे' एवढेंच सांगण्याची वृत्ति दिसते. शिवाय त्या प्रयोगांतून कांही सिद्धांत काढून ते लोकांसमोर आदर्श म्हणून मांडण्याची त्यांची इच्छा नसून 'त्या सिद्धांतांवर रचलेल्या कार्यांचा इतिहास द्यावयाचा आहे' असें त्यांनी म्हटलें आहे. यांत कांही आक्षेपार्ह आहे असें समजण्याचें काय कारण? त्याचप्रमाणे जुन्या आठवणींची उजळणी करण्यांत जो आनंद मनुष्याला वाटतो त्याविरुद्धही आक्षेप घेण्यासारखें काय आहे? उलट तो आनंद अत्यंत सात्त्विक असतो व पुढील आयुष्यांत टक्केटोणपे खाल्लेल्या मनुष्याला क्षणभर आपल्या दुःखाचा विसर पाडण्यास मदत करतो. रूसो याने आपल्या आत्मचरित्रांत एके ठिकाणीं याच अर्थाचे उद्गार काढले आहेत. तो म्हणतो. 'How do I love, from time to time, to return to those moments of my youth, which were so charmingly delightful; so short, so scarce, and enjoyed at so cheap a rate! —how fondly do I wish to dwell on them! Even yet the remembrance of these scenes warms my heart with a *chaste* rapture, which appears necessary to reanimate my drooping courage and enable me to sustain the weariness of my latter days.' जुन्या आठवणी म्हातारपणीं मनुष्याला धीर देतात व दुःखाचा विसर पाडतात, म्हणून त्यांची उजळणी करणें आवश्यक आहे असें त्याचें मत असून त्यापासून मिळणारा आनंद chaste (शुद्ध) असतो असें तो म्हणतो. हा शुद्ध आनंद प्राप्त करून घेणें यांत आक्षेपार्ह काय आहे? त्याचप्रमाणें आपल्याला आलेले विविध अनुभव लोकांना मोकळ्या मनाने सांगितले असतां कांही गोष्टी मनांतल्या मनांत ठेवल्याने भारावून गेलेलें मन मोकळें होतें, हा काय कमी फायदा झाला? एथेल मॅनिन ही तर म्हणते की सुखद अनुभवांपेक्षा आपले दुःखद अनुभव, किंवा मनांत

बोचत असलेल्या गोष्टी लोकांसमोर मांडल्या असतां मनुष्याला फार बरें वाटतें. दुःख स्वतः एकटें सोशीत बसण्यापेक्षा दुसऱ्यास सांगितल्यानें तें सह्य होतें हें सांगावयास नकोच. आत्मचरित्रकारानें जर हा हेतु मनांत बाळगून आत्मचरित्र लिहिलें तर बिघडतें कुठें? तेवढेंही समाधान त्याला मिळूं द्यावयाचें नाही? सारांश, फाजील आत्मप्रौढी न मिरवितां आत्मचरित्रापासून जर सात्त्विक आनंद मिळवितां येत असेल तर आत्मचरित्र लिहिण्याविरुद्ध आक्षेप घेण्याचें कांही कारण दिसत नाही. एका गुर्जर लेखकाच्या शब्दांचा अनुवाद करावयाचा तर असें म्हणतां येईल की 'गतायुष्याच्या संस्मरणांतून पुनः पुनः जीवनरस चोखणें, गत सुखदुःखांच्या हिंदोळ्यावर हृदयाला 'परियें' देणें, भूतकाळाच्या सुकलेल्या वेलीला संस्मृतीचें अमृत सिंचून पुन्हा फुलविणें, गत जीवनाच्या शकलांतून स्मरणांच्या टाकीचे घाव घालून सुंदर मूर्ति निर्माण करणें, हें कोणास आवडणार नाही?' हा आनंद जर आत्म-चरित्रलेखन देऊं शकत असेल तर त्याला मनुष्यानें कां मुकावें?

सुरवातीस सांगितल्याप्रमाणे आत्मचरित्र लिहिणें हें अत्यंत कठीण कसें आहे तें आता पाहूं. चरित्रलेखनाप्रमाणे आत्मचरित्र-लेखनाच्या बाबतींत सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे सत्यकथन. चरित्रापेक्षा आत्मचरित्रांत ही कसोटी साहजिकच जास्त कठीण भासते. दुसऱ्याबद्दल बऱ्यावाईट गोष्टी सत्य न सोडतां सांगणें हें तितकेंसें कठीण नाही; परंतु स्वतःबद्दल तशा गोष्टी सांगणें अत्यंत कठीण. फ्रूडनें कार्लाइलच्या अगदी घरगुती गोष्टी स्पष्टपणें सांगितल्या आहेत, परंतु स्वतःबद्दल लिहिण्याची पाळी आली असती तर त्यानें तितकाच प्रामाणिकपणा दाखविला असता की नाही याबद्दल संशय आहे. स्वतःच्या आयुष्यांत घडलेलीं परंतु लोकांपुढे न आलेलीं दुष्कृत्यें, मनांत आलेले बरेवाईट विचार, स्वतःच्या स्वभावांतील दोष, इत्यादि स्पष्टपणें सांगून आपल्या व्यक्तित्वाचा योग्य विकास दाखविणें

हें ध्येय चांगलें आहे, परंतु तें कितपत साध्य होण्यासारखें आहे? खरेंखुरें आत्मचरित्र लिहिणें ही गोष्ट अशक्य आहे, असें मानणारे पुष्कळ लोक आहेत. अँथनी ट्रोलोप हा इंग्रजी कादंबरीकार म्हणतो की प्रत्येक मनुष्य आयुष्यांत कांही गोष्टी अशा करीत असतो की त्या जगाला कळूं नयेत याबद्दल तो शक्य तितकी खबरदारी घेतो. अशा गोष्टी तो आत्मचरित्रांत लिहील अशी अपेक्षा कशी करावी? तेव्हा आपल्या जीवनाबद्दल पूर्ण सत्य सांगणें मनुष्याला अशक्य आहे. इसाडोरा डंकन या प्रसिद्ध नर्तकीने आत्मचरित्र लिहिलें आहे, त्यांत ती सुरवातीसच म्हणते की कोणत्याही मनुष्याला स्वतःचें सत्यपूर्ण चित्र रंगवितां येणार नाही. तिने जी अडचण दाखविली आहे ती अशी की आपलें स्वतःचें खरें व्यक्तित्व कोणतें हेंच कळणें कठीण आहे; आपल्या मित्रांना आपण निराळे दिसतों, शत्रूंना निराळे दिसतों, आपल्या प्रियकराला किंवा प्रेयसीला निराळे दिसतों आणि स्वतःला निराळे दिसतों—या निरनिराळ्या व्यक्तित्वापैकी आपलें खरें व्यक्तित्व कोणतें हें ओळखणें सोपें नव्हे. दोन माणसें एकमेकांशीं बोलत असतांना खरोखर सहा माणसें बोलणारीं असतात असें जें मागे सांगितलें आहे त्याचा अर्थ हाच आहे.

आपली दृष्टिच अशी कांही चमत्कारिक असते की मनुष्याने स्वतःबद्दल बोलावयास सुरवात केली की तो आत्मप्रौढीशिवाय दुसरें कांही सांगूं शकेल हें आपणास खरेंच वाटत नाही. आत्मप्रौढी नसेल, तर निदान आपल्या ( बहुधा काल्पनिक ) दुःखांचा पाढा लोकांसमोर वाचून त्यांची सहानुभूति प्राप्त करून घेण्याचा तरी त्याचा उद्देश असतो, अशी आपण कल्पना करतों. म्हणूनच आत्मचरित्र लिहिणें हें गौण समजलें जात असावें. प्रामाणिकपणें आपले दोष दाखवावयास जावें तर त्या शब्दांच्या पलीकडे दृष्टि टाकून त्यांतून वेगळा अर्थ काढणारेही भेटतात हें मागे सांगितलेंच. आत्मश्लाघेचा आरोप येईल या भीतीने

आपल्या गुणांचें वर्णन करण्याचें टाळणें हें योग्य नव्हे. परंतु सामान्य वाचक ही गोष्ट लक्षांत घेत नाहीत. स्वतःचे गुण सांगणाऱ्या मनुष्यावर आत्मश्लाघेचा आरोप ते करतातच. अशा वेळीं आत्मचरित्रकाराने काय करावें? याला उत्तर एवढेंच की आपलें अंतःकरण मोकळें करण्याची ज्याला प्रबल इच्छा होईल त्याने लोकापवादाकडे दुर्लक्ष करावें आणि आपल्या आयुष्यांतील घडलेले प्रसंग जसेच्या तसे वर्णन करावे. मग लोक त्यांवरून कांही का अनुमानें काढीत ना!

सत्यकथन हा चरित्रवाङ्मयाचा प्राण होय म्हणून पूर्वी सांगितलेंच. स्वतःच्या जीवनासंबंधीं निर्भेळ सत्य आत्मचरित्रकाराने वाचकांपुढे मांडावें हें ठीकच आहे. परंतु तसें करणें किती कठीण आहे, त्यांत अडचणी कोणत्या येतात, याचा विचार करणें आवश्यक आहे. प्रथम असा विचार केला पाहिजे की मनुष्याला स्वतःबद्दल तरी पूर्ण माहिती असते काय? अथपासून इतिपर्यंत पूर्ण सत्य सांगावयाचें म्हणजे स्वतःच्या जन्मापासूनची मनुष्याला माहिती पाहिजे. हें कितपत शक्य आहे? मनुष्याला आपल्या बालपणाची स्पष्ट स्मृति असूं शकते काय? असली तर वयाच्या कितव्या वर्षापर्यंत ती मागे नेतां येईल? साधारणतः असें म्हणतां येईल की मनुष्याला आपल्या वयाच्या पांचव्या किंवा सहाव्या वर्षापूर्वींची स्मृति नसते. त्यापूर्वीच्या कालांतील माहितीकरितां आपणास दुसऱ्यांवर—म्हणजे आपल्या आईबापांवर किंवा बालपणचें आपलें जीवन पाहिलेल्या इतर वडील माणसांवर—अवलंबून राहावें लागणार हें उघड आहे. त्यामुळे बहुतेक सर्व आत्मचरित्रांत जन्मापासून पहिल्या चारपांच वर्षांच्या कालाची माहिती फार थोडी असते. पुढील कालांतही चांगलें समजूं लागेपर्यंत, म्हणजे वयाच्या १४-१५ वर्षांपर्यंतची हकीकत थोडक्यांतच सांगण्याची पाळी येते, व ती सांगतांना 'मला असें आठवतें,' 'मला असें वाटतें' असे संदेहदर्शक प्रयोग वापरावे लागतात. एडमंड गॉस, अँथनी ट्रोलोप

वगैरे कांही आत्मचरित्रलेखकांनी आपल्या बालपणच्या आठवणी स्पष्टपणें सांगितल्या आहेत. आपल्या वयाच्या पांचव्या किंवा सहाव्या वर्षापूर्वीचें कांही एक आठवत नसल्याचें रूसो याने कबूल केलें आहे. जॉन स्टुअर्ट मिल हा अलौकिक बुद्धीचा मुलगा होता. वयाच्या सहाव्या वर्षी तो मोठमोठीं पुस्तकें वाचूं लागला होता. त्याला तिसऱ्या किंवा चवथ्या वर्षाची व्यवस्थित स्मृति असावी हें साहजिकच आहे. बालपणची आठवण राहिलीच तर एखाद्या विशेष ठळक प्रसंगाचीच राहावयाची. हर्बर्ट स्पेन्सर याने आपल्या वयाच्या तिसऱ्या वर्षी आपली धाकटी बहीण वारली त्याची चांगली आठवण असल्याचें नमूद केलें आहे. लहानपणीं मनावर कांही विशिष्ट परिणाम करणारे प्रसंग घडले असले तर त्यांची साहचर्याने (association) आठवण राहते असेंही स्पेन्सर याने दाखविलें आहे. तो म्हणतो की एकदा मला दाईच्या हातीं सोपवून घरची सर्व मंडळी बाहेर गेली होती. तेवढ्यांत ती दाई मला एकट्याला सोडून घराला कुलूप लावून कांही कामाकरितां बाहेर गेली. वेळ तिन्हीसांजाची होती व मला अतिशय भीति वाटूं लागली. इतक्यांत जवळील चर्चमध्ये घंटा वाजूं लागली. त्या घंटेच्या आवाजाचा त्या वेळीं माझ्या मनावर इतका परिणाम झाला की पुढे कित्येक वर्षें चर्चची घंटा ऐकली की मला त्या दिवशींच्या एकटेपणाची आठवण होत असे. पांगारकर 'चरित्रचंद्रां'त म्हणतात : "पहाटेस आई व ताई जात्यांत भरण घालीत व दळण दळीत. मला त्यांच्या गाण्यांत एक गाणें फार आवडे व तें समर्थांचें 'अंजनीगीत' होय. दळणाची घरघर सुरु झाली की मी ताईच्या मांडीवर डोकें ठेवून पसरायचा व 'ताई, तें म्हण' म्हणून हट्ट करावयाचा. मग 'लंकेहूनी अयोध्ये येतां। रामलक्ष्मण सीता' हें गाणें सुरू झालें की पुन्हा झोपीं जायचा! तिसरे वर्षी माझ्या कानांत पहिलें गाणें शिरलें तें हें अंजनीगीत. त्यावेळच्या चालीसकट तें माझ्या कानांत भरलें तें अद्याप मला आठवतें." अशी एखादी ठळक

गोष्ट सोडून दिल्यास बाकीच्या गोष्टी कोणीतरी वडील माणसानें–आणि त्याही केवळ आठवणीच्या आधारावर–सांगितलेल्या असावयाच्या. केळकरांनीही 'गतगोष्टीं'त म्हटलें आहे की लहानपणाच्या आठवणी या 'तुटक व तुरळक' असावयाच्या व म्हणून स्वत: त्यांनी आपल्या आठवणी 'सुचतील तशा' दिल्या आहेत. त्यांतील एक आठवण तर इतक्या लहानपणची दिसते की त्या वेळीं केळकर हे अंगावर दूध पीत असावे. अर्थात् ही गोष्ट त्यांना आईवडिलांनी किंवा कोणी तरी वडील माणसांनी सांगितली असली पाहिजे. असो. सांगावयाचें इतकेंच की बालपणच्या आठवणी या अगदी अस्पष्ट असल्यामुळे त्यांत निर्मळ सत्याचा आविष्कार होणें कठीणच. त्या सांगतांना 'मला साधारणपणे असें आठवतें' असा प्रयोग घालणें भाग पडतें; म्हणजे लेखकावर निदान असत्यकथनाचा आरोप येऊं शकत नाही.

पुढील आयुष्याची तरी मनुष्यास पूर्ण स्मृति असेल असें निश्चित सांगतां येत नाही. कांही ठळक प्रसंगांची आठवण चांगली राहत असेल, परंतु आत्मचरित्रांत एकसूत्रता येण्यासाठी ज्या हजारों लहानमोठ्या गोष्टी लेखकाला सांगाव्या लागतात त्यांची पक्की आठवण न राहणें असंभवनीय नाही. माझ्या जीवनाबद्दल मला दुसऱ्या कोणापेक्षाही जास्त माहिती आहे असें आत्मचरित्रकार म्हणू शकतो, पण तें कांही विशिष्ट बाबतींत. अमुक एका प्रसंगीं माझ्या अंत:करणांत काय चाललें होतें हें दुसऱ्यापेक्षा मला जास्त माहीत असणार हें खरें; पण विशिष्ट प्रसंग केव्हा घडले, कसे घडले, हें मला सर्वांत जास्त माहीत असेल असें मला छातीठोकपणे सांगतां येणार नाही. याकरितां दैनंदिनीचा फार उपयोग होतो. परंतु 'चरित्रा'वरील निबंधांत सांगितल्याप्रमाणे आपण पुढे आत्मचरित्र लिहूं व त्या वेळीं आपणास सर्व गोष्टी नीट लक्षांत राहणार नाहीत असा विचार करून दैनंदिनी कोण लिहून ठेवणार? आपण आत्मचरित्र लिहूं असें तरी आधीपासून कोणास माहीत

असतें? आपल्याकडे पांगारकर यांनी आपल्या आत्मचरित्राकरितां दैनंदिनीचा चांगला उपयोग केल्याचें आढळून येतें. केळकरांनी 'गतगोष्टीं'त स्पष्टपणे कबूल केलें आहे की "मी रोजनिशी लिहिण्याची सवय ठेविली नाही याविषयीं मात्र मला अतिशय वाईट वाटतें व पश्चात्ताप होतो....आज या गतगोष्टी लिहितांना पुष्कळ गोष्टी आठवत नाहीत, कित्येकांचा कालविपर्यास होतो की काय, अशी जी भीति मनाला वाटते ती वाटण्याचें कारण उरलें नसतें." धोंडो केशव कर्वे आपल्या आत्मवृत्तांत म्हणतात, "आत्मवृत्त लिहिण्याचा प्रसंग मला येईल असें कधी माझ्या स्वप्नींही आलें नाही; यामुळे मी कधी कसलीं टिपणें करून ठेविलीं नाहीत. मी कधीही दिनचर्या (डायरी) लिहिली नाही" व पुढे ते मान्य करितात की "सभांचीं प्रोसिडिंगें (हकीकतीचे लेख) व संस्थांचे रिपोर्ट यावरून कांही माहिती घेऊन बाकीची स्मरणाने लिहिली आहे." सार्वजनिक बाबतींत रिपोर्ट किंवा वर्तमानपत्रांतील लेख यांचा उपयोग होईल. परंतु खाजगी जीवनाची माहिती स्मरणांतूनच लिहावी लागणार. आणि केवळ स्मरणाने लिहिलेल्या हकीकतींत शंभर टक्के विश्वसनीयता असूं शकेल काय?

आपणा स्वतःबद्दल पूर्ण सत्य सांगणें हें वरवर दिसतें तितकें सोपें नाही. एक तर कांही अप्रिय गोष्टी अजीबात वगळण्याची इच्छा होऊं शकते व ती दाबणें अत्यंत कठीण; दुसरें, कांही गोष्टी लपविल्या नाहीत तरी त्यांचें स्वरूप जरासें बदलून टाकण्याकडे प्रवृत्ति होणें शक्य आहे; आणि तिसरें, अजीबात अस्तित्वांत नसलेल्या किंवा न घडलेल्या गोष्टी आपल्या कल्पनेने निर्माण करून त्या आत्मचरित्रांत बेमालूम घुसडल्या जातात—हें तर महत्पाप होय. या तीन्ही प्रकारच्या पातकांचीं उदाहरणें कांही आत्मचरित्रांत मिळूं शकतात. सर्वांचीं उदाहरणें देण्याचें कारण नाही, परंतु यावरून त्यांची संभवनीयता दिसून येईल. चरित्रा-

प्रमाणेच आत्मचरित्रांत प्रत्येक लहानसहान प्रसंगाचें वर्णन न करतां कांही निवडक प्रसंगांचाच परामर्ष घ्यावयाचा असतो. ज्या योगाने मनुष्याचें व्यक्तित्व उठून दिसेल असे प्रसंग निवडावयाचे असा त्याचा अर्थ आहे. परंतु याचा फायदा एखादा आत्मचरित्रकार घेऊं शकेल. प्रसंग निवडतांना तो असेच निवडील की ज्यायोगाने आपणाकडे कोणताच वाईटपणा येऊं नये. आत्मचरित्रकार हा प्रामाणिक असतो असें धरून चालावें हें खरें; परंतु तो जाणून बुजून लबाडी करीत नसून न कळत त्याचेकडून सत्यापलाप घडण्याचा संभव असतो, असें येथे सुचवावयाचें आहे. तसेंच घडलेल्या गोष्टींचें स्वरूप बदलणें हेंही बरेच वेळां नकळत होत असतें. निदानं मनुष्य तसें करीत असतांना आपण कांही खोटें सांगत नाही अशी स्वतःच्या मनाची समजूत करून घेत असतो. आत्मवंचना ही पुष्कळ वेळां न कळत आपल्याकडून घडत असते. लेस्ली स्टीफन या टीकाकाराने जॉन स्टुअर्ट मिल्संबंधीं असें म्हटलें आहे की याने आपल्या पत्नीच्या बुद्धिमत्तेची जी स्तुति केली आहे तींत प्रच्छन्नपणें स्वतःचीच स्तुति केलेली आहे. ती ज्या तत्त्वाचें प्रतिपादन करीत असे तीं बिनचूक असत असें मिल हा म्हणत असे. परंतु ती कोणत्या तत्त्वांचें प्रतिपादन करीत असे? तर याच्याच जीवनांतून प्रतीत होत असलेल्या. म्हणजे तीं बिनचूक तत्त्वें स्वतःचींच, असें अप्रत्यक्षपणें सुचविलें की नाही? ही परवंचनेपेक्षा एक प्रकारें आत्मवंचनाच झाली, व तीही नकळत झाली. आपल्या यशाचें निम्में श्रेय आपल्या पत्नीला देणारे लोक पुष्कळ आढळतात. त्यांत सत्याचा भाग कितपत असतो? आपल्याकडील जुन्या वळणाच्या स्त्रिया पतीच्या कार्याला प्रत्यक्ष हातभार कितपत लावीत असतील? पतीला देवाप्रमाणे मानून त्याच्या सुखदुःखांचा वाटा उचलणें, त्याच्या 'हो' स 'हो' करणें, याकरितां जर तिला यशाचें निम्में श्रेय द्यावयाचें असेल तर गोष्ट वेगळी. परंतु हें सत्याचें विकृतीकरण आहे असेंच म्हणावें

लागेल. उलट रूसो याने आपल्या पत्नीबद्दल जे उद्गार काढले आहेत ते जास्त प्रामाणिकपणाचे वाटतात. आपल्या पत्नीवर सुरवातीस आपलें अतिशय प्रेम होतें, परंतु पुढे पुढे तें कमी होत चाललें होतें, असें त्याने स्पष्ट म्हटलें आहे. कधी कधी असे प्रसंग येत की तिच्या वर्तनाने त्याचें अंतःकरण दुखविलें जाई; परंतु 'याबद्दल मी कधीही कोणाजवळ तक्रार केली नाही' असें तो म्हणतो. "शरीराने व मनाने माझ्याशीं पूर्ण समरस होणारी स्त्री मला पाहिजे होती; ती जागा ती पूर्णपणें कधीच भरून काढूं शकली नाही. तिच्या घरचीं माणसें चमत्कारिक वागणारीं होतीं. त्यांचें व माझें कधीच पटलें नाही. माझी पत्नी त्यांच्या पूर्ण हुकमतींत होती. अर्थात् तिचे व माझे हितसंबंध पुष्कळ वेळां परस्परविरोधी असत." रूसो याने सुमारें ६०० पानांच्या आपल्या आत्मचरित्रांत स्वतःच्या आयुष्यांतील बहुतेक सर्व लहानमोठ्या प्रसंगांचें वर्णन प्रामाणिकपणें केलें आहे. ठिकठिकाणीं त्याने म्हटलें आहे की 'मी जी इतकी लांबण लाविली आहे तिचा वाचकांस कंटाळा येण्याचा संभव आहे, परंतु तसें करणें मला भाग आहे; कारण कोणतीही गोष्ट लपवून ठेवावयाची नाही असा माझा निश्चय आहे.' इतकें असूनही कांही प्रसंगांना विकृत स्वरूप दिल्याचा, चुकीचे कार्यकारणभाव दाखविल्याचा, त्याच्यावर आरोप करणारे टीकाकार आहेतच! स्वतःबद्दल पूर्ण सत्य कोणी सांगूं शकेल हें खरें मानावयास लोक तयार नसतात. अर्थात् एवढ्यासाठी आत्मचरित्र कोणी लिहूंच नये असें म्हणणें चुकीचें होईल. आपणास स्मरत असलेल्या सर्व गोष्टी ज्यायोगाने आपलें व्यक्तित्व स्पष्टपणें उठून दिसेल अशा पद्धतीने लोकांसमोर मांडणें हें आत्मचरित्रकाराचें कर्तव्य होय.

हें कर्तव्य पार पाडावयाचें म्हणजे आत्मचरित्रकाराच्या अंगीं प्रामाणिकपणा व तटस्थवृत्ति हे दोन गुण प्रामुख्याने असले पाहिजेत. मागे सांगितलेंच आहे की दुसऱ्याचे दोष स्पष्टपणें दाखविणें हें सोपें

असतें; पण स्वतःचे दोष स्वतः दाखविणें, क्वचित्प्रसंगीं आपल्या हातून घडलेलीं पातकें, आपल्या मनांत आलेले वाईट विचार, इत्यादिकांचा स्वतः कबुलीजबाब देणें, हें अत्यंत कठीण आहे. या दृष्टीनें चरित्रकारापेक्षा आत्मचरित्रकाराला तटस्थवृत्ति ठेवणें किती कठीण आहे हें लक्षांत येईल. स्वतःबद्दल तटस्थवृत्ति ठेवणें हा प्रयोगच 'वदतोव्याघाता'सारखा वाटतो. स्वतःची स्वतः तिऱ्हाइताप्रमाणें परीक्षा करणें म्हणजे तारेवरचा नाच करण्याइतकें कठीण. तें खऱ्या सत्याच्या उपासकालाच साधूं शकतें. "भले मारा जेवा अनेकोनो क्षय थाओ, पण सत्यनो जय थोओ; अल्पात्माने मापवाने सारु सत्यनो गज कदी टूंको न बनो." (माझ्यासारख्या अनेकांचा क्षय झाला तरी पत्करला, परंतु सत्याचा जय होवो; अल्पात्म्याचें माप घेण्यासाठी सत्याचा गज आखूड न होवो.) हे महात्मा गांधींचे 'सत्याच्या प्रयोगां'च्या सुरवातीचे शब्द प्रत्येक आत्मचरित्रकारानें आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवण्यासारखे आहेत. रूसोनें आपल्या *Confessions* चा हेतु "to present my fellow-mortals with a man in all the integrity of nature" म्हणजे 'मनुष्याचें सत्यपूर्ण चित्र रेखाटणें,' असा दिला आहे. तसेंच हर्बर्ट स्पेन्सर व हॅवलॉक एलिस (याचें आत्मचरित्र नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे) यांनी आपल्या चरित्रास 'a natural history' असें म्हटलें आहे. हॅरोल्ड निकोल्सन यानें आत्मचरित्राचें लक्षण 'scientific autopsy and rigorous post mortem' असें सांगितलें आहे. या सर्वांचा अर्थ एवढाच की आत्मचरित्रकारानें प्रामाणिकपणानें व तटस्थवृत्तीनें आत्मपरीक्षा करून आपल्या अंतःकरणांत खोल दडून बसलेले विचार व भावना वाचकांपुढे खुल्या करून दाखविल्या पाहिजेत. आत्मचरित्र हें खरोखर मानसशास्त्राच्या भूमिकेवर आधारलेलें असतें. मनुष्याच्या विचारांत जी उत्क्रान्ति झाली असेल तिचें चित्रण करण्यासाठी आत्मचरित्रकार मानसशास्त्रज्ञ असला पाहिजे. म्हणूनच डब्ल्यु. एच्. डन यानें म्हटलें

आहे की, "Autobiography impinges upon the realm of psychology; autobiographies are psychological documents of the greatest importance." (आत्मचरित्र हा प्रकार मानसशास्त्राच्या क्षेत्रावर आक्रमण करणारा आहे; आत्मचरित्र हें अत्यंत महत्त्वाचें मानसशास्त्रीय प्रमाणपत्र होय.) हें दुर्घट मनोगाहन व कठोर आत्मपरीक्षण फार थोडया लोकांना साधतें. म्हणूनच आत्मचरित्र हा सर्वांत कठीण वाङ्मयप्रकार ठरतो.

'टिळक चरित्रा'च्या प्रस्तावनेंत केळकरांनी म्हटल्याप्रमाणे मनुष्याच्या हयातींत उठलेल्या वादाच्या धुळीचे लोट जमिनीवर बसण्याला व आरपार स्वच्छ दिसूं लागण्याला कित्येक वर्षे स्रवत असलेलें विस्मृतीचें दहिंवर आवश्यक असतें. एखाद्या गोष्टीकडे तटस्थवृत्तीने पाहण्यासाठी ती गोष्ट इतिहासांत जमा व्हावी लागते. त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या 'गतगोष्टीं'त म्हटलें आहे की काम करीत असतांना आपण काय करीत आहों हें सांगण्यापेक्षा काम हातचें बाजूला टेवल्यावर आपण काय केलें हें (मनुष्याला) अधिक यथार्थ रीतीने सांगतां येतें. 'काम आणि मन हीं अलग होतात, यामुळे स्वतःविषयीं मत देण्याला लागणारा थोडासा त्रयस्थपणाही प्राप्त होतो.' यामुळेच आपलें बरेंचसें जीवितकार्य समाप्त झाल्यानंतर आत्मचरित्र लिहिण्याची सामान्यतः प्रथा आहे. गतायुष्याकडे मनुष्य तटस्थ वृत्तीने पाहूं शकतो, याचें कारण प्रसिद्ध हिंदी लेखक जैनेंद्रकुमार यांनी म्हटल्याप्रमाणे पूर्वी घडून गेलेल्या घटनांबद्दल त्याच्या मनांत वासना शिल्लक राहत नाही, तर केवळ भावना असते; त्या भावनेंत रस असतो, वासनेचें विष नसतें; म्हणून पूर्वायुष्यांतील आपला शत्रु पुढे शत्रु राहत नाही. साधारणपणें पूर्वायुष्यांत आपण आपले स्वतःचे प्रदर्शक असतों—अहंकाराने स्वतःचें प्रदर्शन करण्यांत आनंद मानीत असतों; आयुष्याच्या अखेरीस आपण स्वतःचे दर्शक बनतों. त्या वेळीं आपल्या जीवनाचें चित्र पार बदलतें, कारण स्वतःच्या जीवना-

कडे पाहण्याची आपली दृष्टि बदलते. पूर्वायुष्यांत आपण स्वतःला 'कोणीतरी' समजत असतों, परंतु अखेरीस मागे वळून पाहिल्यावर असें वाटतें की आपण जणू कांही कोणी यात्रेकरू असून जीवितपथावर आपलीं पदचिन्हें उमटवीत चालत आलों आहों, यापेक्षा जास्त कांही नाही. जैनेंद्रकुमार यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या आत्मचरित्राचें अत्यंत मार्मिक परीक्षण केलें आहे. त्यांत त्यांनी असें म्हटलें आहे की जेथपर्यंत जवाहरलाल यांनी स्वतःच्या पूर्वायुष्याचें वर्णन केलें आहे तेथपर्यंत त्यांनी तटस्थता कायम ठेविली आहे व तोच आत्मचरित्राचा उत्कृष्ट भाग आहे. परंतु ज्या ठिकाणीं ते राजकारणाच्या प्रांतांत शिरले आहेत व आपले मतभेद वर्णन करूं लागले आहेत तेथपासून त्यांची तटस्थवृत्ति नाहीशी झाली आहे; त्या ठिकाणीं वासनेने भावनेला मागे सारलें आहे व लेखक स्वतःचा दर्शक नव्हे तर प्रदर्शक बनला आहे. यावरून हें स्पष्ट होईल की मनुष्याने स्वतःच्या जीवनाकडे पाहावयाचें म्हणजे आपल्या जीवनाबद्दलच्या वासनेची हकालपट्टी केली पाहिजे, त्याशिवाय तटस्थवृत्ति अंगीं बाणणें शक्य नाही. भावना मात्र पाहिजे, नाही तर ललितकृतीस आवश्यक असलेली समरसता उत्पन्न होणार नाही. वासनारहित दृष्टीने आपल्या जीवनाकडे पाहण्याइतकी तटस्थता प्राप्त झाली म्हणजे आपले दोष, आपल्या हातून घडलेलीं कुकर्में, इत्यादिकांचा अपलाप करण्याची बुद्धि होण्याचें कारण नाही. मनुष्य प्रामाणिकपणाने व मनमोकळेपणाने आपल्या गुणदोषांचें दिग्दर्शन व चर्चा करूं शकेल. परभाषांतील व आपल्याकडील कांही प्रसिद्ध आत्मचरित्रांची उदाहरणें घेऊन हे गुण त्यांत कसे प्रतीत झाले आहेत व त्यामुळे त्या आत्मचरित्रांना कशी थोरवी प्राप्त झाली आहे याचें दिग्दर्शन करूं.

जगाच्या वाङ्मयांतील अत्यंत प्रसिद्ध आत्मचरित्रांत रूसो याने लिहिलेल्या *Confessions* नांवाच्या आत्मचरित्राची गणना होते. 'मी जें कार्य हातांत घेतलें आहे त्याला जगांत तोड मिळावयाची

नाही व त्याचें अनुकरण करणेंही शक्य नाही' असें पहिल्याच वाक्यांत सांगून 'माझ्या आयुष्यांतील सर्व बऱ्यावाईट गोष्टी मी मोकळेपणाने सांगितल्या आहेत; माझे दोष, माझे अपराध वगैरे मी लपविले नाहीत; त्याचप्रमाणे भलते गुण स्वत:ला चिकटवून घेतले नाहीत; माझ्या व्यक्तित्वाचें चित्र जसेंच्या तसें मी लोकांपुढे उघडें करून दाखविलें आहे.' या शब्दांत आपली भूमिका व्यक्त केली आहे. रूसोच्या कठोर आत्मपरीक्षणाची स्तुति करणारे जसे पुष्कळ सांपडतात तसेच त्याच्या स्पष्टवक्तेपणाला निर्लज्जपणा म्हणून 'विकृत मनोवृत्तीचें निदर्शक इतकें घाणेरडें पुस्तक कोणी क्वचितच लिहिलें असेल' असा शेरा मारणारेही थोडेथोडके नाहीत. रूसोचा स्पष्टवक्तेपणा कित्येक वेळां खरोखरच असह्य वाटतो. त्याचे कबुलीजबाब वाचून एखादा सोवळ्या मनोवृत्तीचा मनुष्य साहजिकच असे उद्गार काढील की 'हा काय मनुष्य आहे की आहे तरी कोण ?' सुमारें ५५ वर्षांच्या आपल्या आयुष्यामध्ये याने किती स्त्रियांवर प्रेम केलें याची यादी तयार करण्यासारखी आहे. तो म्हणतो की, 'फार लहान वयापासून माझ्या मनांत लैंगिक भावनांचा उद्भव झाला; माझें मन अत्यंत भावनाप्रधान आहे; माझ्या इच्छा, वासना, मला दाबून टाकतां येत नाहीत. एकदा त्यांच्या आहारीं गेलों म्हणजे मला कशाचीही शुद्ध राहत नाही; अशा वेळीं माझ्या हातून काय घडेल तें सांगतां येत नाही.' याची प्रेमाची तऱ्हाही विलक्षण असे. आपल्या वयाच्या दहाव्याबाराव्या वर्षीं आपल्यापेक्षा दुपटीने मोठ्या असलेल्या दोन तीन स्त्रियांवर हा प्रेम करूं लागला ! पुढे एका स्त्रीशीं विवाह झाल्यानंतरही कित्येक स्त्रियांवर त्याने प्रेम केलें. या प्रेमांत शारीरिक आकर्षणाचाच मुख्य भाग असे असें तो कबूल करतो. एखाद्या स्त्रीबरोबर एकांतांत बसण्याचा प्रसंग आला तर आपलें मन आवरणें अत्यंत कठीण होई असें त्याने स्पष्टपणें मान्य केलें आहे. लहानपणीं एका गृहस्थाच्या घरीं काम शिकण्यासाठी राहिला

असतांना त्या गृहस्थाच्या कडक शिस्तीमुळे रूसो याला खोटें बोलणें, लहानसहान चोऱ्या करणें, इत्यादि वाईट सवयी लागल्या. रूसो याची मीमांसा करतांना म्हणतो, "हा गृहस्थ मला इतक्या कडक रीतीने वागवीत असे की मला या सवयी लागल्या नसत्या तरच आश्चर्य. जेवतांना टेबलावर चांगले चांगले पदार्थ ठेवलेले असावयाचे व ते मला मिळावयाचे नाहीत; मला एखादी वस्तु पाहिजे असली तर ती कधी मिळावयाची नाही; अर्थात् चोरी करण्याशिवाय दुसरा उपाय काय? शेवटीं मी अगदी निगरगट्ट बनलों! चोऱ्या करून आळ दुसऱ्यावर घालूं लागलों." दुसऱ्या एका ठिकाणीं त्याने अशीच चोरी केली व एका गरीब मोलकरणीवर आळ घातला. मालकाने तिला नोकरीवरून घालवून दिलें व यालाही घराबाहेर काढलें. त्या प्रसंगाचें वर्णन करतांना तो म्हणतो: "मी त्या मुलीवर आळ घेतला याचें कारण मला शिक्षेची भीति वाटत होती असें नव्हे, तर माझी चारचौघांत नाचक्की होईल ही भीति होती. शिवाय माझ्या मालकाने एकीकडे नेऊन सौम्यपणाने विचारलें असतें तर मी अपराध कबूलही केला असता. मला खरोखर त्या मुलीची दया येत होती व वाईट वाटत होतें. परंतु मालक मला धाकदपटशा दाखवूं लागला. अर्थात् मला अपराध कबूल करण्याची जास्तच भीति वाटूं लागली. या गोष्टीचें पुढे मला फार वाईट वाटलें." यावरून खोटें बोलणें, चोरी करणें वगैरे सवयी लहान मुलांना लागतात त्यांत पुष्कळदा वडील मंडळींचाच दोष असतो असें त्याने सुचविलें आहे. आपल्या पत्नीपासून त्याला एकंदर पांच मुलें झालीं. त्या सर्वांना जन्मापासून त्याने अनाथाश्रमांत ठेविलें. याबद्दल त्याच्यावर निर्दयपणाचा आरोप पुष्कळांनी केला. परंतु त्यासंबंधींही त्याने आपली बाजू स्पष्टपणें मांडली आहे. तो म्हणतो की "माझ्या मुलांवर माझें प्रेम नव्हतें असें कोणी समजूं नये. मी त्यांचें उत्तम रीतीनें संगोपन करण्यास आर्थिक दृष्टया

असमर्थ होतों; माझ्या पत्नीच्या घरचीं माणसें–तिची आई, भावंडें, वगैरे–इतकीं मूर्ख होतीं की त्यांच्याजवळ मुलांना ठेवण्यापेक्षा अनाथाश्रमांतच त्यांना अधिक चांगलें शिक्षण मिळालें असतें!" पुढे मात्र या गोष्टीचा त्याला पश्चात्ताप होत असे असें दिसतें. असो.

रूसोच्या या विलक्षण कबुलीजबाबाबद्दल भिन्नभिन्न मतें आहेत हें सांगितलेंच. त्याच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल त्याची कोणी स्तुति करो वा निंदा करो, त्याचें आत्मचरित्र विकृत मनोवृत्तीचा नमुना आहे असें म्हणून कोणी तें टाकाऊ ठरवो; एक गोष्ट मान्य करावी लागेल, की तें अत्यंत चित्तवेधक आहे. मनुष्याच्या व्यक्तित्वाचें इतकें स्पष्ट व संपूर्ण चित्र क्वचित् पाहावयास मिळेल. त्यास क्वचित् आत्मसमर्थनाचाही वास येईल, परंतु तें अप्रत्यक्षपणें केलेलें दिसेल. तो एके ठिकाणीं म्हणतो की "माझ्या आयुष्यांत निरनिराळे प्रसंग जसे घडले तसे मी वाचकांपुढे मांडीत आहें; म्हणजे कोणीही माझ्यावर आत्मस्तुतीचा, फाजील विनयाचा किंवा आत्मसमर्थनाचा आरोप करूं नये." आणि खरोखर हीच आत्मचरित्र लिहिण्याची खरी पद्धत आहे. चरित्राच्या बाबतींत ज्याप्रमाणे 'A Biographer must never impose but only expose' हा दंडक मानला जातो तसा तो आत्मचरित्राच्या बाबतींतही मानण्यांत आला पाहिजे. आत्मचरित्रकाराला स्वतःबद्दल मत देण्याचें टाळतां येणें अशक्य नाही. दुसरें असें की रूसो याचें चरित्र वाचतांना आपणांस त्याच्या स्वभावांत अनेक प्रकारें विसंगति दिसते. रूसोने ही गोष्ट स्वतः मान्य केली आहे, व ही विसंगति वरवर दिसणारी असून खरोखर तशी नाही हें दाखवून दिलें आहे. लेस्ली स्टीफन हा टीकाकार म्हणतो की ही वरवर दिसणारी विसंगति प्रत्येक मनुष्याच्या जीवनांत असते, व त्याबद्दल वाचकाला आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. चरित्रकार चरित्रनायकाच्या जीवनांतील अशी विसंगति दाखविण्याचें टाळण्याचा प्रयत्न करील, परंतु प्रामाणिकपणें आत्मचरित्र लिहिणारा

मनुष्य न कळत तिचें दिग्दर्शन करीत असतो.

आपल्या वैवाहिक जीवनाबद्दल बहुतेक आत्मचरित्रकार लिहि-ण्याचें टाळतात, किंवा आपल्या पत्नीची मोघम शब्दांत स्तुति करून आपल्या जीवितकार्यांतील तिच्या वाटयापुरतें श्रेय तिला देऊन मोकळे होतात. गृहजीवनाचें यापेक्षा तपशीलवार वर्णन देणें त्यांना प्रशस्त वाटत नसावें. रूसो याने आपल्या पत्नीविषयी बरेंच लिहिलें आहे. आधी आपलें तिच्यावर निस्सीम प्रेम असून पुढे पुढे कांही कारणांनी तिच्यावरचें प्रेम कमी होऊं लागलें होतें असें त्याने स्पष्टपणें मान्य केलें आहे. प्रसिद्ध ग्रंथकार एच्. जी. वेल्स याने आपल्या पहिल्या लग्नाची व घटस्फोटाची हकीकत स्पष्ट शब्दांत वर्णिली आहे. तारुण्या-च्या उन्मादांत ज्या स्त्रीवर त्याचें प्रेम जडलें व जिच्याशीं त्याने विवाह केला ती सर्वच बाबतींत त्याच्याहून भिन्न होती हें मागाहून त्याच्या लक्षांत आलें व पुढे कंटाळून त्याने घटस्फोट घेऊन दुसऱ्या स्त्रीशीं विवाह केला. तो म्हणतो: ‘माझ्या कल्पनेप्रमाणे ती माझी सहचरी होऊं शकेल असें वाटून मोठ्या उत्सुकतेने मी तिच्याशीं विवाह केला. परंतु त्या उत्सुकतेच्या भरांत आमच्या दोघांतील स्वभावभिन्नतेकडे मी दुर्लक्ष केलें. मला लहानपणापासून वाचनाची व अभ्यासाची आवड, तर तिला याची मुळीच आवड नाही. मी लहानपणापासून शाळेंत बुद्धिमान व व्यासंगी मुलगा म्हणून प्रसिद्ध, तर ती याच्या अगदी उलट. तिची दृष्टि संकुचित, तर माझी विशाल; अशा परिस्थितींत हें अंतर भरून काढण्याचा आम्ही पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तें शक्य झालें नाही. शेवटीं घटस्फोट करणेंच आम्हांस श्रेयस्कर वाटलें.’ आपल्याकडे श्रीमती रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या ‘आमच्या आयुष्यांतील कांही आठवणी’ मध्ये रानडे दांपत्याच्या जीवनाचें अत्यंत प्रेमळ चित्र काढलें आहे. परंतु श्री. रमाबाई यांनी आपल्या पतीला देवच बनवून टाकलें आहे. गृहजीवनाचें अत्यंत प्रामाणिक व रमणीय

चित्र जर पाहावयाचें असेल तर श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांचीं 'स्मृतिचित्रें' पाहावीं. कौटुंबिक जीवनाचें इतकें सुंदर चित्र कदाचित जगाच्या वाङ्मयांतही पाहावयास मिळणार नाही. श्रीमती लक्ष्मीबाई यांनी रे. टिळक यांचें चित्र जसें यथातथ्यतेने रंगविलें आहे तसें कोणताही दुसरा मनुष्य रंगवूं शकला नसता. आपल्या पतीचे दोष—त्यांचा विक्षिप्तपणा, नादिष्टपणा, रागीटपणा, संशयी वृत्ति इत्यादि—जरी मोकळेपणाने सांगितले असले तरी रेव्हरंड टिळकांबद्दल वाचकाच्या मनांत कधीही अनादर उत्पन्न होत नाही. कथनाचा ओघ अस्खलित वाहत असून अगदी घरगुती गोष्टी नाट्यात्मक पद्धतीने इतक्या समरसतेने व प्रेमळपणाने सांगितल्या आहेत की जणू कांही आपण एखादा चित्रपट पाहत आहों असा भास व्हावा. स्वतःबद्दल लिहितांनाही विलक्षण तटस्थवृत्ति ठेविली आहे. लहानपणीं लग्न झालें त्या वेळीं 'मला नवल वाटतें तें मी टिळकांना कशी पसंत पडलें याचें. माझें रंग, रूप अगदी बेताचेंच होतें; बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदी जागच्या जागीं होते.' टिळक रागीट होते व पत्नीशीं भांडणाचे प्रसंग वारंवार येत. अशाच एका प्रसंगाचें वर्णन करतांना लक्ष्मीबाई म्हणतात, 'टिळक माझ्यावर खूप संतापले. मीही कांही कमी नव्हतें. मी खाटेवर बसून त्यांच्याशीं खूप भांडलें.' याचा परिणाम काय झाला, तर 'ताबडतोब माझ्यावर एक काव्य तयार झालें. तें अर्थात् मला आवडलें नाही.' लक्ष्मीबाई यांची भाषा व वर्णनपद्धति तर इतकी घरगुती व प्रेमळ आहे की ती पुरुषाला कधीच साधावयाची नाही. वाक्यें लहानलहान व सुटसुटीत. उपमादृष्टांत अगदी स्वैंपाकघरांतून घेतलेले. स्वतःच्या वडिलांच्या विक्षिप्त सोवळ्यासंबंधीं सांगतांना 'सकाळीं शौचानंतर हातपाय धुण्यास त्यांना चार नारळांएवढी माती लागे' असें त्या मजेदार वर्णन करतील; तर सासूबाई मामंजींच्या संसाराला कसा हातभार लावीत ही गोष्ट

'सासूबाई शिवणकाम वगैरे करून मामंजींच्या पिठांत आपलें मीठ घालीत असत' अशा घरगुती रूपकानें सांगतील. लहानपणापासून खेडयांत राहिल्यामुळे व घरांतून कधी बाहेर पडलेली नसल्यामुळे आपणास जगाची कांही माहिती नव्हती, हें सांगतांना 'आगगाडीचे डब्बे म्हणजे लाडवाच्या डब्यासारखे असून आंत माणसें घालून मग झांकण लावीत असावें, अशा तऱ्हेची कल्पना करणारी मी मुलगी !' असें विनोदी वर्णन करतील; तर मध्येच 'तशी मी फार जिवट स्वभावाची व चिवट शरीराची आहें.' असें अनुप्रासयुक्त, सुटसुटीत व रेखीव वाक्य घालतील. असो. भाषापद्धतीचें सौंदर्य सोडून दिलें तरी मोकळेपणा व तटस्थता या दोन गुणांच्या बाबतींत या चरित्रग्रंथाला, महात्मा गांधींचें आत्मचरित्र सोडून दिल्यास, निदान हिंदवी वाङ्मयांत क्वचितच तोड मिळेल.

गृहजीवनाचें वर्णन प्रामाणिकपणें केलें तरी त्यांत एक भाग असा असतो की त्यासंबंधीं पुसट उल्लेख करण्यासही मनुष्याची तयारी नसते. स्वत:च्या जीवनांतील स्त्रीविषयक मोहाचे प्रसंग, प्रेमकथा व इतर लैंगिक अनुभव यांचें वर्णन करण्याइतकें धैर्य फार थोडयांच्या अंगीं असतें. पाश्चात्त्य देशांत प्रियाराधनाचा प्रकार सर्वसामान्य असल्यामुळे तेथील लोकांस त्यांत कांही मनाला धक्का देण्यासारखें वाटणार नाही. परंतु हिंदुस्थानांत लिङ्गविषयक संबंधांच्या बाबतींत वाजवीपेक्षा जास्त सोवळेपणा माजविण्यांत आला असल्यामुळे आपल्याकडील मनुष्याला तसें करण्याचा धीर न होणें साहजिक आहे. प्रसिद्ध इतिहासकार गिबन यानें आपल्या आत्मचरित्रांत आपल्या पहिल्या प्रेमप्रसंगाचें वर्णन केलें आहे. या प्रेमाचें पर्यवसान विवाहांत होऊं शकलें नाही. कारण त्याचा बाप या विवाहाच्या विरुद्ध होता. शेवटीं 'I sighed as a lover and obeyed as a son' असे निराशेचे उद्गार काढून त्यानें हें प्रेमप्रसंग-प्रकरण संपविलें आहे. प्रसिद्ध लिङ्गशास्त्रज्ञ हॅवलॉक एलिस यानें

नुकतेंच आपलें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्याने आपल्या वैवाहिक जीवनाचीच मुख्यत्वेंकरून हकीकत दिली आहे. एलिस व त्याची पत्नी यांनी असें ठरविलें होतें की एकमेकांच्या विवाहबाह्य लैंगिक संबंधाबद्दल उभयतांनी कांही आक्षेप घेऊं नये. एलिस याचें पूर्वी दुसऱ्या एका स्त्रीवर प्रेम होतें व तिच्याशीं त्याने पत्रव्यवहार चालू ठेविला होता. अर्थात् त्याच्या पत्नीला कराराप्रमाणे कांही आक्षेप घेणें शक्य नव्हतें. ती मनांतल्या मनांत चरफडत असे. या चमत्कारिक कराराचें पर्यवसान असें झालें की तिचें पुढील आयुष्य अत्यंत दुःखी झालें. हॅवलॉक एलिस व त्याची पत्नी हीं दोघें एखाद्या सामान्य पतिपत्नीप्रमाणे राहिलीं असतीं तर उभयतां जास्त सुखी होऊं शकलीं असतीं असें म्हणावें लागतें. दुसरें एक लैंगिक विषयांची चर्चा करणारें सुंदर आत्मचरित्र एथेल मॅनिन या बाईचें आहे. यांत हिने अगदी लहानपणापासून आपल्या मनांत लिङ्गविषयक जाणीव हळू हळू कशी उत्पन्न झाली याचें अगदी मोकळेपणाने वर्णन केलें आहे. लहानपणीं शाळेंत असतांना रजोदर्शन, गर्भधारणा, अपत्यजन्म, इत्यादि विषयांसंबंधीं शाळेंतील आठदहा वर्षांच्या मुलींमध्ये कुतूहल उत्पन्न होत असे. त्याबद्दल उघड बोलण्याची चोरी. घरच्या वडील माणसांना विचारावें तर तींही सरळ उत्तर कधी द्यावयाचीं नाहीत. अशा स्थितींत या कुतूहलास विकृत स्वरूप कसें प्राप्त होई याची तिने मोकळेपणाने चर्चा केली आहे. तिचें म्हणणें असें की लिङ्गविषयक गोष्टींना कांही तरी विलक्षण अशा रहस्याचें स्वरूप देऊन वडील माणसें मुलांचें नुकसान करतात. या गोष्टींची लहानपणापासून मुलांना माहिती करून दिली तर त्यांना त्यांविषयीं विकृत स्वरूपाचें कुतूहल राहणार नाही. वैवाहिक जीवनांतही पतिपत्नींच्या हृदयैक्यास महत्त्व जास्त देण्यांत येतें व प्रत्यक्ष शारीरिक संबंधाला गौणत्व देण्यांत येतें ही चूक आहे. तिच्या मतें शरीराचें पूर्ण ऐक्य झाल्याशिवाय हृदयाचें ऐक्य होणें शक्य नाही.

"A little more going to bed with the right person would be of great value to the majority of women in this country"—योग्य पुरुषाशीं शरीरसंबंध होणें हें स्त्रियांना अत्यंत आवश्यक आहे, असें तिने स्पष्ट लिहिलें आहे. लैङ्गिक विषयांची आत्मचरित्रांत इतक्या स्पष्टपणें चर्चा करणें हें आक्षेपार्ह नाही; एवढेंच की ती चर्चा शुद्ध शास्त्रीय भूमिकेवरून करावी. इसाडोरा डंकन या प्रसिद्ध नर्तिकेने आपल्या आत्मचरित्रांत आपल्या निरनिराळ्या प्रेम-संबंधांची माहिती दिली आहे; इतकेंच नव्हे तर पुरुषाशीं प्रथम शरीर-संबंध झाला त्यावेळचा अनुभव तपशीलवार दिला आहे. यासंबंधी एथेल मॅनिन हिने असें म्हटलें आहे की आपल्या प्रेमसंबंधांची नुसती यादी व तपशील देणें हें गौण आहे; लिङ्गविषयक अनुभवाचें सार हें खरें महत्त्वाचें असतें. किती निरनिराळ्या पुरुषांशीं किंवा स्त्रियांशीं आपला संबंध आला याची यादी देऊन प्रत्येक संबंधाचें तपशीलवार वर्णन देणें हें विकृत मनोवृत्तीचें लक्षण होय. त्यासंबंधाने आलेल्या लैङ्गिक अनुभवाची मानसशास्त्रीयदृष्ट्या चर्चा करणें हें महत्त्वाचें होय. एथेल मॅनिन हिचें *Confessions and Impressions* य नांवाने लिहिलेलें आत्मचरित्र या दृष्टीने वाचण्यासारखें आहे.

स्त्रीपुरुषसंबंधाची मोकळेपणाने चर्चा करणारें हिंदवी वाङ्मयांतील एकमेव आत्मचरित्र महात्मा गांधी यांचें होय. गांधी यांचें आत्म-चरित्र हें निरनिराळ्या 'प्रयोगांचा' चा इतिहासच आहे, तेव्हा त्यांत स्त्रीविषयक आकर्षण व ब्रह्मचर्यासंबंधींचे प्रयोग यांची माहिती आली असल्यास आश्चर्य नाही. ही माहिती देण्यांत महात्मा गांधी यांनी दर्शविलेला प्रामाणिकपणा व स्पष्टपणा केवळ अपूर्व आहे. श्री. किशोरलाल मश्रूवाला यांनी काढलेले "चरित्रग्रंथांत याला जोड नाही; याचें कारण एकच आहे की या ग्रंथाच्या ओळीन् ओळींत सत्योपासनेचें चिंतन भरलेलें आहे; यांतील सौंदर्य लेखनकलेमुळे आलें नसून सत्याच्या

ओजामुळे आलें आहे," हे उद्गार कोणासही मान्य होण्यासारखे आहेत. वैवाहिक जीवनाच्या सुरवातीस कोणाचीही कामेच्छा तीव्र असूं शकते; परंतु पित्याला शेवटची घरघर लागली असतांना काकांच्या सांगण्याची पडत्या फळाची आज्ञा घेऊन शयनगृहांत पत्नीकडे धाव घेणारा पुत्र विलक्षणच म्हणावयाचा—आणि तें प्रामाणिकपणें कबूल करणारा तर अलौकिक मनुष्यच म्हणावयास पाहिजे ! तें शल्य कायमचें मनाला बोचत राहिल्याचें महात्मा गांधी यांनी नमूद केलें आहे. "सेवाने समये पण विषयेच्छा. ए काळो डाघ हुं आजसुधी घसी शक्यो नथी–भूली शक्यो नथी" (सेवेच्या समयींही विषयेच्छा. हा काळा डाग मी आजपर्यंत घासून काढूं शकलों नाही, विसरूं शकलों नाही.) 'ब्रह्मचर्य' या प्रकरणांत पत्नीशीं पतीने कशा प्रकारचा संबंध ठेवावा याची चर्चा केली आहे. ब्रह्मचर्य म्हणजे विषयवासनेचा त्याग. विषयवासना कायम आहे तोंपर्यंत पत्नीशीं एकनिष्ठ असणें याला सुद्धा स्वाभाविक भावनेपेक्षा जास्त किंमत नाही. ब्रह्मचर्याचें पालन करण्याचा स्वतःचा प्रयत्न अनेकदा फसला; स्वतंत्र खाटा ठेवल्या, तरी संयम पाळणें कल्पनेच्या बाहेर बिकट वाटलें; रात्रींताबडतोब झोप लागावी म्हणून दिवसभर खूप काम करण्याचें ठरविलें व अगदी थकून गेल्यानंतरच झोपण्याचें ठरविलें; तरी यश येईना. परंतु या अयशस्वी प्रयत्नानेच शेवटीं बळ दिलें; व पुढे कित्येक वर्षांनी 'वासना माझ्यावर कुरघोडी करण्यास असमर्थ झाली.' पुढे वीस वर्षें पूर्ण ब्रह्मचर्याचा आनंद लुटला; परंतु त्याचा कठीणपणा जागवत नव्हता असें नाही. वयाच्या छप्पन्नाव्या वर्षींही निरंतर जागृतपणाची आवश्यकता भासतच होती. या सर्व गोष्टी प्रामाणिकपणें मांडतांना हेंही मान्य केलें आहे की सुरवाती सुरवातीला ब्रह्मचर्यपालनाचा जो प्रयत्न केला त्यांतील उद्देश फारसा उच्च नव्हता. ब्रह्मचर्याकरितां ब्रह्मचर्य हा उद्देश नसून केवळ प्रजोत्पत्ति थांबविणें हाच हेतु होता. त्या हेतूंतील गौणत्व त्यांनी मान्य केलें आहे. पुढे संयमाचें

महत्त्व कळलें व त्या दिशेने त्यांनी प्रयत्न सुरू केले. या प्रयत्नांचा इतिहास हा गांधींच्या चरित्रांतील एक अत्यंत उज्ज्वल भाग आहे.

याव्यतिरिक्त सत्य, अहिंसा, आहार, इत्यादिकांसंबंधींही जे प्रयोग त्यांनी केले त्यांचा इतिहास वाचला म्हणजे गांधींच्या प्रामाणिकपणाचें व निर्दय आत्मपरीक्षणाचें त्यांच्या शत्रूंना देखील कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाही. आपले दोष स्पष्टपणें लोकांपुढे मांडण्यांत त्यांनी दाखविलेलें मनोधैर्य व प्रामाणिकपणा, व आपले गुण तितक्याच स्पष्टपणें परंतु नम्रतेने सांगण्यांत दिसून येणारा दुर्दम्य आत्मविश्वास, हीं पाहून वाचक आश्चर्यचकित होतो. कांही प्रसंगीं केलेली स्वतःच्या मनाची फसवणूक नमूद करावयास त्यांनी सोडलेलें नाही. गाईम्हशींवर फुंकारीची क्रिया होते म्हणून दूध वर्ज करण्याची प्रतिज्ञा केली; परंतु एका मोठ्या आजारांत मरणोन्मुख अवस्था झाली असतां डॉक्टरनी दूध घेण्याची आज्ञा केली; रौलट ॲक्टविरुद्ध सत्याग्रहाचा लढा करावयाचा होता आणि त्याकरितां स्वतःच्या उपस्थितीची आवश्यकता भासत होती; त्याकरतां जगणें आवश्यक होतें; गाईम्हशीचें दूध न घेण्याची प्रतिज्ञा केली असली तर शेळीचें दूध घ्यावयास काय हरकत? असा विचार करून शपथेला मोकळें होणें शक्य होतें. शेवटीं "जीववानी आशाए में मनने जेमतेम फोसलावी लीधुं. व्रतनो अक्षर पाळ्यो ने बकरीनुं दूध लेवा निश्चय कर्यो. मारा व्रतनो आत्मा हणायो." (जगण्याच्या आशेने मी कशीतरी मनाची फसवणूक केली. व्रताचें अक्षर पाळलें व बकरीचें दूध पिण्याचा निश्चय केला. माझ्या व्रताच्या आत्म्याचा घात झाला.) आपल्या मनोमंथनाचें इतकें खोल निरीक्षण, व त्याचें तटस्थतेने केलेलें आलेखन केवळ अद्वितीय आहे. यांतच गांधींच्या आत्मचरित्राचा थोरपणा आहे. कोठेही फाजील आत्मसमर्थन सापडावयाचें नाही, फाजील विनय दिसावयाचा नाही व आत्मप्रौढीचा तर गंधही मिळावयाचा नाही. गांधींच्या 'सत्याचे प्रयोगा' इतकें महान्

आत्मचरित्र कोणत्याही भाषेंत अद्यापि माझ्या वाचण्यांत आलेलें नाही.

चरित्रवाङ्मयावरील निबंधांत असें म्हटलें आहे की मराठी भाषेंत उत्कृष्ट चरित्रग्रंथ जवळजवळ नाहीतच. आत्मचरित्राच्या बाबतींत मात्र तसें म्हणतां यावयाचें नाही. १८७१–७२ सालीं लिहिलेल्या दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रापासून आजपर्यंत मराठी भाषेंत सात आठ तरी नांव घेण्यासारखीं आत्मचरित्रें लिहिलीं गेलीं आहेत. या सर्वच ग्रंथांत प्रामाणिक आत्मपरीक्षण भरपूर दिसून येतें. त्यांपैकी कांहींचा या ठिकाणीं उल्लेख करावासा वाटतो. १९१५ सालीं प्रसिद्ध झालेलें व पुढे १९२८ सालीं वाढवून सुधारलेल्या स्वरूपांत बाहेर पडलेलें श्री. कर्वे यांचें 'आत्मवृत्त' मराठी भाषेंतील पहिल्या प्रतीच्या आत्मचरित्रग्रंथांत मोडण्यासारखें आहे. श्री. कर्वे हे अत्यंत भिडस्त व विनयशील म्हणून प्रसिद्ध आहेत. या त्यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब 'आत्मवृत्तां'त स्पष्ट दिसतें. आपले गुणदोष त्यांनी स्पष्टपणें लोकांपुढे मांडले आहेत; इतकें असून स्वाभाविक विनयामुळे ते प्रस्तावनेंत म्हणतात, "या आत्मवृत्तांत एक मोठी उणीव राहिलेली आहे. आपले दोष व आपल्या दोषास्पद कृति दुसऱ्याला सांगणें कोणाला आवडत नाही, या मनुष्यस्वभावाला मी अपवाद नसल्यामुळे, त्यांचा व्हावा तसा उल्लेख यांत झाला नाही. तथापि सामान्य मनुष्यांत आढळणारे दोष माझ्यांत आहेत व त्यांना अनुरूप कृति देखील माझ्या हातून घडल्या आहेत." परंतु हा केवळ विनयाचा भाग आहे. आपले नुसते दोषच नव्हे तर क्वचित् प्रसंगीं घडलेले फजितीचे प्रसंगही ज्या मनुष्यानें प्रामाणिकपणें सांगितले आहेत त्याच्यावर दोषापलापाचा आरोप कोणीही करणार नाही. मराठी सहावीच्या परीक्षेकरितां मोठ्या अडचणीनें पोचल्यानंतर केवळ कृशपणामुळे वयाचा आक्षेप घेऊन परीक्षेला बसूं दिलें नाही, त्यावेळचा मुखदुर्बळपणामुळे व भित्रेपणामुळे ओढवलेला प्रसंग बोलून चालून बालपणचा; त्यांत लाज वाटण्यासारखें

कांहीं नाहीं. परंतु पुढे महिला–विद्यापीठाच्या स्थापनेकरितां प्रचारास निघाले असतां कलकत्त्याच्या मुक्कामांत एका सभेंत आपल्या भाषणानंतर एका मागून एक उपवक्त्यांनी विरोध करावयास सुरवात केल्याबरोबर आपली गाळण उडाली व आपण त्यांना उत्तर देऊं शकलों नाहीं, हें सांगून 'कलकत्ता येथे माझी चांगलीच फजिती उडाली,' असें उघड-पणें मान्य करण्यास विशेष प्रकारचा प्रामाणिकपणा व धैर्य पाहिजे यांत शंका नाहीं. कर्वे यांच्या 'आत्मवृत्तां'त–विशेषतः मागाहून जोडलेल्या पुरवण्यांमुळे द्वितीय आवृत्तींत–कांहीसा विस्कळीतपणा दिसला तरी स्वभावदर्शनाच्या दृष्टीने तें चांगलें झालें आहे असें कोणीही कबूल करील.

आपल्या जीवनयात्रेचें 'प्रवासवर्णन' लिहून आपल्या अनुभवांत वाचकवर्गाला अंशभागी करण्याच्या हेतूने लिहिलेल्या श्री. न. चिं. केळकर यांच्या 'गतगोष्टी' या उत्कृष्ट आत्मचरित्रांत मोडण्यासारख्या आहेत. जवळजवळ चाळीस वर्षें सार्वजनिक जीवनांत घालविलेल्या केळकरांसारख्या पुढाऱ्याच्या आत्मचरित्रांत तत्कालीन महाराष्ट्राचा इतिहास पहावयास सापडल्यास नवल नाहीं; व 'मी व्यक्ति आणि समाज ही समष्टि यांचा जो संबंध आला तीच माझी जीवनयात्रा' असल्यामुळे त्या जीवनयात्रेचें वर्णन बरेंच मोठें, गुंतागुंतीचें व कांहीसें विस्कळीत व्हावें हेंही साहजिक आहे. असें जरी असलें तरी केळकरांच्या कसलेल्या लेखणीने त्यांत भरपूर लालित्य ओतलें आहे. विशेषतः प्रस्तावनेदाखल त्यांनी लिहिलेल्या 'हृद्‌गता'चा कांही भाग केळकरांच्या ललितमधुर भाषाशैलीचा व पूर्णोन्मीलित कल्पनाशक्तीचा उत्कृष्ट मासला आहे. आत्मचरित्रांत ठिकठिकाणीं केळकरांच्या ठायीं असलेली अभिजात विनयशीलता, प्रामाणिकपणा व दुर्दम्य आत्मविश्वास यांची प्रचीती मिळते. आपल्या आयुष्यांत मिळालेल्या यशाबद्दल ते म्हणतात: "मला मिळालेलें स्थानच असें होतें की अंगीं एकपट गुण असला तर

तो पांचपट उठून व खुलून दिसावा. आता माझ्यासंबंधाने कदाचित असेंही म्हणतां येईल की 'कांही गुण सोन्याचा तर कांही सोनाराचा' या म्हणीप्रमाणें माझ्या यशाचा कांही वाटा मला मिळालेल्या विशेष अनुकूल परिस्थितीला असेल, तर कांही वाटा त्या परिस्थितीचा चांगला उपयोग करून घेणाऱ्या मला असेल, तथापि केवळ बुद्धिमत्ता, कर्तृत्व, व्यवहारचातुर्य यांच्या दृष्टीने पाहतां मी बरोबरीच्या इतर लोकांहून श्रेष्ठ किंवा अलौकिक ठरणार नाही." पुढे एके ठिकाणीं ते म्हणतात: "मी महत्त्वाकांक्षी असा केव्हाच नव्हतों. पण नशीबवान् खरा! म्हणूनच पुढील आयुष्यांतील सापेक्ष उत्कर्ष आपण होऊन वेळोवेळीं माझ्या पदरांत पडत गेला. दैवाने असा हात न देतां मला त्याने इतर लोकां-प्रमाणे गोते दिले असते, तर माझी होडी कोणत्या किनाऱ्याला लागली असती हें सांगणें कठीण आहे." आपल्या नेमस्त स्वभावाबद्दल बोलतांना "स्वत:ला पचेल व पश्चात्ताप न होईल तितकेंच करावें आणि प्रामाणिकपणें वाटेल तेंच बोलावें, असा माझा स्वभाव असल्यामुळे मी शर्यतींतल्या घोड्याप्रमाणें राजकारणाच्या रंगणांत धावलों नाही" असे किंचित् आत्मसमर्थनपर उद्गार त्यांनी काढले असले तरी "एकांतिक मतें नाहींत म्हणून घडाडी नाही, ध्येयनिष्ठा असली तरी तिच्या मर्यादा पाहण्याकडे दृष्टि, स्वपक्षसमर्थन असलें तरी प्रतिपक्षाच्या अंगचे गुण घेण्याची फाजील न्यायबुद्धि, इत्यादि अनेक गुणमिश्रित दोष माझ्यामध्ये होते" असा कबुलीजबाब देण्याचा त्यांनी प्रामाणिक पणाही दाखविला आहे. या सर्व पंक्तींत त्यांनी आपल्या जीवनाचें केलेलें कठोर आत्मपरीक्षण दिसून येतें. केळकरांच्या आत्मचरित्रांत एकच मोठा दोष आहे, व तो हा की आत्मनिरीक्षण करतांना सर्वत्र जितकी तटस्थवृत्ति ठेवावयास पाहिजे तितकी ते ठेवूं शकले नाहीत. स्वत:च्या अंगचे दोष दर्शवितांना त्यांनी जितकी कठोरता व आत्मविश्लेषणवृत्ति दाखविली आहे तितकी पुढे स्वत:चें राजकीय जीवन वर्णन करताना

त्यांच्यांत राहिली नाही आणि शेवटीं तर 'आत्मनिरीक्षणा'ला स्वतःच्या बचावादाखल केलेल्या आत्मसमर्थनाचें स्वरूप येऊन त्या आत्मसमर्थनाच्या भरांत त्यांचा तोल सुटल्यासारखा झाला आहे. हिंदी लेखक श्री. जैनेंद्रकुमार यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या आत्मचरित्राबद्दल जे उद्गार काढले आहेत ते केळकरांच्या आत्मचरित्रालाही लागू पडतात. म्हणजे असें की जोंपर्यंत त्यांनी आपल्या पूर्वायुष्याचें वर्णन केलें आहे तोंपर्यंत त्यांनी तटस्थवृत्ति कायम ठेविली आहे व तो सर्वच भाग अत्यंत रमणीय उतरला आहे; परंतु ज्या ठिकाणीं ते राजकारणाच्या प्रांतांत शिरले आहेत व आपले मतभेद वर्णू लागले आहेत त्या ठिकाणीं त्यांची स्वत्वाची जाणीव उसळी मारून वर आल्यासारखी वाटते, व शुद्ध भावनेची जागा वासनेने घेतल्यासारखें वाटतें. हा दोष जरी असला, तरी, भाषेचें व वर्णनाचें लालित्य, कथनांतील खेळकरपणा व आत्मपरीक्षणांतील मार्मिकता इत्यादि गुणांमुळे केळकरांचें आत्मचरित्र कोणत्याही भाषेंतील आत्मचरित्रवाङ्मयांत महत्त्वाचें स्थान मिळवील यांत शंका नाही.

यापेक्षाही स्वत्वाच्या वाजवीपेक्षा जास्त जाणिवेने किंचित् डागळलेला आणखी एक आत्मचरित्रग्रंथ श्री. पांगारकर यांचा 'चरित्रचंद्र' हा होय. हा ग्रंथ अत्यंत तन्मयतेने व प्रेमळपणाने लिहिलेला आहे, परंतु त्यांतील स्वसमरसता इतक्या थरास गेली आहे की स्वतःच्या रूपावरच मोहित झालेल्या नार्सिससची पांगारकर आठवण करून देतात. आपल्या अंगचे दोष पाहण्याइतकी तटस्थवृत्ति केळकरांच्या अंगीं जशी आहे तशी पांगारकरांच्या अंगीं नाही हें 'चरित्रचंद्रा'वरून स्पष्ट दिसतें. 'मी माझ्या निंदकांचीही निंदा केली नाही', 'कोणाचें मन दुखवूं नये म्हणून मी पुष्कळ सत्यकथा गाळल्या आहेत,' वगैरे हॅम्लेट मधील My lady protests too much च्या धर्तीवर केलेलीं विधानें प्रस्तावनेंत घालूनही कोठे 'अपटुडेट पोषाख घातलेल्या'अलीकडील कॉलेज

तरुणाची, कोठे '१९३७ सालांतील धर्माचें वाटोळें करायला निघालेल्या' भाई लोकांची, तर कोठे 'घरच्या बायकोला लाथा मारून, फुकट प्रेमगीतें गाणाऱ्या' कवित्रुवांची, टवाळी करण्याचा मोह त्यांनी आवरलेला दिसत नाही. या टवाळीबद्दल अर्थात् कोणाला वाईट वाटण्याचें कारण नाही, परंतु त्यावरून एवढेंच दिसतें की स्वतःवर बेहद्द खूष असलेल्या पांगारकरांना स्वतःहून वेगळे मार्ग अनुसरणाऱ्यांकडे तटस्थवृत्तीने पाहतां येत नाही. या बाबतींत महात्मा गांधी व पांगारकर हीं दोन टोकें आहेत. गांधींच्या आत्मचरित्रांत पावलोपावलीं निर्दय आत्मनिरीक्षण केलेलें सांपडेल, तर पांगारकरांनी जणू कांही प्रेमाच्या भरांत स्वतःलाच घट्ट आलिंगन दिलें असल्यामुळे आपल्या अंतःस्वरूपाकडे दृष्टि वळवून तटस्थपणें आत्मविश्लेषण करणें त्यांना अशक्य होऊन बसलें आहे असें वाटतें. गांधी किंवा केळकर यांनी स्वतःच्या गुणांचें वर्णन करण्याचें टाळलेलें नाही, परंतु त्यांच्या स्वगुणवर्णनांत आत्मविश्वास प्रतीत होतो; पांगारकर जेव्हा आपल्या गुणांचें वर्णन करतात तेव्हा त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत असाव्या किंवा गुदगुल्या होत असाव्या असा भास होतो. पांगारकरांच्या आत्मचरित्राला जर कशाने खरी शोभा आली असेल तर ती त्यांच्या प्रेमळ व रसाळ कथनपद्धतीने. याबद्दल पांगारकरांची प्रसिद्धिच आहे. शिवाय आपल्या अंतःकरणांत हरिभक्तीचा उदय व विकास कसा झाला व त्यामुळे पुढे जुन्या मराठी संतवाङ्मयाचें अध्ययन करण्याची स्फूर्ति आपणास कशी झाली, इत्यादि गोष्टींचा जो इतिहास त्यांनी सांगितला आहे, त्यांत असत्य किंवा अतिशयोक्त असें कांही सापडावयाचें नाही; व पांगारकरांनी केलेल्या मराठी भाषेंतील प्रचंड व बहुमोल कार्याबद्दलही सर्वांस आदर आहे; यामुळे त्यांचा 'चरित्रचंद्र' वाचनीय झाला आहे.

स्वतःबद्दल लिहिणें हें एका दृष्टीने अत्यंत सोपें व एका दृष्टीने अत्यंत कठीण कसें आहे हें आतापर्यंतच्या विवेचनावरून ध्यानांत

आलें असेल. स्वतःबद्दल आपल्याला सर्वांत जास्त माहिती असते म्हणून तें सोपें असतें, व स्वतःबद्दल तटस्थवृत्ति ठेवणें अत्यंत कठीण म्हणून तें कठीण होऊन बसतें. तटस्थवृत्तीच्या अभावीं सत्याला किंचित् मुरड घालण्याचा किंवा क्वचित् प्रसंगीं कांही गोष्टी कल्पनेने निर्माण करण्याचा मोह आवरणें फार कठीण असतें. प्रसिद्ध जर्मन कवि गटे याने आपल्या आत्मचरित्राला 'Poetry and Truth' असें नांव दिलें आहे; या नांवांतच आपलें चरित्र सत्य व काव्य यांचें मिश्रण आहे असा स्पष्ट कबुलीजबाब दिल्यासारखा नाही काय? असो. 'प्रत्येक मनुष्याने स्वतःचें चरित्र स्वतःच लिहावें' असें डॉक्टर जॉनसन म्हणत असे. त्याचा अर्थ एवढाच की आपल्या जीवनाबद्दल खरी हकीकत लोकांना कळावी अशी मनुष्याची इच्छा असेल तर ती दुसऱ्याने सांगितल्यापेक्षा स्वतः सांगितलेली बरी. आपल्या बाह्य जीवनासंबंधीं संपूर्ण माहिती आपणास नसेल, परंतु आपल्या आयुष्यांत घडलेल्या अनेक गोष्टींची पार्श्वभूमि व आपल्या निरनिराळ्या कृत्याचे हेतु, या गोष्टी आपणाशिवाय दुसरा कोण सांगूं शकेल? आपला चरित्रकार भिडेखातर ज्या गोष्टी सांगण्यास कचरेल त्या गोष्टी आपण मोकळे-पणाने सांगूं शकतों. एरव्ही रूसोसारखा थोर मनुष्य लहानपणीं चोऱ्या करीत असे ही गोष्ट आपणास कशी कळली असती? आपण चोरी करून एका गरीब मोलकरणीवर आळ घेण्याचें नीच कृत्य रूसोने केलें हें जरी त्याच्या चरित्रकाराने स्पष्टपणें नमूद केलें, तरी त्या कृत्यापाठी-मागील पार्श्वभूमि स्पष्ट करणें व त्या वेळच्या आपल्या मनःप्रवृत्तीचें विश्लेषण करणें हें रूसोला स्वतःलाच शक्य आहे. आपल्या पांचही मुलींना जन्मतःच अनाथाश्रमांत ठेवणाऱ्या बापाला कोणीही निर्दयच म्हणेल, परंतु त्याबद्दल रूसोप्रमाणे स्पष्टीकरण त्या बापाने दिल्यानंतर आपला गैरसमज दूर होऊं शकेल. चरित्रकार चरित्रनायकाच्या जीवनां-तील ठळकठळक प्रसंगांचें वर्णन करतो; त्याच्या मनांत उद्भवलेल्या

बऱ्यावाईट विचारांचा उल्लेख करण्यास तो असमर्थ असतो; त्यामुळे पुष्कळ वेळां एखाद्याचें चरित्र वाचल्यानंतर 'मनुष्य आपल्यासारख्या सामान्य माणसापेक्षा वरच्या दर्जाचा आहे' असा विचार वाचकाच्या मनांत येऊं शकतो. चरित्र हें पुष्कळ वेळां मनुष्याच्या दगडी पुतळ्या-सारखें असतें. त्यावरून त्याच्या अंतःकरणाची कल्पना येऊं शकत नाही. महात्मा गांधींचीं तीन चित्रें उदाहरणादाखल घेऊं. एक त्यांचा पुतळा किंवा चित्र घ्या. 'एक मधला दात पडलेलें, अर्धवट उघडलेलें स्मितयुक्त मुख, टक्कल पडलेलें डोकें, जरासे रुंद कान, नाकावर जरा पुढें सरकवून ठेवलेल्या चष्म्यापाठीमागे लुकलुकणारे तेजस्वी व हसरे डोळे' यांत प्रतीत होणारें त्यांचें व्यक्तित्व; "गांधी हे सत्याचे पुजारी आहेत, अहिंसेचे उपासक आहेत, 'सर्वभूतहिते रतः' अशा साधुवृत्तीचे आहेत" अशा शब्दांनी त्यांच्या एखाद्या चरित्रकाराने केलेल्या वर्णनांत प्रतीत होणारें त्यांचें व्यक्तित्व; आणि "रात्रीं साडेदहा किंवा अकरा वाजले असावे. मी पाय चेपीत बसलों होतों. काकांनी मला सांगितलें, 'तूं जा, आता मी बसतों.' मी खूष झालों. आणि सरळ शयनगृहामध्ये गेलों. पत्नीला बिचारीला गाढ झोप लागली होती. परंतु मी कसा झोपूं देणार? मी तिला जागी केली." या पित्याच्या मृत्यूच्या वेळच्या वर्णनांत, किंवा "जोंपर्यंत कोणत्याही पशूचें दूध मनुष्याचा आहार या नात्याने निषिद्धच आहे असें मला वाटतें, तोंपर्यंत तें घेण्याचा अधिकार मला पोचत नाही; हें कळत असून मी बकरीचें दूध घ्यावयास तयार झालों. सत्याच्या पुजाऱ्याने सत्याग्रहाच्या लढाईसाठी जगण्याची इच्छा करून सत्याला कलंक लाविला" या स्वतःच्या प्रतिज्ञाभंगाच्या वर्णनांत दिसून येणारें त्यांचें व्यक्तित्व; यांत कोणतें अधिक सुस्पष्ट, सत्यपूर्ण व सुंदर दिसतें? आत्मचरित्रांतील आलेखनांत जो स्वभाविकपणा व जिवंतपणा दिसतो तो चित्रामध्ये किंवा चरित्रामध्ये क्वचितच दिसूं शकेल.

शिवाय आत्मचरित्रकार सुप्रसिद्ध लेखक असला तर त्याच्या

लेखनासंबंधीं मनोरंजक व उपयुक्त माहिती त्याच्या आत्मचरित्रांत मिळू शकते. जोसेफ कॉनरॅड या सुप्रसिद्ध दर्यावर्दी कादंबरीकाराने *A Personal Record* या नांवाने आत्मचरित्र लिहिलें आहे. त्यांत त्याने आपल्या Almayer's Folly या नांवाच्या कादंबरीच्या जन्मासंबंधीं मनोरंजक हकीकत दिली आहे. या कादंबरीच्या कथानकांत विस्कळीतपणाचा दोष एखाद्याला आढळला आणि पुढे लेखकाच्या आत्मचरित्रावरून जर त्याला असें कळलें की ही कादंबरी लिहीत असतांना लेखक प्रवासांत असून निरनिराळ्या संकटांत सापडल्यामुळे त्यांतील कांही प्रकरणांच्या लेखनांत कित्येक महिन्यांचें वा वर्षांचें अंतर पडलें होतें तर त्याला मौज वाटेल व दोषाचेंही कांही अंशीं स्पष्टीकरण झाल्यासारखें वाटेल. प्रसिद्ध इतिहासकार गिबन याने आपल्या आत्मचरित्रांत *Decline and Fall of the Roman Empire* या आपल्या प्रचंड ग्रंथाची कल्पना आपणास कशी सुचली याचें थोडक्यांत पण मार्मिक वर्णन केलें आहे. '१५ आक्टोबर १७६४ हा तो दिवस. त्या दिवशीं रोम शहरांतील भग्न अवशेषांजवळ बसलों असतां या शहराचा उदय व नाश यांचा इतिहास लिहिण्याची कल्पना मला प्रथम सुचली.' हळूहळू आराखडा तयार झाला, परंतु चार वर्षेंपर्यंत जवळजवळ कांहीच लिहून झालें नाही. थोडेंसें लिहावें, पण तें पसंत न पडून पुन्हा फाडून टाकावें, असें कित्येक दिवस चाललें होतें. शेवटीं ज्या दिवशीं प्रथम कल्पना सुचली त्या दिवसानंतर बारा वर्षांनी पहिला खंड बाहेर पडला ! आणि पुढे बारा वर्षांनंतर सर्व खंड लिहून पूर्ण झाले. शेवटल्या खंडाचें शेवटलें वाक्य लॉसेन या शहरीं मध्यरात्रीच्या सुमारास लिहून झालें, त्या वेळीं आपणास काय वाटलें याचें जें वर्णन गिबन याने केलें आहे तें उत्कृष्ट काव्यांत मोडेल. एच्. जी. वेल्स याने आपल्या आत्मचरित्रांत शेलेने पुरस्कृत केलेल्या अनिर्बद्ध प्रेमाच्या कल्पनेने आपणास कसें भारून टाकिलें होतें व त्यामुळे अशा तऱ्हेचें प्रेम ज्या

स्त्रियांकडून मिळूं शकेल अशा मोकळया मनाच्या, धीट व स्वावलंबी स्त्रियांचीं चित्रें आपण मनांत कशीं रंगवीत असूं, याचें वर्णन केलें आहे. या वर्णनावरून वेल्स याच्या कादंबरींतील कांही स्त्रीपात्रांच्या स्वभावचित्रणाचें मूळ कशांत होतें हें लक्षांत येण्याजोगें आहे. प्रत्येक प्रसिद्ध लेखकानें आत्मचरित्र लिहून आपल्या लेखनासंबंधीं अशी बारीक व एरव्ही न कळण्यासारखी माहिती सांगितली तर वाङ्मयाच्या अभ्यासकांना ती उपयुक्त व मनोरंजक वाटेल.

उपयुक्ततेची व मनोरंजनाची बाजू सोडून दिली तरी केवळ स्वतःच्या समाधानाकरितां मनुष्याने अवश्य आत्मचरित्र लिहावें असें मी म्हणेन. त्यांत अडचणी अनेक असतात, आत्मश्लाघेचा आरोप होण्याचाही संभव असतो, परंतु त्या अडचणी पार करून व आक्षेप टाळूनही आत्मचरित्र लिहिणें शक्य आहे, इतकेंच नव्हे तर इष्ट आहे. प्रत्येक मनुष्याने मरणापूर्वी मृत्युपत्राप्रमाणे आत्मचरित्रही लिहून ठेवावें असें जें एका लेखकानें थट्टेने का होईना, म्हटलें आहे, तें विचारणीय आहे. श्री. जैनेंद्रकुमार यांनी म्हटल्याप्रमाणे आत्मचरित्र लिहिणें हें एक प्रकारें आत्मदान वा आपल्या अनुभवांचें समर्पण आहे. कोणी म्हणेल की दुसऱ्याच्या जीवनांतील घटना जाणण्यांत किंवा माझ्या जीवनांतील घटना दुसऱ्याला सांगण्यांत फायदा काय? तसें पाहिलें तर प्रत्येकाच्या जीवनांतील घटना व परिस्थिति वेगवेगळया असतात. परंतु त्यापासून फायदा एवढाच की दुसऱ्याच्या जीवनांत आपणास आपलें प्रतिबिंब थोडयाशा प्रमाणांत कां होईना पाहावयास मिळतें व पुष्कळ वेळां त्यापासून मनाला समाधान मिळतें. प्रत्येकाच्या आयुष्यांतील घटना वेगळया असल्या तरी सगळीकडे जीवनतत्त्व एकच आहे. एक मनुष्य दुसऱ्यापासून जर कांही मिळवूं शकत असला तर तो त्याचा आत्मानुभव होय, त्याची महत्ता नव्हे. चरित्रलेखनाप्रमाणेच आत्मचरित्रलेखन पुढील पिढीला तत्कालीन इतिहासाचें व थोर

पुरुषांचें यथातथ्य ज्ञान व्हावें या दृष्टीनेही आवश्यक आहे. परंतु हीही उपयुक्ततेची दृष्टि झाली. खरा आनंद आत्मसमाधानाचाच असतो. केळकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'आयुष्याअखेरच्या स्मृतिरूपी चांदण्यांत गतजीवनाचा जो काय स्थूल देखावा दिसेल तो पाहून समाधान पावण्या'चा सर्वांत सोपा व उत्तम मार्ग म्हणजे आत्मचरित्र लिहिणें हा होय.

# प्रमुख संदर्भ ग्रंथ वा लेख


1 *Harold Nicholson* : Development of English Biography.

2 *Andre' Maurois* : Aspects of Biography.

3 *Sydney Lee* : Perspective of Biography. ( Lecture ).

4 *A. J. A. Symons* : Tradition in Biography.

5 *Osbert Burdett* : Experiment in Biography. (Both the Articles in *Tradition & Experiment in Literature*)

6 *Havelock Ellis* : An open letter to Biographers.

7 *Van Wyck Brooks* : Thoughts on Biography.

8 *Encyclopædia Britannica* : ( 14th Edition ) Article on Biography.

९ श्री. ना. बनहट्टी : चरित्रवाङ्मय ( 'अर्वाचीन मराठी साहित्य' या ग्रंथांत समाविष्ट केलेला प्रबंध )

# टीका

## [ १ ]

टीकेबद्दल कांहीही लिहिण्यापूर्वी एक सावधगिरीची सूचना मनांत बाळगावयास पाहिजे. टीकेची टीका करतांना एक मोठी अडचण भासते. ही अडचण टीकेपुरतीच नसून सर्वच प्रकारच्या सारस्वताला किंवा शब्दसाधनेला ती कमी अधिक प्रमाणांत जाणवते. कलेला कमी, शास्त्राला जास्त. त्या अडचणीचें स्पष्टीकरण आरंभीं आवश्यक आहे.

ती अडचण म्हणजे भाषा. म्हणजे समर्पक, सूचक शब्दयोजना.

संस्कृतीच्या शैशवावस्थेंत माणसाने भाषा-संस्था निर्मिली. त्यामुळे विचार व्यक्तविण्याचें सौकर्य त्याला लाभलें. हृदयांत व मेंदूंत दडून बसलेल्या पण स्वस्थ न बसूं शकणाऱ्या भावनांना व कल्पनांना शब्दांची पंखें मिळतांच त्या उन्मुक्तपणे वातावरणांत भराऱ्या मारूं लागल्या खऱ्या—पण हळूहळू हृदयाला व मेंदूला वाटूं लागलें की हें स्वातंत्र्य कसलें, हें तर एक प्रकारचें बंधनच नाही का ? सर्व भावना व कल्पना, विकार व विचार कंठाच्या व ओठांच्या मार्गानेच वाऱ्यावर तरंगावयास पाहिजेत, किंवा मग अक्षरसंकेतांच्या व लिपीच्या मार्गाने दगड, ताम्रपत्र, भूर्जपत्र, कागद इत्यादि साधनांवर उमटले पाहिजेत; तेव्हाच ते दुसऱ्यांना सुगम होणार, तेव्हाच एकाचा मेन्दू किंवा हृदय दुसऱ्याच्या मेन्दूपावेतों किंवा हृदयापावेतो पोचूं शकणार, ही एक तऱ्हेची मर्यादाच नाही का ? जिव्हा माणसाचें फार मोठें बंधन आहे. तिच्यामुळे एकीकडे स्वाद व अ-स्वादाचा रुचि-संघर्ष सुरू झाला; तर दुसरीकडे वाक्स्वातंत्र्य

व वाग्बंधनाचे लेंढ सुरू झाले. मूलत: जी भाषा विचारांसाठी म्हणून अस्तित्वांत आली, ती विचारांपेक्षाही जास्त महत्त्वाची होऊन बसली. विचार गुलाम बनले व भाषा स्वामिनी ! विचार जेव्हा या भाषा-मोहिनीमागे भस्मासुरी आवेशानें पळत सुटले, तेव्हाच विचारांनी एक प्रकारें आत्महिंसा केली. अंतरंगापेक्षा बाह्यांगाला भाव आला. 'अर्थें लोपलीं पुराणें । घात केला शब्दज्ञानें ॥' वाङ्मयांत शाब्दिक चमत्कारांना व शब्दालंकारांना महत्त्व मिळाल्याने अनर्थ पसरला. शब्दांचा कीस निघूं लागला व त्यांच्या विविध अर्थांबद्दल तुंबळ रणें माजूं लागलीं. या आगींत यंत्रयुगाने तेल ओतलें. वर्तमानपत्रें सवंग निघूं लागलीं, व जो उठेल तो स्वतःला टीकाकार समजूं लागला. जो तो स्वतःची टिमकी वाजवूं लागला. स्वतःची म्हणजे स्वतःच्या नांवाची—'नांवांत मोहिनी भासो सामान्यांसी' (Bee)—नांवें म्हणजे अर्थशून्य शब्द. तत्त्व सोडून व्यक्तीला धरण्याची, आत्मा वगळून कुडीला कवटाळण्याची, साप साप म्हणून भुईला झोडपण्याची ही तऱ्हा अलीकडे 'टीका' या संप्रदायांत मोडूं लागली. म्हणूनच ही सूचना सुरवातीस करीत आहें.

भाषा केवळ साधन, आधार, वाट म्हणून अस्तित्वांत आली. तिचें मूळचें स्वरूप दुय्यम होतें. पण साधनाला साध्याचें, आधाराला आधेयाचें, वाटेला मुक्कामाचें स्वरूप मिळतांच भावनांना व विचारांना दुय्यम व गौण स्थान मिळूं लागलें. टीकेच्या बाबतींतही तोच गैरसमज किंवा घोटाळा माजण्याचा फार संभव आहे. व टीकालेखन करणाऱ्यानें त्या गैरसमजापासून स्वतःला अलिप्त ठेवलेलें बरें. आजकाल वर्तमानपत्री तर सोडूनच द्या, पण पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणारी बरीचशी टीका सुद्धा लहानमोठीं शब्दयुद्धेंच असतात, हें कटुसत्य दुःखानें कबूल करावें लागतें. वर्तमानपत्री टीकेबद्दल तर, 'टीकाकार हा वाङ्मयक्षेत्रांतील अत्यन्त महत्त्वाचा अधिकारी आहे. सुंदर व टिकाऊ वाङ्मय कोणतें

याची परीक्षा तो जनतेस करून देत असतो. आणि वाङ्मयासंबंधींच्या अपेक्षा त्याच्या लेखणींतूनच स्पष्ट होत असतात. परंतु विद्यमान मराठी टीकावाङ्मयाकडे पाहिलें तर ही अपेक्षा कांही अंशीं फोल ठरल्यावाचून राहणार नाही.......परंतु बऱ्याचशा नियतकालिकांतील वाङ्मयपरीक्षणें पाहिलीं तर कोणाचीही निराशाच होईल. कारण हें टीकावाङ्मय व्यक्ति-द्वेष, जातिद्वेष व कोती दृष्टि या टीकाविघातक दोषांनी भरलेलें आहे असें दिसून येईल.' हें प्रा. वि. द. साळगांवकरांचें सहा वर्षांपूर्वीचें 'प्रतिभे'च्या खास अंकांतील विधान अजूनही खरें आहे असें म्हणावयास हरकत नाही. या पांच वर्षांत टीका अधिक शास्त्रशुद्ध व काटेकोर झाली असें नसून, तिला जास्त पडता काळच आला आहे. अपवादा-त्मक उदाहरणें असतील; पण त्यांच्यामुळे टीकाऱ्हासाबद्दलचें हें कथन असिद्ध ठरूं शकत नाही.

पण याचा अर्थ असाही नव्हे की साध्यापुढे साधनाचें महत्त्व फिकें वाटून, तिकडे टीकाकारांनी दुर्लक्ष करावें. वस्तुतः या निबंधाचा आरंभच मुळी मी मराठींत टीकाशास्त्रास आवश्यक अशी सर्वसामान्य शब्दसूची नाही या किंचित् कठोर वाटणाऱ्या सत्यकथनाने करीत आहें. पारिभाषिक शब्द तर जाऊं द्याच, पण आजच्या शास्त्रशुद्ध दृष्टिकोणास व विवेचनास आवश्यक असणारे इतर साधे शब्द देखील कैक लोक निरनिराळ्या अर्थांने वापरतात. साधारणपणें जुन्या जमान्यांत ज्याप्रमाणे संस्कृतमधून सरळ शब्द उचलून घटविण्याचा प्रघात असे, त्याप्रमाणे हल्ली इंग्रजींतून शाब्दिक भाषांतर करून शब्द बनविण्याची व रूढविण्याची प्रथा मराठींत दिसून येते. याचें एक मजेदार ताजें उदाहरण म्हणजे महाराष्ट्र साहित्य-पत्रिकेच्या संपादकांनी वापरलेला High-brow या इंग्रजी शब्दास समानार्थी असा 'उत्तान-भ्रू' हा प्रयोग! असे कैक मासले शोधून देतां येतील. साधारणतः 'सब्जेक्टिव', 'ऑब्जेक्टिव', 'कॉन्शसनेस' 'सब कॉन्शस'; 'सेन्सेशन';

'कन्सेप्ट'; इमेज'; 'इम्प्रेशन'; 'कॅथॅर्सिस' वगैरे मानसशास्त्रांतील प्राथमिक शब्दसमुच्चयासाठी अन्वर्थक असे सर्वमान्य शब्द कोठे ठरलेले आहेत? कुणी 'आत्मनिष्ठ'-'वस्तुनिष्ठ' म्हणतो तर कुणी 'ज्ञाता' व 'ज्ञेय' ही जोडी वापरतो; कुणी 'स्व-प्रधान' व 'निःस्व' किंवा 'पर-प्रधान' असे शब्द वापरतो; तर कुणाला 'आत्मलक्षी' व 'वस्तुलक्षी' हे शब्द आवडतात; तर कुणी 'वैयक्तिक' व 'सार्वजनीन' ही दुक्कल पसन्त करतो. जर मानसी अवस्थांबद्दल ही स्थिति, तर मग वाङ्मयांत 'पायलीचे पन्नास' असे विकत श्राद्धाच्या स्वरूपाचे व पावसाळ्यांतील आळंब्यांसारखे रोज नवे नवे उगवणारे 'वाद', त्यांबद्दल तर पुसूंच नका! या शब्दांची इंग्रजींतून मराठीकरण करतांना, पोशाख बदलतांना जी कांही तारांबळ उडते ती तर कांही पुसूंच नका! 'सोश्यालिझम्'ला कुणी 'साम्यवाद', तर कुणी 'समाजवाद' तर कुणी 'समाजसत्तावाद' म्हणतात. व रोमान्स, रोमॅंटिक व रोमॅंटिसिझम् यांना नीटसे मराठी प्रतिशब्द न मिळाल्यामुळे ते मूळचे शब्दच मराठींत सर्रास वापरूं लागले आहेत. 'रियालिझम' व 'आयडियालिझम्' बद्दल तेंच. वास्तववाद, यथार्थवाद, वस्तुवाद, तथ्यवाद, जडवाद व आदर्शवाद, बोधवाद, हेतुवाद, इ० इ०.

याशिवाय विदेशी वाङ्मयप्रवाहांत उठणारे नवनवे तरंग सुद्धा जसेच्या तसे उचलून, त्यांची अनुकृति करण्याचीही सवय आमच्या येथील लेखकांना व टीकाकारांना जडत चालली आहे असें दिसतें. 'कलेसाठी कला', 'जीवनासाठी कला', 'कलेसाठी जीवन', 'जीवनासाठी जीवन'--व शेवटीं कुणासाठी कुणीच नाही--कलाही आपली जागच्या जागींच व जीवनही जेथल्या तेथेच; म्हणजे दोघांतील अंतर तेवढेंच. या परिस्थितीला बव्हंशीं कारण कोणतें? मतभेद असतात व असतीलही; पण त्याहीपेक्षा जास्त म्हणजे शब्दांचा कीस काढणारी, शाब्दिक कोटया लढविणारी व शब्दांवरच घोटाळत रेंगाळणारी आमची शब्द-

प्रिय मनोभूमिका होय पण. शब्द हे कांही झालें तरी नाम-रूप आहेत; सारस्वताचा आत्मा वेगळाच आहे. तो म्हणजे भावना-संयुक्त विचार.

"आणि सामान्यतः पाहतां कोणाच्याही हें सहज लक्षांत येणारें आहे की ज्याप्रमाणे तालमींत घटलेल्या पहिलवानाचा हात चितान्याच्या कामाला वळायचा नाही व जो उत्कृष्ट कुस्तीगीर झाला त्याला चित्रकलेचें किंवा गायनकलेचें म्हणजे मर्म समजेल असेंही नाही, त्याप्रमाणेच 'वेदाभ्यासेंकरून ज्यांच्या मतीस जाडय आलें,' जे 'घटपटादि खटपटीं'त व अवच्छेदकावच्छिन्नादि वाग्जालांत पटाईत होऊन शब्दार्थांचा कीस ना कीस काढावयाला शिकले, अथवा भाष्याब्धींत परम निष्णात झाल्यामुळे भाषारूप संकीर्ण पटाचें प्रतिसूत्र ज्यांस करतलामलवत् स्पष्ट दिसूं लागलें, त्यांस वरील गुणांस्तव काव्यरसाचा यथास्थित अनुभव घडेल व कवीचें हृद्य कळेल ही गोष्ट दुरापास्त होय."

(विष्णुपदी पृ. २३७-३८)

हीं चिपळूणकरांचीं वाक्यें प्रत्येक टीकाकाराने पूर्णपणे लक्षांत ठेवायला हवींत; एकदा शब्द हे अनित्य असून भाव हे नित्य आहेत हा विवेक केला की शाब्दिक टीका किती उथळ, टाकाऊ व क्षणजीवी असते, व तिच्या उलट आत्मिक टीका किती सखोल, टिकाऊ व चिरजीवी असते, हें आपोआप कळून येण्यासारखें आहे. "मराठींतील टीकावाङ्मय कांही अपवाद वगळल्यास प्रायः उथळ व सदोष असेंच असतें. कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचें 'तोतयाचें बंड' व 'रागिणी व तिचीं भावंडें' हे टीकालेख किंवा प्रो. वा. म. जोशी यांचें 'दुटप्पी कीं दुहेरी' या कादंबरीचें परीक्षण यासारखें पहिल्या दर्जाचें लिखाण मराठींत उंबराच्या फुलासारखें दुर्मिळ झालें आहे." हें 'प्रतिभे'च्या १९३५ सालच्या सहाव्या अंकांत 'रामशास्त्री' यांनी केलेलें विधान मुळीच चुकीचें वाटत नाही.

वर्तमानपत्रांतून व नियतकालिकांतून तर असल्या शाब्दिक टीकांचा, म्हणजे बाह्यांग-परीक्षणांचा, नुसता सुकाळ चाललेला दिसतो. कधी तर नुसते शब्दच असतात. 'रत्नाकरा'च्या प्रथमांकांतच बा. अ. भिडे यांनी स्व. मा. त्रि. पटवर्धनांच्या 'बेगमेच्या विरहगीतां'-तील भाषेबद्दल काढलेले 'शालजोडीचीं व घोंगडीचीं ठिगळें गोळा करून, चित्रविचित्र, दडदडीत व घस्मर गोधडी' असे उद्गार व त्या भाषेवरून त्यांना 'वेश्येची तुळशीपूजा' ही सुचलेली उपमा; किंवा 'महाराष्ट्र' सारख्या ग्रंथ परीक्षणासाठी नाणावलेल्या अर्धसाप्ताहिकांतील पु. य. देशपांडे यांच्या 'विशाल जीवन' या कादंबरीवरील अभिप्राय, असलीं असंख्य उदाहरणें देतां येतील. शाब्दिक टीकेच्या अन्तर्गत, कांही ठिकाणीं टीकाविषयाच्या बाह्य स्वरूपावर, तंत्रावर व भाषा-शैलीवरच होणारी खूप टीका; तर कांही ठिकाणीं टीकेच्या नांवाने गोवलेले निव्वळ शब्द, मोडतात. शाब्दिक सहानुभूति, शाब्दिक स्तुतिसुमनें, शाब्दिक चर्चा यांनी आमचें साहित्यजीवन व समाजजीवन नुसतें भरून गेलें आहे. कदाचित पराक्रमाला वाव मिळण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग मोकळा नसल्यामुळे, त्याने शब्दाची वाट धरली असावी. पण शेवटीं 'शब्द! शब्द!! शब्द!!!' असे हॅम्लेटप्रमाणे उद्गार काढावे लागतात. कारण जीवन हें शब्दांपेक्षा फार मोठें आहे. जीवन प्रक्रिया आहे व 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.'

बाह्यांग व अंतरंग टीकेंत, म्हणजे शब्द-तंत्र-रीतीबद्दलची टीका व भावना-विचार-ध्येय इत्यादींची टीका यांमध्ये विवेक सांभाळणें आवश्यक आहे. बाह्यांग टीकेला वर शाब्दिक टीका म्हटलें आहे. तसेंच अंतरंग टीकेला वैचारिक टीका म्हटलें तर, हल्ली वृत्तपत्रांतून माजलेला शाब्दिक टीकेचा फोलपट पसारा व हैदोस, वैचारिक टीकेबद्दल आवड व ओढ उत्पन्न झाल्यास, कमी होईल, असें म्हणणें तर्कसंगत आहे. वैचारिक टीकेबद्दल वाढणारी अभिरुचि फक्त

टीकालेखकांतच उत्पन्न होऊन भागणार नाही; टीकावाचकांमध्येही तसल्या प्रकारची अंतर्मुखता उत्पन्न व्हायला हवी.

शाब्दिक व वैचारिक टीकेंत विवेक करावा म्हणून जें वर सांगितलें, त्याचा अर्थ शब्द व विचार एकमेकांपासून वेगळाले आहेत किंवा दोघेही निरनिराळ्या वस्तूंचे बनलेले आहेत, असा घेऊं नये. शब्द व विचार यांच्यांत एकजिनसीपणा आहे. पण हा एकजिनसीपणा, या प्रकरणाच्या आरंभीं सुचविल्याप्रमाणे, शब्द आणि विचार यांच्या विकासाच्या आरंभावस्थेंत नसतो. शब्दांचें महत्त्व व विचारांची परिपक्वता वाढली म्हणजे आपोआप टीकेंत ही समन्वय बुद्धि काम करूं लागते. मानवी विचार व भावना एकाकी व मूक (अव्यक्त) राहूं शकत नाहीत. मानवांतील जन्मजात सामाजिकतेच्या वृत्तीप्रमाणेंच मानवी विचार व भावना जास्त जास्त व्यापक व मोकळें असें क्षेत्र धुंडीत असतात. हा त्यांचा स्वभावगुणच आहे. जास्त जास्त व्यापक व मोकळ्या दृष्टीने विचार करतांना विचार व भावनांतील सूक्ष्म फरक जसा लोपतो, तसाच शब्द-देह व विचार-आत्मा यांतील भेदही कमी कमी होऊं लागतो. टीकेंतही समन्वय बुद्धीचा विकास याच प्रकारें होत असतो.

या समन्वयात्मक स्थितींत कोलरिजचे 'सखोल विचार म्हणजेच सखोल भावना' ही जाणीव उत्पन्न कशी होते, हें थोडेंसें स्पष्ट करतों. कारण हल्लीच्या विज्ञान विरुद्ध धर्म, बुद्धिवाद विरुद्ध श्रद्धा असल्या वादग्रस्त मतामतांच्या युगांत हें स्पष्टीकरण टीकाकारांसाठी आवश्यक आहे. उत्कट भावना व तर्कशक्ति यांच्यांत वाटतें तितकें विरोधाचें वातावरण नेहमीच नसतें. 'गीतगोविंदकार' जयदेव कवीच्या 'प्रसन्नराघव' नाटकांतील नट म्हणतो : "हा कवि तर्कशास्त्रांतही मोठा प्रवीण आहे म्हणून ऐकतों. तर चांदणें व कडक ऊन हीं जशीं एकत्र असावीं त्याप्रमाणे याचें कवित्व व तर्कशक्ति एके ठिकाणीं पाहून मला मोठा चमत्कार वाटतो!" उत्कट भावनांचीं दोन स्वरूपें म्हणजे कवित्व व

रसिकत्व. जरी पुढील कथनाचा व्यत्यास नेहमी खरा नसला तरी ज्याप्रमाणे उत्तम कवि उत्तम रसिक होऊं शकतो त्याप्रमाणे एखाद्या टीकाकाराचे ठायीं उत्तम तर्कशक्ति व उत्कट भावना एकाच वेळीं राहूं शकतात. किंबहुना, या दोन परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टींमध्ये ज्या टीकाकाराच्या मनाने समन्वय शोधला व सांभाळला, तोच खरा श्रेष्ठ टीकाकार. टीकाकाराची तर्कशक्ति तर विकसित असावीच, पण त्या बरोबर तो श्रेष्ठ रसिकही असावा, म्हणजे त्याची संवेदनशक्ति विकसित असावी; तसेंच, जरी तो कवि असावाच असें नेहमीं म्हणतां येणार नाही, तरी त्याची कल्पनाशक्तीही चांगली असावी.

साधारणपणें रसिकत्व व कवित्व यांना आपले टीकाकार परस्पर-विरोधी मानतात. परंतु हे दोन गुणही परस्परपूरकच आहेत. विष्णु-शास्त्री चिपळूणकर म्हणतात : "प्रथमत: आमच्या वाचकांनी ही गोष्ट लक्षांत आणली पाहिजे की कवित्व व रसिकत्व वस्तुत: पाहतां एकाहून एक भिन्न आहे असें नाही. दोहोंचेंही स्वरूप पाहूं गेलें असतां एकच आहे. ज्याला रसिकता नाही तो कवि कधीही होणार नाही; व जो कवि आहे त्याला रसिकता नाही असें म्हणणें म्हणजे तर अग्नीच्या अंगीं दाहकत्वधर्म नाही किंवा हिऱ्याच्या अगीं तेज नाही असें म्हटल्यासारखेंच झालें. दोहोंत भेद म्हटला म्हणजे इतकाच आहे की रसिकत्वाची अत्युत्कट जी अवस्था तें कवित्व होय." (विष्णुपदी पृ. ३३५)

रसिकत्व व कवित्व या दोन्ही मानसी अवस्था आहेत. व त्यांतील अंतर स्वरूपाचें नसून उत्कटत्वाचें आहे (not a difference of kind but of degree). याच दृष्टीने डॉ. जॉनसन जें म्हणत असे तें खरें की–' To judge of poets is only the faculty of poets ' ( कवीच कवींचे खरे टीकाकार ). आत्मनिरीक्षण व सर्वात्मनिरीक्षण या पायऱ्या ओळखल्यावर टीका करणें येरागबाळाचें काम नाही, हें निराळें सांगावयाला नकोच.

दुसऱ्या शब्दांत मांडावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल की साहित्यनिर्मिति व टीकानिर्मिति या दोन्ही प्रक्रिया सारख्याच रचनाशील व प्रभावी (creative and effective) असतात. ज्याप्रमाणे एखादा चित्रकार, चित्र काढीत असतांना मध्येच किंचित् डोळे किलकिले करून, चित्रापासून लांब अंतरावर उभा राहून, मान तिरपी करून, स्वतःच्या चित्राकडे सारखा पाहत राहतो; ज्या वस्तूचें किंवा व्यक्तीचें चित्र काढलें जात आहे तिच्याकडे परत-परत निरखून पाहतो; परत स्वतःच्या कलाकृतीस काळजीपूर्वक न्याहाळून त्यांतील उणीवा व इतर दोष शोधून काढतो; व पुनः चित्रफलकाजवळ जाऊन भराभर ते दोष सुधारण्याचा प्रयत्न करूं लागतो; किंवा, ज्याप्रमाणे एखादा कवि स्वतःच्या रचनेस पुन्हा पुन्हा, गुंगून, आळवून, म्हणून पाहतो व त्यांतील मात्रादोष, तालदोष, शब्दयोजनेंतील दोष शोधून पाहतो व पुनः संशोधन करतो; तद्वतच प्रत्येक श्रेष्ठ लेखकांत जसा स्रष्टा तसाच द्रष्टा लपलेला असतो. स्रष्टा रचना करतो, द्रष्टा टीका करतो. नुसती रचना करावयाची व त्याची टीका मात्र करतां यावयाची नाही, ही वृत्ति श्रेष्ठ लेखकास शोभत नाही. स्वतःच्या रचनेचें, तटस्थ, त्रयस्थ, वस्तुनिष्ठ परिस्थितींत स्वतःच्या व्यक्तित्वाचें मानसिक प्रलम्बीकरण वा प्रक्षपण (projection) करून मूल्यांकन करावयाची वृत्ति श्रेष्ठ लेखकांत कमजास्त प्रमाणांत असते, व असावयाला हवीच. रचनात्मक वृत्तीला टीकात्मक वृत्तीमुळे शिक्षण मिळतें; दुसऱ्या वृत्तीला पहिल्या वृत्तीमुळे अंतर्दृष्टि व अनुभवाचा लाभ होतो. सारांश, कलावंत व टीकाकार या भूमिका वाटतात तितक्या वेगळाल्या नाहीत; दोघांची स्थिति आंधळा व पांगळा या गोष्टींतील परस्परसहकार्यासारखी आहे.

टीका म्हणजे चित्रकार, चित्रवस्तु व चित्रप्रेक्षक या तीन बिंदूंचें तारतम्य व एकजिनसीपणा ठरविणारी सरळ रेषा. टीका म्हणजे कवि

व रसिक यांच्या मनोवृत्तींना निष्पक्ष दृष्टीने तोलणारा ताजवा. टीकाकाराचें काम म्हणजे पाणबुडयासारखें. नुसतें समुद्रांत वरवर पोहून पाणबुडयास मोत्यें सापडत नसतात; टीकाकारानेही उथळ, शाब्दिक व तांत्रिक होऊन भागत नाही. टीकाकार हा या दृष्टीने एका संशोधकाप्रमाणे असतो; त्याला प्रचलित मूल्यांची छाननी करून 'नित्यानित्य-वस्तुविवेक' करावयाचा असतो.

मॅथ्यू आरनाल्ड या सुप्रसिद्ध इंग्रज टीकाकाराचें तें सुप्रसिद्ध सूत्र, ज्याचें स्व. मा. त्रिं. पटवर्धनांनी आपल्या 'सुधारक' काव्यांत एका पंक्तींत पद्यबद्ध भाषांतर केलें आहे–'वाङ्मय म्हणजे संस्कृति-टीका', मान्य केल्यास, सगळेंच वाङ्मय एक प्रकारचें टीका-वाङ्मय ठरेल. 'संस्कृती'चीं मूल्यें परिवर्तनक्षम व विकासगामी असतात; कांही मौलिक नीतितत्त्वें मात्र अबाधित व अपरिवर्तनीय आहेत. तेव्हा टीकाकाराने अधिकाधिक अंतर्मुख व विचारी व्हायला पाहिजे; त्याला तत्त्वज्ञान व वाङ्मयाचे पारस्परिक संबंध शिकविणारें अध्ययन व स्वतंत्र मनन आवश्यक आहे. हें उमजलें तर मग शाब्दिक टीका, वरपांगी टीका वगैरे प्रकार, ज्यांना हॅझलिट या सुप्रसिद्ध टीकाकाराने क्षुद्रत्वाचे व कीटकप्राय कुरकुरीचे निदर्शक म्हटलें, ते कमी होऊं लागतील. वस्तुत: शब्दांबद्दल भांडण म्हणजे निव्वळ रुचींबद्दल, आवडीनिवडींबद्दल भांडण होय. रुचि ही अगदी वरवरची व गौण गोष्ट आहे. तिच्या बुडाशीं कोणतींच तात्त्विक मूल्यें नाहीत–मला चहा आवडत नाही, तुम्हांला तो आवडत असेल–असलाच रुचिभेदाचा जो प्रकार तोच शाब्दिक टीकेचाही होय. पण वाङ्मयाचें उचित मूल्यांकन व मार्गदर्शन, म्हणजेच खरी टीका, निव्वळ रुचिवैधर्म्यावर व रुचिवैचित्र्यावर अवलंबून नसते. त्यासाठी टीकेचें तंत्र करून भागत नाही. असाध्य 'प्रतिभे'चें एकवेळ 'साधन' केलें जाऊं शकेल, वाळूंतून तेल गळूं शकेल, पण टीकेने ठरावीक साच्याचें ठोकळेबाज तंत्र अंगीकारावें

असें म्हणणें म्हणजे जिवंत निर्झराला बांध बांधून त्याचा कालवा बनविणें, किंवा माणसाचें 'रॉबट' सारखें यंत्रीकरण करणें होय.

टीकेचें तंत्र केल्यास, हिलेयर बेलॉकच्या एका विनोदी लेखांतील परिस्थितीप्रमाणे अनवस्था उत्पन्न होण्याची आशंका आहे. बेलॉकने 'टीकाकारांची टीका' नांवाचा एक विनोदी लेख लिहिला आहे. त्यांत एका दुकानाचा उल्लेख आहे, ज्यांत 'टीका कशी करावी ?' 'केवळ पांच मिनिटांत टीका', 'टीकेचीं तेरा सूत्रें', या नांवाच्या पुस्तिका मिळतात. तेथेच टीकेस आवश्यक लेखनसामग्री—तांबडी निळी पेन्सिल, कात्री, डिंक, टाचण्या वगैरेही मिळतात. ज्याला टीकेचा व्यवसायच सुरू करावयाचा असेल व प्राथमिक धडे घ्यावयाचे असतील, त्या टीकाकाराने फक्त त्या दुकानांतून ती सामग्री विकत आणावी; ज्या पुस्तकाची टीका करावयाची असेल तें मधून मधून चाळावें, कोणत्याही भागावर तांबड्या पेन्सिलीने खुणा कराव्या, कात्रीने त्या कापाव्या, कागदावर डकवाव्या व मधून-मधून पुढील वाक्यें पेरावीं. "एकंदरींत 'क्ष' लेखक, ज्यांनी अमुक अमुक रचना लिहिल्या आहेत व ज्यांची फलाण्या क्षेत्रांत दिगन्तकीर्ति आहे, त्यांची ही नवीन कलाकृति किंवा रचना किंवा पुस्तक १······आहे. त्यांतील भाषा २······असून, कथानक ३·······आहे; शैली ४·········असून, बांधणी ५·······व मुद्रण ६ ······ आहे." मग या मजकुरातील मोकळ्या सोडलेल्या ठिकाणीं, खाली दिलेल्या विशेषणांच्या याद्यांच्या तक्त्यांतील (हे तक्ते आमचे दुकानांत दिडकीला एक असे मिळतात, बेलॉकच्या यादीपेक्षा मी ते खास मराठी लेखकांच्या सोईसाठी वेगळ्या प्रकारें लिहिले आहेत) वाटेल तीं विशेषणें—लेखक, संपादक, प्रकाशक टीकाकाराचा मित्र असल्यास, शत्रु असल्यास वा कुणीही नसल्यास—कात्रीने कापून डिंकाने चिकटवावींत; म्हणजे झाली टीका तयार !

एक नमुन्यादाखल तक्ता असा—

| मित्र असल्यास | शत्रु असल्यास | कुणीही नसल्यास |
|---|---|---|
| १ संग्राह्य | कलंकभूत | सुंदर |
| वैशिष्ट्यपूर्ण | संस्कृति नष्ट करणारें | बरें |
| उपादेय | समाजविघातक | साधारण |
| मार्मिक | अश्लील | वाईट म्हणतां येणार नाही असें |
| | प्रतिभाशून्य | |
| २ तेजस्वी | अनाकर्षक | प्रसादयुक्त |
| चित्ताकर्षक | जडजंबाल | मधुर |
| नावीन्यपूर्ण | शिथिल | सुबोध |
| गंभीर | अलंकारशून्य | सरळ |
| | मामुली | |
| ३ गुंगविणारें | भिकार | गुंतागुंतीचें |
| कमालीचें | गचाळ | रिझविणारें |
| हातांतून पुस्तक खाली ठेवूं न देणारें असें | अर्थहीन व हेतुशून्य | उत्तम |
| | गुंतागुंत, निरगांठ, उकल वगैरे नसलेलें | पहिल्या प्रयत्नास साजेसें |
| ४ प्रसन्न | रद्दड | नावीन्य नसलेली असलेली |
| ओघवती | रकाने भरण्यासाठी लांबविलेली | |
| मनोरंजक | | विशेष कांही नसलेलें असलेलें |
| आल्हाददायक | पाल्हाळिक | |
| अपूर्व | कंटाळवाणी | |
| | सतराव्या शतकांतील | |
| ५ नयनमनोरम | अगदीच टाकाऊ | वरील विशेषणांपैकी (१) प्रमाणे |
| व वैचित्र्यपूर्ण | कलाशून्य | |
| ६ साजेशी | सदोष | |
| कलात्मक | किंमतीच्या मानानें दरिद्री | |
| अगदी अद्ययावत् | | |

यानंतर पुढे बेलॉकने एका टीकाकाराची फजिती उडविणारी जी मजेदार हकीगत लिहिली आहे ती वाचली की मग मात्र हसून मुरकुंडीच वळेल. तो टीकाकार आपला टीकालेख संपादकाच्या इच्छे-नुसार तीनदा बदलतो—एकदा स्तुति, एकदा निंदा, परत स्तुति. मोबदल्याच्या आशेनुसार लांबीरुंदीही बदलतोच.

वरील शाब्दिक टीकेची थट्टा सोडली तरी, वैचारिक टीकेच्या बाबतींतही टीकाकारास आवश्यक असलेली सहृदयता व लेखकाचें हृद्गत अचूक ओळखण्याची कला एखाद्याच्या अंगीं नसल्यास कशी परिस्थिति उद्भवूं शकते याबद्दल एक दृष्टान्त श्री. रामनारायण पाठक या सुप्रसिद्ध गुजराथी लेखकाने लिहिलेल्या एका चुटक्यावरून देतों व हें प्रास्ताविक संपवतों.

एकदा एका चित्रकाराने राधाकृष्णाचें चित्र काढलें. राजाने तें चित्र पाहिलें. तो म्हणाला–'मी तुला शंभर मोहोरा देतों. मला तें चित्र दे.' चित्रकार म्हणाला–'तुम्हांला मी माझें चित्र कां देऊं? तुम्ही माझ्या चित्रांत कोणतें वैशिष्टय बघितलें?' राजा म्हणाला–'वैशिष्टय म्हणजे? तुम्ही एवढे नामांकित चित्रकार; तुमच्या चित्रांत वैशिष्टय असणारच. तुमचें चित्र नको कां आम्ही संग्रहीं ठेवायला?' चित्रकाराने तें चित्र दिलें नाही. स्वत: दरिद्री असतांही शंभर मोहोरांची रक्कम अव्हेरली. त्याने विचार केला–'अरसिकाला असलें चित्र देण्यापेक्षा....'

चित्रकार पुढे चालला. वाटेंत एक गणिका भेटली. तिनेही त्या चित्राची मागणी केली. चित्रकाराने प्रश्न टाकला–'कां, तुला हें चित्र कां आवडलें?' गणिका म्हणाली–'चित्रांत कृष्णाच्या पायांतील काटा राधा काढीत आहे असें जें दाखविलें आहे त्यांतील कृष्णाच्या चेहऱ्या-वरील सुई बोचली असतांही निर्विकार, सहिष्णु, धीर अशा भावनांच्या छटा व राधेच्या बावरलेल्या मुद्रेवर कृष्णाला सुई कुठे बोचणार तर

नाही ना असली काळजीमिश्रित उत्कंठेची करुणरम्य झांक मला फार आवडली.'

चित्रकाराने तें चित्र गणिकेला विनामूल्य दिलें.

[ २ ]

टीका कशी असावी यापूर्वी टीकाकार कसा असावा याचा विचार अपरिहार्य आहे. टीकाकार कसा नसावा याचीं उदाहरणें तर प्रत्यहीं वर्तमानपत्रांतून आपल्याला बघावयाला मिळतातच. मत्सरग्रस्त, ईर्ष्याप्रेरित, वैयक्तिक निंदा वा कुटाळक्या यांत वेळेचा व शक्तीचा अपव्यय करणारा, क्षुद्र मनाचा, एकांगी, उथळ बुद्धीचा, हटवादी किंवा प्रागतिक वा नवनव्या विचारांच्या लाटा सहन न करूं शकणारा, अज्ञानी, अहंमन्य, अनभ्यासी किंवा निव्वळ 'वेदाभ्यासजड' असा टीकाकार केव्हाही कीव करण्यालायक होय.

टीकाकारास आवश्यक पहिला फार मोठा व जरूरीचा गुण म्हणजे त्याने निष्पक्ष बुद्धीने टीका करावयास हवी. निष्पक्ष म्हणजे त्याला दोन्ही पक्षांचें चांगलें ज्ञान पाहिजे व त्यांत दुराग्रहपूर्वक कोणत्याही एका बाजूची अवास्तव स्तुति किंवा अवास्तव निंदा त्याने करतां कामा नये. टीकाकाराचें महत्त्वाचें साधन म्हणजे विवेकबुद्धि, म्हणजेच समतोलपणा. तोल गेला तो टीका काय करणार? जुने नवे हे कालाचे, स्वदेशी विदेशी हे देशाचे, तसेच लहान मोठे हे नाम रूपाचे भेद टीकाकाराच्या बुद्धीला जखडीत नाहीत. तो सत्याची कास धरतो व सत्याची खरी कसोटी अन्तिम-निर्णयात्मक स्वरूपाची असते. त्यांत जुने नवे, स्वदेशी विदेशी असल्या सापेक्ष गुणदोषांनी विचलित होण्याइतकें मानसिक दौर्बल्य व्यक्त होत नसतें. निष्पक्ष टीकाकार तोच असूं शकेल की ज्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा दुसऱ्याचें अपहरण करून पूर्ण होत नसतात, ज्याला ईर्ष्या द्वेष नसतात, तसेंच मोह-मायेचे अनुबंधही

नसतात, व ज्याची बुद्धि स्थितप्रज्ञ असते—असलाच टीकाकार कंपूशाहींत सामीलही होत नाही व स्वत:चा कंपूही निर्माण करीत नाही. तो कुणाचे चावेही घेत नाही, की कुणाला बोचकारेही भरीत नाही; व त्या ऐवजीं स्वत:ला चाववून किंवा ओरबाडून, शब्दांनीच का होईना, घेत नाही. जो सदसद्विवेक बुद्धीच्या आश्रयाने आपलीं प्रामाणिक मतें व्यक्त करतो; व तीं व्यक्त करण्यांत नाहक लांगूलचालनही करीत नाही की हकनाहक चिखलफेकही करीत नाही. तो फक्त सत्य-सूर्याचा प्रखर प्रकाश टीकाविषयावर धरतो व जें दिसतें तें सांगतो. तो जास्ती भानगडींत पडत नाही, निष्कर्षही काढीत बसत नाही, की फुकट कारण—मीमांसाही मनानेच करून, काल्पनिक गैरसमजही पसरवीत नाही. असला निष्पक्ष टीकाकार सडेतोड, स्पष्टवक्ता व निर्भय वृत्तीचा असतो. तो कच खात नाही. उगीच स्वत:वर विरोध ओढवून घेत नाही, किंवा विरोध निर्माण व्हावा असलीं अजब कृत्येंही करीत नाही.

या ठिकाणीं साहजिक असा प्रश्न उद्भवतो की मानवी मानस अशा तऱ्हेने पूर्णपणें नि:पक्षपाती होणें शक्य आहे काय? त्याच्या मनांत कुठे ना कुठे तरी नेणिवेच्या स्तरांत का होईना, अपरोक्षपणे एखादा संस्कार शिल्लक राहतोच ना? बालपणांतील संस्कार, सामाजिक संस्कार, आनुवंशिक, भौगोलिक इत्यादि नाना प्रकारचे संस्कार टीकाकाराच्या मनांत दडलेले असूं शकतात. त्यांची वाट काय? या शंकेला उत्तर असें की टीकाकाराने निष्पक्ष बुद्धीने टीका करावी, याचा अर्थ असा मुळीच नव्हे की त्याने आधी आपल्या सर्व संस्कारांवर पूर्ण विजय मिळवावा व योगी बनावें. किंवा या संस्कारांना नष्ट करावें वा वगळावें. बेकन नामक प्रख्यात इंग्रज लेखक व तत्त्वज्ञाने मनुष्याच्या मनांत चार प्रकारचे अध्यास किंवा अज्ञानाचे थर सांगितले आहेत. एक गुहेंतील संस्कार, एक बाजारहाटांतील संस्कार, एक नाटयशाळेंतील संस्कार व चौथा जातीय संस्कार. या

अज्ञानावरणांना तो 'आयडोला' म्हणतो. या 'आयडोलां'पासून किंवा ज्ञानविवेकबुद्धीला आच्छादित करणाऱ्या कल्मषावरणांपासून टीकाकाराने सावध असावें, टीकेंत यथाशक्य व्यक्तिगत असूयादि दुर्भावनांनी शिरूं नये याबद्दल काळजी घेत असावें; व संस्कारांना विचारांच्या ताब्यांतच राहूं द्यावें. टागोरांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे विचारांच्या 'स्रोत:पथा' समोर वाट आडवून धरणारी आचारांची व संस्कारांची 'मरुवालुराशि' असूं नये एवढाच नि:पक्षपात बुद्धीचा भावार्थ. 'Avoid Extremes' (अति तेथें माती, म्हणून अतीस टाळिती) असला पोपकवीने आपल्या टीकाशास्त्रावरील पद्यप्रबंधांत दिलेला इशारा या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

पण टीकाकाराने निष्पक्षबुद्धि बाळगावी म्हणजे दोन्ही पक्षांना खूष करण्याचा प्रयत्न करण्यासाठी 'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति' असें करूं नये किंवा इकडे जाऊं की तिकडे, असला नुसता संशयात्मा बनूं नये. त्याचें स्वत:चें मतनैश्चित्य झालेलें असावें. समुद्रांतील दीपस्तम्भ चोहीकडे प्रकाश फेकतो म्हणून तो इकडे तिकडे चोंहीकडे वारा वाहील तसा बदलत फिरत नाही. खडकावर त्या दिवादांडीचे पाय मजबूत रोवलेले असतातच. टीकाकारही आत्मस्थ असला की मग त्याला कशाची भीति नाही. तो दोन परस्परविरोधी गोष्टींना एकाच वेळीं, आपल्या मतनैश्चित्याच्या बळावर व आत्मविश्वासावर, एकत्र आणूं शकतो, त्यांचा समाहार करूं शकतो. वाल्ट व्हिटमनने एका कवितेंत म्हटलें आहे—

Do I contradict?
Very well, I contradict
I contain multitudes.

(अर्थ-मी आत्मविरोधी आहें असं तुम्हाला वाटतं काय? असेन मी आत्मविरोधीही असेन—कारण माझ्यामध्ये अनेक समुदाय सामाव-

लेले आहेत.) दृष्टि इतकी उच्च नेल्यानंतर क्षुद्र भेदादिकांचें भान उरत नाही. आज आमच्या टीकाकाराने आपली मनोभूमिका इतकी उंच न्यावयास हवी; म्हणजेच त्याला निष्पक्षबुद्धीबरोबरच आत्मविश्वासपूर्ण अशी स्वतःची सुनिश्चित विचारमालिका पाहिजे. हल्ली मराठींतील टीकाकाराची स्थिति हवामान दाखविणाऱ्या कोंबड्यासारखी होते. कांही दिवस सनातन्यांना शिव्या देणें नवमतवादांत मोडत होतें ना? मग चला, कांही दिवस सनातन्यांवर टीकेची झोड उठविली. मग कांही दिवस मवाळांची तळी उचलून धरणें, मग गांधींची टवाळी करणें, हिंदुसभेचा पक्षाभिमान बाळगणें, व मग सरतेशेवटीं समाजवादाकडे सहानुभूति व क्रांतिकारकांशीं लांबचें सख्य दाखवणें, वगैरे हल्लीच्या टीकाकारांचें मोर्चा बदलण्याचें 'तंत्र' आहे. अशा रीतीने काळाप्रमाणे स्वतःची अभिरुचि बदलत जाणें व त्या बदलत्या अभिरुचीबरोबर स्वतःची मूळ विचारनीति सोडून, स्वविरोधाची अक्षम्य तार्किक चूक करणें, समाहाराची कल्पना नसल्याचें व मुळांतच ब्रीद नसण्याचें लक्षण. असला बूड नसलेला (spineless) टीकाकार वाङ्मयक्षेत्रांत तोंडपुजेपणा करूं शकेल, उगवत्या सूर्याला नमस्कार करून कदाचित स्वस्त लोकप्रियताही मिळवूं शकेल, पण त्याला टीकाकाराचें पवित्र कर्तव्य पार पाडण्याचें समाधान तर दूरच राहो, पण श्रेय देखील कुणी देणार नाही.

मात्र मतनैश्चित्य या शब्दाचा अर्थ पुन्हा किंचित स्पष्ट करतों. नाही तर मतनैश्चित्य म्हटलें म्हणजे रूढिवादी, गतानुगतिकत्वप्रिय सनातनी मनोवृत्तीचा मनुष्यही 'माझीं मतं निश्चित आहेत' म्हणून म्हणेल. मग? पण त्याला उत्तर असें की मतें काय व मानवी मनाचे कोणतेही असले आदर्श काय 'कूटस्थ, अचल व ध्रुव' स्वरूपाचे असूंच शकत नाहीत; कारण त्याचा अर्थ मानवी मन हा एखाद्या दगडासारखा अचल व गतिमानतेस पराङ्मुख असा पदार्थ आहे

असें मानावें लागेल. मतनैश्चित्य म्हणजे आत्मविश्वास. हें आत्मतत्त्व विकासोन्मुख असूं शकेल. हेगेलच्या 'लोगॉसप्रमाणे' तें चिरविकासशीलही असूं शकेल. कुणास ठाऊक? टीकाकाराच्या दृष्टीने मतनैश्चित्याचा अर्थ जडत्व नाही, हें केव्हांही जाणायला हवेंच.

टीकाकारास आवश्यक तिसरा गुण म्हणजे टीकाविषयाचें पूर्ण ज्ञान या पूर्ण ज्ञानावाचून वर उल्लेखिलेलें मतनैश्चित्य किंवा आत्मविश्वास उत्पन्न होणारच नाही मुळी. टीकाविषयाचें पूर्ण ज्ञान तर हवेंच पण त्याशिवाय अवान्तर ज्ञानाचीही फार आवश्यकता आहे. आधुनिक टीकाकारास शास्त्रें आणि तत्त्वज्ञान यांचा अभ्यास आवश्यक आहे. शास्त्रांच्या अभ्यासाने वास्तवते ( Reality ) चा निकष त्याला लावतां येईल, तर तत्त्वज्ञानाचा अभ्यास त्याला सत्या ( Truth ) च्या अन्वेषणास प्रवृत्त करील. शास्त्रांनी जड भौतिक द्रव्याचा कोपरान् कोपरा धुंडाळतां येईल, तर तत्त्वज्ञानाने चेतन आत्मिक आदर्शांचा ठाव घेतां येईल. शास्त्रीय दृष्टीने विश्लेषणशक्ति वाढेल; तत्त्वज्ञानाने संश्लेषणवृत्ति. परन्तु तत्वज्ञानाचा अभ्यास करणें याचा अर्थ सर्वत्रच तत्त्वज्ञानाचे तट्टू पुढे करणें असा नव्हे. तर्कांच्या गोफणीने व तत्त्वज्ञानाच्या रूढ दंडुक्याने काव्याचीं पाखरें व वाङ्मयाचीं वासरें हकलावयाचीं नसतात. वस्तुतः तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने वस्तुमात्रांतील संबंधज्ञान वाढतें, दृष्टि सखोल व विशाल होते, आणि संशयांतील तीक्ष्णता जाऊन कुतूहल तेवढें राहतें. कारण तसें म्हटलें तर जगांतलें आजपावेतो मिळालेलें व पुढेही मिळणारें सर्व ज्ञान एका विशाल प्रश्नचिन्हासारखें आहे. 'कस्त्वं? कोऽहम्??', तसेंच लेनिनचें तें प्रसिद्ध सूत्र 'अंतिम कांहीच नाही' ( Nothing is final ), आणि उमरखय्यामच्या रुबाईचा तो एक चरण--'हा काफला कुणास ठाऊक कोणत्या अज्ञात दिशेकडे चालला आहे!' हे सर्व वाक्यांश हेंच सिद्ध करतात की ज्ञानाची प्रगति एका व्यूहांतून दुसऱ्या व्यूहांत, अशाच प्रकारें चालली आहे. म्हणून

टीकाकाराने बुद्धिवादाचा आश्रय घेतांना, बुद्धीच्या मर्यादा ओळखूनच बुद्धीला 'वादा'च्या चौकटींत बसवावें.

तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने टीकाकारास साध्य होणारी मोठी गोष्ट म्हणजे सिद्धांतांना विशिष्ट परिस्थितींत व उदाहरणांत कसें वापरावयाचें हा पोच येईल. *Outline of Modern Knowledge* या ग्रंथामध्ये पा. ९०६ वरील एक उतारा या दृष्टीने उपयोगी वाटतो म्हणून देतों– "टीकेचे नियम म्हणजे सार्वभौम सिद्धान्तांना विशिष्ट दृष्टांतांत लागू कसें करावयाचें याबद्दलचे नियम होत. म्हणजे टीकानियम वस्तुनिष्ठ नियम आहेत; आणि म्हणून टीकाकाराच्या वैयक्तिक विशेष गुणावगुणांवर टीका कधीच पूर्णपणें अवलंबून नसते. आत्मनिष्ठतेचा भागही आवश्यक आहेच. कारण सिद्धांत वगैरे टीकेस लागतात ते सिद्धांतांसाठी नसून, गुणांची पारख करण्यासाठी सिद्धांत साधनरूप ठरतात."*

येथेच टीकाकार तत्त्वज्ञ असला म्हणजे त्याने अरसिक होऊं नये हा इशारा देणें फार आवश्यक आहे. कारण कोणतीही टीका सहानुभूतीच्या अधिष्ठानावाचून खरी टीका असूंच शकत नाही. पोप कवीने आपल्या टीकेवरील पद्यबद्ध निबंधांत शेवटीं अहंकार, ईर्ष्या, द्वेष इत्यादि दुर्गुणांपासून सावध राहण्याचा उपदेश देऊन पुस्तकी पंडितांचा व त्यांच्या शुष्क टीकेचा उल्लेख करून खेदाने असे उद्गार काढले आहेत की "असा टीकाकार कोठून भेटणार, जो शिकवायला तयार असून ज्याला

* "The rules of criticism, so far as they are valid, are nothing but modes of using universal theory in particular cases. They are thus objective rules; and criticism by virtue of them, need not wholly depend on the personal peculiarity of the critic. But the subjective element must come in. For it is entirely for its own purpose that criticism uses theory, a purpose, which, strictly speaking, theory cannot assist : namely to judge of merit."

स्वतःच्या विद्येबद्दल अहंकार नाही; जो निःपक्षपाती असून ज्याचें मन पूर्वग्रहाने दूषित नाही, की अंधश्रद्धेने भारावलेलें नाही; जो विद्वान असून सुसंस्कृत असेल व सुसंस्कृत असून प्रामाणिक असेल, विनयवान पण धीट, माणुसकी असून कठोर असेल; जो आपल्या मित्राचें दोषाविष्करण करण्यास मागे पाहणार नाही की शत्रूंचे गुण आनंदाने कबूल करण्यास लाजणार नाही; ज्याची अभिरुचि व्यवस्थित असेल आणि ज्याला जगाचा, जीवनाचा व पुस्तकांचा नीट अनुभव असेल व ज्याच्या ठिकाणीं विद्वत्ता व रसिकता यांचा संगम आढळेल?" बोझांके या समकालीन तत्वज्ञाच्या *Threes Lectures on Aesthetics* या ग्रंथांतील—The true critic is he and he only who can teach us rightly to enjoy (खरा टीकाकार तोच जो आम्हांला उचित प्रकारें रसग्रहण शिकवील) हें सुप्रसिद्ध सूत्र समोर ठेवलें तर शास्त्रीय दृष्टि, सूचक बुद्धि व रसग्रहणक्षमता या सर्व गोष्टींची टीकाकारांत एकसमयावच्छेदेंकरून किती आवश्यकता आहे हें वेगळें सांगायला नको.

शेवटीं, टीकाकार व्यवहारचतुर असावा व भाषापंडित असावा हें तर सांगणें नकोच. व्यवहारज्ञानशून्य टीकेमुळे अनर्थ होण्याचा जसा फार संभव तसेंच भाषेबद्दल काळजी न बाळगली तर या लेखाच्या सुरवातीस उल्लेखिलेल्या अडचणी आहेतच.

## [ ३ ]

माझे सन्माननीय मित्र व हिन्दीचे प्रतिष्ठित लेखक श्री. जैनेन्द्र-कुमार यांच्या 'साहित्य की कसौटी' (वाङ्मयाचे निकष) नांवाच्या एका व्याख्यानवजा निबंधांतील कांही भाग या प्रकरणाच्या सुरवातीस देतों. मूळ निबंध बराच मोठा आहे. त्याचा सारांश खाली देतों—

"आधी सोनाराच्या दुकानाची गोष्ट सांगतों—

"एक माणूस आला व आपली अंगठी विकावयाची आहे असें म्हणाला.

"एक बाई आली. तिने आपल्या पाटल्या विकायला आणल्या होत्या.

"सोनाराने दोन्ही वस्तु घेतल्या. एक काळा काळा दगड त्याच्या जवळ होता. त्यावर त्याने दोन्ही वस्तु घासून पाहिल्या व नंतर दोघांना म्हणाला, 'तुमचें सोनें इतकें शुद्ध आहे, इतकें अशुद्ध आहे. या कठीण काळ्या दगडाला 'कसोटी' म्हणतात. या दगडाला सोन्याचा मोह मुळीच नाही. सोन्याइतकी त्याची किंमत तर नाहीच नाही.'

"नंतर सोनाराने दोन्ही वस्तु भट्टींत घातल्या. सोनें वितळून त्याचा गोळा झाला. जो भाव त्या दिवशीं बाजारांत होता त्या भावाने तो सोन्याचा गोळा वजनाने विकत घेतला गेला. वजन लहानशा ताजव्याने केलें. सोन्याने सोनें मोजतां येत नाही. एकाचें माप किंवा एकाची कसोटी दुसऱ्याला लागत नाही.'

"आता रत्नपारख्याच्या दुकानांतील गोष्ट सांगतों—

"दोन पोरी त्याच्या दुकानांत आल्या. एकीला मोत्यांची माळ हवी होती, दुसरीला इअररिंग (कर्णफूल) हवें होतें.

"दुकानदाराने खऱ्या मोत्यांचे व खऱ्या हिऱ्यांचे अलंकार दाखविले. खरे असल्याने त्या डागिन्यांच्या किंमती फार होत्या. शिवाय ते डिझाइनही त्यांना पसंत नव्हते.

"दुसरें डिझाइन त्यांच्या पसंतीस उतरलें. तें खोटया मोत्यांचें व खड्यांचें होतें. पण त्यांना तेंच आवडलें.

"येथे निकष आवडी-निवडीचा किंवा सौन्दर्याभिरुचीचा होता. मूल्याचा प्रश्न गौण होता.

"आनंदाने त्यांनी खोटे अलंकार घेतले व किंमत दिली. दुकानदार म्हणतच राहिला की—बघा, खोटयापेक्षा खरे मोती खडे जास्त मूल्यवान आहेत !

"पण त्या पोरींना मूल्य नको होतें, रूप हवें होतें. मोत्यांचें व हिऱ्यांचें नांव खरें असो की कल्चर्ड, त्यांना नांवाशीं काय, रूप हवें होतें!

"वाङ्मयांतही सोनार व रत्नपारखी असे दोन्ही प्रकारचे रसिक व टीकाकार असतात. पण एक गोष्ट मात्र खरी की सोन्याचें मोजमाप वेगळें, मोत्याचें वेगळें; तसेंच शास्त्राचे नियम निराळे, काव्याचे निराळे. कुठे उपयुक्ततेला किंमत जास्त, तर कुठे सौन्दर्याला. कुठे बाजारभावाने किंमत ठरत असेल तर कुठे वैयक्तिक आवडीनिवडीने.

"वैयक्तिक अभिरुचि सुसंस्कृत होत गेली तर सदभिरुचीस पोषक असें वाङ्मयही निर्माण होत जाईल."

वाङ्मयीन टीकेचे निकष ठरवितांना देखील दोन गोष्टी लक्षांत ठेवायला पाहिजेत—एक तर वाङ्मयाची उत्पत्ति कशी होते व दुसरी त्याचें प्रयोजन काय?

संक्षेपतः असें म्हणतां येईल की व्यक्ति वाङ्मय निर्माण करते पण तें व्यक्तीसाठीच निर्माण करीत नाही, जर ती स्वतःपुरतेंच आपलें वाङ्मयक्षेत्र मर्यादित मानीत असती तर तिने प्रकाशनाचा, वर्तमान-पत्रांचा, व्याख्यानाचा, नभोवाणीचा आश्रय घेतलाच कशाला असता? वाङ्मय संतकवि मानीत तसें 'स्वांतःसुखाय' नाही. मग तें पूर्णपणें दुसऱ्यांकरतांच असतें काय—म्हणजे वाङ्मय परोपकार, परमार्थ, उपदेश, प्रचार या स्वरूपाचेंच असतें की काय? पण कोणता परमार्थ स्वार्थ-शून्य असतो बरें; आणि कोणत्या प्रचाराच्या मुळाशीं प्रचारकाची विशिष्ट मतपद्धतीवरील आस्था, श्रद्धा व तिचें उत्कटत्व नसतें? वाङ्मय व्यक्ति आणि समाज या दोहोंच्या परस्पर-संघर्षाने व परस्पर-संगमाने उत्पन्न होतें, हें खरें.

विशिष्ट देशकालपरिस्थितीचा ठसा त्या काळांतील कांही संवेदन-क्षम व्यक्तींवर पडतो. त्या व्यक्तीची मानसिक भूमिका अशी तयार

असते की, जशी साठविलेल्या दारूगोळयावर ठिणगी पडावी, तशीच त्या व्यक्तीला आपल्या भावना व आपले विचार व्यक्त करण्याची उत्कट आंतरिक तळमळ उत्पन्न होते. अशाच व्यक्ति 'वाङ्मय' निर्माण करतात. या तळमळीशिवाय जें लिहिलें जातें तें वाङ्मय नसून निव्वळ कल्पनारंजन, तथ्यनिरूपण किंवा शब्दजुळणी होय. या तळमळीशिवाय वाङ्मयांत सार्थकता येत नाही.

पुन्हा हें सांगायला नकोच की व्यक्तीची ही तळमळ व्यक्ती-पुरतीच नसते. व्यक्तीला आपण एका (विषम किंवा उत्तम) समाज-व्यवस्थेचे घटक आहोंत ही जाणीव उत्पन्न होते. म्हणजेच व्यक्तीला स्वतःच्या लघुत्वाचें भान असतें. असलें भान ज्या व्यक्तीला नसतें ती व्यक्ति अहंकाराने पछाडलेली असते व ती खरें वाङ्मय निर्मूं शकत नाही. गॉइटे या जर्मन कवीने याच अर्थाने लेखकांना इशारा दिला होता की ज्या लेखकाला आपण जें लिहितों तें कमींत कमी तीन हजार लोक तरी समजूं शकतील अशी खात्री नसेल त्याने लेखणी हातीं धरूं नये. व्यक्तीची ही तळमळ केवळ व्यक्तीसंबंधींची न राहतां जेव्हा विश्वात्मक स्वरूप ग्रहण करते तेव्हा तिला वाङ्मय म्हणतात. जी व्यक्ति स्वतःस अनेकांचें प्रतीक समजून, अनेकांच्या मुक्या आकांक्षांना वाचा फोडण्यास उद्युक्त होते—नव्हे, त्याशिवाय तिला दुसरी वाटच दिसत नाही—तिलाच खरी वाङ्मयनिर्मात्री म्हणतां येईल.

अर्थात्, व्यक्ति व देशकालपरिस्थिति हीं वाङ्मयनिर्मितीचीं दोन आवश्यक अंगें मानल्यावर, व्यक्तिदृष्टया व परिस्थितिदृष्टया टीकेचे दोन वेगळाले निकष आपल्यासमोर येतात.

(१) व्यक्तीचे विचार, उच्चार व आचार ज्यांत शास्त्रीय दृष्टया समीक्षिले जातात ते मानसशास्त्रीय व नीतिशास्त्रीय सिद्धांतांचे निकष.

(२) देशकालपरिस्थितीविषयीं सामान्य नियम मांडणारे समाज-

शास्त्रीय निकष (राज्यशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादि यांच्यामध्येच अंतर्भूत होतील.)

मानसशास्त्र व समाजशास्त्र यांचा वाङ्मयीन टीकेशीं काय संबंध आहे हें जाणण्यापूर्वी, हें लक्षांत ठेवलेलें बरें की हीं दोन्ही शास्त्रें अजून आपल्या अनिर्णीत अवस्थेंत आहेत. व म्हणून त्यांतील नियम स्थूल अनुमान व ठोकळ आडाखे या रीतीनेच मान्य करायला हवेत. दोन्ही शास्त्रें अंतिम सत्यें मांडीत नसून, सापेक्ष सत्याचेंच दर्शन देत असतात. नीतिशास्त्रांत बायबलमधील 'दहा आज्ञा' किंवा 'सत्यं वद, धर्मं चर' सारख्या शाश्वत नियमांचीं वचनें दिलीं आहेत हें जरी खरें असलें तरी नीतीचें कलेवर केव्हाही परिवर्तनक्षम असतें. नीतिनियमांत 'कूटस्थ, अचल व ध्रुव' असें शांकरब्रह्मासारखें अपरिवर्तनीय जें तत्त्व असेल त्याच्या जोडीला मानसशास्त्रांतील प्रयोगावस्थेंत असलेले नव-नवीन निर्णय बसविले तर या निकषाबद्दल घोटाळा माजणार नाही. व हीं शास्त्रें सापेक्ष असलीं तरी टीकेच्या शास्त्रीय स्वरूपाच्या सोयीसाठी, कोणती ना कोणती तरी, मानीव का म्हणाना, मर्यादा अंगीकारणें भाग आहेच.

मानसशास्त्र आणि वाङ्मयीन टीका यांच्या परस्परसंबंधाची चर्चा करतांना पूर्वीच्या प्रकरणांत उल्लेखिलेला नैसर्गिक वृत्तीं (instincts) चा लढा व सहकार ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आत्मसंरक्षण, स्वमताग्रह (self-preservation and self-assertion), सामाजिकता, आत्म-प्रदर्शन, क्षुधा, काम, जिज्ञासा या सात मूल वृत्ति मानतात. याशिवाय आत्मसंरक्षणांतून उत्पन्न होणारा क्रोध व भीति; स्वमताग्रहांतील अहंकार व जिघांसा; सामाजिकतेंतून उत्पन्न होणारे अनुकरणप्रियता व सहिष्णुता; आत्मप्रदर्शनांतून व जिज्ञासेंतून निर्माण होणारे विजिगीषा, मत्सर, द्वेष, सौन्दर्यपिपासा, शोधवृत्ति; काम व क्षुधा यांतून निर्माण होणारे कितीतरी गुणावगुण व्यक्तीच्या ठायीं असतात. याशिवाय कांही आनुवंशिक

संस्कार व कांही सवयींचे परिणाम असतातच. याशिवाय व्यक्तीव्यक्तींमध्येही विचार, भावना किंवा इच्छाशक्ति यांच्या प्राधान्यानुरूप निरनिराळ्या प्रकृति असतात. त्यांचे मुख्यतः अंतर्मुख व बहिर्मुख असे दोन वर्ग पडतात. सविस्तर चर्चा येथे स्थलसंकोचामुळे अशक्य आहे. वाङ्मयावरून व्यक्तीची चर्चा सुरू करण्यापूर्वी वाङ्मय-निर्मात्या व्यक्तीची वरील मानसशास्त्रीय विश्लेषणपद्धतीने चिकित्सा करणें जरुर असतें. मराठींत अलीकडे उठलेली वैयक्तिक टीकेची धुळवड—जिचा उल्लेख पुढे विशेष येईलच—हिच्या मुळाशीं बऱ्याचशा विकारी व संस्कारी वृत्तींचाच भरणा आहे.

या ठिकाणीं टीकाकाराची अहंग्रंथि किंवा न्यूनग्रंथि टीकाकारास कशी नडते याची आठवण करून देणारा हॅझलिटचा एक उतारा देण्याची माझी इच्छा आहे—" I would rather be a man of disinterested taste and liberal feeling to see and acknowledge truth and beauty wherever I found it than a man of greater and more original genius to hate, envy and deny all excellence but my own—but that poor scanty pittance of it which I had myself produced!' ( अर्थ—स्वतः रचलेल्या क्षुद्र व क्षुल्लक कृतींशिवाय इतरांच्या सर्व कृतींतील चांगुलपणा अमान्य करणारा व इतरांच्या कृतींकडे प्रतिस्पर्धेच्या व ईर्ष्या-द्वेषाच्या भावनेने बघणारा थोर व मौलिक प्रतिभावंत लेखक होण्यापेक्षा, मी आपला एक सामान्य अभिरुचि असलेला उदार भावनांचा माणूस झालेलों पुरवेल, कारण या रीतीने मला सत्य व सौन्दर्य मोकळ्या मनाने पाहातां येईल व कबूल करतां येईल. ) हॅझलिटने म्हटलेली गोष्ट खरोखरीच फार मार्मिक आहे. कित्येक लेखकांना थोडीशी स्तुति व थोडासा आदर मिळूं लागतांच, ते स्वतःस फारच मोठे व प्रतिभावान असे मानूं लागतात, व परिणामीं, स्वतःच निर्मिलेल्या स्वतःच्या कल्पनाचित्राशीं वास्तविक स्वतःला ताडून पाहतांना

त्यांना जो अनपेक्षित निराशेचा धक्का बसतो, त्याने ते बेजार होतात. व म्हणूनच कैक लेखक ओरड करतात की, 'अरे, मला अनुल्लेखाने वाङ्मयांत ठार केलें हो;' पदवी असणें किंवा नसणें; किंवा लेखकाने गरीब असणें वा श्रीमंत असणें, या गोष्टींमुळे जे विशिष्ट मानसिक प्रत्याघात उत्पन्न होतात व ज्या ग्रंथि मनांत जडतात, त्या टीकाकाराने अभ्यासण्याजोग्या आहेत. तसेंच जडजंबाल शब्दयोजना किंवा 'रुचेल तसें व विकेल तसें' लिहिणारांची सवंग मनोवृत्ति, यांच्या पाटीशीं असलेलें व्यापारी व बकाली मानसशास्त्र पडताळून पाहण्यासारखें आहे.

नीतिशास्त्र व टीका यांचा संबंध काय, असें विचारल्याबरोबर आपल्यासमोर मराठी वाङ्मयांत, 'ओलेती' प्रकरणीं, व भा. रा. तांबे यांच्या निबंध प्रकरणीं, माजलेलीं दोन रणें उभीं राहतात. वाङ्मयांत अश्लीलता म्हणजे काय? ग्राम्य विनोदाच्या मर्यादा कोणत्या? प्रत्येक लेखकाने व कवीने मूरहेड व रॅशडेलच्या नीतिग्रंथांचा अभ्यास करून नंतर लेखन करावें की काय? प्रा. कवीश्वरांचें 'नीति आणि कलोपासना' हें किंचित एकांगी झालेलें पुस्तक या बाबतींत एक बाजू फार स्पष्टपणें व जोराने मांडीत आहे की--'उच्चतम कलेने नीतिनियम झुगारतां कामा नये.'

तांबे म्हणतात--'उच्चतम कलाकृतींत नीतिनियम अबाह्धित असतातच.'

प्रा. फडके यांचा 'उपयुक्तता व पावित्र्य' हा निबंध पाहा ('उषा' मासिक अंक २० वा)--'पावित्र्य स्वयंभू नाही. माझ्या वाडवडिलांनी जे विषय पवित्र मानले ते त्यावर कुणी 'पवित्र' असा छाप मारला होता म्हणून नव्हे. निसर्गाने किंवा देवाने असे छाप मारलेले नाहीत. सृष्टीने पवित्र व अपवित्र असा भेद केलेला नाही.'

अत्रे व कैक इतर नवमतवादी, फ्रान्समध्ये एकेकाळीं नांवाजलेल्या झोला, मोपांसा, बॉड्लिवीर, बालझाक इत्यादि लेखकांप्रमाणे प्रकृतिवादा-

(Naturalism) चा पुरस्कार करून म्हणतात--"कलेचा नीति-अनीतीशीं संबंध नाही. कला वास्तवचित्रणासाठी आहे. कला 'शिवाशिवाच्या पलीकडे' Beyond good and evil आहे." वगैरे.

यासंबंधीं एफ. एच. ब्रॅडले यांच्या Collected Essays मध्ये पा. ६१८ ते ६२७ वर वाङ्मयांत लैंगिक प्रश्नांची चर्चा कितपत करावी यावर मोठें मार्मिक विवेचन आढळतें. "सौन्दर्यप्रतीति कधीच पूर्णपणें आत्मनिष्ठ असूं शकत नाही. एखाद्या वस्तूचें--मग ती दूर असो की जवळ, हालती असो वा स्थिर, जिवंत प्राणी असो वा पदार्थ असो-स्थायी आकर्षण, निव्वळ वैयक्तिक संवेदना ओलांडून, सर्वांना सारखें असें अनुबोधा (Cognition) च्या प्रांतांतलें स्थायी आकर्षण वाटेल, तेव्हाच त्या वस्तूस सुंदर म्हणतां येईल·····अर्थात् निर्वैयक्तिक ठरल्यानंतर, सौन्दर्यप्रतीतींत आम्ही आत्मलीन होत नसून, सौंदर्यज्ञाता आपल्या बाहेरील ज्ञेयवस्तूंत रममाण होतो. अर्थात् कल्पनेच्या मदतीने तो आपल्या व्यक्तिगत दुबळेपणाच्या व सवयींच्या पलीकडे जातो व सौन्दर्यप्राप्तीचा चिरंतन शोध करीत असतो. या शोधांत निर्मोह आणि स्वातंत्र्य (Detachment and Freedom) या दोन्हीची आवश्यकता असते. लैंगिक विषयांवरील चर्चाही निर्वैयक्तिक (impersonal) स्वरूपाची, आणि निर्मोहास अनुसरून असली की ती स्वतंत्र व अनिर्बंध असल्यास हरकत नाही."

आपल्याकडे 'सदभिरुचि' शब्दाचा जो बागुलबुवा उभारला जातो, त्या सदभिरुचीचा लक्षांश जरी आम्ही किंचित अंतर्मुख होऊन स्वतांत उतरविला, तर? सदभिरुचि अशी वरून चिकटवून किंवा लादून येत नसते. ती आंतून निर्माण झाली पाहिजे. सर्व नीतिनियमां-बद्दल हेंच आहे. समाजांत एखादा मनुष्य सभ्य, शीलवान दिसतो, वागतो; नीतिमान मानला जातो. परंतु यावरून त्याची नीतिमत्ता कधीच ठरत नसते. तो एकटा असतांना, वा एका किंवा दोघां

व्यक्तींच्या--मग ते शत्रु असोत की मित्र असोत--सान्निध्यांत कसा वागतो यावरून त्याची नीतिमत्ता ठरविली जाईल. व ती ठरविणाराही तो स्वतःच असेल. शास्त्र फक्त नियम समोर मांडण्यापुरतें असतें.

अश्लीलतावादाविषयी कै. श्री. कृ. कोल्हटकर म्हणतात--

"नुसती अश्लीलता सर्वथैव निंद्य होय. तीच जर एखाद्या सुंदर विचाराशीं अशा रीतीने संलग्न असली की, ती गाळली असतां तो विचारही आणतां येत नाही, तर ती क्षम्य असते. कारण अशा प्रसंगीं अश्लीलतेकडे गौणत्व येऊन, प्रेक्षकांचें मन त्या सुंदर विचाराकडे ओढून जातें."

प्रा. कवीश्वर विचारतील की ज्या विचारांत अश्लीलता संलग्न असेल तो सुंदर असेलच कसा? सौन्दर्य व शिवत्व इतक्या भिन्न चिजा आहेत काय?

प्रा. फडके 'साहित्य आणि संसार' या ग्रंथांत म्हणतात—
" 'अश्लील' या शब्दाची व्याख्या तरी काय, असें मला कोणी विचारलें, तर मी सांगेन जें 'ग्राम्य तें अश्लील.' "

आता हें 'ग्राम्य' ठरवायचें कुणी? संस्कृति (?) विकासाबरोबर चांगल्यावाईट गोष्टींची वाढ व्हायचीच. व एखादा वरून सभ्य मनुष्य आंतून ग्राम्य कशावरून नसेल? 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे, हृदये तु हलाहलम्'! ग्राम्यतेचा निकष कोणता?

श्री. माडखोलकर आपल्या 'वाङ्मय आणि नीति' नामक निबंधांत (रत्नाकर, एप्रिल १९२६) म्हणतात—"कांही सामान्य नीतितत्त्वें हीं शाश्वत आहेत असें जरी समजून चाललें, तरी समाजाच्या लौकिक नीतींत मात्र नित्य परिवर्तन होत असतें, यांत शंका नाही...... अशा स्थितींत रूढ नैतिक कल्पनांच्या कृत्रिम पाशांनी प्रतिभेला जखडून टाकण्यांत अर्थ काय?......मनुष्य दुराचरण करावयाला उद्युक्त होतो, तो कांही त्यांत त्याला आनंद वाटतो म्हणून नव्हे;

इच्छेविरुद्ध व क्वचित् अजाणतेपणानेही, तो मोहाच्या आवर्तांत सापडून, त्याचें अध:पतन होतें; आणि म्हणून, त्याची हेटाळणी न करतां, त्याच्याविषयी सहानुभूति वाळगणें, हेंच आपलें कर्तव्य आहे." व पुढे 'रिसरेक्शन' या कादंबरीच्या टीकेवरील टॉलस्टॉयचें हें उत्तर ते नमूद करतात—"मी जेव्हा हें पुस्तक लिहिलें तेव्हा मी वासनांचा अंत:करणपूर्वक तिरस्कार करीत असें, आणि त्या तिरस्कारास व्यक्त करण्याचा एक मार्ग म्हणजे मी तें पुस्तक लिहिलें." अलेक्झांडर कुप्रीन याच्या वेश्याजीवनावर आधारलेल्या व जगांतील कैक भाषांतून अनुवाद झालेल्या 'यामा' कादंबरीबद्दल सुद्धा कमीअधिक प्रमाणांत हेंच म्हणतां येईल. पण डी. एच. लॉरेन्स या इंग्रजी लेखकाचा व जेम्स जॉइसचा तर त्याहीपेक्षा बंडखोर वृत्तीने केलेला लैंगिक प्रश्नाचा आविष्कार व पुरस्कार–याची कोणत्या कोटींत गणना करणार ? मनोगाहनशास्त्रांतील प्रयोग म्हणून तेंही एकवेळ क्षम्य मानलें तरी स्वत: माडखोलकर आपल्या 'दुहेरी जीवन' सारख्या कादंबरींतील उत्तान 'लिंगपिसाट' (हा शब्द माझ्या माहितीप्रमाणे श्री. वाळिंबे या नवीन चिकित्सक टीकाकाराचा आहे) पात्रांचें समर्थन टॉलस्टायप्रमाणे देऊं शकतील काय ? माडखोलकरांच्या बीभत्स शृंगारिक वर्णनांतून निव्वळ हॅवेलॉक एलिसची शास्त्रीय विचिकित्सा किंवा लॉरेन्स सारखा रानवट दणकटपणा असतो काय ? माडखोलकर त्या वर्णनांतून रंगत असतांना दिसतात. हें वा. म. जोशांसारख्या सन्मान्य टीकाकारांचें मत आहे, माझें नव्हे.

वर माडखोलकरांचें लेखन उदाहरण म्हणून घेतलें. वस्तुत: अलीकडील बऱ्याचशा लेखकांत लैंगिक प्रश्नांबद्दल दिसून येणारी अनिर्बन्ध आवड, गेल्या पिढींतील सनातनी दडपणांमुळे, कदाचित् प्रतिक्रिया–स्वरूपाची असेल. पण कोणतीही प्रतिक्रिया केवळ प्रतिक्रिया म्हणून उपयोगाची नाही. प्रतिक्रियेने प्रगतीस पोषक झालें पाहिजे. अन्यथा ती प्रतिक्रिया फक्त एखाद्या मानसिक रोगाप्रमाणे असते, हा

मानसशास्त्रीय दंडक वाङ्मयांतही समोर ठेवायला पाहिजे.

नीतिशास्त्र म्हणजे सामाजिक व्यक्तीचें शास्त्र आहे. समाजविहीन व्यक्तीचें नीतिशास्त्र तें काय असणार? अर्थात् नीतिनियमांचा विवेकपूर्वक स्वीकार कलावंतास आवश्यक होय; मात्र प्रसिद्ध इतालियन सौन्दर्यशास्त्रज्ञ क्रोचे याने म्हटल्याप्रमाणें "कोणतीही कलात्मक प्रतिकृति एखाद्या नीतिदृष्टया प्रशंसनीय किंवा निंद्य कृतीची प्रतिकृति असते; परन्तु कलात्मक प्रतिकृति ही स्वतः नीतिअनीतीपलीकडे असते."* नीतिनियमांच्या कक्षेबाहेर राहणें क्षम्य, असें कांही लोकांचें मत आहे. वस्तुतः जे खऱ्या व चांगल्या ध्येयासाठी जगतात, त्यांना जीवनापासून वेगळे असे नीतिनियम पाळत बसावें लागत नाही. नीतिनियमांबद्दल बाऊ किंवा बूज राखणें, त्यांचा विरोध किंवा समर्थन करीत बसणें, हें याच गोष्टीची साक्ष पटवितें की नीतिनियम म्हणजे व्यक्तिनिरपेक्ष असें तिसरें कांहीतरी आहे, व ते जीवनांत उतरविण्यास लोक भितात किंवा त्यांना अनावश्यक मानतात वगैरे. चिकित्सकपणाच्या या बौद्धिक व एकांगी विकासांत आम्ही कुठे जीवनांतील सामग्र्याला, सतत-चेतन प्रवाहाला विसरत तर नाही ना, अशी कधी कधी शंका वाटते! क्लाइव बेलने एके ठिकाणीं मोठया गमतीने म्हटलें आहे की 'समाज कलेवर अप्रत्यक्ष परिणाम घडवून आणतो, कारण कलावंतांवर तो प्रत्यक्ष परिणाम घडवीत असतो.'

टीकेचे समाजशास्त्रीय निकष म्हणजे तदंतर्गत अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, प्राणिशास्त्र, वंशशास्त्र वगैरे सामूहिक जिवन्त तत्त्वांचे निकष आलेच. टीकाकारास यांचा अभ्यास फार उपयोगी पडेल. जों जों आमच्या ज्ञानाच्या परिसीमा वाढत जातील, व मूल्यांचीं क्षितिजें

---

* An artistic image portrayi an act morally praiseworthy or blameworthy. but this image as image is neither morally praiseworthy nor blameworthy ' (crice)

विस्तृत होत जातील तों तों असलें शास्त्रीय अध्ययन फार महत्त्वाचें ठरत जाईल. पण त्या त्या शास्त्रांतील तत्त्वें प्रयोगावस्थेंत आहेत व तीं तत्त्वें अगदी सार्वकालिक व सर्वदेश-मान्य नाहीत ही जाणीव मनांत ठेवली म्हणजे पक्षाभिमानानें आंधळें व्हायला नको.

तौलनिक समाजशास्त्राचा व सामाजिक मानसशास्त्राचा अभ्यास टीकाकारास मानवसमाजाच्या विकासाची व त्यांत वाङ्मयाचें व कलेचें स्थान कोणतें याची कल्पना आणून देईल. मानवसमाज मूलतः कसा प्रवासी व दरवेशी अवस्थेंत होता; निसर्गाशीं लढतां लढतां आज संस्कृति म्हणून जें कांही आपण म्हणतों, त्या अवस्थेपावेतो तो कसा येऊन पोचला; कुटुंब, जाति, पंथ, धर्म, राष्ट्र इत्यादि टप्पे काय दर्शवितात व वाङ्मयावर यांचा क्रमानुसार काय काय परिणाम घडून आला, हें समाजशास्त्र व मानववंशशास्त्र (Anthropology) शिकवील. कलेचा मूलोद्गम कोणता याच्याबद्दल रॉजर फ्राय या इंग्रज सौन्दर्य-शास्त्रज्ञानें गुहावासी आदिपूर्वजांच्या शिल्प व चित्रकौशल्यावरून अनुमानें बसवलीं आहेत. मध्ययुगांत कला व वाङ्मय सर्वस्वीं धर्म व ईश्वरानुराग यांना वाहिलेलें आढळतें. आजकालचे कांही पुरोगामी टीकाकार या प्रकारच्या वैष्णव व वैष्णवेतर धार्मिक कवितेला व वाङ्मयाला विस्मृतिवादी (escapist) म्हणून त्यांचें महत्त्व कमी प्रतीचें लेखितात. परंतु त्या त्या काळाचा विचार करतां तें तें वाङ्मय तितकेंच पुरोगामी स्वरूपाचें होतें हें उज्जयिनी येथील महाराष्ट्र वाङ्मय-मंडळाच्या वार्षिकोत्सवाच्या अध्यक्षस्थानावरून दिलेल्या श्री. पु. य. देशपांडे यांच्या व्याख्यानांत सिद्ध केलेलें आहेच. वस्तुतः ज्याला आम्ही एका दृष्टीनें विस्मृति किंवा पलायन म्हणतों, तें दुसऱ्या दृष्टीनें आत्मसिद्धीचें किंवा परिपूर्तीचें तत्त्वज्ञान का म्हणून असूं शकणार नाही? समाजशास्त्रांत, समाजविकासांतील संघर्षांत व धर्म-पंथ आदि मतांच्या गलबल्यांत वाङ्मयानें आपली रसोपासना जी शाबूत व अव्याहत

राखली आहे त्याचें श्रेय समाजाला किंवा समाज ज्या समजांवर आश्रित असतो त्यांना नसून व्यक्तीलाच आहे. आधुनिक काळांत, जीवनकलह जों जों तीव्र स्वरूपाचा व समाजव्यवस्था जों जों परावलंबी व अपरोक्ष-श्रम-प्रद्धतीची होत चालली आहे, तों तों वाङ्मयाचें कार्य व टीकेचें कार्य यांची परस्परावलंबित जबाबदारीही तितकीच वाढत चालली आहे, हें टीकाकाराने लक्षांत ठेवावयास हवें. गुण व परिणाम या दोन्ही दृष्टींनी वाङ्मयीन टीकेस समाजशास्त्र आवश्यक आहे.

प्राणिशास्त्र, वंशशास्त्र, शरीरशास्त्र वगैरे शास्त्रांचा जरी व्यक्तीशीं संबंध असला तरी त्याचा वाङ्मयीन टीकेशींही अपरोक्ष संबंध येतोच. अमुक लेखकांत अमुक प्रकारची निराशावादी वृत्ति, किंवा अमुक विकृत आवड, किंवा लिंगपिसाट वृत्ति कां आहे, याचें मूळ वाङ्मयनिर्मात्या व्यक्तीच्या मनोभूमिकेंत जितपत बघतां येईल तितकेंच त्याचे शारीरिक व आनुवंशिक गुणविशेष पडताळूनही जाणतां येण्याजोगें आहे. प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांचा अभ्यास, भूगोल व भूगर्भ या विद्यांचें ज्ञान वाङ्मयांत उपयोजिल्या जाणाऱ्या निसर्गवर्णनांची टीका करतांना आवश्यक आहेच. पण आधुनिक तत्त्वज्ञानावरही जीवशास्त्राचा ( Biology ) जो अंमल चालला आहे, व बर्गसॉं, हक्स्ले, हाल्डेन इत्यादि विचारी विवेचकांची त्याबद्दल जी दृष्टि आहे तिची माहिती टीकाकारास असणें आवश्यक आहे. मराठींत असला एक गौरवपूर्ण प्रयत्न श्री. द. के. केळकर यांच्या 'वादळी वारे' या संग्रहांतच विशेषेंकरून आढळतो.

आता उरतां उरलें अर्थशास्त्र व राज्यशास्त्र. आधुनिक भाषेंत बोलावयाचें म्हणजे हीं अन्योन्याश्रित शास्त्रें होत. भांडवल हेंच सिंहासन व भिरास हाच राजदंड असे आधुनिक राष्ट्रकारणांत व वाङ्मयासमोरही मोठाले पेचप्रसंग व प्रश्न उभे राहिले असल्यास नवल नाही. आक्षिप्त वाङ्मय, लेखनावळ, लेखक व प्रकाशक यांचे संबंध, कादंबऱ्यांतील

राजकारण, 'साहित्य आणि समाजजीवन' सारख्या लेखमाला, वगैरे वगैरे याच प्रश्नांतून उद्भवणाऱ्या अनंत प्रश्नांपैकी कांही होत. वस्तुत: यांची बरीच सविस्तर चर्चा लालजी पेंडसे विरुद्ध पु. य. देशपांडे या वादांत होऊन चुकली आहे. तरी पण हल्लीच्या टीकाकाराला कोणत्याही राजकीय 'वादा'ला न चिकटतां निष्पक्ष बुद्धीने स्वतंत्र टीकादृष्टि राखावयास पाहिजे हें निराळ्याने सांगायला नको.

नुकतेंच मराठींत एका कादंबरीचें परीक्षण वाचावयास सापडलें. टीकाकाराच्या नांवाच्या ठिकाणीं कुणी प्रथितयश व लोकप्रिय अशीच व्यक्ति होती. कादंबरीही तितक्याच मोठ्या व्यक्तीने लिहिलेली. असें असतांनाही टीकाकार जातां जातां असें म्हणतो की, 'या कादंबरीचा सर्वांत मोटा उल्लेखनीय विशेष गुण म्हणजे यांत गांधी व गांधीवादावर मनसोक्त कोरडे ओढले आहेत.' पहिली गोष्ट म्हणजे गांधी ही व्यक्ति व गांधींचीं तत्त्वें या दोन्ही गोष्टी एकच नाहीत. त्यांतल्या त्यांत ख्रिस्त म्हणजे ज्याप्रमाणे सर्व ख्रिश्चन धर्मानुयायी नाहीत तद्वतच गांधी म्हणजे गांधीवादी सर्व जन मुळीच नाही. अशा अवस्थेंत ही असली एकांगी टीका कुठवर टीका या शब्दाला पात्र ठरणार? पण मराठींत असल्याच टीकांना फार ऊत आलेला आहे व यांनाच फार किंमत दिली जाते.

राजकारणाने वाङ्मयाची गुलामगिरी पत्करूं नये, तितकेंच टीकाकारानेही कोणत्याही राजकीय मतावलीने आपली दृष्टि अंध वा अधू करून घेऊं नये.

याप्रमाणे निरनिराळ्या शास्त्रांचा जों जों अभ्यास वाढेल, तों तों टीकाकाराने उपयोगांत आणावयाचे निकष जास्त सार्वभौम व सार्वत्रिक स्वरूपाचे ठरूं लागतील. टीकाकाराची दृष्टि जास्त सखोल व विशाल, म्हणजेच वैज्ञानिक बनत जाईल.

सेंट ब्यूव्ह (Saint Beauve) या फ्रेंच टीकाकाराचा निकषां-बद्दल एक मननीय उतारा देऊन हें प्रकरण येथेच आटोपतें घेतों.

"निसर्गात वैविध्य भरपूर आहे. प्रतिभेचे प्रकारही अनंत आहेत. मग बा टीकाकारा, तूंच एकाच तऱ्हेच्या कायम ठशाबद्दल कां आग्रह

घरतोस ?...टीकाकार व इतिहासज्ञ जो असेल तो प्रत्येक लेखकाच्या मनःप्रवाहाबरोबर वाहत सुटत नाही; तो प्रत्येक लेखकाला स्वतःच्या तत्त्वांशीं पडताळून पाहतो; आणि तो या स्वच्छंद वाहणाऱ्या कैक निर्झरांना, स्वत: आधी कष्टाने खणलेल्या कृत्रिम कालव्यांमध्ये आणून सोडतो. जर कांही बंडखोर शाखा असतील तर त्यांना तो कापून टाकतो."*

## [ ४ ]

आता या प्रकरणांत टीकेचे विविध प्रकार व पद्धति यांच्या स्वरूप-भेदांचा विचार करू या. एकेका प्रकाराचीं उदाहरणें बरोबर दिल्याने तो तो प्रकार स्पष्ट होत जाईल असा भरवसा आहे. टीकाप्रकारांत देखील आत्मनिष्ठ व वस्तुनिष्ठ असे विभाग पाडल्यास प्रत्येकाच्या अन्तर्गत खालीलप्रमाणे चार चार प्रमुख टीकाप्रकार मोडतील:—

| आत्मनिष्ठ | वस्तुनिष्ठ |
|---|---|
| (१) कलादृष्टीस प्राधान्य देऊन केलेली टीका | (१) शास्त्रीय टीका |
| (२) व्यावहारिक (सामाजिक) टीका | (२) तात्त्विक ,, |
| (३) राजकीय ,, | (३) ऐतिहासिक ,, |
| (४) वैयक्तिक ,, | (४) वर्तमानपत्री ,, |

*" Nature is full of variety—of moulds which differ : the forms of talent are indefinite. Why ? O critic, insist on one pattern only ? ......the critic-historian never lets himself go with the current of each writer's nature, as he meets it; he recalls it peremptorily to his mode; he forces more than one wanderning stream back to the artificial channel he has dug beforehand. If there are rebel branches, they are cut off " ( Loci critic p. 415)

वाङ्मयांत कलात्मक टीका रसिकजन प्रामुख्यानें करतात. या टीकाप्रकारांत कुठे उद्गारचिन्हांची सैल हाताने केलेली खैरात आढळते, तर कुठे हळुवार संवेदनक्षम मनाला स्पर्श करणाऱ्या मार्मिक कलात्मक स्थलाचा उल्लेख असतो. शब्दचमत्कृति, अलंकार, पेचप्रसंग वगैरे शोधणारी रीतिप्रधान टीका याच सदरांत येईल. कांहींच्या मतें, ही उच्च प्रतीची नाही; कारण अभिरुचीचें व संवेदनक्षमतेचें गमक वैयक्तिक आवडी-निवडी व संस्कारानुसार वेगवेगळालें असूं शकेल. लहानपणची एक हास्यास्पद गोष्ट आठवते. एका सनातनी वृत्तीच्या मित्राला शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्याबद्दल वाटणारा आदर निम्मा-अधिक कमी होण्याचें कारण फक्त एवढेंच की त्याला कुणाकडून तरी निश्चित रीत्या कळलें की सदर बंगाली कादंबरीकार शाकाहारी नव्हते; व ते मासळी खात. माझ्या मित्राच्या नावडीचें कारण फक्त मासळी या खाद्याबद्दल वैयक्तिक किळस! रंगयोजनेविषयीं, तसेंच स्वरमाधुरीविषयीं प्रत्येकाचे डोळे किंवा कान तितके सारखेच सुसंस्कृत झालेले नसतात. अशा स्थितींत कलात्मक टीकेची फार गरज भासते. जी टीका सुरुचि निर्माण करणाऱ्या, सुमतीस चालना देणाऱ्या वाङ्मयाकडे वाचकांचें लक्ष वेधील, ती खरी कलात्मक टीका. निव्वळ रीतिचमत्कारांना प्राधान्य देणारी टीका केव्हाही गौण प्रकारची कलात्मक टीका होय. मराठींतलें उदाहरण घ्यावयाचें झाल्यास काका कालेलकरांची बरीचशी टीका खऱ्या कलात्मक स्वरूपाची असते. गौण प्रकारच्या टीकालेखकांचीं नांवें कशाला हवींत ?

पण या कलात्मक टीकेच्या सौन्दर्यप्रधान निकषाच्या अगदी उलट व्यवहारवाद्यांचा उपयुक्ततेचा निकष असतो. जेथे रसिक एखाद्या कवितेंतील बहारीच्या शब्दयोजनेवर खूष होतो व म्हणतो 'वा:'; तेथेच नेमका हा व्यवहारवादी वा समाजवादी विचारतो 'हँ:! याचा उपयोग काय? हें काव्य किती जणांचें पोट भरूं शकेल? हें विलासी

वर्गाच्या सुखवस्तुपणाचें दर्शन व रिकामपणाची कामगिरी आहे.' (जणूं काय पोट भरणें हाच माणसाचा संपूर्ण जीवनहेतु!) या पद्धतीची व्यावहारिक टीका बव्हंशीं तीन प्रकारची असते—

एक, समाजाच्या कालच्या धारणा उराशीं बाळगून नेहमी 'जुन्याकडे जा!' असला आग्रह धरणारी (सनातनी);

दुसरी, समाज ज्या अवस्थेंत आहे, त्याला जसेंच्या तसें घेऊन चालणारी (वास्तववादी);

तिसरी, समाज कसा व्हावा याचीं स्वप्नचित्रें (यूटोपिया) मनांत बाळगून त्याप्रमाणेच वाङ्मय लिहिलें जावें असें प्रतिपादणारी (नवमतवादी).

या प्रकारच्या टीकेंत, वस्तुत: जेथे बुद्धिप्रामाण्याला व विवेकशीलतेला अत्यधिक महत्त्व द्यावयास हवें, तेथे त्याच्या अगदी उलट भावनाप्रधान, जहाल, पक्षांध व आत्यंतिक स्वरूपाचीं, विरोधी मतांचा नेहमीं विपर्यास करणारीं अशीं विधानें आढळून येतात. हा बुद्धीचा तोल सोडण्याचा प्रकार केवळ सनातनीच करतात असें नसून नवमतवादीही तेंच पुष्कळदा करतात. ('किर्लोस्करा'चीं वार्षिकें याची साक्ष देतील.) धार्मिक सनातनी टीका आणि मार्क्सला 'बाबावाक्यम्' मानणाऱ्या अर्धवट समाजवाद्यांची टीका यांत मनोवृत्तीचा फरक मुळीच नाही. दोघेही सारखेच मतविशिष्टाला चिकटलेले व ग्रंथप्रामाण्य मानणारे रूढिवादी (dogmatist) असतात. परंपरागत ज्ञानांतील श्रेष्ठ अंश व प्रयोगकालीन ज्ञानांतील श्रेष्ठ अंश घेऊन जे समतोल बुद्धीने प्रगतिपोषक वाङ्मय-टीका करतात अशा उत्तम सनातनी व उत्तम नवमतवादी वा समाजवादी टीकाकारांचा प्रश्नच अलाहिदा. ते रूढिबद्ध नसतात; उलट जीवनतत्त्वाप्रमाणे सतत विकासशील अशी त्यांची मनोवृत्ति असते.

वास्तववादी सामाजिक टीका सुद्धा कैक जागीं भारीच विसंगत ठरते. उदाहरणार्थ श्री. आ. रा. देशपांडे यांचें 'भग्नमूर्ति' नामक

काव्य! यांतील काव्यविषयाचा सामाजिक हेतु (social content) काय व या पुस्तकाचा सामाजिक पुनर्घटनेंत भाग (role) कोणता; हें सर्व अर्थशास्त्रीय मूल्यनिर्धारणाने ठरवीत बसणें म्हणजे अश्रूंचें वजन किती व किंमत काय व त्यांना एकत्र करून त्यांचें बाष्पीकरण (evaporation) केल्यास क्षारद्रव्य (NaCl) किती उरेल याची मोजदाद करीत बसण्यासारखेंच आहे. 'रस' ही चीज—चीज जर त्याला म्हणूं शकलों तर—(किंबहुना, अवस्था) मानसिक व अतींद्रिय स्वरूपाची आहे; तिचें स्थूल मूल्यमापन अशक्यप्राय आहे. 'रसा'ला भौतिक व स्थूल उपयुक्ततेच्या बंधनांनी बांधूं पाहाल तर रसाचा आत्मा तर उरणार नाहीच, फक्त शब्द तेवढे हातीं राहतील; रेने फुलप मुलरने आपल्या 'माइंड अँड फेस ऑफ बोल्शेविझम' मध्ये म्हटल्याप्रमाणे रशियांत झाले तसे (खरोखरीच तसे आहेत की नाहीत कुणास ठाऊक!) 'कवींचे कारखाने' मात्र तयार होतील; व हुकुमेहुकूम कवितेचा पक्का माल निपजूं लागेल. म्हणूनच व्यावहारिक टीका सर्वत्र करूं नये; प्रसंग पाहून व पोच संभाळून तशी टीका करण्यांत यावी.

जी स्थिति सामाजिक टीकेची तिच्याही पेक्षा वाईट परिस्थिति राजकीय टीकेची होत चालली आहे. राजकारण म्हटलें म्हणजे आधीच इंद्रधनुष्यासारखा क्षणजीवी व नानारंगी खेळ. पण या इंद्रधनुष्यांत सुद्धा एकाच रंगाला पुरतें इंद्रधनुष्य मानणारे कमी का आढळतात? विशिष्ट राजकीय गटाचा शिक्का कपाळावर मारून, जात्यभिमानाने किंवा प्रान्ताभिनिवेशांत मानवी हिताची व नीतीची उपेक्षा करणारे कैक टीकाकार वस्तुत: टीका करीत नसून प्रचार करीत असतात. प्रचार म्हटला म्हणजे त्यांत आग्रह आलाच. टीकाकाराने मूलग्राही व्हावें; दुराग्रही होऊं नये. मूलग्रहण म्हणजे सर्व पक्षांचा समाचार घेणें त्यासाठी तितकेंच आवश्यक होऊन बसतें. असलें उत्तम मूलग्राही राजकीय टीकाकाराचें मराठींत उदाहरण द्यावयाचें म्हणजे प्रा. न. र. फाटक किंवा आचार्य जावडेकर यांचेंच.

गुजराथींत श्री. भट्ट यांच्या साहित्यसमीक्षा नामक ग्रंथांत पहिलाच लेख 'विवेचननो आदर्श' यासंबंधीं आहे. त्यांत टीकाकाराचे गुण सत्यनिष्ठा, स्वातंत्र्य, सत्यभाव वगैरे सांगतां सांगतां ताटस्थ्याबद्दल गमतीने लेखकाने 'अमृतबाझार पत्रिके'चे संपादक कै. मोतीलाल घोष यांचें उदाहरण दिलें आहे. ते फार तुटकपणें वागत; बड्या लोकांच्या समाजांत तर विशेषसे वावरतच नसत; त्यावर त्यांना एकाने प्रश्न केला की, 'असें कां?' तर त्यांनी उत्तर दिलें, 'मी ठरलों पत्रकार. मला या बड्या लोकांविरुद्धही केव्हा लिहावें लागेल त्याचा नेम नाही. मी त्यांच्याशीं संपर्क ठेवला तर केवळ मुलाहिजाखातर तरी मला त्यांच्यावर भेदक टीका करणें संभवणार नाही. म्हणून मी आपला त्यांच्यापासून दहा हात दूरच राहतों.' जसा निष्पक्ष पत्रकार, तसाच निष्पक्ष वाङ्मयीन टीकाकार वाङ्मयावर राजकारणाचे व राजकारणावर वाङ्मयाचे असे अन्योन्य परिणाम बघत असतो, अभ्यासीत असतो. बागेचें परीक्षण करावयास जाणाऱ्याला बागेंतील एका विशिष्ट कमळावर किंवा दुसऱ्या फुलावर रममाण होण्याची परवानगी किंवा अवकाश असतोच कुठे ?

वाङ्मयांत अलीकडे सर्वत्र ऐकूं येणारी मार्क्सवादी टीकाकारांची ओरड की वाङ्मयांत आम्हांला वर्गसंघर्ष पाहिजे, श्रममूल्य पाहिजे, वर्गहीन समाजघटनेचा आदर्श पाहिजे वगैरे, हीही याच एकांगी टीका-प्रकारांत मोडते. आजच्या विषम समाजव्यवस्थेंत व पारतंत्र्याच्या राजकीय परिस्थितींत असले सूर निघणें अगदी स्वाभाविक आहे. पण मार्क्सवादी टीकाकाराने हेंही लक्षांत ठेवायला पाहिजे की त्यांच्या धारणा अन्तिम नाहीत. मार्क्सही मनुष्य होता व चुका करूं शकत होता. जगाचें जीवन मार्क्सच्या तर्कांच्या चौकटीपलीकडे वेगाने प्रगत होत आहे, हें मार्क्स-'वाद्यां'नी विसरूं नये. ज्यूलियस हेकरच्या 'मॉस्को डायलॉग्ज' या अत्यन्त सुंदर पुस्तकांत पृष्ठें २२६ ते २२९ 'कम्यूनिझमच्या अमलांत कलेचें तत्त्वज्ञान' यावर चर्चा आहे. त्यांत

प्लॅखॅनॉव्ह या काल्पनिक पात्राने कांही कटु का असेनात, पण सत्यें चवाठ्यावर मांडलीं आहेत. "'कलेसाठी कला' या आरोळीऐवजी आता 'पैशासाठी कला' ही आरोळी लोकांच्या मनांत जमूं पाहत आहे. मार्क्सनेही आपल्या 'तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य' या ग्रंथांत असेंच म्हटलें आहे की, 'आता अशी वेळ येऊन ठेपली आहे की ज्या गोष्टी पूर्वी निव्वळ व्यक्त केल्या जात, त्याही विकत घेतल्या जातील–पुण्य, प्रेम, मतें, शास्त्रें, विवेक इत्यादि; कर्मीत कमी या सर्व व्यापारांत तर शिरतीलच......'

"हल्ली मात्र स्थिति अशी आहे की आम्ही दूषित समाजांतच राहतों; त्याचे घटक म्हणवितों व त्या समाजव्यवस्थेस बदलणार असा आवही आणतों. या दोन्ही गोष्टी एकाच वेळेस होऊं शकणार नाहीत. वर्गविशिष्टाचे घटक बनून राहाणें व वर्गविहीन समाजरचनेबद्दल झुरत बसणें, वर्गविहीन समाजरचनेचें निष्क्रिय स्वप्न पाहत बसणें किंवा आन्तरराष्ट्रीय श्रमजीविसंघाचें मनोराज्य करणें, हें सर्व शेखमहंमदाच्या अवतारास साजेसें आहे."

म्हणूनच पुरोगामी लेखकही जिला वंद्य मानतात अशी 'ला मिझराब्ल' सारखी कलाकृति रचणारा विक्टर ह्यूगो 'Les Orientales' (१८२९) या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म्हणतो, "तुम्ही कवीला असें विचारूं नका की तूं अमकाच विषय कां निवडलास? तमका कां निवडलास नाहीस? फक्त ती कृति कशी निर्मिली आहे याची चर्चा करा; कां निर्मिली आहे याची चर्चा करूं नका. कलाकृति कशी निर्मिली? या प्रश्नापलीकडे कलावंताला कांही सांगतांही येणार नाही; व टीकाकाराने तें विचारूंही नये. कलेला लगाम, हातकड्या किंवा तुरुंगाशीं कांही एक मतलब नाही; ती तर म्हणते—'जा, त्या प्रदेशांत मुक्तपणें विहार कर, की जेथे कोणतेंही फळ निषिद्ध नाही.' देशकाल कवीचेच प्रांत आहेत. कवी त्यांचा अधिपति आहे व तो स्वच्छंद विहार करील."

जेव्हा जेव्हा व जेथे जेथे कलावंतांनी टीकाकाराची भूमिका स्वतः पत्करून स्वतःच्या कलेचें ध्येय समजाविण्याचा प्रयत्न केला आहे, तेव्हा व तेथे त्यांचे शब्द बरेच दुर्बोध झालेले आहेत. ऑस्कर वाइल्डचा 'The Artist and the Critic' हा संवाद, आर्नाल्ड बेनेटचा 'Why classic is a classic?' हा लेख, टी. एस इलियटच्या 'The Sacred Wood' या ग्रंथाची प्रस्तावना; किंवा 'The Common Reader' च्या लेखिकेची तारांबळ हीं सर्व याचींच निदर्शक आहेत. उज्जयिनी येथील महाराष्ट्र-वाङ्मय-मंडळाच्या अध्यक्ष-स्थानावरून केलेल्या भाषणांत श्री. पु. य. देशपांडे या मान्य पुरोगामी लेखकाचे शब्द देखील कोणत्याही गूढगुंजनात्मक कवीपेक्षा कमी प्रतीचे वाटत नाहीत.

"चतुर्गुणात्मक साकल्य : शास्त्रीय उपमेच्या साहाय्याने कलाकृतीचें स्वरूप स्पष्ट करावयाचें झाल्यास, तें एक प्रकारचें चतुर्गुणात्मक साकल्य आहे असें म्हणतां येईल. ज्या एका अज्ञात माध्यमामध्ये सृष्टीचे सर्व व्यापार अखंड चालू असतात, त्या माध्यमाकडेच कलावंताचें अंतःकरण अखंड ओढ घेत असतें......व्यक्ति आणि विश्व यांच्या नवनव्या संगतींतून निर्माण होणारें नवनवें साकल्य म्हणजेच नानाविध कलाकृति. जगाचें त्रिगुणात्मक स्वरूप सामान्य माणसाला सहज आकलन करतां येतें, पण विशिष्ट अनुभवांच्या चटक्यामुळे होरपळलेल्या मनाला ही संगति अपुरी वाटूं लागते. अपुरी माळ पुरी करण्यासाठी तें मन तळमळूं लागतें. ज्याने माळ पुरी होईल असें पुष्प शोधण्यासाठी मन रानोमाळ हिंडूं लागतें......" वगैरे (पृष्ठ ८). अशा प्रकारें 'प्रतिमा आणि प्रतीक' यामध्ये खऱ्या पुरोगामी वाङ्मयसेवकाची प्रतिभा वावरावयास हवी. जो एखाद्या मतवादास हटवादीपणें चिकटला, तो कसला पुरोगामी? उदाहरणच द्यावयाचें असल्यास पु. य. देशपांडे यांची प्रतिभा सतत विकासप्रवण आहे,

त्याचें कारण हेंच--त्यांनी मार्क्सची 'पद्धति' घेतली; व ते तेथेच अडकून, चिकटून राहिले नाहीत. (महाराष्ट्र साहित्य-पत्रिका वर्ष ११ अंक १ यांतील 'पुरोगामी वाङ्मयाविषयीं संग्रहीत विचार' या विषयाच्या जिज्ञासू विद्यार्थ्यांनी व अभ्यासकांनी अवश्य पहावेत).

शेवटची व सन १९४० मध्ये मराठी वाङ्मयक्षेत्रांत फार जोराने चर्चाविषय म्हणून गाजलेली गोष्ट म्हणजे वैयक्तिक टीका. याविषयीं मुंबई मराठी साहित्य-संघाने घातलेल्या मर्यादा कुणीही मान्य करील अशा प्रकारच्या आहेत. सद्भिरुचीस सोडून वैयक्तिक टीका होऊं नये हा विवेक सर्वांनी राखला की सर्व वाद आपोआप मिटेल. पण आमच्या येथे अच्युतराव कोल्हटकरांनी घातलेली शिवराळ टीकेची परंपरा अजूनही कैक साप्ताहिकें चालवतांना दिसतात. या शिवराळ-पणाला नुसते टीकाकार किंवा त्यांची टीकापद्धतीच तेवढी जबाबदार असते, असें नाही. सेंट ब्यूव्ह (Saint Beauve) ने आपल्या The Old moons of criticism मध्ये म्हटल्याप्रमाणे-"टीका नुसती तसें म्हटलें तर कांहीच करत नसते व करूं शकतही नाही. जनतेच्या भावनांच्या सान्निध्यानेच ती कार्यक्षम ठरूं शकते. मी तर येथवर म्हणेन की टीकाकार हा जनतेचा कारकून (सेक्रेटरी) असतो. हा चिटणीस जनता काय बोलते तें टिपून घेण्याची वाट पाहत बसत नाही, तर उलट स्वतः होऊनच जनतेच्या मतांचा कयास बांधीत असतो." जनाभिरुचि पुष्कळदा सवंग लिखाणाला उत्तेजन देते व मग 'जें विकतें तेंच पिकतें' या न्यायाने लेखक वाटेल तें भरकटूं लागतात. हल्लीचीं मराठीं साप्ताहिकें याचीं चांगलीं उदाहरणें आहेत.

श्री. रा. शं. वाळिंबे यांचा याच विषयावर एक सुंदर लेख एका मासिकांत प्रसिद्ध झाला होता. त्यांत इंग्रजी वाङ्मयांत एके काळीं वैयक्तिक टीकेची कशी झोड उठली होती, याचीं कैक उदाहरणें दिलीं होतीं. डॉ. जॉनसनने ग्रे कवीबद्दल असे उद्गार काढले होते की 'अगदी

कंटाळवाणा प्राणी आहे हा. कविताही त्याची तशीच!' कीट्सबद्दल क्वार्टर्ली रिव्यू या नियतकालिकाने 'याची ही कविता कसली, वेडगळ-पणा' व बायरन कवीला 'सभ्य बदमाश' म्हटलें होतें. फ्रँक हॅरिस व शॉ यांची गुद्दागुद्दी तर वाङ्मयांत बरीच गाजली. पण इंग्रजी वाङ्म-यांत असल्या गोष्टी घडल्या किंवा घडतात म्हणून आपणहि त्या उचलाव्या हें तर्कट बरोबर नाही. त्याशिवाय इंग्रजी वाङ्मयसेवकांची खिलाडू वृत्ति कुणीकडे व परवा एका व्यंगचित्रावर चिडून मराठींतील सुप्रसिद्ध कादंबरीकाराने व्यंगचित्रकाराला, इंग्रजींतच का होईना, 'तुमची धिंड काढायला हवी!' असले उद्गार काढले ते कुणीकडे! येथेच या विषयावर प्रा. वि. ह. कुळकर्णी यांच्या एका लेखांतील एक अवतरण देतों. "व्यक्तिविषयक टीका करावयाला बिलकूल हरकत नाही. मात्र ती संबद्ध म्हणजे मुद्द्याला धरून असावी.......एखादा वक्ता स्वदेशीवर व्याख्यान देऊं लागला म्हणजे त्याचा पोषाख स्वदेशी कपडयाचा आहे की नाही, याची चिकित्सा करणें हा प्रश्न व्यक्तिविषयक असला तरी समर्थनीय व कदाचित् आवश्यकही ठरेल. परंतु एखाद्या नाटकाचें परीक्षण करते वेळीं नाटककाराच्या पोषाखाची चिकित्सा करणें हें व्यक्ति-विषयक टीकेचें निंद्य स्वरूप होय."

माझ्या मतें जेथे जेथे आचार, उच्चार व विचार यांच्यांत वैषम्य आढळणार तेथे तेथे वैयक्तिक टीका ही होणारच. मात्र ती देखील सदभिरुचीस धरून व टीकाविषयाबद्दल पूर्ण माहिती असल्यावरच करावी. अज्ञानमूलक व पूर्वग्रहदूषित टीका किंवा माडखोलकरांच्या 'अवशेष' मधील 'मी शेगांवला काय पाहिलें?' सारखे लेख, केव्हाही त्याज्य व निंद्य. तात्पर्य, वैयक्तिक टीका ही नैतिक आदर्शांच्या निकषांना साक्ष ठेवून करावी. त्यांत वैयक्तिक स्वार्थ वा कुत्सितपणा असूं नये. यासंबंधीं निबंधमालेंत शास्त्रीबुवांनी 'ग्रंथावर टीका' या प्रकरणीं काढलेले उद्गार परत सांगावेसे वाटतात—

"जो मनुष्य आपल्या गुणांची लोकांनी प्रशंसा करावी असें इच्छितो, त्यानेच आपल्या दोषांची निंदा ऐकण्यासही कां सिद्ध नसावें? आपले गुण काढून दोष तेवढे लोकांनी झाकून ठेवावे असें त्यास वाटतें काय? व जनाची प्रवृत्ति ज्याने यत्किंचितही अवलोकन केली असेल तो अशी वेडी आशा तरी बाळगील काय? शिवाय आपण जसे दुसऱ्याचे दोष काढण्यास काडीइतकाही अनमान करीत नाही, तसेंच दुसऱ्यांनीही आपणाविषयीं कां करूं नये? सर्वांस सर्वांच्या गुणदोषांची चर्चा करण्यास अर्थात् पूर्ण अधिकार आहे; इतकेंच मात्र की कांही गोष्टी, उघडपणें बोलून दाखविल्या असतां चालतात, आणि कांही चालत नाहीत."

ॐ ॐ ॐ ॐ

वस्तुनिष्ठ टीकाप्रकारांत शास्त्रीय व तात्त्विक टीकाप्रकारासंबंधीं बरीचशी चर्चा 'शास्त्रीय व तात्त्विक टीका-निकष' या प्रकरणीं येऊन चुकली आहे. माझ्या मतें मराठींत हल्ली हयात असलेल्या लेखकांत असली टीका लिहिणारे समीक्षक म्हणून प्रा. वा. म. जोशी, कृ. पां. कुळकर्णी, द. के. केळकर, वि. ह. कुळकर्णी, ग. वा. कवीश्वर, बा. सी. मर्ढेकर, श्री. ना. बनहट्टी, के. नारायण काळे, अनंत काणेकर इत्यादिकांचा उल्लेख करतां येईल. ऐतिहासिक टीकाकारांत गो. स. सरदेसाई, द. वा. पोतदार, मा. के. काटदरे, दि. वि. काळे, प्रभृतींचा उल्लेख गौरवाने करावयास हवा. हीं नांवें सहज सुचलीं तीं दिलीं; त्यांत बरींच नांवें सुटलीं असतील याची लेखकास पूर्ण जाणीव आहे. वर्तमानपत्री टीकेंत वि. स. खांडेकर, माडखोलकर, प्रभाकर पाध्ये वगैरे नांवें येतात; पण यांच्या टीकांतून टीकेपेक्षा काव्य व भाषालंकार वगैरेच प्राचुर्याने असतात.

आता ऐतिहासिक व वर्तमानपत्री टीका यांचा परामर्ष विशेषेंकरून घेऊं या. इतिहास आणि टीकावाङ्मयाचा संबंध फार जुना आहे.

तसें म्हटल्यास इतिहास जवळजवळ भूतकाळाची टीकाच होय; व टीका म्हणजे वाङ्मयीन प्रवाहांचा त्रोटक इतिहासच आहे. मेकॉले, बर्क, गिबन, रस्किन, कार्लाइल पासून अगदी आधुनिकांपैकी लिटन स्ट्रॅची, हिलेयर बेलॉक, सान्तायाना इत्यादि लेखक 'टीका-इतिहास-तत्वज्ञाना'-चा त्रिवेणीसंगम करणारे प्रतिभावंत टीकाकार होत. आपल्याइकडेही सरदेसाई व पांगारकर हीं ऐतिहासिक टीका, व टीकात्मक वाङ्मयेतिहास लिहिणाऱ्या व्यक्तींचीं नांवें घेतां येतील. ऐतिहासिक समालोचन व समालोचनात्मक इतिहास या दोन्ही गोष्टी असल्यावांचून कोणत्याही भाषेचा वाङ्मयेतिहास पूर्ण होत नाही. इतिहास सत्यावर कल्पनेचे साज चढवितो; टीका कल्पकतेला सत्यान्वेषणाकडे नेते. इतिहास हा मनोरा कल्पिल्यास, टीका म्हणजे लांबवरचा वाङ्मयप्रवाह सूक्ष्मपणें पाहूं देणारी प्रवासी दुर्बीण किंवा त्या प्रवाहाचें अवखळ नृत्य व मंथर गतिमानता यांचें क्षणचित्र घेणारें 'छायाचित्र-यंत्र' (कॅमेरा) होय. वाङ्मयाचा प्रवाह या इतिहासाच्या मनोऱ्यास जुमानीत नाही की किनाऱ्यावर उभें राहून क्षणचित्रें व रेखाचित्रें काढणाऱ्या या विहंगम दृष्टीच्या टीकाकारासाठी थांबत नाही. वाङ्मयप्रवाहांत, कधी कधी या मनोऱ्याच्या पायथ्याशीं चालणाऱ्या प्रचंड उलाढालीं (ऐतिहासिक घटनां) मुळे पूर येतो. व मग महापुराचें भविष्य जसें अनिश्चित, तसेंच या वाङ्मयक्रान्तीचेंही भवितव्य कुणी सांगावें! महापुराच्या विनाशी व विकासी प्रभावांचा उल्लेख बंगालचे विप्लवी कवि काझी नजरुल इस्लाम यांच्या 'विद्रोही' नामक कवनांत आढळतो—"मी श्रावणमासांतील जल-प्लावन आहे. कधी माझ्यामुळे धरणीस नाना वर्ण प्राप्त होतात; तर कधी माझ्यामुळे विपुल ध्वंसही होतो." *

---

* आमि श्रावण-प्लावन वन्या
कभु धरणिया करे वरणिया, कभु विपुल-ध्वंस-धन्या !

या प्रवाहांतील एखाद्या लहरिकेने किंवा तरंगाने जर प्रयत्न केला की मी प्रवाहाचें पूर्ण परीक्षण करीन तर तें तिला किंवा त्याला शक्य होईल काय? बर्क्लें या तत्त्वज्ञाने यालाच, 'मिरवणुकींत असलेल्या व्यक्तीला मिरवणुकीची पूर्ण कल्पना येणार नाही; मिरवणुकी-बाहेर असलेल्या व्यक्तीसच ती कल्पना येऊं शकते,' असा दृष्टान्त दिला आहे. जवळजवळ तीच स्थिति समकालीनांनी समकालीनांबद्दल मतप्रकाशन करण्यांत होत असते.

पण कित्येक असे असामान्य निबंधकार प्रत्येक भाषेंत झाले व आहेत की ज्यांनी इतिहास आणि टीका उत्कृष्ट प्रकारें लिहिल्या आहेत. त्यांत गिबन व आंद्रे मॉर्वा हीं दोन नांवें प्रामुख्याने मोडतात. गिबनच्या आत्मवृत्ताबद्दल तर एकाने विनोदाने असें म्हटलें आहे की यांत गिबन कोठे आहे व रोमनसाम्राज्य कोठे नाही याचा शोध लावणें कठीण! वाल्टर बॅगेहॉट याने आपल्या *Estimates in criticism* या ग्रंथां-तील दुसऱ्या भागांत पहिले दोन निबंध गिबन व मेकॉलेवर लिहिले आहेत. त्यांत ऐतिहासिक टीका लिहिणाऱ्यांच्या शैलीचे प्रकार त्याने वर्णिले आहेत. कांही टीकाकार इतिहासांतील घटना दाखल्याप्रमाणे घेतात तर कांही त्याच घटनांमध्ये तन्मय होतात व रंगून जातात. कांहींना ऐतिह्य घटनांचा विस्तृत पट आवडतो तर कांहींचें काम लहान लहान रेखाचित्रांनीच भागतें. डॉ. केतकर यांची शैली व परवा प्रसिद्ध झालेल्या 'भूतावरील भ्रमण' या पुस्तकाची शैली यांतलें जें अंतर; किंवा इतिहाससंशोधक राजवाडे यांचें लिखाण व न. चिं. केळकर यांची 'फ्रान्सची राज्यक्रांति'सारखें पुस्तक, यांतील जें अंतर तेंच वर वर्णिलेल्या पद्धतींतील अंतर होय!

वर्तमानपत्री टीकेंत बऱ्याच गोष्टी मोडतात: एक तर मुद्रण-यंत्राच्या सोयीप्रमाणे टीकाकाराचें मन यांत्रिक झालेलें असतें. स्थल-कालाच्या मर्यादा त्याला नेहमी भिववीत असतातच, याशिवाय ही

जाणीवही त्याला नेहमी बोचत राहते की आज लिहिलेली टीका उद्यां अगदी बिनकामी ठरणार आहे. ऐतिहासिक टीकाकार जेथे गंभीर स्वरूपाचा असतो, तेथेच वर्तमानपत्री टीकाकार बराचसा उथळ असतो. ऐतिहासिक टीकाकाराला जशी संशोधनाची तळमळ लागलेली असते, तसें वर्तमानपत्री टीकाकाराचें नाही. वर्तमानपत्री टीकेला लोकप्रियतेचें आमिष सारखें आकर्षीत असतें. असल्याच सवंग टीकेला फार गंभीर रीत्या घेतल्याने जो सात्त्विक संताप वाटतो, तशा तऱ्हेचा संताप श्री. शेजवलकरांच्या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेंत आढळतो. वर्तमानपत्री टीकेंत उत्तम पोच राखला तो 'प्रतिमें'तील रामशास्त्र्याने. तसा त्यांत त्यालाही आपल्या बुरखा मंडळांतील सदस्यत्वाचा फायदा होताच म्हणा. 'वायुपुत्रा'ची 'आकाशवाणी' वर्तमानपत्री टीकेंतील विनोदी प्रकाराचा अकृत्रिम नमुना आहे. खांडेकरांचा 'वनविहार' जास्त तिखट झाला आहे, तर माडखोलकरांचा 'विचारविलास' फारच त्रुटित स्वरूपाचा. श्री. क्षीरसागर, प्रा. फडके यांचीं पुस्तकेंही या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. 'साहित्य आणि संसारा' शिवाय प्रा. फडक्यांनी केलेला एक उल्लेखनीय नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणजे परदेशी भाषांतील उत्कृष्ट कादंबऱ्यांच्या कथानकांचा परिचय. तसें पाहिलें असतां वर्तमानपत्री टीकेचें क्षेत्र बरेंच व्यापक असतें. व त्यांत अहंकार, स्पर्धा, ईर्ष्या, द्वेष, स्पृहा, असूया, स्तुति, परस्परप्रशंसा इत्यादि सर्व मानवी विकारांना पूर्णपणें व्यक्त करण्यास मुबलक वाव असतो. फडके, खांडेकर, माडखोलकर या ललितवाङ्मयाच्या क्षेत्रांत नांवाजलेल्या त्रयीने एकीकडे त्रुटित असें वर्तमानपत्री टीकास्त्र परजलें असलें तरी दुसरीकडे या तिघांनीही अनुक्रमें 'प्रतिभासाधन'; 'गडकरी-व्यक्ति आणि वाङ्मय'; आणि 'आधुनिक कविपंचक' असले बहुमोल टीकाग्रंथ लिहून मराठी वाङ्मयांत भर घातली आहे, हें कधीही विसरणें शक्य नाही.

मात्र वर्तमानपत्री टीकालेखकांना सूचना म्हणून डॉ. जानसनचा एक मूल्यवान सन्देश येथे देण्याचा मोह आवरत नाही. हा उतारा

Rambler मासिकाच्या आरंभींच्या अंकासाठी त्याने लिहिलेल्या विचारांमधून घेतला आहे. ‘कित्येकांच्या गुणाचें चीज होत नाही; कित्येक अनुल्लेखाने ठार मारले जातात; कित्येकांच्या वाङ्मयीन बालहत्या व आत्महत्या होतात. जे लेखक लेखनद्वारा यश:प्राप्तीच्या नादीं लागले, त्यांनी लक्षांत ठेवावें की वाचकांपैकी अधिकांश आपापल्या चैनींत गुंतलेले लोक असतात; त्यांना बौद्धिक करमणुकीची परवा नसते... कांही नांवावर जातात; तर कांही तीं नांवें मोठीं होऊं नयेत म्हणून सारखे फूत्कार सोडीत असतात. नवीन कांही सांगितलें तर पचत नाही; जुनेंच उगाळीत बसा तर रुचत नाही. विद्वान आहेत ते आपलें नांव कुठे खाली न पडो म्हणून मत देण्यास टंगळमंगळ करतात; तर अज्ञानी कधी चांगलें मत व्यक्त करून आपलें समाधान कसें व्यक्त करणार? एकूण, यश:प्राप्ति ज्यांना झाली, ती त्यांच्या आंतरिक गुणांमुळे, विलक्षण प्रतिभेमुळे किंवा पांडित्यामुळे असें मुळीच मानूं नका; कारण त्याशिवायही इतर कैक कारणें असतात तीं न सांगितलीं तरच बरीं.”

टीकेच्या पद्धति व्यक्तिश: व परिस्थितीप्रमाणे वेगवेगळ्या असतील. कुठे पद्यात्मक, कुठे गद्य; कधी दीर्घ, तर कधी त्रोटक; कुठे सौम्य तर कुठे भेदक; कुठे संवादात्मक तर कुठे गोष्टीवजा; कधी प्रचारकी व जाहिरातवजा तर कधी पांडित्यपूर्ण व चर्चात्मक. पण या सर्व क्षुल्लक पद्धतिभेदांना सोडून दिलें तरी टीकेंतील विवेचनपद्धति साधारणपणें तीन प्रकारची आढळते— (१) विश्लेषणात्मक (२) तौलनिक (३) संश्लेषणात्मक.

पहिली पद्धति म्हणजे फोड करणारी, चिकित्सा करणारी पद्धति. वैयाकरणी, अलंकारशास्त्री, रीतिशास्त्री Rhetoricians यांची ही पद्धति. दुसरी टीकाविषयाचें स्वतंत्र व एकटें विश्लेषण न करतां टीकाविषयाला इतर विषयांच्या सान्निध्यांत ठेवून त्याचा लहानमोठेपणा ठरविणारी पद्धति; व तिसरी म्हणजे योग्य ती तात्त्विक भूमिका घेऊन टीकाविषयाचें मूल्यमापन व महत्त्वमापन समुचित दंडकांच्या

व दृष्टिकोणां ( Perspective )च्या द्वारा करणारी पद्धति. या तीन्ही प्रकारच्या टीका मराठी वाङ्मयांत विपुल आढळतील. जिज्ञासूंनी तीन्ही तऱ्हेचीं उदाहरणें स्वत: होऊन शोधून काढण्याचा प्रयत्न करावा.

याच ठिकाणीं एक सूचना अशी द्यावीशी वाटते की मी वर मांडल्या इतक्या या पद्धति वेगवेगळ्या नाहीत. कैकदा एकाच टीकेंत दोन्ही-तीन्ही प्रकार एकदम आढळतील. आणि ते प्रकार एकत्र झालेही पाहिजेत, नाही तर टीका परत एकांगी स्वरूपाची होईल. मॅथ्यू आर्नाल्डने आपल्या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं गाइटे या जर्मन कवीची साक्ष दिली आहे. त्याच्या मतें "कांही कवींना असें वाटतें की कवितेंतील शब्द, छन्द, वगैरे बाह्यस्वरूप कितीही अशुद्ध असलें, वेडेविद्रें असलें तरी चालेल, काव्यांत मुख्य भावनापरिपोष आहे ना, कल्पनाचमत्कार आहे ना ?—झालें तर मग! याच्या उलट कांही कवींना असें वाटतें की कवितेचे शब्द, प्रास, मात्रा, यमक वगैरे ठाकठीक, चापून-चोपून, व्यवस्थित रचिलेलें असलें म्हणजे झाली कविता; त्यांत भावनेची उत्कटता आणि मौलिकता पाहिजेच कशाला? हे दोघेही कवि व तसलेच टीकाकार काव्याचे किंवा टीकेचे खरे साधक नसून नुसते षोकीन ( dillettante ) असतात. यांतील पहिल्या प्रकारचे लेखक, वाङ्मय वाचणाऱ्यांचें नुकसान करतात; दुसऱ्या प्रकारचे लेखक स्वत:चें नुकसान करतात."

## [ ५ ]

ऑलिव श्राइनर या लेखिकेच्या 'स्वप्नें' नामक रूपक कथा-संग्रहांत एका शिकाऱ्याचा उल्लेख आहे. त्याने एका सुंदर पक्ष्याचें प्रतिबिंब एका सरोवरांत पाहिलें व त्या पक्ष्याला शोधून काढण्याचें त्याला वेड लागलें. आजन्म तो पक्षी तो शोधीत राहिला व त्याला तो सापडला नाहीच. सौन्दर्यशोधनाचें काय व सत्यशोधनाचें काय, असेंच आहे. 'जीवनां'तील त्याच्या आभासामागे लागून जे वेडे झाले त्यांचें वेड आजन्म टिकलें.

खरा कलावन्त काय व खरा टीकाकार काय, असलाच द्रष्टा असतो. तो स्रष्टा असतो. खरी टीका विधायक व रचनात्मक असते.

खऱ्या टीकेंत 'आनंदमरूपममृतम्'चा आन्तरिक तळमळीने केला जाणारा प्रामाणिक शोध असतो. खरी टीका म्हणूनच स्वतःची असूं शकते, दुसऱ्याची असूं शकत नाही.

असल्याच खऱ्या टीकेंत शास्त्र व कला यांचा संगम होतो.

असली टीका व्यक्तिनिरपेक्ष असते व तत्त्वापेक्षिणी असते.

असल्या टीकेने जरी कुठे तोडमोड केलीच, तरी तिच्याजवळ लगेच त्याला भरून काढणारी तडजोड असतेच. विकासास आवश्यक तेवढाच विनाश ती करते.

अशी टीका वस्तु व आत्मा यांच्या निष्ठेंतून उपजते. अर्थात् ती टीका निव्वळ संशयकल्लोळ राहूं शकत नाही. ती मार्गदर्शक ठरते.

असली टीका जड नसून, चैतन्यप्रद असते.

ही टीका 'वादां'च्या चौकटींत बसत नाही, कारण सर्व वादच तिच्यांतून निर्माण झालेले असतात मुळी.

साक्षीला रामनारायण पाठक हे गुजराथींतील मान्य समालोचक आहेत. ते आपल्या 'आपणा विवेचननां केटलाक कूटप्रश्नो' नामक व्याख्यानाच्या शेवटीं म्हणतात--'आवा वादोने लीधे विवेचननो मुख्य प्रश्न के अमुक कृति कलात्मक छे के नथी, होय तो कई रीति छे, अे धूमायित थाय छे. कोई वादथी कोई अकला कला बनती नथी. एक पण वादनुं नाम दीधा विना, के तेनी पंचात कर्या विना कलानी साची कृति थई छे. अने एक वार कृतिने समस्तरूपे अने तेनुं एक एक सूक्ष्म अंगप्रत्यंग जोईने ते कला छे अेम प्रतीत थया पछी, वादना शब्दोथी तेनी टीका करवानी सगवड मळे, पण ते सर्व अे कृति समजवा माटे छे. कृति एक बाजू पडी रहे ने अकेली वादनी चर्चा थाय अे मिथ्याचेष्टा छे.' (अर्थ–असल्या 'वादां'मुळे टीकाकारापुढचा

मुख्य प्रश्न, अमुक कृति कलात्मक आहे की नाही, हा गोंधळांत पडतो. कोणत्याही 'वादा'मुळे अ-कला कला झालेली नाही. एकाही वादाचें नांव न काढतां किंवा त्याच्याबद्दल चर्चाही न करतां, कलेच्या कृति खऱ्या व परिणामकारक ठरल्या आहेत. एकदा रचनेच्या अंगप्रत्यंगाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर व ती कलाकृति आहे हें ठरल्यानंतर, 'वाद' शब्दांनी टीका सोयीची होते, पण हा सर्व कृति समजण्याचा प्रकार आहे. पण जेथे कृति बिचारी एका बाजूस पडते व नुसत्या वादावर चर्चेचें पीक उठतें, तो मात्र अगदी मिथ्या प्रयत्न.)

आणि मराठींत काय व हिंदींत काय, इंग्रजींतून उधार आणल्यामुळे म्हणा की कांहीही कारणामुळे म्हणा 'वादा'वाचून टीकेचें पाऊल पुढे उचलत नाही. "अमुक यांत मार्क्सवाद नाही; तमक्या रचनेंत भूतदयावाद आहे; फलाण्या कादंबरींत गांधीवादाची नालस्ती आहे; वास्तववाद हा कल्पनावादापासून वेगळा; तर यांत जडवाद आहे पण समाजसत्तावाद नाही; आदर्शवाद तर लोपलाच; हा फडके अत्रेवाद तर हा शून्यवाद !...." असली असंख्य 'वाद' प्रत्ययधारी शब्दांची आळंब्यांसारखी वाढ वाङ्मयक्षेत्रांत होत आहे. पण वाङ्मयाचें तर दूरच राहिलें, पण वाङ्मय वाचणाऱ्यांचें किंवा लिहिणाऱ्यांचें या 'वादां'पासून कांही हित साधलें जातें काय?

वादांची परंपरा पाश्चात्त्यांकडून आमच्या इकडील नव्या लेखकांनी उचलली. हिंदीचे नामांकित साहित्येतिहासकार व टीकाकार (जे नुकतेच स्वर्गवासी झाले) पं. रामचंद्र शुक्ल हे 'द्विवेदी अभिनंदन ग्रंथां'तील 'साधारणीकरण और व्यक्तिवैचित्र्यवाद' नामक निबंधांत म्हणतात, "भारतीय काव्यदृष्टि भिन्न भिन्न विशेषों के भीतर से 'सामान्य' के उद्घाटन की ओर बराबर रही है। किसी न किसी 'सामान्य' के होकरही 'विशेष' हमारे यहाँ काव्यों में आते रहे हैं। पर योरपीय काव्यदृष्टि इधर बहुत दिनोंसे विरल विशेष के विधान

की ओर रही है।......'कल्पना और व्यक्तित्व पर एकदेशीय दृष्टि रखकर पश्चिममें कई प्रसिद्ध 'वादों' की इमारतें खडी हुई। इटली-निवासी क्रोसे ने अपने 'अभिव्यंजनवाद' के निरूपणमें बडे कठोर आग्रह के साथ कला की अनुभूति को ज्ञान या बोध-स्वरूप ही माना है।"*

क्रोचेने कलेचें कार्य बुद्धिवादी किंवा वैज्ञानिक प्रक्रियेपासून भिन्न आहे असें सिद्ध केलें आहे, तोंपावेतो त्याचे सिद्धान्त बरोबर आहेत. पण ज्या 'अनुभवा' (Intuition) ला तो सर्व कलेचा मूलबिंदु मानतो, त्यांत विवेकाला, विभिन्नत्वाला मुळीच जागा देत नाही. उलट कलेचें यशापयश त्या अनुभवांना व्यक्त करणाऱ्या पद्धतीवर तो टाकूं इच्छितो. अशा रीतीने कलेचें खरें मर्म कळणार नाही; व कलेच्या प्रामाणिकतेचाही नाश होईल ही भीति वाटते. जर्मन तत्त्वज्ञ इमॅनुएल कँट याने सौन्दर्यनिर्णयाविषयी सांगितलेलीं पांच विशेषणें या दृष्टीने जरूरीचीं वाटतात:—१ स्वातंत्र्य, २ निष्पक्षता, ३ सहेतुकता, ४ संकुचित ध्येय नसणें, ५ विवेक. व क्रोचे देखील एकीकडे जेव्हा खऱ्या कलेला आन्तरिक मूर्तभावना (internal image) म्हणतो तेव्हा सौन्दर्यनिर्णयाला किंवा टीकेला सार्वभौम स्वरूप देण्यास का तयार होत नाही हें कळत नाही. अशा रीतीने टीका फक्त आत्मनिष्ठ स्वरूपाची राहणार नाही का? स्थल-संकोचामुळे ही चर्चा येथे वाढवितां येत नाही विद्यार्थ्यांसमोर व जिज्ञासु वाचकांसमोर हा प्रश्न म्हणून मी ठेवतों. विशेष अभ्यासकांनी ड्युईचें *Art as Experience* आणि क्रोचेच्या *Aesthetics* चे अध्याय १ ते ३ व विशेषतः ११ (Criticism of Aesthetic Hedonism) हे वाचावेत.

शेवटीं टीकेवर बरींच पानें लिहिलीं. त्यांतून प्रश्नही बरेच उद्भवले. त्यांतील कैक प्रश्न तर अजून अनिर्णीत अवस्थेत आहेत. विज्ञान स्वतः प्रगतिपथावर आहे; व या प्रश्नांचा निर्णय मनोविज्ञान व समाजविज्ञानच कांही अंशीं देऊं शकल्यास, शक्य आहे. सर्व-

---

* हिंदी बरेंच संस्कृतमय असल्याने मराठींत अर्थ दिला नाही.

साधारणाप्रमाणें म्हणावयाचें म्हणजे इंग्रज कवि पोप याने दिलेला साधासुधा इशारा—

"खरा टीकाकार प्रत्येक प्रतिभापूर्ण रचनेला ज्या हेतूने रचयित्याने ती रचना केली असेल, त्याच दृष्टीने व त्याच हेतूने पाहतो."* यांत टीकाशास्त्राचें रहस्य स्थूल मानाने सामावलें आहे असें म्हणण्यास हरकत नाही.

आणि शेवटीं मराठींतील टीकेची सांप्रतची स्थिति पाहतां गस्टॉव फ्लॉबर प्रमाणें अशी इच्छा व्यक्त करावीशी वाटते.—"पूर्वी टीकाकार म्हणजे नुस्ता वैय्याकरणी असे. आता तो इतिहासकार झालेला आहे. पण असे टीकाकार आपल्या भाषेंत व वाङ्मयांत केव्हा निर्माण होतील की जे खरे कलावंतही असतील; व जे कलेचें यथार्थ मूल्यमापन करूं शकतील? अशा टीकाकारांच्या ठायीं विशाल कल्पनाशक्ति व विशाल अंत:करण पाहिजे; त्याशिवाय चिरंतन, सदा उद्यत असलेला उत्साह हवा; व सर्वांत मोठी व महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुसंस्कृत अभिरुचि हवी; जी हल्लीच्या टीकाकारांतून क्वचितच दिसते." †

---

* A perfect judge will read each work of wit
With the same spirit as its author writ.

A. Pope

† "In your last letter, you speak of criticism and say you expect it to disappear. I think, on the contrary, that it is just appearing over the horizon. Criticism today is the exact opposite of what it was, but that is all. In the days of Laharpe the critic was a grammarian, today he is a historian like Sainte Beauve or M. Taine. When will he be an artist, not a mere artist, but a real artist?...... Such a critic must have great imagination and a great goodness of heart; I mean an everready faculty of enthusiasm; and then, taste; but this last is so rare, even among the best, that it is never mentioned nowadays."

*( Gustav Flaubert to George Sand in a letter*
Dated 2-2-1869)

# संदर्भ ग्रंथ

## इंग्रजी


Outline of modern knowledge

Loci Critici

Critical Essays

*I. W. Richards* : Rudiments of Criticism.

*Walter Pater* : Interpretations.

*Saintsbury* : History of Criticism.

*R. Osbern* : Freud and Marx.

*Codwell* : Studies in dying culture.

*Rommain Rolland* : I will not rest.

*Aldous Huxley* : Do what you will.

Mind आणि Philosophical Quarterly च्या फायली.


## मराठी


केळकर–ग्रंथ

वा. म. जोशी : विचारसौन्दर्य

मा. गो. देशमुख : मराठीचें साहित्यशास्त्र

अगाशे : सारस्वत समीक्षा

ना. सी. फडके : प्रतिभासाधन

शि. म. परांजपे : साहित्यसंग्रह

शेजवलकर : शेजवलकरांचे लेख

याशिवाय साहित्य संमेलनप्रसंगींचीं भाषणें, ठाणें, बडोदें, मुंबई, उजैन येथील साहित्य परिषदेंतील अध्यक्षीय भाषणें. ज्योत्स्ना, सह्याद्रि, विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षणाच्या फायली.


## हिंदी


द्विवेदी अभिनंदन ग्रंथ

श्यामसुंदर द्विवेदी : साहित्य समालोचन

पं. रामचंद्र शुक्ल : चिन्तामणि, काव्य में रहस्यवाद

विविध साहित्य संमेलनप्रसंगींचीं अध्यक्षीय भाषणें


## गुजराथी


रामनारायण पाठक : आधुनिक काव्यसहित्यना वहेणो

'प्रस्थान' मासिकाचे अंक

# सूची


अत्रे, प्र. के. १७४
अनार्ल्ड बेनेट १८८
अलेक्झँडर कुप्रीन १७७
ॲब्रट ५१
आठवणी ५९-६१; ६३, ६७, ७०, ८२-८५, ८८
आत्मचरित्र ५७, ५८, ६२, ६३, ६५, १०२-२७, १३०, १३१, १३३-३५, १३७-४२, १४४-४७
आपटे, दा. ना. १८
आलिव श्राइनर १९६
आस्कर वाइल्ड १८८
इतिहास ३, १०, १२-१४, १६, १७, १९, २१-२३, ३०, ३५, ५१, ५६, ६२, ७१, ८३, १०२
इलियट टी. एस. १८८
उमरखय्याम १६६
एब्रर कौंबी १६७
एलिस, हॅवलॉक ११, २२, १०१, १२५, १३३, १३४, १७७
कला, चरित्रलेखनाची ९, २३, २८, ३०, ३३, ४७, ५२, ६६, ६७, ७१, ७८-८०, ८२, ८३
कलावादी ७-२८
कवीश्वर, ग. वा. १७४, १७६, १९१
कर्वे, धों. के. १०६, १०८, १०९, ११२, १२२, १३८, १३९
काझी, नझरुल इस्लाम १९१
कादंबरी ९, १०, ३७, ६७, ६८, ७०, ७१, ७८, ८०;-कार ९४, ९६, १०१
कार्लाइल १०, १२, ३४, ३५, ४६, ६३, ६४, १०१, ११७, १९०
काणेकर, अनंत १९१
कालक्रम ७८, ७९
कॉनरॅड, जोसेफ १४५
कालेलकर, काका १८३
काव्य ९, ३९
काळे, के. ना. १९१
काळे, दि. वि. १९१
क्लाइव बेल १७८
कीट्स १९०
कुळकर्णी, कृ. पां. १९१
कुळकर्णी, वि. ह. १९०, १९१
केतकर, श्री. व्यं. २७, ३२, ४२, १९३
केळकर, द. के. १८०, १९१

केळकर, न. चिं. १३–१५, १९, ४४, ५७, ६०, ७२, ७३, ८३, १०५, १०७, ११०, १२१, १२६, १३९, १४०–४२, १४७, १९३
कोलरीज १५५
कोल्हटकर, श्री. कृ. ११३, १५३, १७६
कोल्हटकर, अ. ब. १८९
क्रोचे १७८–१९९
खाडिलकर, कृ. प्र. ६८, ११३
खांडेकर, वि. स. १९१, १९४
गटे ३८, १४३
गस्टॉव फ्लावर २००
गार्डिनर, ए. जी. ९६–९९
गॉइटे १७६, १९६
गांधी, महात्मा ११२, ११५, १२५, १३३, १३५, १३७, १४२, १४४, १८१, १९८
गॉस, एडमंड ११९
गिबन, एडवर्ड १०, १०७, १३३, १४५, १९१, १९२
ग्रीन, जे. आर. १०
ग्रे १९१
ग्लॅडस्टन्, डब्ल्यू. ई. १६, १९, ३३, ८७
चरित्र-चरित्रवाङ्मय ९–५१, ५३–६३, ८३–८५, ८७, ८८, ९०, ९७, ९९–१०७, १०९, ११३, ११७, ११९, १२२, १२५, १३०, १३८, १४३, १४४
चरित्रनायक १२, १६, १७, २०, २२, २७, २९, ३४, ३८, ४०, ४३–४५, ४७, ४८, ५४–५६, ६०, ७१, ७३–७५, ७८, ८०–८२, ९०, ११३, ११४, १४३
चिपळूणकर, लक्ष्मणशास्त्री ४८
चिपळूणकर, विष्णुशास्त्री १५, ४७, ४८, ७६, ७७, ८१, ८२, ११४, १५३, १५६, १९१
जयदेव १५५
जावडेकर, आचार्य १७७
जीवशास्त्र २२, ५०
जेम्स जॉइस १७७
जैनेन्द्रकुमार १०२, १२६, १२७, १४१, १४६, १६८–६९
जोशी, वा. म. ६१, १५३, १७७, १९१
जॉन ड्युई १९९
जॉनसन डॉ. २१, २८, ३३, ४५–४८, ८९, १४३, १७७
ज्यूलियन हेकर १८६
टागोर १६४

टॉलस्टॉय १७७
टिळक, रेव्ह. ५७, ६०, ६९, ११३, १३२
टिळक, लक्ष्मीबाई ६०, ६९, १३२
टिळक, लोकमान्य १३, १४, १९–२१, ३३, ४२, ४४, ५७, ५८, ६०, ८३
ट्रापोल, अँटनी ११८
डंकन, इसाडोरा ११३, ११८, १३५
डन्, डब्ल्यू. एच्. १०३, १२५
डिकन्स ६०, ७७, ७८
डिझराएली, बेंजामिन् १६, १९, ३३, ३७, ३८, ६५, ७३, ७४, ७८, ७९, ८७, ८९, ९३, ९४
तटस्थता–पणा–वृत्ति ७१, ७४, १२४, १२५, १२७, १३२, १३७, १४०, १४३
तांबे, भा. रा. १७४
दादोबा पांडुरंग १३८
दिवेकर, दि. वा. ९९
देशपांडे, आ. रा. १८४
देशपांडे, पु. य. १७९, १८१, १८८
दैनंदिनी ३०, ५७-६२, ६४, ६६, ६९, ७०, ७५, ८२, ८३, १२१, १२२
दोष २५–२७, ४१–४३, ४५–४९;–दर्शन ५५, ७४, १०७, ११३, ११४, १२५, १३८, १४०
नाइटिंगेल, फ्लॉरेन्स् ५३, ५४, ९२
निकोल्सन्, हॅरोल्ड ९०, १२५
नेपोलियन् ५०, ५१, ५९, ७८, ९०
नेहरू, जवाहरलाल १२७, १४१
पत्रे–पत्रव्यवहार ३०, ५१, ५६–६२, ६४, ६६, ६७, ७५, ८२, ८३, ८८
पटवर्धन, मा. त्रि. १५४, १५८
पदार्थविज्ञानशास्त्र ५०
पाध्ये, प्रभाकर १९१
पांगारकर, ल. रा. ५७, ५८, १०६, १२०, १२२, १४१, १४२
पाठक, रामनारायण १६१, १९७
पोतदार, द. वा. १९१
पोप १६४, १६७, २००
प्रतीक (Motif) ९३, ९४
प्लूटार्क २३
फडके, ना. सी. ९, ७५, ७९, १७४, १७६, १९४
फाटक, न. र. १५, ४३, ४४, ७७, ८२, ११४, १८५
फ्रँक हॅरिस १९०
फरूड, जे. ए. १०, ४६, ४७, ६३, ६४, ११७
बनहट्टी, श्री. ना. १९१
बर्क १९१

70490

ब्रक्लें १९३
ब्रायरन, लॉर्ड ३५, ४२, ६२, ९०, ९१, १९०
बॉस्वेल २१, २४, ३५, ४५, ४८, ८९
बी १५०
बेकन १६३, १६४
बोझांके १६८
बोधवाद-वादी २७, ४२, १०६
बोडस, गणपतराव १०७
ब्रॅडले, एफ्. एच्. १७५
भट्ट १८६
मनोविश्लेषणशास्त्र ३४, ५०
मर्ढेकर, बा. सी. १९१
महाराष्ट्र साहित्य पत्रिका(त्रैमासिक) १५१, १८९
महीपति २३
मार्क्स, मार्क्सवादी १८४, १८६–८७, १९८
माडखोलकर, ग. त्र्यं. ९९, १७६, १७७, १९०, १९१
मानववंशशास्त्र २१, २३
मानसशास्त्र २२, ३४, ५०, ६९, १२५, १२६
मिल, जे. एस्. १२०, १२३
मुसोलिनी १०९
मेकॉले १०, १९१
मोर्वा, आंद्रे १६, १७, २०, ३०, ३१, ३३, ३६, ३८, ३९, ५५, ५९, ६२, ६५, ७३, ७४, ७७, ७९, ८७–९२, ९६, ९९, १९३
मोर्ले १६–१८
मॅक्समुल्लर १०७
मॅथ्यू आरनाल्ड १५८, १९६
मॅनिन्, एथेल ११४, ११६, १३४–३६
युंग, आल्फ्रेड ३४
रस्किन १९१
राजवाडे, वि. का. ३२, ४२, ६३, १९३
रानडे, न्यायमूर्ति १५, ३३, ४३, ५७, ६०, ६९, ७०, ७२, ७७, ७८, ११४
रानडे, रमाबाईसाहेब ४३, ६०, ७२, ७८, १३१
रामदास, समर्थ ८, ११२, १२०
रामशास्त्री १५३, १९४
रॉजर फ्राय १९७
रूसो, जे. जे. १०८, १११, ११३, ११६, १२०, १२४, १२५, १२७, १२८, १३०, १३१, १४३
रेने, फुलप मुलर १८५
लघुकथा ९, ३६
लालजी पेंडसे १८१
लॉरेन्स, डी. एच्. १७७

ली, सिडने २८, २९
लुडविग, एमिल ५१, ५९, ७८, ९० ९२, ९६
लेनिन १६६
वर्जिनिया वूल्फ १८८
वायुपुत्र १९४
वॉल्टर बॅगेहॉट १९३
वॉल्ट व्हिटमन ४२, ११३, १६४
वाळिंबे, रा. शं. १७७, १७९
वॉशिंग्टन, बुकर टी. १०९
विक्टर ह्यूगो १८७
वेल्स, एच्. जी. ९९, १३१, १४५, १४६
व्हिक्टोरिया, राणी १८, २४, ३६, ५३, ७४, ७७, ८४, ८५, ८८, ९१, ९२
शास्त्र (चरित्रलेखनाचें)९,१२,५६
शुक्ल, पं. रामचंद्र १९८
शेक्सपियर, विलियम ४९, ७१
शेजवलकर १९४
शेले, पी. बी. २०, ३१, ३७, ३८, ५९, ७३, ७४, ७८, ७९, ९१, ९३, ९४, १४५
सत्य १०, २७–२९, ३१, ४१, ४२, ४५, ४६, ५५, ६४, ६५, ७२, ९४, ९५, १०४, ११५, १२१–२३, १४३
सान्तायाना १९१
साळगांवकर, वि. द. १५१
सेंट ब्यूव्ह १८१, १८९
स्वभावचित्रें ९५–९९
स्टीफन्, लेस्ली १२३, १३०
स्टीव्हनसन्, आर. एल्. ५०, ६२
स्ट्रॅची, लिटन् १८, २५, २८, २९, ३६, ३९, ५०, ५३, ७४, ७७–८०, ८३, ८५, ८६, ८९–९४, ९६, ९९, १००
स्पेन्सर, हर्बर्ट १२०, १२५
हिटलर १०९, ११०
हिलेयर बेलॉक १५९–१६१,१९२
हॅझलिट १७३
हेगेल १६६
ह्यूम, डेव्हिड १०
क्षीरसागर, श्री. के. ९९, १९४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | २० | वासुदेव फडके | वासुदेव बळवंत फडके |
| २२ | १ | मानवशास्त्र | मानसशास्त्र |
| २३ | १९ | 'लीळाचरित्र' चरित्र | 'लीळाचरित्र' |
| २८ | १७ | कला म्हणजे | कला म्हटली म्हणजें |
| ३७ | २३ | आधारें | आधारें |
| ३९ | २ | काढं | काढू |
| ३९ | १२ | शिलक | शिल्लक |
| ४६ | १ | (I would not) cut | "I would not cut |
| ५२ | १४ | जाऊं? | जाऊं! |
| ५९ | १९ | दैनदिनी | दैनंदिनी |
| ६० | १३ | आठवणीचे | आठवणींचे |
| ८२ | १७ | पंचापुढे | पंचांपुढे |
| ८५ | ६ | more | mere |
| ८७ | २५ | these | those |
| ८९ | २१ | डॉनसन | जॉनसन |
| ९० | १४ | Syron | Byron |
| ९८ | १८ | onr | our |
| १२५ | ८ | थोओ | थाओ |
| १५१ | ७ | सहा | सात |
| १५२ | ५ | विकत श्राद्धाच्या | विकतश्राद्धाच्या |
| १६० | ९ | जडजवाल | जडजंबाल |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६७ | ८ | नियय | नियम |
| १६८ | ९ | Threes | Three |
| १७४ | १९ | अधाहृत | अध्याहृत |
| ,, | २१ | उपयुक्ता | उपयुक्तता |
| १७८ | २४ | portrayi | protrays |
| ,, | २५ | blameworthy. | blameworthy... |
| ,, | २६ | (Cwice) | (Croce) |
| १८० | ४ | प्रद्धती | पद्धती |
| १८४ | २० | dogmatist | dogmatic |
| १८७ | १ | काल्पनिक | कल्पक |

REFBK-0006272

# प्रा. प्रभाकर बळवंत माचवे

## एम्. ए.

अगदी तरुण असूनही प्रा. माचवे यांनी इतक्यांतच खूप लेखन केलें आहे. विशेष गोष्ट ही की हे जितक्या गोडीने मराठींत लेखन करितात तितक्याच हौसेने हिंदींतही करितात. हिंदी लेखक श्री. जैनेन्द्रकुमार यांच्यावर 'जैनेन्द्रके विचार' नांवाचा एक बराच मोठा ग्रंथ यांनी हिंदींत लिहिला आहे. यांच्या लेखनांतून कोणता एखादा विषय गळला आहे, असें बहुधा आढळणार नाही, इतकी यांची लेखणी चौफेर संचार करिते. सर्व विषयांवर अप्रतिहतपणें टीका करणाऱ्या लेखकाची 'टीके'वर लिहिण्यासाठी योजना झाली हें योग्यच, असें कोणीही म्हणेल. हेही उज्जैनच्या माधव कॉलेजांत प्राध्यापक आहेत.

# नवभारत ग्रंथमालेचें सोळावें व सतरावें पुस्तक

## भगवान बुद्ध

लेखक-आचार्य धर्मानन्द कोसम्बी

पूर्वार्ध व उत्तरार्ध

**पृष्ठें १९२+१८४; किंमत दोन्ही खंड मिळून ३ रु. ट. ख. निराळा.**

प्रस्तुत पुस्तक त्रिखंडकीर्ति आचार्य धर्मानन्द कोसम्बी यांनी लिहिलें आहे. या विषयावर कोसम्बींचा जन्मभराचा व्यासंग आहे. भगवान् बुद्धाचा कल्याण-कारक धर्ममार्ग त्यांस पटलेला असून त्याच्याशीं त्यांचें तादात्म्य झालें आहे. अशा ग्रंथकाराने लिहिलेल्या ग्रंथांत विद्वत्ता व जिव्हाळा यांचा अपूर्व संगम झालेला नजरेस पडावा, हें स्वाभाविक आहे.

जगांत जिकडे तिकडे भीषण संहाराचें तांडवनृत्य सुरू आहे, अशा या काळांत बुद्धाच्या प्रेममय उपदेशाचें विवरण करणारें हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे हा योगायोग महत्त्वाचा आहे. बुद्ध भगवंताच्या कल्याणकारक धर्ममार्गाचें अवलोकन, मनन व आचरण करण्याची जर केव्हा अत्यंत जरूरी असेल तर ती आताच आहे. अधिकारी पुरुषाने वर्णिलेलें बुद्धाचें हें चरित्र वाचकांच्या विचारास खास चालना देईल.

"या पुस्तकाची योग्यता इंग्रजी व मराठीतर देशी भाषा यांत भाषांतर होण्याची आहे. बुद्धावर दसकड्यांनी मोजतां येण्यासारखीं इंग्रजी पुस्तकें आहेत; पण ह्या पुस्तकाइतकीं उद्बोधक, चर्चात्मक व स्वतंत्र विचार प्रकट करणारीं दोन तीनच असतील."

—प्रा. चिं. वि. जोशी

"प्रस्तुत चरित्रग्रंथांत बुद्धचरित्रासंबंधींच्या भरपूर नि व्यापक माहिती-बरोबरच एकप्रकारची तळमळ दिसते........मानवी संस्कृति सर्वस्वीं नष्ट होण्याचा क्षण आला असतांना बुद्धाच्या प्रेममय नि शांततामय मानवधर्माची शिकवण हाच एक मुक्तीचा नि चिरशांतीचा मार्ग दिसतो. अशा मार्गाचें विवरण करणारा हा ग्रंथ योग्य समयीं प्रकाशित होत आहे असेंच सर्वांस वाटेल."

—झंकार

"विचाराला प्रेरक असें हें ग्रंथरत्न प्रसिद्ध करणारी 'नवभारत ग्रंथमाला' खचितच अभिनंदनास पात्र आहे."

—अग्रणी